
म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. ६२२

REFBK-0023507
REFBK-0023507




म. ग्रं. सं. ठाणें
षय भू प्रवास
ं. क्र. ६22

सदंभ भूप्रवास
६२२
२३५०८
२७।७।८२

# मॅड मॅड अमेरिका

कॉन्टिनेन्टल

वि. वि. गोखले यांची इतर पुस्तके

उद्याचे जग

भावातीत ध्यान

ध्यानविद्या

# मॅड मॅड अमेरिका

वि. वि. गोखले
एम्. सीएच्. ई. (न्यूयॉर्क)
आय्. ए. एस्. (सेवानिवृत्त)

REFBK-0023507
REFBK-0023507

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पुणे ३०

प्रथमावृत्ती : १९८२

प्रकाशन क्रमांक : ९०८

किंमत रुपये १६–००

सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशक : अ. अ. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ३०

मुद्रक : शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ, पुणे ३०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२२
२३५०८
भूप्रवास २३/७/८२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# किती सांगू अमेरिकेच्या गमती ?

'अमेरिका' नावाचा एक चमत्कार आहे. त्या चमत्काराच्या सुरस कथा आणि विचित्र व्यथा सांगणारी ही कहाणी आहे. थोडी कडू आणि थोडी गोड, अमेरिकन पंडितांनी रंगविलेली, आणि भारतीय झरोक्यातून दिसणारी, चित्तथरारक आणि चित्तविदारक, परंतु साध्यासुध्या शब्दातली ही एक वैजयंतीमाला आहे.

हरिकथानिरूपण जितके रसाळ, तितकेच अमेरिकानिरूपण मधाळ आहे; कधीही न संपणारे, अद्भुत, असे हे आनंदाने, जल्लोषाने, आश्चर्याने, रंगलेले विषय आहेत. कधी व्हिएतनाम युद्ध, तर कधी इराणमधले ओलीस अमेरिकन; कधी निक्सनचे वॉटरगेट, तर कधी कार्टरचे बिली गेट; कधी घटस्फोटांचे उच्चांक, तर कधी सुखसमृद्धीचे शिखर ! अशा या वर्णनातून, वृत्तपत्रांचे मथळे व रकाने अमेरिकेने वर्षानुवर्षे फुलविले आहेत. या बाबतीत दुसरा कोणताही देश अमेरिकेची बरोबरी करू शकणार नाही; जगातील साऱ्या वृत्तपत्रांना इतके विविध, चवदार खाद्य दुसरा कोणताही देश देऊ शकलेला नाही !

त्यातून आता भारत–अमेरिका संबंधांमध्ये एक वेगळ्या प्रकारचा उच्चांक, १९८० व ८१ सालामध्ये गाठला गेला आहे. अंदाजे बावीस हजार भारतीय या १९८० सालामध्ये आणि जवळजवळ तितकेच १९८१ मध्ये अमेरिकेत

कायम वास्तव्य करण्यासाठी गेले, आणि अमेरिकन कायद्यात, आशियाई राष्ट्रासाठी राखून ठेवलेली मर्यादा या वर्षी पूर्णपणे भारताने गाठली. यापूर्वी कधीही इतकी मंडळी एका वर्षात भारतातून, अमेरिकेत कायम राहण्यासाठी गेली नव्हती !

कलकत्त्याला काका आहेत, अहमदाबादला व्याही आहेत, आणि मद्रासला जिगरदोस्त आहेत, एवढ्याशा वर्णनाने आता आपले भागत नाही; आपले जिव्हाळ्याचे क्षितिज आता रुंदावले आहे. डेट्रॉइटचा अनिल, ओटावाचा मधू, वॉशिंग्टनचा अवि, बर्कलीचा श्रीराम, टोरोंटोचा विष्णू, आणि न्यूयॉर्कचा प्रकाश, अशी मैत्रीची व जिवाभावाची मंडळी आजकाल सर्वदूर पसरलेली आहेत, असे आता पुण्या-मुंबईतले गुंड्याभाऊ आणि रंगूमावशी यांना वाटते

**विस्तारलेले ऋणानुबंध :**

आमच्या कुटुंबियांचे तर गेली कित्येक वर्षे अमेरिकेशी स्नेहसंबंध जुळून आलेले आहेत. तीन वेळा आम्ही दोघे अमेरिकेला जाऊन आलो.

न्यूयॉर्कची अरुणा, सुवर्णा आणि शोभा, ॲबॉयची एलिनॉर आणि येलची जूडी, अशा अनेकांच्या घरी जाऊन मी व माझी पत्नी, असे आम्ही दोघे मनसोक्त जेवलो आहोत; गप्पाष्टके केली आहेत. सॅनफ्रॅन्सिस्कोच्या परिषदेत मी निबंध वाचला. कॅलिफोर्नियात वास्तुशांतीला व गणेशचतुर्थीला मी पोथी वाचली; अमेरिकन दांपत्यांना मी ' भावातीत ध्यान ' ( टी. एम्. ) कॅलिफोर्नियात शिकविले; आणि चार तरुण अमेरिकन ध्यानशिक्षकांसह मी १९८२ मध्ये उस्मानाबाद, लातूर, व पुणे येथील १२ कॉलेजांतून १००० विद्यार्थ्यांसाठी ध्यानवर्ग घेतले ! तर १९४७ मध्ये अमेरिकेत विद्यार्थी असताना तेथे आम्ही हिंदी कारागिरीची प्रदर्शने भरविली; ते सारे आनंदाचे दिवस आम्हाला आठवतात.

१९४६ साली, म्हणजे ३६ वर्षांपूर्वी, अमेरिकेत भारत सरकारतर्फे उच्च शिक्षणासाठी मी प्रथम गेलो; न्यूयॉर्कमधील ब्रुकलिन पॉलिटेक्निकमधून मी मास्टर्स डिग्री ( केमिकल इंजिनिअरिंग ) घेतली, आणि माझ्या पत्नीने, सौ. चंपूताईनी, कोलंबिया विद्यापीठांतून बालशिक्षण या विषयात मास्टर्स डिग्री घेतली. आम्ही दोघांनी त्या वेळी ' किर्लोस्कर ', ' स्त्री ', आणि ' वसंत '

मासिकांतून अमेरिकेसंबंधी लेख लिहिले होते; आणि ' अमेरिकेत गुंड्याभाऊ ' या नावाने एक मासिक सदर किर्लोस्कर मासिकात मी कित्येक महिने चालवीत होतो. १९४८ साली आम्ही अमेरिकेतून परत आलो, तेव्हा ते सदर बंद केले.

त्यानंतर १९६९ साली, अमेरिकेतून हिंदुस्थानात २ वर्षे येऊ इच्छिणाऱ्या व शांतिसैनिक म्हणून काम करू इच्छिणाऱ्या अमेरिकन तरुणांना मराठी भाषा व संस्कृतीचा परिचय करून देण्यासाठी सौ. चंपू काही आठवड्यांसाठी अमेरिकेत गेली होती. १९७२ साली मी अमेरिकेत व कॅनडात गेलो, तेव्हा पुण्यातील ज्ञानप्रबोधिनी या संस्थेला, कॅनडातील एका संस्थेची मदत मिळवून देण्याची संधी मला मिळाली होती. १९७७ साली आम्ही दोघेही ६।। महिने कॅनडा व अमेरिकेत गेलो होतो. आमचे दोघे मुलगे अजित व संजय, त्या वेळी कॅलिफोर्नियात इंडस्ट्रिअल इंजिनिअर म्हणून काम करीत होते, व सून सौ. कल्पना तेथे होती, त्यांच्याकडे आम्ही राहिलो; व ओटावा, टोरोंटो, वॉशिंग्टन,न्यूजर्सी, येल, हार्टफोर्ड, न्यूयॉर्क, लॉस एंजल्स, फिलाडेल्फिया, अँबॉय, शिकागो, बोस्टन, अशा अनेक ठिकाणी आम्ही भारतीय व अमेरिकन, कॅनेडिअन कुटुंबांत राहिलो; मुंबई–पुण्यात असतानाही अनेक अमेरिकन मंडळी आमच्याकडे वेळोवेळी राहायला व भेटायला येत असत. १९७४ साली किर्लोस्कर मासिकाचा खास अमेरिका विशेषांक निघाला होता, त्यामध्येही मी व आमची मुलगी सुरंगा असा दोघांनी भाग घेतला होता. सुरंगाने १९७२ साली कॅलिफोर्निया विद्यापीठातून एम्. एस्. डिग्री घेतली; आमच्या घरचा योगायोग असा की– मी, सौ. चंपू, आमचे दोघे मुलगे व मुलगी अशा पाचही जणांनी अमेरिकेतील कोणत्या ना कोणत्या विद्यापीठाची मास्टर्स डिग्री संपादन केलेली आहे !

**मॅड मावशी :**

गेली पस्तीस वर्षे असा हा आमचा व आमच्या कुटुंबियांचा योगायोगाने अमेरिकेशी संबंध आला आहे. भारत आमची मातृभूमी तर अमेरिकेला मावशी म्हणण्याइतपत आमची प्रीती तिच्यावर जडून गेली. परंतु ही खट्याळ मावशी अशी काही बहुरूपिणी आहे, की कोणत्या शब्दांत तिचे वर्णन करावे असे

जबरदस्त प्रश्नचिन्ह डोळ्यांसमोर उभे राहते! १९७१ साली बंगला-देश युद्धाच्या वेळी सातवे आरमार बंगालच्या उपसागरात निक्सनच्या आदेशाने येऊ लागले, तेव्हा तर ही एक पूतनामावशी असल्याचा भास अनेक भारतीयांना झाला असेल.

खाष्ट मावशी, आचरट मावशी, रसीली, विद्वान, प्रतिभावान, हौशी, प्रेमळ, क्रूर, हावरट, व्यसनी मावशी, अशी हिची अनेक चित्रे पुढील प्रकरणांतून आपण पाहणार आहोत. आपण प्रेमाने एखाद्या मावशीला 'मॅड' म्हणतो, तशाच प्रेमातून 'मॅड, मॅड, अमेरिका' असे तिचे वर्णन मीही केले आहे; आणि अमेरिकेतही करतात; मावशीच्याच तोंडचा तो शब्द आहे.

किर्लोस्कर, स्त्री, महाराष्ट्र-टाइम्स, रविवार सकाळ, स्वराज्य, तरुण भारत यांत प्रसिद्ध झालेले माझे काही साहित्य, थोड्याबहुत फरकानंतर या पुस्तकात वापरू दिल्याबद्दल मी या सर्व संपादकांचा आभारी आहे; तथापि बरेचसे नवे साहित्य व अद्ययावत माहिती या पुस्तकात मी देण्याचा प्रयत्न केला आहे. अमेरिकेत जाऊ इच्छिणाऱ्यांसाठी शेवटचे प्रकरण उपयुक्त होईल असे वाटते.

**तडाखेबंद 'मॅड' मासिक :**

'टाइम', 'न्यूजवीक', 'रीडर्स डायजेस्ट', 'स्पॅन', अशा अनेक लोकप्रिय अमेरिकन नियतकालिकांचा, कित्येक वर्षे घेतलेल्या आस्वादाचा, माझ्या या पुस्तकासाठी मला उपयोग झाला; तसाच अनेक अप्रतिम अमेरिकन ग्रंथांचाही झाला. हे ऋण मी येथे नमूद करतो.

भारतात प्रसिद्ध होणाऱ्या 'स्पॅन' मासिकातून, बहुधा अमेरिकेची चांगली बाजू कौशल्याने मांडण्यात येते. तर 'टाइम' किंवा 'न्यूजवीक'-सारखी साप्ताहिके, अमेरिकेतील चांगल्या व वाईट अशा सर्वच अनंत घटनांमागचे उघडेनागडे सत्य मांडायला कधीच कचरत नाहीत. अमेरिकेत 'मॅड' नावाचे एक मासिक प्रसिद्ध होत असते, त्यामध्ये तर इतक्या खमंग, इरसाल विनोदी व्यंगचित्रांतून, अमेरिकन जीवनावर असे काही घणाघाती लगुडप्रहार करण्यात येतात, की काही विचारू नका! स्वतःवरच इतकी टीका इतक्या झकास नाविन्याने व हसतखेळत करणारा दुसरा देश जगात नसेल!

एखाद्या मासिकालाच 'मॅड' हे नाव देणारा हाच एक देश आहे. 'इट्स् ए मॅड, मॅड, मॅड, मॅड वर्ल्ड' या नावाचा चित्रपट निघाला तो याच देशातून. आणि चांगल्या व वाईट अशा सर्वच उपक्रमांमागे, मॅड माणसाच्या हिरीरीने धावण्याचा विक्रम याच मॅड-भूमीत नेहमी घडून येत असतो. अशा या मॅड देशाचे कौतुक मनोभावे करण्याचा एक मॅड प्रयत्न या पुस्तकात मी केला आहे.

कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे श्री. अनंतराव कुलकर्णी यांनी कसोशीने आणि कुशलतेने या पुस्तकाच्या प्रकाशनाचे काम पुरे केले, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. या पुस्तकाबद्दल मला जो मोबदला मिळेल, तो पुण्याच्या "ज्ञानप्रबोधिनी" या संस्थेला देण्यात येणार आहे.

**वि. वि. गोखले**

२१०७ सदाशिव, १४ विजयानगर

मार्च १९८२.

पुणे ३०

# अमेरिकन चर्पटपंजरी

‘ अमेरिका देश ’ हा विषयच इतका अद्‌भुतरम्य आहे की अनेक मान्यवर व्यक्तींनी, पुढाऱ्यांनी व विचारवन्तांनी, अमेरिकेसंबंधी मोठी गंमतीदार मुक्ताफळे वेळोवेळी उच्चारून, कशी छान खसखस पिकविलेली आहे; त्या चर्पटपंजरीचा हा पंधरा मुक्ताफळांचा लहानसा फेरफटका पुरा करून मग आपण पुढे वळू या —

अमेरिका देश कोठे वहावत चालला आहे, हे त्या देशाला कळत नाही; पण जेथे कोठे तो जाणार आहे,– ( मसणात का असेना )– तेथे जाण्याचा वेगाचा रेकॉर्ड मात्र तो मोडणार, असा त्या देशाचा निश्चय आहे !

**— लॉरेन्स जे. पीटर**

अमेरिका हा आजच्या जगातील सर्वांत बलाढ्य, सर्वांत श्रीमंत, आणि सर्वांत भयानक ( धोकेबाज ) देश आहे !

**— रॉबर्ट मेनार्ड हचिन्स**

अमेरिका हा जगाच्या इतिहासात एकच असा देश आहे, की जो रानटी अवस्थेतून ( मधल्या सुधारणेच्या व संस्कृतीच्या अवस्थेतून न जाता ) एकदम शेवटच्या अवनतीच्या व अधोगतीच्या अवस्थेलाच आश्चर्यकारक रीतीने जाऊन पोहोचला आहे !

**— पुढारी जॉर्जेस क्लीमेन्को**

अमेरिका म्हणजे एक चूक आहे, प्रचंड मोठी चूक आहे !

**– मानसशास्त्रज्ञ सिगमंड फ्रॉइड**

साऱ्या जगाने अमेरिकन जीवनाचा व अस्मितेचा कित्ता गिरवावा, अशा मिशनरी कल्पनेतून आपण सर्वांनी अमेरिका देशाला वाचविले पाहिजे; त्या कल्पनेतून अमेरिकेची सुटका केली पाहिजे ! अशा मिशनरी कल्पना, म्हणजे एक मोठा जागतिक धोका आहे.

**– नेहरू पारितोषिक विजेते समाजशास्त्रज्ञ गुनार मिर्डल**

सामान्य माणूस– मग तो काळा असो की गोरा असो– त्याच्यासाठी आजही अमेरिका हाच सर्वोत्तम देश आहे; इथे जर तो नशीब काढू शकला नाही, तर तो कोठेच काढू शकणार नाही.

**– विचारवन्त एरिक हॉफर**

आपल्या समस्या आजच्या दुप्पट काय पण तिप्पट जरी झाल्या, तरीही आपला देश जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा आघाडीवरच राहील !

**– १९८१ चे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रीगन**

अमेरिका हा आजही अत्यंत श्रीमंत असा आपला देश आहे; जे अपयश दिसून येत आहे, ते नैतिक क्षेत्रातील आहे; निर्मळ अंतःस्फूर्तीच्या क्षेत्रातील आपले अपयश आहे.

**– अमेरिकेतील एक गव्हर्नर जेरी ब्राऊन**

अमेरिकेत खूप समस्या आहेत हे खरे; पण त्या सोडविण्याइतपत भरपूर बुद्धी, साधने व ताकद आपल्यापाशी आहे, ही त्यातली चांगली गोष्ट आहे.

**– कारखानदार हेनरी फोर्ड ( ज्यूनिअर )**

अमेरिकेत च्युइंग गम खाण्यासाठी जितका पैसा खर्च होतो, त्यापेक्षा अधिक पैसा जेव्हा पुस्तके घेण्यासाठी खर्च होऊ लागेल, त्याच वेळी अमेरिका सुसंस्कृत होऊ लागली, असे म्हणता येईल.

**– एलबर्ट हबर्ट**

'अमेरिकॅनिझम' म्हणजे काय हे मला माहीत नाही; पण निवडणूक जिंकायला हा शब्द खरोखरी मोठा झकास व सुरेख आहे.

— वॉरेन हार्डिंग

आपण परदेशात कारस्थाने करून, खोटे बोलून, फसवून, खूनही करण्याचे राजकारण खेळायचे, आणि अमेरिकेत आपण विश्वासू, दयाळू, प्रतिष्ठित नागरिक आहोत, असा टेंभा मिरवायचा, हे कसे काय शक्य आहे ?

— अमेरिकन लेखक आर्चिबाल्ड कॉक्स

आफ्रिकेतील चेटकिणींचे प्रयोग पाहून अमेरिकन नागरिक त्या जुनाट वैद्यकीची व अंधश्रद्धेची चेष्टा करतात, आणि हीच अमेरिकन मंडळी वजन कमी करण्यासाठी घेण्याच्या तथाकथित औषधांवर व उपकरणांवर अंधश्रद्धेने दहा कोटी डॉलर्स दरवर्षी खर्च करीत असतात ( म्हणजे ८० कोटी रुपये ! )

— लिओनार्ड लेव्हिनसन

जगातील फक्त ६ टक्के लोकसंख्या अमेरिकेत आहे, पण जगातली अर्धी संपत्ति या ६ टक्के लोकांच्या हातांत आहे. रोज जेवढ्या अन्नाची जरुरी आहे, त्याच्या ७२ टक्के अधिक अन्न ही ६ टक्के मंडळी खाऊन फस्त करतात; पण उरलेल्या ९४ टक्क्यांपैकी दोन-तृतीयांश जनतेला जरुरीपेक्षा कमी आहारात भागवावे लागते, आणि कित्येकांची तर उपासमार होत असते.

— पाद्री मिचेल अँडरसन, सॅक्रॅमेंटो, कॅलिफोर्निया

कायदा, सुव्यवस्था, अमेरिकेची घटना, सुप्रीम कोर्ट, दया, आणि बुद्धिवाद यांपैकी कशाच्याही विरुद्ध आरडाओरड, किंवा हिंसक निदर्शने करायची असतील, तर अमेरिकेत केव्हाही तीस लक्ष माणसे गोळा करणे कठीण नाही.

— जॉन केनेथ गॅलब्रेथ ( भारतातील पूर्वीचे राजदूत )

जुने टाकून देऊन नवे घेत राहणे, आणि उठसूट यंत्रे वापरून सारे जीवन यंत्रमय करणे, यालाच अमेरिकन मंडळी "प्रगति" असे नाव देतात.

— लुई ममफोर्ड

## अनुक्रमणिका


१ मॅड मॅड अमेरिका ... १

२ अमेरिकेत गुंज्याभाऊ ... २४

३ भोजनभाऊंची मिष्ठास कहाणी ... ३७

४ चंदेरी, सोनेरी कॅलिफोर्निया ... ४८

५ घटस्फोट पाहावा घेऊन ... ६६

६ पदयात्रेतून समाजसेवा ... ८१

७ या, सुखांनो या ... ८५

८ अमेरिकेतील हिंदू मंदिरे ... १०५

९ अनेक गुरू व नाना पंथ ... ११२

१० गंमतशाही आणि हिंसाकाण्ड ... १२६

११ अमेरिकेत जाऊ इच्छिता का ? ... १४६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२२
23५0८
भूप्रवास 23/अत्रे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

: १ :

# मॅड मॅड अमेरिका

अमेरिका म्हणजे खरोखरी एक गहजब आहे ! अगदी फॅब्युलस, फन्टास्टिक, फन्टॅबुलस असा हा देश आहे !

इथल्या चतुरंग श्रीमंतीच्या नवलकथा ऐकत राहणे, म्हणजे आनंदाची एक पर्वणी आहे. अमेरिकन माणसाचे चित्रविचित्र छंद, त्याचे मनमोकळे हास्य आणि मैत्री, आणि त्याचे अनंत उपद्‌व्याप यांनी अमेरिकन जीवनात एक अपूर्व रंग भरलेला आहे.

अमेरिकेतील रॉक अँड रोल आणि मुष्टियुद्धे, तिथला रंगीत टी. व्ही. आणि रंगीत राजकारण, तिथली फॅड्स आणि फॅशन्स, गडगंज कारखानदारी आणि अफाट शेती, डिसनेलॅंड आणि वेधशाळा, घटस्फोट, व्यसने आणि गुन्हेगारी– अशी सारी अमेरिकन सृष्टी अत्यंत अद्‌भुत आहे ! शब्द थिटे पडावेत, अशी ही मोहमयी यक्षभूमी आहे. एकेक मजेदार किस्से आणि विस्मयकथा ऐकू लागलात तर पुनवेची सारी रात संपून जाईल, पण या सुरस आणि चमत्कारिक कथांची अमृतधारा संपणार नाही !

साऱ्या जगातील माणसांनी येऊन, संपूर्णपणे मोकळ्या पडलेल्या या अवाढव्य देशामध्ये दीड-दोनशे वर्षांत एक अतिबलाढ्य, अतिश्रीमंत, आणि अतिप्रसिद्ध राष्ट्र निर्माण करावे, या विलक्षण घटनेला जगाच्या इतिहासात दुसरी तोड नाही. अमेरिकेची जन्मकथा भरघोस, भरधाव आणि खरोखरी अद्भुतरम्य अशी आहे; अमेरिकेतील आजचे विक्रम, आणि आजच्या समस्याही तितक्याच रोमांचकारक आहेत. इतकी सांगण्यासारखी, आणि इतकी दिलबहार, इतकी मनोरंजक कहाणी, दुसऱ्या कोणत्याही देशाला लाभलेली नाही.

अनंत, विविध क्षेत्रांतील सुखदुःखांचे कडेलोट पाहावेत तर ते अमेरिकेतच. कुत्र्यामांजरांच्या खाद्यापासून, मंगळ-शुक्रावरील उड्डाणापर्यंत झेप घेणारी अनेक कार्यक्षेत्रांतली मनस्वी प्रयोगशीलता, जिद्द आणि बेगुमान खर्च पाहावा तर तो अमेरिकेतच. जगातील साऱ्या राष्ट्रांतील खाद्यपेये चाखण्याची व कारागिरी पाहण्याची व घेण्याची संधी इथे मिळते; तशीच साऱ्या भाषा शिकण्याची, साऱ्या राष्ट्रांतील सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक विद्यांचा सांगोपाङ्ग अभ्यास आणि उपासना करण्याची मनमुराद हौस याच देशात भागवावी.

एकतीस प्रकारचे आइस्क्रीम सर्वत्र सुलभतेने याच देशात मिळू शकते; आणि विवाह व बिनविवाह, घटस्फोट व सहजीवन यांचे एकतीस प्रकार याच देशात सुलभतेने दिसतात.

" सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते " असे एक संस्कृत सुभाषित आहे; म्हणजे पैसे असले की सारे गुण त्या व्यक्तीला चिकटतात, किंवा चिकटविता येतात. अमेरिकेचे जरा वेगळ्या अर्थाने असेच काही तरी झाले आहे. अमेरिकेत बारा महिने दिवाळी असते, बारा महिने पैशाचा पाऊस पडत असतो, असे म्हणता येईल. आणि या पावसाने अथांग भिजलेल्या या स्वर्गभूमीतून, अनंत प्रकारची फळफळावळ, धनधान्ये, आणि डेरेदार वनराई जशी डवरून येते, त्याचप्रमाणे अफाट शस्त्रास्त्रे, अजब करमणूक, चौसष्ट कला व विज्ञाने, व विचित्र व्यसने यांची बरीवाईट रोपटीही जोमाने वाढतात !

ॲक्युपंक्चरपासून झेनपर्यंत—ए टु झेड—साऱ्या नव्याजुन्या विद्यांमध्ये पारंगत होण्याचा हव्यास धरणारा, त्यासाठी वेळ, पैसा, व परिश्रम खर्च करू शकणारा, मानवाचा अजब नमुना या अमेरिकेतच प्रकर्षाने पाहायला मिळतो.

म्हणूनच गेल्या पस्तीस वर्षांमध्ये साऱ्या जगातली निम्म्याहून अधिक नोबेल पारितोषिके पटकावण्याचा बहुमान अमेरिकेत पंडितांनी, अनेक क्षेत्रांतून सातत्याने राखला आहे.

गेल्या महायुद्धानंतर युरोपच्या पुनर्वसनासाठी कोट्यवधी डॉलर्स खर्च करून अमेरिकेने एक जागतिक उच्चांक गाठला ! १९६६ च्या दुष्काळात भारताकडे फारच मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याच्या बोटी पाठवून, त्यातही एक जागतिक उच्चांक अमेरिकेने साधला, यात शंका नाही. आणि व्हिएतनाम-सारख्या छोट्या देशावर जो अगणित बॉम्बवर्षाव अमेरिकेने वर्षानुवर्षे चालू ठेवला, त्यातही एक अपूर्व असा जागतिक उच्चांक अमेरिकेने प्रस्थापित केलेला आहे ! तीस हजार कोटी रुपये खर्च करून, चंद्रावर पहिला मानव उतरविण्याचा बहुमान याच देशाला मिळाला; आणि १९८१ मध्ये अंतरिक्षयानासकट ( कोलंबिया यान ) पृथ्वीवर परतण्याचा पहिला विक्रम याच देशाने केला.

इथे बेबंद, बेछूट वृत्ती जितकी मोकाट सुटली आहे, तितकीच सनातनी, कुढी वृत्ती आणखी हट्टी झाली आहे. संपत्तीचे उत्पादन व वापर जसा बेसुमार वाढला आहे, तसाच संपत्तीचा विध्वंस आणि नासाडीही फुगत चालली आहे. युरोप आणि अमेरिका मिळून जे पुढारलेले औद्योगिक देश आहेत, त्यांतील फक्त २८ टक्के लोकसंख्या अमेरिकेत आहे; पण त्या सर्व देशांतून जितके एकूण क्रूड ऑइल वापरले जाते, त्यातले सत्तर टक्के एकट्या अमेरिकेतच वापरून फस्त केले जाते; आणि त्याची आयात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नोटा छापून, अमेरिकन सरकारला तुटीचे अंदाजपत्रक दरवर्षी सादर करावे लागते. गेल्या तीन वर्षांत ( १९७७ ते १९८० पर्यंत ) अमेरिकेतील पेट्रोलच्या किंमती दुप्पटीने वाढल्या म्हणून ते तक्रार करतात; पण युरोपमध्ये वर्षानुवर्षे अमेरिकेच्या दुप्पट किंवा तिप्पट भावाने पेट्रोल विकले जात आहे.

## बेसुमार उधळपट्टीचा देश :

लॅन्स मॅरो या अमेरिकन पत्रपंडिताने अमेरिकेतील पेट्रोलच्या आणि सर्वच वस्तूंच्या उधळपट्टीचे मोठे सुरेख वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे :

" वातानुकूलित प्रचंड स्टेशनवॅगनच्या कॅरिअरवर, इंजिनयुक्त पडाव बांधून, अमेरिकन कुटुंबे शंभर मैलांपलीकडल्या सरोवराकडे जातात, आणि

शक्तिशाली इंजिने चालवून त्या पडावातून मनसोक्त नौकाविहार करतात. अजस्र आकाराची सुपरमार्केट्स संपूर्णपणे वातानुकूलित असतात. तेथे जाऊन जरुरीच्या आणि बिनजरुरीच्या भरमसाट वस्तू खरेदी करतात. त्या वस्तू वापरून झाल्या की, काचेच्या, प्लॅस्टिकच्या व जाड पुठ्ठ्याच्या रिकाम्या बाटल्या व डबे सरळ फेकून देतात. घरामध्ये फ्रीज, डिश-वॉशर, मायक्रोवेव्ह ओव्हन, वॉशिंग मशिन, एअरकंडिशनर अशा सर्व वस्तू एनर्जी जाळीत असतात. टुमदार बागांची विस्तृत पसरलेली घरे, कारखाने, मार्केट्सही आता (गर्दी व प्रदूषण टाळण्यासाठी) एकमेकांपासून इतकी दूरवर पसरली आहेत की, रोज शेकडो मैल मोटर चालविणे अपरिहार्य झालेले आहे. अन्नाची, ऊर्जेची व वस्तूंची इतकी उधळपट्टी व नासाडी करणारा जगात दुसरा कोणताही देश नाही. अन्नासकट या देशात ज्या शेकडो वस्तू रोजच्या रोज फेकून दिल्या जातात, त्यातूनच काही छोट्या राष्ट्रांचा संपूर्ण उदरनिर्वाह भागू शकेल, अशी वस्तुस्थिती आहे!"

ओहायो राज्याचे माजी गव्हर्नर जॉन गिलिगन हे मध्यंतरी जागतिक आन्तरराष्ट्रीय विकास संस्थेचे (एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेन्ट) अध्यक्ष होते. अमेरिकेतील उधळपट्टीच्या सवयी आणि गरीब देशातली उपासमारी, यांच्या विषमतेने व्यथित होऊन, त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अमेरिकन जनतेला उद्देशून जे विषण्णतेचे उद्गार काढलेले आहेत, ते खरोखरी संस्मरणीय आहेत. ते म्हणतात : नेवाडा राज्यामध्ये जुगार खेळून एकाच वर्षात अमेरिकन नागरिक जितके पैसे घालवितात, किंवा उधळून टाकतात, तितकासुद्धा पैसा गरीब राष्ट्रांच्या विकासासाठी आपण अमेरिकेतून दरवर्षी देऊ शकत नाही!

जगामध्ये अर्धपोटी जगणारी ६० कोटी माणसे अनेक गरीब देशांतून आहेत. त्यांना सकस आहार व आरोग्य मिळविण्यासाठी अमेरिकेतर्फे जी आर्थिक मदत दरवर्षी खर्च होते, त्यापेक्षा किती तरी अधिक रक्कम दरवर्षी अमेरिकेतील कुत्र्यांना देण्यात येणाऱ्या अन्नावर खर्च होत असते. अशी ही विषमता व बेपर्वाई लांछनास्पद आहे, आणि तिची दखल अमेरिकन जनतेने घेतली पाहिजे, असे त्यांना वाटते. पण प्रेसिडेन्ट रेगन आल्यानंतर ह्या मदतीत आणखी कपात करून, लष्करी खर्च मात्र वाढला आहे!

गंमत अशी आहे की, गरीब देशांना मदत करण्यात खुद्द अमेरिकन

राष्ट्राचाही स्वतःचा फायदाच होत असतो, हे पुष्कळांच्या नीट लक्षात येत नाही. पण त्यासंबंधी अभ्यासयुक्त आकडेवारी मात्र चांगल्या रीतीने प्रसिद्ध झालेली आहे. फ्रँक ट्रिपेट या पत्रपंडिताने थोडक्यात असा गोषवारा काढलेला आहे की, एक डॉलरची मदत अमेरिकेने आन्तरराष्ट्रीय विकासनिधीत जमा केली, की त्याच्या बदल्यात दोन डॉलर्सच्या ऑर्डर्स अमेरिकन कंपन्यांना आणि तंत्रज्ञांना गरीब राष्ट्राकडून मिळत असतात. दुसरा एक असा अभ्यास प्रसिद्ध झालेला आहे की, जागतिक बँकेच्या निधीमध्ये अमेरिकेने एक डॉलर जमा केला, की कॉंट्रॅक्ट मिळणे, उपक्रम चालू ठेवणे आणि व्याजापोटी, अशी जवळजवळ साडेनऊ डॉलर्सची परतफेड अमेरिकेच्या अर्थकारणाला त्यामुळे होत असते. असे हे जे अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष फायदे अमेरिकेला होतात ते तिथल्या विचारवंतांना व समंजस राजकीय पुढाऱ्यांना पटलेले आहेत, पण सामान्य जनतेमध्ये मात्र "गरीब देशांना मदत करून आपण त्यांच्यावर उपकारच करीत आहोत. जी राष्ट्रे अमेरिकेच्या विरुद्ध बोलतात व वागतात, त्यांना तर मुळीच मदत करू नये," अशा प्रकारची भावना बहुधा दिसून येते !

लाखो रुपयांची अन्नधान्याची मदत दुष्काळामध्ये भारताला अमेरिकेने केली, हे खरे आहे; पण सुसन जॉर्ज या अमेरिकन विदुषीचे म्हणणे असे की, "संपूर्ण आढावा घेतला, तर असे दिसते की, ९३ टक्के उत्पादन गरीब राष्ट्रांतून होतच असते. सुमारे सात टक्क्यांची परदेशी मदत, अमेरिकेसारख्या राष्ट्रांकडून या गरीब राष्ट्रांना मिळालेली आहे; आणि पुष्कळ वेळा हे धान्य मदतीऐवजी बाजारभावाने अमेरिकेने विकलेलेच आहे; किंवा त्या विक्रीतून मिळालेल्या पैशातून मुंबईतील शेरॅटन हॉटेलसारख्या उपक्रमांना अप्रत्यक्षपणे भांडवल मिळालेले आहे, व त्यामुळे अमेरिकन कंपन्यांचा फायदाच झालेला आहे. शिवाय धान्यविक्रीमुळे अमेरिकेतील खूप धान्यकोठारे मोकळी झाली, धान्य साठविण्याचा खर्च वाचला, नव्या धान्योत्पादनाला चालना मिळाली, आणि धान्यवाहतुकीचा मोठा व्यापार मिळून अमेरिकन जहाज कंपन्यांनाही चांगला फायदा झाला.

१९६९ ते १९७२ या तीन वर्षांमध्ये, श्रीमंत राष्ट्रांनी मनात आणले असते, तर नऊ कोटी टन अधिक धान्य पिकविणे त्यांना सहज शक्य होते; पण धान्याचे भाव खाली येतील, म्हणून ते न पिकविण्याचे त्यांनी ठरविले.

शेतकऱ्यांना अधिक धान्य न पिकविता, आपापल्या जमिनी ओसाड, पडित ठेवून द्याव्यात, म्हणून १९७३ या एकाच वर्षात अमेरिकन शासनाने त्या शेतकऱ्यांना ३०० कोटी डॉलर्स ( २५०० कोटी रुपये ) फुकट सबसिडी म्हणून वाटले !

सुसन जॉर्ज शेवटी असे म्हणते की, गुरांना व कुत्र्यामांजरांना मानवी अन्न खायला घालून, त्या गुरांचे मांस वाजवीपेक्षा फार अधिक प्रमाणात खाऊन, आणि उत्तम शेतजमिनी ओसाड पाडून ठेवून, श्रीमंत राष्ट्रांनी मानवतेविरुद्ध मोठा गुन्हा केला आहे; सुप्रसिद्ध फ्रेंच शास्त्रज्ञ रेने द्युमाँ यांच्या जळजळीत शब्दात सांगायचे, तर "बांगला देश, इथिओपिया, आणि साहल या देशांतून दुष्काळ व उपासमारीने हजारो बालके पटापट मृत्युमुखी पडली, असे म्हणण्याऐवजी, श्रीमंत राष्ट्रांतील उधळपट्टी करणाऱ्या, स्वार्थी आणि अधाशी नागरिकांनी या बालकांना गिळले,—खाऊन फस्त केले, असे म्हणणे अधिक सयुक्तिक होईल ! आणि २००० साल उजाडले, तरी वर्षानुवर्षे, गरीब देशांतील भुकेकंगाल बालकांना 'खाण्याचे' रानटी कृत्य, श्रीमंत अमेरिकन असेच चालू ठेवणार आहेत. त्यांचा नागडा स्वार्थ हेच जागतिक उपासमारीचे खरे कारण आहे !"

**बहुराष्ट्रीय कंपन्यांची साम्राज्यशाही व गुन्हेगारी :**

एक अगदी वेगळ्या चिंतेची बाब, म्हणजे काही बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या ( मल्टिनॅशनल ) उलाढालींमुळे होणारे गरीब राष्ट्रांचे नुकसान व ससेहोलपट ! "अमेरिकन कारखानदारीचा या शतकातला हा सर्वात मोठा गुन्हा आहे," अशा कठोर शब्दांमध्ये, सॅनफ्रॅन्सिस्कोच्या 'मदर जोन्स' या मासिकाने या नव्या संकटाची व गुन्हेगारीची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे :

मानवी आरोग्याला फार विघातक असलेली काही कंपन्यांची निवडक औषधे, जंतुघ्न रसायने (पेस्टिसाइड्स ), आणि काही संततिप्रतिबंधक साधने, यांना अमेरिकेत मज्जाव करण्यात आला. अमेरिकन सरकारच्या फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन व इतर हितकारी संस्थांतर्फे, अशा या मज्जावाला पूर्ण पाठिंबा देण्यात आला. परंतु अशा या विषारी औषधांची व रसायनांची गरीब देशांमध्ये मात्र अद्यापही निर्यात चालू आहे, व त्या निर्यातीला

अमेरिकन सरकार मज्जाव न करता, उलट या कंपन्यांना सर्वतोपरी साहाय्यच करीत आहे, असे ' मदर जोन्स ' या मासिकाने सप्रमाण वेळोवेळी सिद्ध केले आहे !

पाऱ्याचे एक रसायन-जंतुघ्न वापरलेला ८००० टन गहू व इतर धान्य इराकला १९७२ साली पाठविण्यात आले, त्यामुळे ४०० इराकी माणसांचे मृत्यू ओढवले. फॉसवेल नावाचे अत्यंत विषारी जंतुघ्न इजिप्तला पाठविणे चालूच राहिले होते, त्यामुळे काही वर्षांपूर्वी इजिप्तमध्ये एक हजाराहून अधिक म्हशी मेल्या ! यू. एस्. एड. या संस्थेतर्फे १९७४ साली ४ कोटी रुपये खर्चून, भारत व पाकिस्तानसकट अनेक गरीब राष्ट्रांकडे फॉसवेल व इतर विषारी जंतुघ्नांची निर्यात करण्यात आली. डालकॉन शील्ड नावाच्या संततिप्रतिबंधक लूपमुळे १९७४ साली १७ मृत्यू ओढवले, आणि २ लक्ष स्त्रियांना गर्भाशयाची बाधा झाली. १९७५ साली त्यावर बंदी घालण्यात आली; परंतु गरीब राष्ट्रातील त्याचा प्रचार चालूच राहिला, त्यामुळे या गरीब राष्ट्रांतील ४॥ लक्ष स्त्रिया अद्यापि हे लूप-साहित्य वापरीत आहेत.

डेपो-प्रोव्हेरा नावाचे एक संतति-प्रतिबंधक इंजेक्शन घेतले की ३ ते ६ महिने गर्भ-धारणा होत नाही, असे अपजॉन कंपनीने प्रसिद्ध केले, आणि ७० देशांमध्ये ५० लक्ष स्त्रियांवर प्रयोग केले. वंध्यत्व आणि कॅन्सर त्यातून निर्माण होऊ शकतो, असे दिसून आल्यावर १९७८ साली अमेरिकेत त्याच्या उत्पादनाला व विक्रीला बंदी घालण्यात आली; मात्र इतर राष्ट्रांत अद्यापही त्याचा वापर कसा चालू आहे, त्याची सविस्तर हकिगत ४ मे १९८० च्या ' इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया 'मध्ये आलेली आहे.

गरीब राष्ट्रांनीच अत्यंत जागरूक राहून अशा विषारी व घातक औषधींना व उपकरणांना मज्जाव करावा; केवळ फुकट मदत मिळते म्हणून ही अमेरिकन मदत स्वीकारू नये, असे अमेरिकन हितकारी संस्थाच आता बजावू लागल्या आहेत !

## धूम्रपानाच्या साथीची अमेरिकेतून निर्यात !

" टायफॉइड, कॉलरा, क्षय यांच्या साथीने पूर्वी माणसे खूप मरत असत; तशीच धूम्रपानाची ही साथ आहे. ही साथ थोपविता येईल,

व त्यामुळे कॅन्सरचे हजारो मृत्यू टाळता येतील !" असा जबरदस्त प्रचार युरोप-अमेरिकेतील डॉक्टरांनी सुरू केल्याने अमेरिकेत पुरुषांचे धूम्रपानाचे प्रमाण गेल्या दहापंधरा वर्षांत थोडेसे कमी झाले आहे; परंतु ही कमी झालेली विक्री भरून काढण्यासाठी, अमेरिकेतील मोठ्या आन्तरराष्ट्रीय कंपन्यांनी आता गरीब व अविकसित देशांतून धूम्रपान प्रसाराचा व सिगारेट विक्रीचा धडाका सुरू केला आहे; आणि अमेरिकन सरकार या स्वार्थी कंपन्यांना संपूर्ण प्रोत्साहन देत आहे, असा गंभीर आरोप वॉल्टर रॉस या अमेरिकन पंडिताने केलेला आहे. अमेरिकन कॅन्सर सोसायटीतर्फे 'वर्ल्ड स्मोकिंग अँड हेल्थ' जर्नल प्रसिद्ध होत असते. त्याचा संपादक म्हणून वॉल्टर रॉस काम करतो. मार्लबरो, केन्ट, कूल, चेस्टरफिल्ड अशा कंपन्या अमेरिकेत सिगारेट तयार करून खपवितात, त्यात फक्त १७॥ मिलिग्रॅम डांबर असू शकते, असा अमेरिकेत कायदा आहे; पण फिलिपाइन्समध्ये या सिगारेट विकतात, तेव्हा त्यात ३२ मिलिग्रॅम डांबर असते, व 'सिगारेट आरोग्याला हानिकारक आहे' असे पाकिटावर छापण्याचे बंधनही नसते !

१७०० कोटी रुपयांच्या सिगारेट व तंबाखू, केवळ १९७९ या एका वर्षांत अमेरिकेने परदेशांत निर्यात केली (रीडर्स डायजेस्ट, जुलै १९८०). या व्यापारासाठी अमेरिकन सरकार व या कंपन्या खूप सवलती देतात; कारण सरकारलाही अबकारी करांचे खूप उत्पन्न मिळत असते. ब्राझील, मालावी, टांझानिया, केन्या, मलेशिया, झांबिया, अशा अनेक देशांतून तंबाखू पिकविण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जे देणे, त्यांचा माल विकत घेणे, त्या सरकारांना उत्पन्ने मिळवून देणे, यासाठी जागतिक बँक, आणि अमेरिकन कंपन्या दुर्दम्य उत्साहाने काम करीत असतात ! त्यामुळे या अविकसित देशांतून मृत्यू व रोगराई वाढत आहे, व अमेरिकन कंपन्या मात्र गबर होत आहेत. हे सारे काही लांच्छनास्पद आहे, असे वॉल्टर रॉस म्हणतो. कॅन्सर सोसायटीने त्यासाठी मोठी मोहीम हाती घेतली आहे.

**सूर्य कधी मावळत नाही, अशा कंपन्या :**

या मल्टिनॅशनल कंपन्यांची ताकद व प्रभाव किती प्रचंड असते, त्याची थोडीशी चुणुक किंवा कल्पना पुढील आकड्यांवरून वाचकांच्या लक्षात येऊ शकेल.

जनरल मोटर्स या सुप्रसिद्ध कंपनीचा वार्षिक विक्रीचा आकडा पाहिला, तर बेलजिअम किंवा स्वित्झर्लंड या देशाच्या संपूर्ण राष्ट्रीय उत्पादनापेक्षा, तो आकडा मोठा आहे ! आणि जगभर अनेक देशांतून या जनरल मोटर्ससारख्या कंपन्यांचे जे आर्थिक जाळे कोळयाच्या जाळयासारखे पसरलेले असते, त्याचा प्रभाव त्या त्या देशातिल राजकारणावरही पडत असतो.

अमेरिकन सरकारची स्वतःची ताकद कमी होऊ लागली आहे. पण या मल्टिनॅशनल कंपन्यांची ताकद व पसारा जगभर वाढू लागला आहे, असेही म्हणण्यात येते.

ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नाही, असे पूर्वी अभिमानाने ब्रिटिश माणूस सांगत असे. आता ब्रिटिश सम्राज्यावर सूर्य मावळतो, पण आय्. बी. एम्., युनिलिव्हर, व्होक्स्वॅगन व हिताची अशा जगड्व्याळ पसरलेल्या कंपन्यांच्या साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नाही, असे सांगण्यात येते.

खाजगी कंपन्या या बोलून चालून फायद्यासाठीच व्यवहार करीत असतात. पण अमेरिकन सरकार गरीब राष्ट्रांसाठी काय करीत असते ?

सिगारेट–दारू–जुगारापासून, खाजगी मोटरी, विमाने, बोटींपर्यंत अनेक चैनींवर उदंड पैसा उधळणारी, आणि साध्या पिस्तुलापासून भयानक शस्त्रास्त्रांपर्यंत बेफाट पैसा जाळून टाकणारी अमेरिका गरीब देशांच्या मदतीसाठी योग्य प्रमाणात खर्च करते का, हा एक महत्त्वाचा निकष आहे. पिअरसन समिती आणि संयुक्त राष्ट्रसभेने या योग्य प्रमाणाचे दंडक घालून दिलेले आहेत. राष्ट्रीय एकूण उत्पन्नाच्या ( G. N. P. ) $\frac{3}{4}$ टक्का गरीब राष्ट्रांसाठी खर्च करावा, असा हा दंडक आहे. पण सोळा श्रीमंत राष्ट्रांच्या मालिकेत अमेरिकेचा खालून १४ वा नंबर लागतो !– कारण अमेरिका फक्त आपल्या उत्पनाच्या पाव टक्का मदत करते. कॅनडा, हॉलंड, नॉर्वे, स्वीडन, ऑस्ट्रेलिया फ्रान्स व अरब राष्ट्रे अमेरिकेपेक्षा किती तरी अधिक प्रमाणात मदत करतात. अशी वस्तुस्थिती आहे; आणि वर्ल्ड बँकेचा अध्यक्ष मॅकनमारा याने आपल्या अध्यक्षीय भाषणात याबाबत दरवर्षी अमेरिकेसंबंधी खेद व्यक्त केला होता ! पुन्हा-पुन्हा अमेरिकेला ठपका दिला होता. पण अमेरिकन सरकारने ही मदत वाढवून दिली नाही. उलट प्रेसिडेन्ट रेगन त्या मदतीत कपात करीत आहेत.

**गरीब राष्ट्रांचीच अमेरिकेला मदत :**

याहीपुढे जाऊन असे म्हणता येईल की, अमेरिका गरीब राष्ट्रांना जितकी मदत करते त्याहीपेक्षा गरीब राष्ट्रे अमेरिकेला जी मदत करतात त्या रकमेचा आकडा अधिक मोठा आहे ! आणि असा हा आश्चर्यकारक निष्कर्ष कोणी आलतूफालतू किंवा चक्रम अर्थशास्त्रज्ञाने काढलेला नसून, युनायटेड नेशन्स ( संयुक्त राष्ट्रसभा ) सारख्या जागतिक भारदस्त संस्थेच्या एका अभ्यासगटाने अंकटॅड ( UNCTAD ) या शाखेतर्फे १९७८ साली प्रसिद्ध केलेला आहे.

अदमासे पंधरा लक्ष भारतीय देशाबाहेर काम करण्यासाठी गेले, त्यांतली साडेअकरा लक्ष मंडळी इंग्लंड–अमेरिकेसारख्या श्रीमंत पश्चिमी देशांतच गेलेली आहेत. डॉक्टर व एंजिनियर आपल्या देशात शिकून तयार होतात, तेव्हा त्यांच्यासाठी शिक्षणसंस्थांना व पालकांना बराच खर्च येतो. प्रत्येक डॉक्टर-मागे दरडोई ९०,००० ते १३५,००० रुपये खर्च होतो, असा दोन विद्या-पीठांचा अंदाज आहे. परंतु त्यांची सेवा आपल्या देशातील जनतेला उपलब्ध न होता इंग्लंड–अमेरिकेला मात्र काही खर्च ( शिक्षणापायी ) न करता फुकटात डॉक्टर मिळत असतो. अशा या ‘ ब्रेन-ड्रेन ’मुळे गरीब राष्ट्रांचे नुकसान, व श्रीमंत राष्ट्रांचा फायदा होतो. एक एंजिनिअर इंग्लंड अमेरिकेत जाऊन काम करू लागला की, भारताचे बत्तीस हजार डॉलर्सचे ( अडीच लक्ष रुपयांचे ) नुकसान होते, असा युनो संस्थेचा अंदाज आहे. गरीब राष्ट्रांतील संस्थांमधून शिकून तयार झालेले डॉक्टर, एंजिनियर, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ इत्यादी जितकी मंडळी इ. स. १९७० या एकाच वर्षात अमेरिकेत जाऊन एकूण स्थायिक झाली, त्यांच्यामुळे अमेरिकेचे उत्पन्न त्या साली तीन हजार कोटी रुपयांनी वाढले व गरीब देशांचे तितकेच उत्पन्न बुडाले, असा यूनोने व्यक्त केलेला अंदाज आहे. याउलट त्याच १९७० साली अमेरिकेने गरीब राष्ट्रांना जी अधिकृत एकूण मदत केली, तिची किंमत पंचवीसशे कोटी रुपये भरते. तेव्हा गरीब राष्ट्रेच आपले तंत्रज्ञ व डॉक्टर्स विनामूल्य व स्वखर्चाने पुरवून अधिक मदत अमेरिकेलाच करीत असतात असा हा सरळ निष्कर्ष आहे !

यावर असा उलट युक्तिवाद करण्यात येतो की, परदेशी गेलेले तंत्रज्ञ

मायदेशाकडे मनीऑर्डरी पाठवीत असतात; त्यामुळे गरीब राष्ट्रांची आर्थिक परिस्थिती सुधारते. अरबी आखातातून जो अविच्छिन्न मनीऑर्डरींचा प्रवाह गेली काही वर्षे वहात राहिला, त्यामुळे भारताची परदेशी चलनाची समस्या कमी तीव्र झाली, यात शंकाच नाही. शिवाय असेही म्हणता येईल की, भारतामध्ये ३० टक्के इंजिनीअर बेकार राहू शकतात, व राहतात. त्यापेक्षा त्यांना परदेशांत नोकरी मिळणे अधिक श्रेयस्कर नाही का ?

परंतु हे मुद्दे ‘ यूनो ’ला पटलेले नाहीत. गरीब देशांतून शिक्षण मिळालेले डॉक्टर्स व एंजिनिअर्स मोफत इंग्लंड-अमेरिकेत राबवून घेण्याचा, या श्रीमंत राष्ट्रांना नैतिक हक्क आहे का ? असा हा सवाल आहे. १९६७ ते १९७९ या बारा वर्षांत जो तंत्रज्ञांचा ओघ ( ब्रेन-ड्रेन ) गरीब राष्ट्रांतून श्रीमंत राष्ट्रांना फुकटात मिळाला, त्याची भांडवली किंमत अदमासे ४४,००० कोटी रुपये ( ५५ बिलियन डॉलर्स ) होते, असा अंकटॅड या यूनोच्या संस्थेचा अंदाज आहे; आणि मे १९७९ मध्ये अंकटॅडची जी जागतिक परिषद भरली होती, त्यामध्ये श्रीमंत राष्ट्रांनी चर्चेनंतर तत्त्वतः असे मान्य केले आहे की, या तंत्रज्ञांच्या ब्रेन-ड्रेनमुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई, काही प्रमाणात, श्रीमंत राष्ट्रांनी गरीब राष्ट्रांना दिली पाहिजे ! अमेरिकेत बोस्टन ( एम्. आय. टी. ) येथील सुप्रसिद्ध विद्यापीठांत काम करणारे भारतीय अर्थशास्त्रज्ञ श्री. ज़गदीश भगवती यांनी या नुकसान-भरपाईच्या प्रश्नाला प्रथम चांगल्या रीतीने चालना दिली, असे मत आपले अर्थशास्त्रज्ञ श्री. व्ही. के. आर. व्ही. राव यांनी व्यक्त केले आहे. ही केवळ भारताचीच समस्या आहे, किंवा प्रामुख्याने भारताची समस्या आहे, असे मात्र समजू नये. १९६२ ते ६९ या आठ वर्षांमध्ये अमेरिकेत ४२४३५ तंत्रज्ञ गरीब देशांतून येऊन स्थायिक झाले, त्यांतले केवळ १४ टक्के किंवा ५९०४ तंत्रज्ञ भारतातून गेले होते.

१९७५ साली अंदाजे बारा हजार भारतीय विद्यार्थी अमेरिकेत शिक्षण घेत होते, तर १९८० साली त्यांची संख्या नऊ हजारांपर्यंत खाली आली. कारण आपल्या विद्यार्थ्यांना कमी प्रवेश देण्याचे धोरण अमेरिकेने स्वीकारलेले आहे. अनेक परदेशांतून अमेरिकेमध्ये शिक्षणासाठी विद्यार्थी जातात. भारतीय विद्यार्थ्यांपेक्षा इतर देशांतलेच विद्यार्थी खूप अधिक प्रमाणात अमेरिकन विद्यापीठांतून शिक्षण घेत असतात. १९७९ मध्ये दोन लक्ष पस्तीस हजार

परदेशी विद्यार्थी अमेरिकेत शिक्षण घेत होते. त्यांतले सर्वांत जास्त म्हणजे छत्तीस हजार विद्यार्थी इराणमधून आलेले होते. तैवान, जपान, नायजेरिया, कॅनडा, हाँगकाँग आणि भारत या सहासात देशांतून खूप विद्यार्थी अमेरिकेत जातात, असे एका पाहणीतून दिसून आले आहे. टेक्झास विद्यापीठाच्या परिसरांत जॉर्डनच्या विद्यार्थ्यांनी एक मशीद उभारली आहे; तर इंडियाना विद्यापीठामध्ये इतके विवाहित सौदी अरेबिअन विद्यार्थी आहेत की, टेलिफोन डायरेक्टरी सौदी अरेबिअन असल्याचा भास होतो. या परदेशी विद्यार्थ्यांमुळे अनेक अमेरिकन विद्यापीठांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे; डबघाईला आलेली काही कॉलेजे उत्तम सावरली आहेत.

काही परदेशी विद्यार्थ्यांच्या राजकारणांमुळे विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना व पोलिसांना डोकेदुखी होऊन बसते; पण आता या पिद्यापीठांना वर्षानुवर्षे डोकेदुखीचे प्रकारही अंगवळणी पडल्यासारखे झाले आहेत.

तेहरानमधील अमेरिकन एंबसीच्या अधिकाऱ्यांना ओलिस ठेवून, " शहाना आमच्या ताब्यात द्या, तरच या अधिकाऱ्यांना आम्ही सोडू " असा जो पवित्रा इराणमधील विद्यार्थ्यांनी व खोमेनीच्या सरकारने घेतला होता, त्यामुळे अमेरिकन प्रतिष्ठेला व राजनीतीला एक जबरदस्त धक्काच बसला. अमेरिकन जनता व सरकार अंतर्मुख होऊन या साऱ्या अजब घटनांची दखल घेऊ लागली; आणि कधी नव्हे असे प्रामाणिक व सखोल विचारमंथन तेथे नव्याने सुरू झाले असे म्हणावेसे वाटते.

### करावे तसे भरावे :

श्री. टिमथी सीरी या सिनसिनॅटी शहरातील पत्रलेखकाने ' टाइम ' साप्ताहिकाला पत्र पाठवून ( २४-१२-७९ चा अंक ) ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत, त्यांत अगदी मोजक्या शब्दात त्याने अमेरिकेच्या परदेशनीतीसंबंधी सामान्य अमेरिकन नागरिकाच्या भावना स्पष्ट शब्दांत व्यक्त केल्या आहेत. तो म्हणतो की, "इराणमध्ये आज जो अमेरिका-विरोधी प्रकोपाचा प्रखर उद्रेक दिसून येतो, तो म्हणजे जागतिक वडवानलाची एक झलक, किंवा नुसती सुरुवात आहे. इराणचा शहा, नायकारॅग्वाचा सोमोझा, दक्षिण कोरियाचा पार्क आणि फिलिपाइन्सचा मार्कोस, अशा

अनेक हुकुमशहांना जगभर वर्षानुवर्षे अमेरिकेने संरक्षण व भरघोस साहाय्य दिले, त्यांनी आपापल्या स्थानिक जनतेवर अनन्वित अत्याचार व जुलूम केले, आणि अगणित संपत्ती अमेरिकेत व परदेशांत नेली; अशा या उथळ अदूरदर्शी राजनीतीचे पापाचे घडे आता जणू काही भरत आले आहेत, आणि त्यामुळे अनेक देशांतून अमेरिकाविरोधी लाटा अशाच उचंबळून येत राहतील."

वास्तविक अमेरिका ही जगातली सर्वांत बलाढ्य व मुक्त अशी लोकशाही; आणि तेथे वृत्तपत्रांना व कार्यकर्त्यांना जे उदंड व्यक्तिस्वातंत्र्य मिळते ते खरोखरच मोठे कौतुकास्पद व हेवा वाटण्याजोगे आहे; लोकशाहीचा उदोउदो इथे मुक्तकंठाने होतो, आणि आचरणातही अमेरिकेत तो ठायी ठायी दिसतो. अशा या राष्ट्राने जगभर जुलमी झोटिंगशहांना भरभक्कम मदत द्यावी, अमेरिकेतही मनसोक्त आसरा द्यावा, आणि त्यांच्या अत्याचाराने स्थानिक जनता मात्र भरडून निघावी, हे दृश्य किती विचित्र वाटते! त्या त्या राष्ट्रांतील दुर्दशांची वर्णने वाचली की मन खेदाने विषण्ण होऊन जाते!

दक्षिण अमेरिकेतील नायकारॅग्वा देशावर ४६ वर्षे सोमोझा घराण्याचे राज्य होते. लोकशाही राहो, पण साध्या जमीनविषयक व सामाजिक सुधारणा करण्यासही प्रेसिडेन्ट सोमोझा नाराज होता. जनतेच्या पुढाऱ्यांना व मुक्तिफौजांना वर्षानुवर्षे चिरडून टाकणे हे शेवटी जेव्हा अशक्य झाले, त्या वेळी अमेरिकेच्या सल्ल्यानुसार अखेरीस जुलै १९७९ मध्ये त्याने व त्याच्या अनेक श्रीमंत अधिकाऱ्यांनी काढता पाय घेतला, आणि अमेरिकेत फ्लॉरिडामध्ये आपल्या गडगंज संपत्तीसह सर्वांनी आश्रय घेतला. मायामी बीच (फ्लॉरिडा) येथे सोमोझाचे जे बादशाही राजवाड्यासारखे घर आहे, त्याचीच किंमत ऐंशी लाख रुपये (१ मिलियन डॉलर्स) होईल. शिवाय आपली अमेरिकेत व इतर परदेशांत ऐंशी कोटी रुपयांची (१० कोटी डॉलर्स) मालमत्ता आहे, असे वार्ताहरांजवळ त्याने कबूल केले. पण त्याचे दुःख हे की, आपली स्वतःची सवातीनशे कोटी रुपयांची (४० कोटी डॉलर्स) आणखी मालमत्ता नायकारॅग्वा देशात आहे, ती आता सर्व डाव्या सरकारच्या ताब्यात जाऊन जप्त होणार आहे! अमेरिकेची सतत अशी चिंता होती की, ह्या देशाचे राज्य डाव्यांच्या व कम्युनिस्टांच्या हाती जाऊ नये. सोमोझा व त्याचे अधिकारी

यांनी देश सोडण्यापूर्वी जे बॉम्बहल्ले मुक्तिफौजांवर केले, त्यामुळे देशातील अनेक कारखाने उद्ध्वस्त झाले, पंधरा हजार माणसे मेली, आणि सहा लक्ष लोक (म्हणजे देशातील २५ टक्के लोकसंख्या) बेघर झाले. कापूस ही मुख्य शेती, पण त्या पिकाची प्रचंड नासाडी झाली, आणि १९८० सालच्या पिकाचेही वाटोळे झाले. कारण पेरणी होऊ शकली नाही. धान्याची टंचाई आणि लूटमार यांनी ग्रामीण भाग त्रस्त झाला.

## इराणचा राग का होता?

इराणच्या शहाची कारकीर्द पाहिली तर गेल्या वीस वर्षांत अशीच विषमता, आक्रस्ताळेपणा, हुकुमशाही व भ्रष्टाचार दिसून येतो, अशी वर्णने अमेरिकन पत्रपंडितांनी केलेली आहेत. तेलाचे भाव भरमसाट वाढल्याने इरणचा वार्षिक तेलाचा फायदा १ बिलियन डॉलर्सवरून २१ बिलियन झाला (म्हणजे सतरा हजार कोटी रुपये झाला– २१ पटीने वाढला). ते वापरून अत्यंत अद्ययावत टँक, क्षेपणास्त्रे, फाइटर विमाने अशा प्रचंड शस्त्रास्त्रांवर, गेल्या वीस वर्षांत इराणच्या शहाने एकोणतीस हजार कोटी रुपये (३६ बिलियन डॉलर्स) खर्च केले; बऱ्याच मोठ्या ऑर्डर्स सतत अमेरिकन कारखान्यांना मिळत राहिल्या. ट्रूमनपासून कार्टरपर्यंत सर्व अमेरिकन राष्ट्राध्यक्षांची दोस्ती त्याने मिळविली, आणि रशियाच्या सीमेवर गुप्त केन्द्रे व इलेक्ट्रॉनिक साहित्य उभारण्यास अमेरिकेला पूर्ण मुभा दिली. इराणमधून तो बाहेर पडण्यापूर्वी सत्तर हजार अमेरिकन तंत्रज्ञ आणि सल्लागार इराणमध्ये काम करीत होते.

परंतु महागाई, भ्रष्टाचार, व "सावक" पोलिस यंत्रणेकडून होणारी छळणूक यांना ऊत आला होता. अंदाजे ५ ते १० हजार लोकांना ठार मारण्यात आले, व हजारोंना तुरुंगात डांबण्यात आले. इराणमधील ९५ टक्के खेड्यांतून नळाचे पाणी मिळत नाही; शेतीकडे दुर्लक्ष झाल्याने, शहराकडे धाव घेणाऱ्यांची संख्या वाढली. आरोग्य, डॉक्टरांची सोय, ग्रामपंचायती, राजकीय हक्क, अशा सर्व बाबतींत ग्रामीण जनतेची दुर्दशाच होती. पण शहांची खाजगी एकट्याची मालमत्ता अमेरिकेत ऐंशी कोटी रुपयांहून अधिक होती. शहा खोमेनी आल्याने इराणचे वाटोळेच झाले, असे काही लोक

म्हणतील. पण अमेरिकन राजनीती कशाला महत्त्व देते, ते आपण येथे पाहात आहोत.

**शस्त्रास्त्रांची राजनीती :**

अमेरिकेने मदत केलेल्या काळातील ब्राझील, तैवान, दक्षिण कोरिया, फिलिपाइन्स, पाकिस्तान अशा अनेक विकसनशील देशांची 'प्रगती' पाहिली, तर सर्वत्र इराण व नायकारॅग्वाप्रमाणे अशीच विषमता, ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष, आणि लष्करशाहीचा उदय असा जणू काही एक पायंडाच पडलेला दिसून येतो, असा निष्कर्ष मेरी कॅलडॉर या विदुषीने काढला आहे. (फेब्रु. १९७६, एकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली, मुंबई, यातील लेख).

पाकिस्तानचे उदाहरण देऊन ती म्हणते की, पाकिस्तानच्या लष्करी साहित्यापैकी दोन-तृतीयांश किंमत अमेरिकेने दिली होती. उरलेली एक-तृतीयांश किंमत भागविण्यासाठी पूर्व पाकिस्तानातील (हल्लीचा विमुक्त बांगला देश) जूट व इतर शेतीमालाच्या निर्यातीचा उपयोग केला गेला. म्हणजे पूर्व पाकिस्तानने पैसे भरले, आणि पश्चिम पाकिस्तानचे लष्कर खूप बळकट केले गेले; कारण रशियन सरहद्द संभाळण्यासाठी व चीनशी संपर्क साधण्यासाठी अमेरिकेला पश्चिम पाकिस्तानची केन्द्रे व मदत हवी होती. बांगला देशमधून लाखो निर्वासित येत होते; अशा वेळी आपल्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी अमेरिकेला गेल्या होत्या; परंतु निक्सन आणि किसिंजर यांनी भारतालाच दोषी ठरवून पाकिस्तानची बाजू उचलून धरली, हा इतिहास सर्वांना माहीत आहे. किसिंजरने आपल्या आत्मवृत्तामध्ये या कृत्याचे व बंगालच्या उपसागरात अमेरिकन आरमार पाठविल्याचे समर्थनच केले आहे.

दक्षिण अमेरिकेतील एल सॅल्व्हॅडॉर येथील हुकुमशहांना प्रचंड लष्करी मदत देऊन, तेथे जे अनन्वित अत्याचार चालू राहिले ती १९८१ सालची अगदी चालू घटना आहे. या घृणास्पद राजनीतीविरुद्ध अमेरिकेतील विद्यार्थ्यांनी (व्हिएतनाम युद्धाप्रमाणेच) प्रचंड निदर्शने १९८१ मध्ये वॉशिंग्टनमध्ये रेगन राजवटीविरुद्ध केली होती.

प्रत्येक मिनिटाला १ मिलिअन डॉलर्स (८० लाख रुपये) किंवा दरवर्षी ३,६०,००० कोटी रुपये, असा बेमुर्वतखोर खर्च शस्त्रास्त्रांवर व तथाकथित

'संरक्षणा'वर जगभर सध्या होत आहे, आणि निसर्गाला व पृथ्वीला हा भार असह्य होतो आहे, अशा शब्दात यूनोच्या 'इन्व्हायरनमेन्ट प्रोग्रॅम' शाखेने ( UNEP ) आपला १९८० सालचा जागतिक अभ्यास प्रसिद्ध केला आहे. जागतिक दारिद्र्य, उपासमार, रोगराई, निरक्षरता आणि पिळवणूक नाहीशी करण्यासाठी वास्तविक जे निकराचे युद्ध सर्व राष्ट्रांनी मिळून 'गरीबी हटाव'साठी करायला पाहिजे, त्याऐवजी अत्यंत मूल्यवान अशी नैसर्गिक संपत्ती आणि परिश्रम, केवळ विध्वंसनासाठी गुंतविली जात आहे. विकास कार्यासाठी जितकी मदत दिली जाते, त्याच्या वीसपट खर्च या संहारक विध्वंसनकार्यासाठी कायम होत राहणे, म्हणजे पृथ्वीला होत असलेला भयानक विषमय रक्तस्रावच आहे, असे वर्णन यूनोच्या अहवालात केले आहे.

व्हिएतनामच्या युद्धात जी विषमय रसायने वापरली गेली, त्यामुळे हजारो एकरांतील नैसर्गिक वृक्ष आणि वने, वनचरे, बेचिराख झाली. ती अरण्ये पूर्ववत व्हायला कदाचित पन्नास वर्षेसुद्धा पुरणार नाहीत. परंतु आता याहीपेक्षा अधिक विषारी बॉम्ब निघाले आहेत. "गेल्या तीस वर्षांमध्ये जगातील विध्वंसनाची शक्ती अक्षरशः लक्षावधी पटीने वाढलेली आहे," असे या यूनो-शाखेचे संचालक डॉ. टोलबा म्हणतात.

**घरचा अहेर :**

यूनोसारख्या जागतिक संस्था किंवा परदेशी पंडितच अमेरिका–रशियावर खवळलेले आहेत, असे नसून अनेक अमेरिकन राजकारणी, शास्त्रज्ञ, विचारवंत, सर्वच मंडळी या भयानक सर्वनाशी संहारकांडावर तुटून पडून ओरड करीत आहेत ! कॅलिफोर्नियातील १९७८ सालचे ओकलंडचे खासदार ( हाउस रिप्रेझेन्टेटिव्ह ) रॉन डेलन्स एकदा म्हणाले की, "लष्करी साहित्याचे हे सतत वाढते राष्ट्रीय उत्पादन म्हणजे 'ॲबसोल्यूट मॅडनेस' आहे, महामूर्ख मॅडपणा आहे; " सर्व कल्याणकारी कार्यक्रमांचा शेवट नंबर ज्या देशात लागतो, व मिलिटरीचा जेथे अग्रक्रम पहिला लागतो, त्या देशाचा विनाशकाळ जवळ आला आहे, असे समजावे !"

भारत आणि अमेरिका यांचे संबंध, आणि या दोन देशांची तुलना करायला आपण बसलो, की साऱ्या विचित्र, 'ॲस्ट्रॉनॉमिकल' अशा अफाट

तफावतीने मन हादरून जाते. भारतातील ४६ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली पिचत आहे; तर अमेरिकेतील तीस टक्के माणसे व बहुसंख्य कुत्रीमांजरे, अति आहारामुळे व्यथित आहेत ! अमेरिकन जीवनातील अनेक गमतीजमती वाचून आपले मनोरंजन होते, हे खरे आहे; पण मनाला भाजून चटका लावणारी, साऱ्या आनंदाची चिरफाड करणारी, अंतर्मुख करणारी, अत्यंत व्यथित करणारी ही विषमता म्हणजे आजची सर्वप्रथम समस्या आहे, असे मला वाटते.

खूप अधिक खाऊन गलेलठ्ठ झाल्यामुळे जे गंभीर रोग होऊ शकतात, त्यामुळे अमेरिकेत दरवर्षी पन्नास हजार माणसे मृत्युमुखी पडतात ! तर अपुऱ्या व निःसत्त्व आहारामुळे, दूषित पाण्यामुळे व दारिद्र्यामुळे भारतात दरवर्षी पन्नास हजार मुले बालवयातच आंधळी होतात. एकट्या गोवरामुळे भारतात दरवर्षी वीस हजार मुले मृत्युमुखी पडतात; आणि हजारी १४० बालकांचा मृत्यू जन्माच्या वेळी होतो. वारंवार होणाऱ्या जुलाबाने आजारी पडून, दहा लाख माणसे भारतात दरवर्षी मृत्युमुखी पडतात !

जगात आज होणारा, फक्त अर्ध्या दिवसाचा 'संरक्षण-खर्च' (लष्करी खर्च) वाचविता आला, तर मलेरिया निर्मूलनाचा साऱ्या जगाचा खर्च त्यातून जागतिक आरोग्य संघटनेला भागविता येईल ! १९८१ साली रोम-मध्ये आपल्या पंतप्रधान इंदिरा गांधींनी 'एफ. ए. ओ.' संघटनेचे व्याख्यान देताना अशाच प्रकारची आकडेवारी दिली होती. एका लष्करी टँकची किंमत ८० लाख रुपये असते ! या रकमेतून एक लाख टन तांदूळ साठ-विण्यासाठी चांगली कोठारे बांधता येतील, व त्यामुळे चार हजार टन तांदूळ न सडता, दरवर्षी वाचविता येईल ! किंवा याच लाख रुपयांतून तीस हजार विद्यार्थ्यांसाठी एक हजार वर्गांचे बांधकाम करता येईल !

एका लष्करी बॉम्बफेकी विमानाला २ कोटी डॉलर्स ( १६ कोटी रुपये ) खर्च येतो; या खर्चातून, चाळीस हजार गावांतून छोटे दवाखाने किंवा औषधांची दुकाने उभारता येतील ! पाकिस्तानला "एफ–१६" जातीची जी विमाने अमेरिका देत आहे, त्या प्रत्येक विमानाची किंमत बारा कोटी रुपये आहे !

प्रेसिडेन्ट रेगनच्या नेतृत्वाखाली अमेरिकेतील पेंटॅगॉनने ( लष्करशाहीने ) १९८६ सालापर्यंत, जे एक दिव्य, भव्य, अशा अमेरिकेच्या उभारणीचे

स्वप्न उराशी बाळगून साकार करण्याचे ठरविले आहे, त्याचा सोनेरी आराखडा खालीलप्रमाणे आहे : ( इंडियन एक्स्प्रेस, १० मार्च १९८१ )

१९८१ मध्ये होणारा लष्करी खर्च : १७१ बिलिअन डॉलर्स किंवा १३६८०० कोटी रुपये; १९८२ मध्ये १९६ बिलियन, ८३ मध्ये २२४ बिलियन, ८४ मध्ये २५३ बिलियन, ८५ मध्ये २८४ बिलियन, आणि १९८६ मध्ये ३१८ बिलियन डॉलर्स, म्हणजे २५४४०० कोटी रुपये खर्च अमेरिकेत लष्करशाहीवर होणार आहे ! मग जगभर हजारो बालके उपासमारीने, अंधत्वाने, रोगराईने अकाली मृत्यू पावली, किंवा आयुष्यभर लुळीपांगळी झाली, तरी काय मोठेसे बिघडले ? आणि अमेरिकेने व रशियाने का पर्वा करावी ? गरीब राष्ट्रेच जबाबदार आहेत; त्यांनी संततिनियमन करावे, व अमेरिकेने आणि रशियाने लष्कर फुगवावे, हाच आजचा परमपवित्र युगधर्म आहे ! हेच " रेगॉनॉमिक्स " असावे ! प्रेसिडेन्ट रेगन यांच्या नव्या अर्थशास्त्राला " रेगॉनॉमिक्स " हे नाव अमेरिकन पंडितांनी बहाल केले आहे !

## अमेरिकेतच कुटुंबनियोजनाची खरी जरुरी !

अविकसित गरीब देशांनी सक्तीचे कुटुंबनियोजन करावे, राक्षसी लोकसंख्यावाढीला निर्धाराने आळा घालावा, असे कानीकपाळी ओरडून, उपदेशाचे डोस त्यांना नेहमी पाजण्यात येत असतात. परंतु काही अमेरिकन विद्वान असे बजावू लागले आहेत की, अमेरिकन मंडळींनीच कुटुंबनियोजन जास्त कसोशीने पाळण्याची जरुरी आहे ! कारण जन्मल्यापासून मरेपर्यंत, अमेरिकन माणूस नैसर्गिक संपत्तीची जी लूट व बेसुमार उधळपट्टी करतो, त्यामुळे पृथ्वीला त्यांचा भू-भार असह्य होऊ लागला आहे ! हे आकडे पाहा :

प्रत्येक अमेरिकन माणूस सरासरीने आयुष्यात पुढीलप्रमाणे संपत्ती फस्त करतो : अडीच कोटी गॅलन पाणी, २८ टन लोखंड व पोलाद, १२०० बॅरेल पेट्रोलिअम, ६००० किलो कागद, ५० टन अन्न, आणि ८०,००० रुपयांचा सार्वजनिक खर्च. आणि हा माणूस आयुष्यात पुढील वस्तू वापरून सरळ फेकून देतो : १०,००० बाटल्या, १७,५०० पत्र्याचे डबे, २७,००० बुचे, सव्वादोन मोटरी, ३५ रबर टायर्स, १२६ टन कचरा, आणि पावणे-

दहा टन दूषित वायू !

या दृष्टीने पाहिल्यास, निसर्गसंपत्तीची वारेमाप धूळधाळ करण्यात अमेरिकेचा पहिला नंबर लागतो; आणि अमेरिकन जनता बेजबाबदार व धोकेबाज पद्धतीने वागत आहे, असे श्रीमती डोनेला मेडोज या विदुषीने, 'ए लुक ॲट द फ्यूचर' या आपल्या पुस्तकात बजावले आहे. अमेरिकेतील एक जन्म हा गरीब राष्ट्रांतील जन्मापेक्षा, पंचवीस पट महागडा असतो, असा तिचा निष्कर्ष आहे !

## ऐंशी लाख रुपयांचे कोकेन खाणारी महिला !

दारू, धूम्रपान, गांजा, चरस, एल्.एस्.डी., हेरॉइन, कोकेन अशा व्यसनांची श्रीमंती अमेरिकेत कशी फोफावत आहे, त्यांच्या विस्मयकथा अमेरिकन नियतकालिकांतून नेहमीच वाचायला मिळतात. त्यांच्या चोरट्या व्यापारातून होणारा गडगंज फायदा, आणि त्याला सोकावल्यामुळे वाढणारी गुन्हेगारी, दहशतवाद, अपघात, प्रकृतीची व संपत्तीची धूळधाण, असे हे व्यसनपुराण वाचून वाचून शेवटी आश्चर्यसुद्धा वाटेनासे होते !

सोन्यापेक्षा पाचपट महाग असलेली कोकेन पावडर हुंगणे, हे आज अमेरिकेतील अत्यंत प्रतिष्ठित असे व्यसन समजले जाते ! या खुळ्या प्रतिष्ठेपायी किती संसारांची व संपत्तीची वाताहात व्हावी, त्याला काही धरबंध राहिलेला नाही ! मरवाना ( चरस )चा वापर प्रतिवर्षी २४ बिलियन डॉलर्स (एकोणीस हजार दोनशे कोटी रुपये) असतो. अशा प्रतिष्ठेने हजारो अमेरिकन तरुण-तरुणींमध्ये आजपर्यंत मरवाना मिरवीत होता. पण आता कोकेनचा वार्षिक खप ३० बिलिअन डॉलर्सपर्यंत गेल्याने (चोवीस हजार कोटी रुपयांचे कोकेन !) दारू व सिगारेट वगळून, इतर मरवानाची मिजास मागे पडली आहे ! अमली पदार्थांचा एकूण धंदा चौसष्ट हजार कोटी रुपयांचा आहे !

आपल्या भारत सरकारचे १९७८–७९ चे वार्षिक बजेट एकोणीस हजार कोटी रुपयांहून कमी होते ! तेव्हा आता हसावे की रडावे तेच कळेनासे झाले !

श्रीमती फिलिप्स या अमेरिकन चित्रपटनिर्मातीने दहा वर्षांमध्ये ऐंशी लाख रुपयांचे कोकन स्वतः वापरले; त्यामुळे "जगते की मरते, अशा

अवस्थेला पोचून मी कसा माझा व अनेकांचा सत्यानाश घडविला " या विषयावर म्हणे ती आता पुस्तक लिहीत आहे ! ( टाइम, ६-७-८१ ).

मुंबईत आमचे एक मित्र आहेत. त्यांच्या एकुलत्या एक मुलाला चरसचे व्यसन कॉलेजमध्ये लागले. ते आता सुटत नाही. पैशाची व प्रकृतीची नासाडी करून निरुद्योगी राहणाऱ्या त्या तरुण मुलाची भयानक शोककथा त्याचे आईवडील दोन तास आम्हाला सांगत होते ! काळीज पिळवटून टाकणारी ती मुंबईतली एक सत्यकथा आहे. चरस-कोकेनची ही आसुरी गलिच्छ संस्कृती आपल्या भारतात फोफावू नये, म्हणून प्रयत्नांची शिकस्त आपल्याला करावी लागणार आहे !

## सुरम्य फ्लॉरिडाचा दैवदुर्विलास करणारी कोकेन :

उत्तरेतल्या कडक हिवाळ्याऐवजी अगदी सौम्य थंडी, आणि संत्र्यांच्या बागा यांनी प्रवाशांना खेचून घेणारा फ्लॉरिडा प्रांत, कोकेनच्या चोरट्या आयातीसाठी आणि त्यामुळे निर्माण झालेल्या गुन्हेगारीसाठी आता नावाजलेला आहे !

कोकेन व चरस यांच्या अमेरिकेतल्या आयातीपैकी ७० टक्के आयात आता फ्लॉरिडा प्रांतातून होते. आणि टूरिझमच्या इतकाच कोकेन-चोरट्यांचा धंदा तेजीत आहे. प्रांतातले एक-तृतीयांश खून या चोरटेपणातून होत असतात; आणि साऱ्या अमेरिकेत, मयामी हे फ्लॉरिडातील शहर, गुन्हेगारीत पहिला नंबर पटकावून बसले आहे. क्यूबा आणि हैटी येथून राजरोसपणे येणाऱ्या निर्वासितांचा या चोरट्या धंद्यात मुख्य हात आहे, असे सांगतात; आणि दक्षिण अमेरिकेची ती एक अनधिकृत राजधानीच समजली जाते.

गेल्या पाच वर्षांत ( १९७६–८१ ) सव्वादोन लक्ष पिस्तुले व बंदुका या प्रांतातील लोकांनी विकत घेतल्या. १९८१ या एकाच वर्षात ६६,००० बंदुका व पिस्तुले विकल्या गेल्या. पिस्तुले घेण्या-विकण्यावर कसलेच निर्बंध नाहीत. रस्त्यात जोराने मोटरीचा हॉर्न वाजवून एखाद्या वाटसरूला तुम्ही जरा दूर सारण्याचा प्रयत्न केलात, तरी तो तुमच्यावर पिस्तुल चालवील, अशी परिस्थिती असल्याची वर्णने टाइम साप्ताहिकाने केली आहेत ! ( २३-११-८१ ). केवळ १९८० या एका वर्षात ४५०० कोटी रुपयांची

कोकेन आणि १००० कोटी रुपयांचा चरस कस्टम्स अधिकाऱ्यांनी जप्त केला, पण त्याच्या दसपट जप्तीतून सुटला असला पाहिजे; कारण दररोज ८० विमाने कोकेन भरभरून रात्री अज्ञात स्थळी उतरत असतात, असा अंदाज आहे !

## सडून वाळून जाणारी लक्षावधी संत्री :

'मॅड मॅड अमेरिके'तील संत्र्यांच्या खुल्या पिकाचा एक अगदी ताजा किस्सा सांगून हे विषमता-पुराण आपण संपविणार आहोत !

१९८१ मध्ये १४ लक्ष टनांहून अधिक असे मधुर संत्र्यांचे, उच्चांक करणारे पीक कॅलिफोर्नियात आले. पण त्यातले निम्मे पीक बाजारात पाठविताच आले नाही, कारण ते पाठविण्यास सरकारची बंदी होती ! शेतकऱ्यांना भाव चांगले मिळावेत, म्हणून सरकारने असे नियम कायद्याने केलेले आहेत. फ्लॉरिडामधील संत्री बहुतेक रसासाठीच वापरतात, तेथे हे नियम लागू नाहीत. शिकागोमध्ये गतवर्षी ५० सेंटला एक संत्रे मिळत होते, ते या वर्षी ७० सेंटला मिळत आहे. परंतु ग्राहकाला असा भूर्दंड पडला तरी चालेल; गरीब मंडळींना त्यामुळे संत्रे खाणे परवडले नाही तरी चालेल; पण बाजारात जादा माल येऊ द्यायचा नाही. कारण शेतकऱ्याला चांगला भाव मिळाला पाहिजे; अशी ही अमेरिकन सरकारची भूमिका आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी ऊस, कांदा, तंबाखू अशा वस्तूंना चांगले भाव मिळावेत, म्हणून आंदोलने गेली दोनचार वर्षे चालू ठेवली आहेत; त्या संदर्भात शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेले अमेरिकेतील हे कडक कायदे आपल्याला स्वागतार्ह वाटतील हे खरे; पण मार्च १९८१ मध्ये त्याचा असा नतीजा झाला, की कॅलिफोर्नियातील शेकडो एकरांमध्ये वाळून सडून जाणाऱ्या लक्षावधी संत्र्यांचा नुसता खच पडलेला दिसून आला व त्याचे फोटो अमेरिकन साप्ताहिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत ! हा फळांचा नाश वाचविणे अमेरिकेत शक्य झालेले नाही; तशी यंत्रणा नाही, की बेपर्वाई आहे, की सरकारी नियमांचा सावळागोंधळ आहे, त्याची आता म्हणे पुन्हा बारकाईने सरकारतर्फे छाननी होणार आहे ! कोणत्याही इतर प्रगत देशात असा प्रचंड नाश उघड्या डोळ्यांनी पाहिला जाईल, असे वाटत नाही. प्रगत सरकार, उत्तम रस्ते,

फोन, कॉम्प्युटर्स, गाड्या, विमाने, मोठी भांडारे– अशा सर्व सोयी असूनही इतका प्रचंड फळांचा नाश ज्या देशात १९८१ सालीसुद्धा होऊ शकतो, अशा देशाला ' मॅड, मॅड, ' हे विशेषण शोभते, असे वाटते.

परंतु अमेरिकन माणसाची उत्पादनातली जिद्द, संघटना, परिश्रम, परंपरा अतुलनीय आहेत; म्हणूनच ' पृथ्वीवरील स्वर्ग ' त्यांनी अमेरिकेत निर्माण केलेला आहे; त्यांनी जी प्रचंड सुबत्ता निर्माण केलेली आहे, त्यामुळेच प्रचंड नाशाच्या समस्या त्यांच्यापुढे उभ्या राहतात, असे म्हणता येईल.

अशी ही सुवर्णभूमीची सुफला सुबत्ता त्यांनी खेड्यापाड्यापर्यंत कशी पोचवली आहे, त्याचा मनोहर फेरफटका आपण पुढील प्रकरणातून सुरू करणार आहोत. कोकेनसारख्या व्यसनात अपार संपत्ती उधळणारा मॅड अमेरिकन जेव्हा निसर्गप्रेमाने पुलकित होतो, तेव्हा शेतातील गरीब गांडुळांचा अभ्यासही तितक्याच मॅड हिरीरीने तो करीत असतो. अमेरिकन चतुरस्रतेची ती एक गंमतीदार झलक आहे.

## गांडुळे वाढवा, आणि श्रीमंत व्हा !

" निसर्गाकडे चला," अशा ध्येयाने प्रेरित झालेल्या शास्त्रज्ञांनी अमेरिकेत अलीकडे एक गंमतीदार पण अत्यंत मोलाचे असे संशोधन जमिनीतल्या गांडुळांवर केले आहे, आणि त्यांतून नवे उद्योगधंदे व नवीन संपत्ती निर्माण होऊ लागली आहे !

गांडुळांमुळे जमिनीचा पोत सुधारतो, किंवा मासेमारीत गांडुळांचा उपयोग करतात, इतक्याच तुटपुंज्या ज्ञानसामुग्रीत आपण आजपर्यंत गुरफटलो होतो; पण आता " गांडुळ-शेती " आणि " गांडुळ कारखाने " असे नवे उपक्रम अमेरिकन पठ्ठे-मंडळींनी हाती घेतले आहेत ! हे गांडुळ-पुराण मोठे विस्मय-कारक आहे !

शेतामध्ये जर खूप जिवंत गांडुळे आणून सोडली, तर गव्हाचे उत्पादन दुप्पट होते, आणि गवताचे चौपट होते; आणि काही वनस्पती तर दसपट वाढतात, असे दिसून आले आहे ! मात्र मेलेली नव्हे, तर जिवंत गांडुळे आणून सोडली पाहिजेत. हे लक्षात येऊन अमेरिकेत आता म्हणे नव्वद हजार शेतकरी जिवंत गांडुळांचे उत्पादन व विक्री करण्याचा जोडधंदा करीत

असतात. कचऱ्यापासून कंपोस्ट करण्याचे काम गांडुळे इतक्या हुशारीने व झटपट करतात की, लहानमोठ्या शहरांतून गांडुळांची मदत घेणे फायदेशीर आहे, असे दिसून आले आहे. कॅनडात १९७० साली असा एक कारखाना सुरू झाला, व हल्ली तेथे दर आठवड्याला ७५ टन कचऱ्यापासून उपयुक्त कंपोस्ट-खत करण्याचे काम हजारो गांडुळे मोठ्या आनंदाने करीत असतात. जपानमध्ये प्रत्येकी १० टन कचऱ्याचे ४ कारखाने सुरू झाले आहेत.

इतकेच नव्हे, तर घरोघरी असा गांडुळ-कुटिरोद्योग सुरू करता येईल, असे स्वप्न साकार करण्यासाठी अमेरिकन शास्त्रज्ञ आपली डोकी वापरू लागले आहेत. केवळ दीड मीटर लांबी-रुंदी-खोली असलेल्या पेटीत वीस हजार गांडुळे घेऊन सुरुवात करावी, म्हणजे ४ मंडळींच्या कुटुंबाला, स्वतःच्याच घरातील केरकचऱ्यापासून उत्कृष्ट खत करण्याचा कारखाना घरी चालू करता येईल, अशी ही योजना असून, मोठ्या उत्साहाने त्यावर संशोधन चालू आहे !

♣ ♣

: २ :

# अमेरिकेत गुंड्याभाऊ

गावाचं नाव ग्रीनटाउन. नावासारखेच हिरवेगार. रॉनीच्या कॅडिलॅक गाडीतून आरामशीरपणे आम्ही तिथे पोचलो होतो. अवघ्या पंधराशे वस्तीचे छोटेसे गाव; पण टुमदार बंगले, आणि डोळ्यांना सुखविणाऱ्या हिरवळी यांनी कसे नटूनथटून बहरले होते !

रॉनी आणि एलिनॉर– त्याची पत्नी दोघेही याअगोदर दोनच वर्षांपूर्वी भारत-भेटीला आले होते. त्या वेळी मुंबईत आमच्या घरी तीन दिवस पाहुणे मंडळी म्हणून उतरले होते. "सर्व्हास" (Servas) नावाची, जगभर शाखा असलेली एक संस्था आहे. परदेशी अतिथींना दोन-तीन दिवस आपुलकीने आपल्या घरी ठेवून घेऊन पाहुणचार करायचा, हेच सभासदांचे मुख्य काम असते. शिकागोचा बॉब हा अमेरिकन शांतिसैनिक आमच्या घरी मुंबईला असाच राहिला होता; तेव्हा त्याच्या घरी शिकागोला दोन दिवस राहून, आता मी इंडियानापोलिसच्या विमानतळावर उतरलो होतो; रॉन आणि एलिनॉर माझ्या स्वागतासाठी तिथे आले होते. त्यांचं गाव "अॅबॉय" तेथून

४५ मैलांवर. अगदी पाचशे वस्तीचे गाव. पण नावालाच खेडं म्हणायचं; रस्ते आणि मोटरगाड्या अशा काही बुलंद की, जणू काही सुखाच्या धुंदीवर घरंगळत आम्ही केव्हा रस्ता संपविला ते कळलेसुद्धा नाही. अॅंबॉयच्या अलीकडे रॉनचा मित्र जॉन ग्रीनटाउनमध्ये राहतो, त्याच्याकडे आम्ही जरा ब्रेक घेतला.

"हाय जॉन ! हाय बेटी !" इत्यादी नमस्कार–चमत्कार करून आम्ही प्रथम जॉनच्या लॉनवर थोडा वेळ सुखावलो. बेटी ही जॉनची बायको; जॉनची 'बेटी' नव्हे. जॉन आणि बेटीने मग आम्हाला त्यांचे घर हिंडून दाखविले; काही महिन्यांपूर्वीच ती दोघे इथे राहायला आली होती. चार बेडरूम्सचे ते घर. सहज चाळीस हजार डॉलर्स त्या वेळी आणि आता सव्वा लाख पडले असतील. म्हणजे सुरुवातीला सहा-सात हजार डॉलर्स भरून राहायला गेले असतील. गंमत अशी की, जॉन व बेटी दोघे पूर्वी रॉनीच्या धंद्यातच त्याला मदत करायची. बेटी ही तर रॉनीची सेक्रेटरी होती; आणि जॉन असिस्टंट होता. रॉनीच्या धंद्याची पूर्ण माहिती घेऊन त्यांनी तोच धंदा स्वतंत्रपणे सुरू केला होता; व रॉनीच्या घरापेक्षाही मोठे घर घेतले होते ! बाहेरच्या मखमली हिरवळीशी स्पर्धा करणारे मखमली गालिचे घरभर जॉनने पसरले होते; प्रत्येक खोलीत कलर किंवा साधा टी. व्ही. सेट बसविला होता ! फ्रीज, डिश-वॉशर, लॉंड्री, सेलिंग बोट, बार्बेक्यू सेट– सर्व सर्व काही जॉनकडे होतं; म्हणजे साधारण सुखवस्तू अमेरिकन बन्याबापूकडे जे जे असायला पाहिजे, ते ते सर्व होते; पण विशेष म्हणजे बेटीने आता इलेक्ट्रॉनिक ओव्हन घेतली होती. त्या नव्या ओव्हनचा तिला इतका अभिमान वाटत होता, इतकी ती फुलली होती की, काही विचारू नका !

ओव्हनची जादू दाखविण्यासाठी तिने मग कागदी पिशवीत थोडे मक्याचे दाणे घातले, आणि ती पिशवी ओव्हनमध्ये ठेवून तिने बटन दाबले. केवळ अडीच मिनिटांत तडतड लाह्या फुटल्या, आणि पॉप कॉर्नचा खमंग वास सुटला. बेटीने गरमागरम पॉप कॉर्न बाहेर काढला; "कागदी पिशवी थोडी तरी जळली आहे का पहा ! हात लावून पहा !" ती म्हणाली. पिशवी मुळीच भाजली जळली नव्हती; आतल्या पॉपकॉर्न लाह्या मात्र झकास फुलल्या होत्या. मग तिने पाणी तापवून दाखविले; तेसुद्धा दीड मिनिटात उकळू लागले, पण

भांडे फारसे तापलेच नाही.

नव्या ओव्हनचे कौतुक झाल्याने बेटीला मूठभर मांस चढल्यासारखे वाटले; मग फ्रीजमधून तिने रेड वाइन काढली. पॉप कॉर्न आणि रेड वाइन सर्वांना देताना ती म्हणाली, "मला माणसं फार आवडतात; तुम्ही आलात फार छान झालं!" एलिनॉर म्हणाली, "कारण हे एवढे मोठे यांचे घर, पण घरात फक्त तीन माणसेच, बरे का!"

"होय, तीन! पण कधी कधी अडुसष्टसुद्धा होतात!" बेटी म्हणाली. कालच तिच्याकडे अडुसष्ट मंडळी पार्टीसाठी आली होती; पण कोणाला त्यांनी काही कमी पडू दिले नाही. "अडुसष्ट मंडळी खरोखरच आली, यावर तुझा विश्वास बसतो का! तिने विचारले; "आजच जरा मोकळी झाले; मात्र हे भारतीय पाहुणे आणलेस, ते फार बरे केलेस. आता मी अगदीच हॉट पँटमध्ये (शॉर्ट पँट) आहे; पण किती उकाडा आहे, नाही का? मला वाटतं, पाहुण्यांना काही त्यात वाटणार नाही."

पण सर्वांचे कपडे तसेच होते. तिचा मुलगा मोठ्या शहरात ॲथलेटिक कोच होता, तो सुटीला आला होता, आणि गवताच्या गंजी रचण्यात बापाला मदत करीत होता; आणि सून शहरात स्पीच-थेरॅपी-संस्थेत काम करीत होती, तीही आली होती. बिनबाह्यांचे पातळ—हलके स्वेटर, आणि मांड्यासुद्धा नीटपणे झाकत नव्हत्या, अशाच सर्वांच्या शॉर्ट पँट्स!

बेटीने इलेक्ट्रॉनिक ओव्हन घेतली, त्याचे वैषम्य एलिनॉरला मुळीच वाटले नाही. एक तर एलिनॉरकडे "मोटर-होम" होते, तसले काही जबरदस्त आकर्षण बेटीकडे कुठे होते? आणि दुसरे म्हणजे, भरपूर पैसे नसताना जॉन व बेटी क्रेडिटवर सर्व काही खरेदी करीत सुटतात, म्हणजे "ती वेडी आहेत, दुसरं काही नाही" असे एलिनॉरचे मत होते.

रॉनी व एलिनॉरचे ते मोटर-होम म्हणजे एक फिरते सुखसदनच होते. एअर कंडिशनिंग, लॉँड्री, टी. व्ही., गॅस, बिछाने, टेबले, उत्कृष्ट स्वयंपाक-घर अशा साऱ्या छान सोयी असलेला, पंधरा हजार डॉलर्सना घेतलेला तो एक भ्रमण-रथाचा हैदोस उच्चांक होता, असे म्हणता येईल. त्या रथातून दरवर्षी हिवाळ्यात ती दोघे फ्लॉरिडामध्ये ड्राइव्ह करून जात असत.

रॉनीची 'ॲबॉय ग्रेन कंपनी' म्हणजे एक पिढिजाद धंदा होता, आणि

त्याला आता चांगली बरकत आली होती. आपल्या जावयालाच धंद्यात घेऊन, तो निवृत्त झाल्यासारखा गोल्फ खेळण्यात वेळ घालवायचा; ग्रेन एलेव्हेटर वापरून, शेतकऱ्याचे धान्य नीट साठविणे, हा त्यातला मुख्य भाग होता. त्याची स्वतःची फारशी शेती नव्हती.

आणि निदान चारपाचशे एकर शेती नसेल, तर यांत्रिक अवजारांचा खर्च व देखभाल परवडत नाही, अशी या भागातली परिस्थिती आहे.

**शाळा-मास्तर म्हणजे दोनशे एकर शेती :**

केवळ शे-दोनशे एकर शेती असणे हे येथे "छोट्या शेतकऱ्या"चे लक्षण समजले जाते, आणि असे छोटे शेतकरी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. येथल्या शाळामास्तरचे वार्षिक उत्पन्न, आणि शे-दोनशे एकर शेती असलेल्याचे वार्षिक उत्पन्न सारखेच असते, असे मला सांगण्यात आले ! छोट्या पोल्ट्रीज, छोटी किराणा दुकाने, असे सर्वकाही नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. परंतु डेअरी, फळबागा, अजूनही लहान प्रमाणावर काही ठिकाणी व्यवस्थित चालत असलेल्या दिसल्या. ३५–४० जर्सी गाई पाळून जवळजवळ एकट्याने त्यांची व्यवस्था पाहणारा शेतकरी व त्याची डेअरी रॉनीने मला दाखविली. यांत्रिक दूध काढण्याच्या पद्धतीमुळे त्याचे काम सोपे झाले असले, तरी त्याला खूपच कष्ट करावे लागतात. आपल्याकडला म्हादबा पहाटे उठतो, त्याप्रमाणेच "मी रोज सकाळी पावणेपाच वाजता उठतो," असे तो म्हणाला. बेट्सी, पेट, अशी आपल्या गाईंची लाडकी नावे त्याने ठेवलेली होती. आपल्याकडे ढवळी-पवळी असतात तशीच. इतकेच काय पण त्यांच्या गोठ्यामध्ये शेण-मूत व त्यावर घोंगावणाऱ्या माशासुद्धा आपल्यासारख्याच तिथेही दिसल्या. परंतु जवळच असलेले शेतकऱ्याचे वातानुकूलित घर कसे अगदी स्वच्छ, सुबक, सुंदर होते ! शेतकरी दिवसभर कष्ट करतो खरा, पण त्यानंतर मनमुराद सुखासाठी, टी. व्ही. पासून वॉशिंग मशिनपर्यंत सर्व साहित्याने त्याचे घर जणू काठोकाठ तुडुंब भरून वाहात होते, असेच वाटावे.

मग एक दिवस तिकडचा कत्तलखाना पाहायला रॉनी मला घेऊन गेला. रोज इथे ३० ते ४० गुरे मारीत होते; पण त्यासाठी अद्ययावत यंत्रसामुग्री, इमारती, शीतगृह मिळून ५६ लक्ष रुपयांचे भांडवल त्यात गुंतले होते. एकट्या

इंडियाना प्रांतातच असे ९०‘कत्तलखाने आहेत, आणि ते सर्व चांगले चालले आहेत असे कळले. पूर्वी याच्या पाचपट, पण कमी क्षमतेचे कत्तलखाने होते, ते हळूहळू बंद होऊन मध्यम क्षमतेचे व अधिक फायदेशीर असे हे कत्तलखाने चालू झाले.

रॉनीचा “ सव्हॉस ” पाहुणा म्हणून आल्याने, अशी ही अस्सल ग्रामीण अमेरिका पाहण्याचा माझा छान योग जुळून आला; अॅबॉय खेडेगाव सोडण्यापूर्वी, त्याने मित्रांना बोलावून, माझ्यासाठी एक शाकाहारी पार्टी दिली; म्हणजे खूप भात शिजवून, भाज्या नुसत्या उकडून ठेवल्या. मी, रॉनी व त्याचा मित्र बड, यांनी गुरुशर्ट घातले, सुगंधी उदबत्त्या लावल्या होत्या. करमणूक म्हणून मी काही मंडळींचे हात पाहून, त्यांची खरी-खोटी भविष्ये व स्वभाववर्णने सांगितली. हिंदी कारागिरी व बूट त्यांना भेट म्हणून दिले व त्यांनी मला टी-शर्ट व सौ. साठी कापड दिले. मी सर्वांना “ लकी-बीन ”ही दिले. केरळमध्ये लाल गुंजांच्या आंतमध्ये, हस्तिदंती अत्यंत चिमुकले उंट, हत्ती इत्यादी भरून वर हस्तिदंती बारीक झाकण बसवितात. अशा गुंजांना “ लकी-बीन ” म्हणतात. मुंबईत दहा रुपयांना शंभर मिळतात. मंतरून ताईत द्यावा, तसाच “ हा लकी बीन घे, म्हणजे तुला उत्तम बढती—पत्नी—सुखाचे दिवस मिळतील ” असे आशीर्वाद गावोगावच्या अमेरिकन मंडळींना देण्यात मोठी मौज होती.

### “ सव्हॉस ” संस्थेतर्फे पाहुणचार :

या “ सव्हॉस ” संस्थेचे भारतातील अध्यक्ष श्री. हरिवल्लभ पारीख हे आहेत. बडोदा जिल्ह्यातील आदिवासी भागात त्यांचा आनंद-निकेतन आश्रम आहे ( पत्ता— रंगपूर, कवन्त, व्हाया कोसिंद्रा, जिल्हा— बडोदा, गुजरात ). आदिवासी खेड्यांसाठी त्यांची अनेक विधायक कार्ये चालू असतात. दरवर्षी अनेक परदेशी मंडळी येथे राहून ही कामे पाहतात. ऑस्ट्रेलिया-खोली, कॅनडा-खोली, अशी नावेसुद्धा आश्रमातील खोल्यांना देण्यात आली आहेत. आणि मग भारतात अनेक शहरांतून “ सव्हॉस ” यजमानांचे पत्ते घेऊन, व त्यांना पत्रे लिहून परदेशी मंडळी गावोगावी भारतीय कुटुंबांत राहून पाहुणचार घेतात. गावोगावी हॉटेलमध्ये राहण्याऐवजी असे कुटुंबातून राहणे

हे स्वस्त पडते; आणि आतिथ्यशीलतेने आपुलकीचे व मैत्रीचे लागेबांधे निर्माण होतात, असे या “ सर्व्हास ” संस्थेचे उद्दिष्ट व अनुभव आहे.

न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन, टोरोंटो अशा अनेक ठिकाणी मी पाहुणा म्हणून अशा अमेरिकन कुटुंबातून राहिलो आहे. आमचा मुलगा अजित हा ऑस्ट्रेलिया व फिजी मार्गे अमेरिकेला गेला होता, तेव्हा मेलबोर्न इत्यादी ठिकाणी तोही असा पाहुणा म्हणून राहिला होता. आणि मुंबईत व पुण्यात आमच्या घरीही देशोदेशींचे अनेक पाहुणे कित्येक वर्षे, अधूनमधून असेच आलेले आहेत. या “ सर्व्हास ” संस्थेची पुरेशी माहिती मुंबई–पुण्यातील मंडळींना नाही, असे वाटते. संस्थेचे सभासद होणे सोपे असते, व अनेक नवी मंडळी सभासद झाल्यास ही देवाणघेवाण वाढू शकेल, असे वाटते. ज्यांना शक्य असेल व इच्छा असेल, त्यांनी आनंदनिकेतन आश्रमाशी संपर्क साधावा.

**शहारे आणणारा प्रश्न :**

बहुतेक परदेशी मंडळी मध्यमवर्गीय असतात; स्वतःच्या खांद्यावरून आपले सामान वाहात असतात. असेच भरपूर सामान पाठुंगळीला बांधून, मध्यंतरी सिलव्हिया नावाची एक गलेलठ्ठ पण हसरी, बडबडी जर्मन महिला दत्त म्हणून आमच्या पुण्यातल्या घरी येऊन उभी राहिली. तेव्हा तिचा अवतार पाहून आम्हांला हसू आवरेना. पण सीलोन, ब्रह्मदेश, नेपाळ, मलेशिया, जावा, असा प्रचंड प्रवास कित्येक महिने याच अवतारात एकटीने करून, व घरोघरी राहून तिने जिद्दीने स्वस्तात पुरा केला ! आणि मग ती जर्मनीत परतली.

या बहुतेक मंडळींना आपला साधा शाकाहारी सगळा स्वयंपाक चालतो, व आवडतो; पथारी टाकायला जागा मिळाली, जरा स्वच्छ बाथरूम व संडास असला आणि गप्पा मारायला माणूस मिळाले की, त्यांचे समाधान असते. पण कधी कधी अशी काही विचित्र पृच्छा होते की, ती ऐकून आपण स्तिमित होऊन जातो. रॉनी आणि एलिनॉर मुंबईत आमच्याकडे असताना, एक दिवस त्यांनी विचारले की, मुंबईत पिंजऱ्यात कोंडून ठेवलेल्या वेश्या असतात, त्या आम्हाला बघायला मिळतील का ? कामाठीपुऱ्यातील पिंजऱ्यासंबंधीच त्यांना कोणी तरी सांगितले असावे, हे उघड होते. तो प्रश्न ऐकून आम्ही शरमेने

हादरून गेलो; शहारे आले; कामाठीपुऱ्यातील ते हिडिस दुर्दैवी पिंजरे नाकारण्यात काहीच अर्थ नव्हता; पण असल्या भेटी सदभिरुचीला सोडून होतील असे सांगून त्या " साइट सीइंग " कार्यक्रमाला आम्ही स्पष्ट नकार दिला. मात्र परदेशांत आपल्या भारताचे दारिद्य, भुके कंगाली, महारोग, भिकारी, कामाठीपुरे अशा दुःखद प्रदर्शनांचा उपयोग " टूरिस्ट इंडस्ट्री " कशी करून राहिली आहे, त्याची झलक रॉनी–एलिनॉरच्या प्रश्नाने आम्हाला करून दिली.

सुदैवाने परदेशांत ज्या अनेक घरांतून मी भारतीय पाहुणा म्हणून राहिलो, तेथे असले परिप्रश्न कोणी विचारले नाहीत; पण अमेरिकन स्वभावाच्या मात्र अनेक गमतीदार छटा पाहायला मिळाल्या.

अॅबॉय खेड्यातले रॉनी व बड, यांना घरातील प्रत्येक खोलीत टी. व्ही. सेट असणे म्हणजे प्रतिष्ठा असे वाटते; तर वॉशिंग्टनचे यूजीन व नॅन्सी आपल्या घरात एकही टी. व्ही. सेट ठेवायला तयार नाहीत ! राजधानी वॉशिंग्टनमध्ये हा यूजीन एक तरुण सरकारी नोकर आहे. त्याची पत्नी नॅन्सी आणि दोन लहान मुले डग आणि डेव्हिड, असा त्यांचा संसार अडीच खोल्यांत सजलेला आहे. यूजीन व नॅन्सी अजिबात धूम्रपान करीत नाहीत; व रोज जेवताना किंवा एरवीही ड्रिंक्स फारशी घेत नाहीत. छोट्या मुलांबरोबर सकाळी न्याहारी घेतानासुद्धा ग्रेस ( प्रार्थना ) म्हणून मग न्याहारी सुरू करतात. संध्याकाळी घरी आल्यावर मुलांबरोबर यूजीन चक्क खेळ खेळतो ! " टी.व्ही.ला वेळ कुठे आहे ? " यूजीन म्हणाला. नॅन्सीला मी म्हटले, " दुपारी वेळ जायला टी. व्ही.चा उपयोग नाही का ? " ती म्हणाली, " दिवसभर पुष्कळ काम असतं. टी. व्ही.ला मला खरंच वेळ नसतो; आणि लहान मुलांवर टी. व्ही.चे संस्कार आतापासून नकोत, असे वाटते."

टी. व्ही.ची जुलमी करमणूक घरी बाळगण्याऐवजी सामाजिक कार्यात हे दांपत्य स्वतःला गुंतवून घेते. ती दोघे राहतात त्या ' कॉलनी 'ला लहानसा बगीचा व मुलांचे क्रीडाकेन्द्र मिळावे, म्हणून वर्षभर दोघांनी खटपट केली; कमिट्या, सभा, पत्रव्यवहार इत्यादी करून अखेरीस त्यांनी पन्नास हजार डॉलर्स या केन्द्रासाठी मंजूर करून घेतले ! फ्रान्स, जपान, ऑस्ट्रिया, भारत अशा देशोदेशींचे माझ्यासारखे १९ पाहुणे ' सर्व्हास ' संस्थेतर्फे त्यांच्याकडे

दोन वर्षांत उतरून गेले आहेत. यूजीनने आता लांबच्या वर्जिनिया भागात शंभर रुपये एकर भावाने १२० एकर जमीन घेतली आहे. आणि तेथे इमारतीचे उत्तम लाकूड देणारे वृक्ष तो लावीत आहे. "आम्ही दोघांनी लग्न झाल्यापासून आजपर्यंत धूम्रपान न केल्याने जे आमचे पैसे वाचले असतील, त्यातून ही जमीन आम्ही खरेदी केली !" असे युजीन म्हणतो !

आणि हा हिशेब खराच असावा, असे वाटते; कारण टोरोंटो (कॅनडा) मधील डेव्ह आणि बारबारा हे दांपत्य दिवसभर धूम्रपान करीत असतात. त्यांना दोघांना मिळून निदान रोजचे तीन डॉलर्स (२५ रुपये) त्यासाठी लागतात. असा त्यांचा हिशेब आहे ! म्हणजे १६ महिन्यांतच १२००० रुपयांची शिल्लक, धूम्रपान न केल्यामुळे त्यांच्या पदरी पडू शकते !

डेव्ह आणि बारबारा यांच्या संसाराचा एक आगळाच नमुना आहे. त्यांना मूलबाळ काही नाही, पण त्यांनी दोन मांजरांना घरी प्रेमाने पाळलेले आहे; त्यांचे लाड करताना व्हिटॅमिनयुक्त सर्व अन्न त्या मांजरांना मिळते. परंतु त्या मांजरदांपत्यालाही पिल्ले व्हायला नकोत, म्हणून बोक्याचे व्हॅसेक्टॉमी ऑपरेशन त्यांनी करवून घेतलेले आहे. 'सर्व्हीस' पाहुणा, म्हणून टोरोंटोतील अकराव्या मजल्यावरच्या त्यांच्या फ्लॅटमध्ये मी गेलो, तेव्हा दोघा मांजरांनी घरभर नुसता धुडगुस घातलेला होता; व एक मांजर तर सारखे माझ्या मांडीवर येऊन बसू लागले. डेव्हला इतका धुडगुस सहन झाला नाही, आणि त्याने रागावून मांजरदांपत्याला बाहेर व्हरांड्यात कोंडून ठेवले; पण बारबारा म्हणाली, "नको रे कोंडू त्यांना, खेळू दे !" तिने पुन्हा त्यांना मोकाट सोडले.

टोरोंटोला एक फार सुंदर कॅनडा प्रदर्शन कायम सजविण्यात आलेले आहे; नुसते हिंडून सर्व गंमती पाहायच्या म्हटल्या, तरी दिवसभर जातो. डेव्ह बारबाराने शनिवारी ते सर्व दाखविले. रविवारी सकाळी माझ्या इच्छेनुसार ताजी गव्हाची धिरडी (पॅन-केक) आणि मेपल-सिरपची झकास न्याहारी त्यांनी दिल्यावर मी म्हटले, "तुमच्या चर्चमधली रविवारची प्रार्थना बघू या का?" तेव्हा तिथे जाऊन, आम्ही गुडघे टाकून, बायबल हातात धरून, संगीताच्या सुरात, येशू खिस्ताची आळवणी केली; मग घरी जाऊन डेव्हला चंदनाची सिगारेट-केस दिली, बारबाराला जयपुरी बटवा दिला, आणि

त्यांचा निरोप घेऊन "भटकश्रमे"च्या चित्रविचित्र वळणांची वाट पुन्हा धरली. एकेक गावच्या, आणि नाना कुटुंबांतल्या तऱ्हा आणि गंमती पाहिल्या की वाटते, किती सांगू, आणि काय काय लिहू ? प्रवासातली खरी लज्जत म्हणजे माणसांचे हे इंद्रधनुष्य, आणि त्यांच्या परस्पर-संबंधांची ही रंगभूमी, यात मात्र काही शंका नाही.

या भटकंतीत फिलाडेल्फियातील एका कुटुंबातले दुःखद चित्र अजून डोळ्यांसमोर उभे राहते. त्यांनी मला शहरांतील स्वातंत्र्यघंटा आणि इतर ठिकाणे हिंडून दाखविली. घरी गेल्यावरही सर्वांशी मनसोक्त गप्पा झाल्या. परंतु त्यांचा पंधरा-सोळा वर्षांचा मुलगा घरात खूप रागावलेला होता. त्याने अगोदरच जेवून घेतले होते. आणि माझ्याशी तो चकार शब्द बोलला नाही; त्याबद्दल माझे काही म्हणणेही नाही; परंतु आई-वडिलांशी माझ्यादेखत त्याने कडाक्याचे भांडण काढले; त्यांना अद्वातद्वा बोलला, आणि रात्री तो घराबाहेर निघून गेला. त्या आईवडिलांचे चेहेरे आठवले की, अशी ही भांडणे नेहमी त्या घरात होत असावीत, असे वाटावे. मग तो मुलगा मादक द्रव्ये घेत होता की आणखी कसली समस्या होती, ते समजणे कठीण होते. पण तो मुलगा आईवडिलांना मारपीट करायलाही डगमगणार नाही, असे मला वाटले; आणि रोजच्या वितंडवादाने विटून आईवडिलांचे चेहेरे काळवंडले आहेत, असा मला भास झाला.

न्यूजर्सीतील सिलबरमन या ज्यू दांपत्याचे चित्र, याच्या अगदी उलट होते. ७७ साली, मी व सौ. चंपू भारतातून प्रथम न्यूयॉर्कला उतरलो, तेव्हा विमानतळावरती दोघे हंसतमुखाने आमच्या स्वागताला हजर होती; व त्यांच्या घरीच आम्ही प्रथम उतरलो. त्या दोघांचे परस्परांवरील प्रेम, त्यांच्या दोघा मुलींबद्दल त्यांना वाटणारा जिव्हाळा, आत्मविश्वास आणि प्रेमाचे लागेबांधे, किती स्पष्टपणे त्यांच्या बोलण्या-चालण्यात उमटत होते.

लोकांच्या घरासमोर हिरवळी ( लॉन ) लावणे, सुधारणे, आणि त्यांची निगा राखणे, हाच त्यांचा मुख्य व्यवसाय होता. नवरा घराबाहेरची कामे करायचा, आणि बायको घरचे ऑफिस, फोन, पत्रे संभाळीत असे. वर्षातून दहा महिने उसंत नाही, इतके काम त्यांना असायचे. आम्ही गेलो तेव्हा जरा त्यांचा "स्लॅक सीझन" होता. सौ. चंपूने त्यांच्यासाठी एक प्रवेशद्वारा-

वरचे तोरण, खास सोलापुरातून बनवून आणले होते. आंबा, नारळ, अशी रंगीत चित्रे, आणि अनेक चिमुकल्या घंटा बसविलेले ते अस्सल भारतीय तोरण त्यांना खूप आवडले; मग वर्ल्ड ट्रेड सेंटर, आणि शॉपिंगसाठी त्यांच्या-बरोबर आम्ही खूप भटकलो, ते सुखाचे दिवस आम्हांला अजून आठवतात. हे मनमोकळे हसरे दांपत्य मुंबईत आमच्या घरी पूर्वी उतरले होते, तेव्हाच त्यांचे आमचे प्रथमदर्शनी प्रेम जमले होते !

**नव्या भटक्या जमाती :**

आम्हां कोणा गोखल्यांची, अशी ही छोटीशी भ्रमणगाथा, काही फार मोठी अद्‌भुत नाही. सिंदबादची रहस्ये त्यात नाहीत; किंवा तरुण माणसांच्या पराक्रमांची झेपही त्यांत नाही, परंतु

“ केल्याने देशाटन, कुटुंब-मैत्री, घरात संचार ।
चेहेरे-ग्रंथ-विलोकन, मनुजा आनंद होतसे फार ।। ”

असा अनुभव आम्हांला आला.

केल्याने देशाटन, पंडितमैत्री, सभेत संचार ।
शास्त्रग्रंथविलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार ॥

असा तो जुना श्लोक आहे. अफाट देशाटन करणारी नवी पिढी पाश्चिमेत आता उदयाला आली आहे. टोरोंटोला डेव्ह आणि बारबारा यांच्या घरी मी उतरलो होतो. ती दोघेजण त्यापूर्वी नुकतीच जगप्रवास करून आली होती; ती दोघेजण अडीच वर्षे सतत स्वतःच्या ‘ मोटरहोम ’ गाडीतून नाना देशांतून प्रवास करीत होती; त्यातले अडीच महिने, हिंदुस्थानातच त्यांचे भटकणे झाले ! जरा थोडे पैसे साठले की आपली ‘ वाँडरलस्ट ’ची तहान शमविण्यासाठी तरुण मंडळी घराबाहेर पडतात, आणि कमीतकमी खर्च करून सहज दहापंधरा देशांतून हिंडून येतात.

पण पायाला भिंगरी लावल्यासारखा, अमेरिकन मनुष्य, स्वतःच्या देशातही एकसारखा आपले घर व पत्ता बदलत असतो. जगाच्या पाठीवर असा दुसरा क्वचितच एखादा देश या बाबतीत अमेरिकेची बरोबरी करू शकेल. आपल्याकडे नोकरी करणारांच्या बदल्या होतात, व सरकारी नोकरांच्या जास्त बदल्या होतात. पण अमेरिकेत बदली केली जाते म्हणून नव्हे, तर

अधिक चांगली संधी मिळते व मिळविता येते, म्हणून माणसे आपणहून सारखी पत्ते व घरे बदलत असतात. चार कोटी अमेरिकन (म्हणजे एकूण लोकसंख्येच्या वीस टक्के!) वर्षातून एकदा आपला पोस्टाचा पत्ता बदलतात, असा एक अंदाज प्रसिद्ध झालेला आहे. वॉशिंग्टनसारख्या शहरातली टेलिफोन डिरेक्टरी पाहिली, तर निम्म्यापेक्षा अधिक नावे नव्या डिरेक्टरीमध्ये नवीनच आलेली दिसतात! नव्या नोकऱ्या, नवी घरे, फोन, सारे काही झटपट मिळू शकते, आणि जुना फ्लॅट, घरे, झटपट सोडता किंवा विकता येतात. भाड्यानेही अनेक वस्तू मिळत असतात.

**झाडे भाड्याने मिळतील :**

आपल्याकडे काही शहरांतून सायकली भाड्याने मिळतात, तशा अमेरिकेत मोटरगाड्या भाड्याने मिळतात; काही तासांसाठी, दिवसांसाठी किंवा महिन्यांसाठी मिळू शकतात. मोटरीप्रमाणेच टी. व्ही. सेट, फर्निचर, लॉनमोअर, जडजवाहिरे, टेप-रेकॉर्डर, चांदीची भांडी– इथपासून शर्ट आणि चादरीपर्यंत सर्व काही भाड्याने मिळू शकते; अमेरिकेत नऊ हजार असे जनरल स्टोअर्स आहेत, की जिथे वस्तू नुसत्या भाड्याने मिळतात; विकत मिळतच नाहीत! घराभोवती काही काळ लावण्यासाठी झाडेझुडपेसुद्धा भाड्याने मिळू शकतात, आणि गाय किंवा मांजर पाळायची असतील, तर तीसुद्धा भाड्याने मिळतात!

आणि अर्थात या सर्वांच्या जोडीला हायर पर्चेज, व क्रेडिट कार्डच्या सोयीमुळे पैशांचे हप्ते भरून मोठे घरही घेता येते; व हप्ते भरून अनंत वस्तूंचा संसारही त्या घरात क्षणार्धात उभा करता येतो, आणि त्याची वाटेल तेव्हा वासलात लावणेही फार कठीण जात नाही.

"जुन्या वस्तू फेकून द्या, आणि नवीन घ्या!" असा दिव्य संदेश घेऊन, टी. व्ही., वृत्तपत्रे, आणि दुकानदार अमेरिकन माणसाला सतत नव्या वस्तू घेण्याला आकर्षित करीत असतात.

**नित्यनूतन आणि क्षणभंगुर :**

जीवन हे क्षणभंगुर आहे, अशी वेदान्ताची शिकवण आहे. 'क्षणोक्षणं

यन्नवतामुपैति ', म्हणजे क्षणोक्षणी नित्यनूतनतेने उमलते ते जीवन, अशी सुंदर कल्पना आपल्याकडे ऋषिमुनींनी गाइलेली आहे. अशा या नित्यनूतन व क्षण-भंगुर जीवनाची खरी प्रचीती अमेरिकन माणूस अनुभवीत असतो !

आणि आपले गाव, शाळा, आई-वडील, धार्मिक परंपरा, अशी काही श्रद्धास्थाने जन्मभर जतन करावीत, अशी भावनाही तिकडे आपल्याइतकी दिसत नाही. जणू काही कसलेही जोरदार मायापाश नसलेला हा अमेरिकन जीवन्मुक्त झालेला आहे !

आणखी पंधरा-वीस वर्षांनंतर, किंवा एक दोन पिढ्यांनंतर, समाजाचे चित्र कसे दिसू लागेल, त्याची भविष्यवाणी सांगण्यासाठी, अमेरिकन समाजपंडित सतत चिंतन–मनन करीत असतात. " फ्यूचरॉलॉजी " नावाचे एक नवे शास्त्र तेथे उदयाला आले आहे; म्हणजे फल-ज्योतिष नव्हे, तर सर्वांगीण अभ्यास करून भविष्याचे अचूक दर्शन घेऊ इच्छिणारे नवे समाजशास्त्र. इ. सन २००० साली विज्ञान कोठपर्यंत पोचेल, विवाहसंस्थेचे काय होईल, शस्त्रास्त्रांची शर्यत थांबेल की नाही, अशा स्वप्नांच्या गूढगुंजनामध्ये तेथले प्रकाण्डपंडित गुंतलेले आहेत. आणि डझनावारी आडाखे व पुस्तके प्रसिद्ध होत आहेत.

**ग्रीनिंग ऑफ अमेरिका :**

असा एक सुंदर प्रयत्न म्हणून आर्थर राइश या लेखकाच्या ' ग्रीनिंग ऑफ अमेरिका ' या पुस्तकाचा उल्लेख करता येईल. हे पुस्तक अगदी अली-कडचे नाही, पण त्यात मांडलेला तीन जमान्यांचा सिद्धान्त मोठा आकर्षक वाटतो. म्हणून मी तो थोडक्यात येथे देऊ इच्छितो.

तो म्हणतो की, अमेरिकेचा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांची तीन जमान्यांत विभागणी करता येण्यासारखी आहे.

( १ ) ज्याने त्याने स्वतःपुरते पाहायचे, त्यासाठी बेदरकारपणे मुसंडी मारायची, असा जुना जमाना पूर्वी अमेरिकेत माजला होता.

( २ ) चालू जमाना म्हणजे ' मिलिटरी इंडस्ट्रिअल कॉम्प्लेक्स 'चे अधिराज्य आहे. सत्तेची हाव, समाजकल्याणापेक्षा नफेबाजी महत्त्वाची, चैनी वाढविण्यासाठी बेमुर्वत जाहिरातखोरी; आणि शस्त्रास्त्रांचे बेजबाबदार उत्पादन

करण्यासाठी लष्करशहांची व उद्योगपतींची झालेली हातमिळवणी. माणसाचा दर्जा हा त्याच्या सत्तेवर व पैशावर अवलंबून; आणि शिक्षण हे ' रॅट–रेस '-साठी बद्धपरिकर झालेले– असा हा चालू जमाना आहे.

( ३ ) राईश म्हणतो की, आता अमेरिकेचे हळूहळू ग्रीनिंग व्हायला लागणार आहे; खऱ्या अर्थाने समाज-जीवनामध्ये हिरवळ निर्माण होणार आहे. या ' नया जमाना 'मध्ये माणूस हा प्रथम माणूस राहणार आहे; त्यामुळे कोणालाही कमी लेखले जाणार नाही. आपुलकी, प्रेम, सहानुभूती, शाश्वत मूल्यांचे महत्त्व, मैत्री, करुणा यांचा उदय होईल. गरीबांची कणव आणि विश्वकल्याणाची तळमळ वाढू लागेल. लढाई, चढाओढ, हिंसा, राक्षसी महत्त्वाकांक्षा यांचे महत्त्व या जमान्यात कमी कमी होत जाईल, असे त्याचे भाकित आहे. पण अशा या ' ग्रीनिंग 'ची लक्षणे अद्याप फारशी दिसत नाहीत. लष्करशाहीच प्रबळ होते आहे, असे आजचे चित्र आहे.

व्हिएतनाम युद्ध चालू असताना होत नव्हता इतका वाढता खर्च प्रतिवर्षी लष्करावर सध्याच्या ' शांतते 'च्या काळात तेथे होत आहे !

♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
822
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## : ३ :

# भोजनभाऊंची मिष्ठास कहाणी

बंडूच्या टोयोटा गाडीतून सॅन होजेच्या डाउन-टाउनकडे आम्ही निघालो होतो. रंगीबेरंगी झगमगीत निऑनसाइनमध्ये ‘ मामा मिया पिझेरिया ’ अशी इटालिअन रेस्टॉरंटची लकाकी पाटी वाचली; आणि मी बुचकळ्यात पडलो, की हे ‘ मामा ’ कोण ?

“ अहो, हे एकच मामा नाहीत इथं. ‘ मामा सॅम अँड बर्गर ’, ‘ मामा बोंगिओनों ’, अशी अनेक मामा-मंडळींची रेस्टॉरंट्स इथे आहेत.” बंडूने उलगडा करून सांगितले. “ त्याचं काय आहे, की मागल्या युद्धात काही इटालिअन आणि अमेरिकन सैनिक हिंदुस्थानात आले होते; तेव्हा मुंबईच्या ‘ मामा काणे ’ विश्रांतिगृहातील चमचमीत घिरडी, आंबोळी आणि मिसळ खाऊन ते इतके खूष झाले की त्यांनी एक ‘ फॉरेन-कोलॅबोरेशन ’च करायचे ठरविले; त्याचा परिणाम म्हणजे आता मामांच्या नावावर इथली ही रेस्टॉरंट्स चालतात ! ”

“ ते खरंच आहे, ” बन्याबापू म्हणाले, “ आणि मग त्या सेडरिक

हार्डमनचं तरी काय, तसलाच प्रकार आहे ! कालच्या पेपरमध्ये पट्टीचा खाणारा फुटबॉलकॅप्टन म्हणून त्याचं वर्णन आलं आहे; मला मुळी त्यानं त्याच्या घरीच जेवायला बोलावलं होतं; आणि भिंतीवर चक्क हंबीरराव मुतनाळे पहिलवानाचा फोटोच त्यानं लावला होता, त्याचं मला मुळीच आश्चर्य वाटलं नाही. अरे काय त्याचं खाणं ? तू वाचलंस ना ते वर्णन ? प्रत्येक जेवणात पाऊण किलो बीफ किंवा चिकन त्याला लागतं. दर आठवड्याला १ किलो सॉसेज, १ किलो चीज, २० अंडी, २ गॅलन दूध, ३ किलो फ्रूट सॅलड, ४ गॅलन संत्रा रस,– असा त्याचा आहार आहे ! पाणी कधीच पीत नाही तो; संत्रा रस किंवा दूध पितो. म्हणजे हा आहार त्याला पुरत नाही; पण वजन फार वाढून चालत नाही ना इथल्या फुटबॉलला ! मग काय करील बिचारा ? उपाशी राहतो झालं ! पण कोल्हापुरी पहिलवानाच्या फोटोची तरीसुद्धा पूजा केल्याशिवाय तो फुटबॉल खेळत नाही म्हटलं ! सेडरिक मुळी मला सांगतच होता की, कोल्हापूरची ती पहिलवानी स्फूर्ती नसली, तर मी कसचा खाणार, आणि काय खेळणार ? ”

बंडू आणि बन्याबापू–दोघांनीही सर्वांना ‘ मामा ’ करण्याचे ठरविले होते. कारण आज शुक्रवारची सायंकाळ होती, फॉर्म्युला ठरलेला होता; पाच-सहाजणांचं एक टोळकं करायचं; गप्पांना विषय वाटेल तो; पेपरमधलं ‘ पिझ्झा कुपन ’ कापून घ्यायचं, म्हणजे ५० टक्के सूट मिळून मोठा पिझ्झा सर्वांनी घ्यायचा; ‘ पिझ्झा हट ’ला फोन अगोदर करायचा की “ बंडू आणि कंपनी येत आहे, तरी कांदा आणि ‘ हलापिनो पेपर ’ ( म्हणजे इथली ढब्बू तिखट मिरची ) घालून झणझणीत पिझ्झा तयार ठेवा ! ” तिथे गेल्यावर सर्वांनी प्रथम मनसोक्त सॅलडची मिसळ, हवी तितकी, पाहिजे तितक्या वेळा, पाहिजे ते त्यात घालून घ्यायची, तरी एकच किंमत असते. कटकन छान तुकडा मोडणारे क्रिस्प, चविष्ट लेट्युस हा त्यातला मुख्य भाग. ‘ आइसबर्ग लेट्युस ’ या गोंडस नावाखाली, कोबीपेक्षा मोठा गड्डा फ्रीजमधून काढून ते विकतात. मग त्यावर कांदा, टोमॅटो, बीट, हरभरा, पावटा, काकडी– काहीही, कितीही घाला– आणि वरती घमघमीत ‘ थाउजंड आयलंड ड्रेसिंग ’ घालून बंडू डुलत डुलत टेबलाशी आला की मला आठवण यायची– पुण्यात भेळ घेऊन येताना तो असाच डुलायचा ! मसाला दोशा म्हणजे जसे

आपले राष्ट्रगीत झालेले आहे, तसे पिझ्झा म्हणजे अमेरिकेची राष्ट्रगीता झालेली आहे !

सॅलड-मिसळ, पिझ्झा-डोसा आणि पाचपंचवीस जोक्स हसून झाले की आज कोणती बिअर व्यायची, यावर गंभीर चर्चा व्हायची; पण आज माझ्या-सारखी भटजी मंडळी कंपनीला असल्याने 'स्ट्रॉबेरी मेल्बा फ्रोगर्ट' आम्हाला देण्याचा घाट त्याने घातला होता. 'स्ट्रॉबेरी आणि पीच घातलेले फ्रोझन योगर्ट' असा त्याचा भावार्थ बन्याबापूंनी मला पामराला स्पष्ट करून सांगितला.

**योग आणि योगर्ट :**

आता योग आणि योगर्ट दोन्हीही कित्येक वर्षे अमेरिकेत लोकप्रिय झाली आहेत, हे मला माहीत होतं; पाणी सुटू नये म्हणून जिलेटिन वापरून दही करतात, तेव्हा लो-फॅट योगर्ट म्हणतात, हेही मला माहीत होतं; पण फ्रोगर्ट किंवा आइस्क्रीमसारखं फ्रोझन योगर्ट म्हणजे एक नवीनच बंड आणि प्रस्थ गेल्या काही वर्षांत इथं फोफावलं आहे !

योगर्ट खाऊन रशियन शतायुषी होतात; 'तक्रं शक्रस्य दुर्लभम्'; दही खाल्ल्याने युरोपिअन शेतकऱ्यांना कॅन्सर होत नाही; अशा प्रकारची सुभाषिते आणि भाकडकथा सांगोवांगी षट्कर्णी होऊ लागल्या होत्या.

दुधाच्या अडीचपट भावाने योगर्ट विकता येत असेल, आणि त्याचबरोबर गिऱ्हाइकांना शतायुषी करण्याचे पुण्यही पदरात पडत असेल, तर मग अमे-रिकन उद्योगपती मागे राहणे कसे शक्य आहे? त्याच्या कल्पकतेला एक नवीन शिंग उगवल्यासारखं झालं.

३१-डरफुल (थर्टिवन-डरफुल) अशा नावाखाली शेकडो दुकानांतून एकतीस प्रकारचे वंडरफुल आइस्क्रीम आजही इथं विकले जाते. आता त्यांच्या जोडीला, किंवा चढाओढीला, १६ प्रकारचे स्वाद असलेले फ्रोगर्ट मिळू लागले आहे. रंगीत टी. व्ही.वर षोडषगुणी चित्रविचित्र फ्रोगर्टचे सुंदर डबे दिसतात; आणि त्याच्यावर लहान मुले (साहजिकच) अगदी तुटून पडतात. रॉबी म्हणतो— माझा अननस फ्लेवर, जिनी म्हणते— माझी रासबेरी, मग इतर पोरे दुसरी नावे गातात— लेमन, पॅशनफ्रूट, पीच, प्लम, चॉकोलेट,

ब्लूबेरी, पपया– आणि मग कोनमधून, किंवा ‘ संडे ’ बनवून, पॉपासिकल्स बनवून पोरं ते खातात; संत्रारस, मध आणि व्हॅनिला घालून योगर्ट फ्रीज केले, की “ योगी फ्रूट फ्रीज ” अशा नावाने चक्क कायाकल्प झालेला असतो, असे सुमधुर आश्वासन आबालवृद्धांना मिळते. अनंतकोटी अशा त्या योगर्टनायकांचे सारे सारे ब्रह्मांड पोराबाळांना व मोठ्यांनाही टी. व्ही.वर कसे गुरफटून टाकते !

**कूपमंडूक पुणेरी :**

तसे आमच्या मुंबईतही श्रीखंडाबरोबरीने ‘ त्रिखंड ’, ‘ आम्रखंड ’, ‘ हापूस-लस्सी ’, ‘ पीयूष ’, असे बुलंद प्रकार चारदोन हॉटेलांतून दिसतात; पण इथले सप्तरंगी षोडष-गंधी योगर्ट आणि फ्रोगर्ट, जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी कसे सर्वत्र धुडगुस घालते, ते प्रत्यक्ष पाहायला जावे तेव्हा त्याच्या वंशा कळे.

पण मी बंडूला म्हटले, “ खरं सांगू का ? परवा सनीव्हेलमध्ये त्या जोशी-कडे कसं केशर-जायफळयुक्त घरगुती श्रीखंड केलं होतं ! त्या मस्त चवीच्या मानाने हे योगर्ट अगदी बेचव वाटतं मला !—सारे जहांसे अच्छा– असं आपलं ते श्रीखंड म्हणजे खरंच किती सुपीरिअर वाटतं, नाही का ? ”

बंडूला हे माझे म्हणणे काही पटले नाही; तो म्हणाला, “ तुम्ही लेको पुणेरी भटजी म्हणजे असेच कूपमंडूक; अरे, जगात काय काय चाललं आहे, ते जरा नीट पाहा खरं ! ”

**प्रचंड पैसा :**

पिझ्झा, हॅम्बर्गर, फ्राइड चिकन, अशा ‘ तयारबाज ’ मालाला इथे “ फास्ट-फूड्स ” म्हणतात. घराबाहेरच्या खाण्यावर अमेरिकन मंडळी म्हणे पाच हजार कोटी डॉलर्स ( ४००० कोटी रुपये ) दर वर्षी खर्च करतात; त्यातला ‘ फास्ट-फूड्स ’चा वाटा २८ टक्क्यांपर्यंत झपाट्याने वाढून पोचला आहे. ‘ पिझ्झा हट ’ कंपनीच्या दर वर्षी नव्या आणखी ४०० शाखा निघत असतात ! मॅकडोनॉल्ड ( रेस्टॉरंट ) हा तर सर्वांचा दादाच म्हटला पाहिजे. त्यांच्या ४२०० शाखा जगभर आहेत. १९७७ साली ११ कोटी डॉलर्स ( १०० कोटी रुपये ) नुसता नफाच त्या कंपनीने मिळविला. स्वच्छता,

स्वाद, सौंदर्य आणि समाधान यांमध्ये उच्चांक गाठण्यासाठी पराकाष्ठेची तपश्चर्या या कंपनीने केली आहे, असे सांगितले जाते. हॅम्बर्गर, चीजबर्गर, फ्रेंच फ्राइज, मिल्क शेक, इत्यादींच्या जोडीला 'एग-मॅक-मफिन' नावाचा अभिनव ब्रेकफास्ट प्रकार, चार वर्षांच्या संशोधनानंतर तिने अलीकडे लोकप्रिय केला आहे. दर वर्षी जाहिरातीवरही ३२५ कोटी रुपयांचा अगडबंब खर्च ती करते. आकाशाकडे पाहताना, हिंडताफिरताना, टी. व्ही. पाहताना, उठताबसता सर्वत्र जनार्दन जसा भरून उरलेला असतो, तसा हा मॅकडोनाल्ड !

दुपारचे बारा वाजले की रंगीत टी. व्ही.वर 'सोप-ऑपेरा'ची नाटके सुरू होतात; वर्षानुवर्षे त्यांतली कथानके चालू आहेत. पॅटचा घटस्फोट होणार की नाही, डोरायनचा प्रेमाचा त्रिकोण कसा फसतो, आणि मायकेलचे विचित्र सत्य उघडकीला येईल का ?– याबद्दल साऱ्या दर्शकांना उत्सुकता असते. सोप ऑपेराने भुरळ घातलेली लक्षावधी मंडळी, 'पुढे काय होणार' हे पाहण्यासाठी दुपारी टी. व्ही. लावून बसली, म्हणजे बेछूट जाहिरातींनाही अगदी ऊत येतो; एकदा मी तासभर घड्याळ लावून मिनिटे मोजली; चार मिनिटे नाटक, मग दोन मिनिटे जाहिराती, पुन्हा ४ मिनिटे नाटक व २ मिनिटे जाहिराती– असा धुमाकूळ स्वच्छंदपणे चालू होता. मग त्यामध्ये डिकॅफिनेटेड कॉफी म्हणजे अपायकारक कॅफीन काढूनही स्वादिष्ट असलेली कॉफी, कोणी ना कोणी मिटक्या मारीत पीत असतो; ( बंडू म्हणतो की ती कॉफी रद्दी लागते, स्वादिष्ट वगैरे काहीही नसते. ) किंवा दुधात भरपूर भिजल्यावरही तसूभरसुद्धा न वाकणारे नवे मक्याचे पोहे पाहून कुणा तरी बॉबचा कलिजा आनंदाने बहरलेला दिसतो– खलास झालेला दिसतो !

आणि मग गोमांसाचे तुकडे अधिक चमचमीत लागणारा नवीन माल बाजारात आल्याने, जुन्या ब्रँडकडे आता 'कुत्रेसुद्धा ढुंकून पाहणार नाही' हे प्रत्यक्षच कुत्र्यांना टी. व्ही.वर आणून दाखविले जाते; पण वाचकहो, तो जुना आणि चविष्ट नवा पुडा, दोन्हीही कुत्र्यांसाठीच असतात, माणसासाठी नव्हे. कुत्री-मांजरी टी. व्ही.वर प्रत्यक्ष बोलूनच सांगतात की, "मला किनई, ते म्यॉव मिक्स कित्ती कित्ती आवडतं म्हणून सांगू ?" मांजराला ९ जन्म असतात, अशी एक दंतकथा आहे. त्यामुळे 'नाइन लाइव्हज' नावाने विकले जाणारे अन्न मांजराला अधिक प्रिय असते, हे अर्थात ओघानेच आले.

एका जाहिरातीत घरातला मुलगा, त्या मांजराकडे पाहून आनंदाने डोळे मिचकवतो; आणि मग ती गुबगुबीत रंगीत मांजरेही, त्याच्या खास व्हिटॅमिनयुक्त अन्नपुड्यांकडे पाहून, अगदी तसेच डोळे मिचकवतात ! आता इतके सगळे कौतुक पाहिल्यावर दुसरा कोणता तरी गचाळ माल आपल्या लाडक्या कुत्र्या-मांजराला देण्याची कोणाची बिशाद आहे ? कॅलिफोर्नियातील एक शास्त्रज्ञ डॉ. मॉरिस यांनी मात्र संशोधन करून अलीकडे असे जाहीर केले आहे की, शाकाहारी आहार मांजरांना उत्तम मानवतो; त्यामुळे कंपन्यांनी मांसमच्छर न घालता माल बनविल्यास राष्ट्रीय बचत होणार आहे !

यावरून आठवण झाली; सान्ता बारबारा गावी आम्ही एका ओळखीच्या सुखवस्तू अमेरिकन दांपत्याकडे गेलो होतो. त्यांना हिंदुस्थानात येण्याची इच्छा आहे व ऐपतही आहे; पण त्यांची लाडकी कुत्री ‘ टिना ’ हिला मग कोठे ठेवायची ? ( कारण भारतात नीट निगा होणार नाही ) नवरा बॉब म्हणाला की, “ आपण तिला केनेलमध्ये ठेवू; तिथे रोज फक्त ३ डॉलर्स ( २७ रुपये ) पडतील;” पण बायको ॲना म्हणाली, “ नको रे बॉब, केनेलमध्ये टिनाला फार एकलकोंडे वाटेल; माझ्या बहिणीकडेसुद्धा मी तिला ठेवू इच्छित नाही; मला वाटतं, आपण हिंदुस्थानात जाण्याचा बेत रद्द करू या ! ” आता बोला !

अशा मंडळींच्या प्रेमळ भावना जपून, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी, उद्योगपती आणि टी. व्ही.वाले बिचारे अविरत प्रयत्न करीत असतात !

टी. व्ही. म्हणजे इथले एक मायबाप सरकारच आहे; जनतेवर खरोखरी त्यांचंच राज्य चालतं. अमेरिकन लोक जरुरीपेक्षा दुप्पट साखर खातात, त्याचे कारण अमेरिकन शब्दात सांगायचे तर इथल्या टी. व्ही.ने लोकांना ‘ शुगर-जंकी ’ करून टाकले आहे. “ ‘सेगो’ खा; म्हणजे तुमच्या ‘ एगो ’ला धक्का बसणार नाही ! ” असं एक गाणं बजावून सांगतं; आणि “ लाल रंगाचे ‘ हवायन पंच ’ प्या, म्हणजे तुमचा उत्साह ओसंडून झणत्काराने नाचू लागेल ! ” असा टी. व्ही.नं संगीत रंगीत गुलजार भाषेत एकेक किस्सा सुनावला, की खुळ्यासारखे स्त्रीपुरुष स्टोअर्सकडे धाव घेतात, आणि ‘ सेगो ’ व ‘ हवायन पंच ’ खरेदी करून आणतात.

**तीन कोटी गलेलठ्ठ :**

आणि हे स्टोअर्स तरी केवढाले? सुपरमार्केटमध्ये ८००० च्या वर वेगळाल्या वस्तू मिळू शकतात; आणि दिवसाकाठी लक्षावधी रुपयांचा माल विकला जातो. सुपरमार्केटचा फेरफटका, म्हणजे जणू काही चौऱ्यांशी लक्ष योनींचा चित्रविचित्र फेराच असतो. आर्टिचोक-( कमळडड्डी ) पासून झुकिनी-( दोडकी ) पर्यंत, नुसती भाजीपाल्यांची नावेच ए टु झेड इतकी अनेक, की ती नीट लक्षातही रहात नाहीत. अनंत प्रकारची फळे, ब्रेड, केक, कुकीज, क्रॅकर, कँडी, अंडी, मासे, खेकडे, डुकरे, तंगड्या– कोणती वस्तू नाही असं नाहीच. स्विस चीज, मेक्सिकन टाको, हिंदी चहा, इटालिअन ड्रेसिंग, व्हिएन्ना सॉसेज, इंग्लिश मफिन, फ्रेंच ब्रेड असे सारे विश्वदर्शन तिथे तुम्हाला घडते. अक्रोड-चॉकोलेट, चेरी-पाय, ॲपल-फ्रिटर्स, बबुगोशा आइसक्रीम, मशरूम-सूप, काष्टौषधी चहा ( हर्ब टी ), मनुका-पोहे, भुइमूग ( पीनट ), बटर, लेमन-डोनट, गाजर-केक, अननस-कुकी, चीज-हॅम्बर्गर, अशा अनेक स्टंट वस्तूंचा तो माया-बाजार पाहिला, म्हणजे असे वाटते की, ही ‘ यांकी ’ मंडळी कशापासून काय मिश्रपदार्थ बनवतील, याचा तुम्हाला कधी थांगपत्ता लागायचा नाही ! आणि इथली बहुसंख्य मंडळी हा सर्व अन्नकोट पदरी पाडून अंगावर चढवू शकतात,– गरिबीचे दारुण दुःख इथं जवळजवळ नाहीच– म्हणून या अन्नकोटाचे कौतुक इथे मनाला फारसे कधी खुपत नाही.

आता हे मात्र खरे की, इथली काही मंडळी फारच मोठा अन्नकोट अंगावर चढवितात ! किती खायचं आणि किती लठ्ठ व्हायचं, याला काही मर्यादाच राहात नाही ! अमेरिकेतील अंदाजे १५ टक्के म्हणजे सुमारे तीन कोटी मंडळी गलेलठ्ठ आहेत, असा शास्त्रज्ञांचा कयास आहे. येलची मानसशास्त्रज्ञ डॉ. जूडी रोडिन हिने त्याचा विशेष अभ्यास केला आहे. ती म्हणते की, मिष्टान्नाचे रूप, गंध, किंवा नुसत्या विचारानेसुद्धा ही मंडळी हुरळून जातात; मनावरचा एकदा तोल सुटला की त्यांच्या स्वादुपिंडातून अधिकाधिक इन्शुलिन स्रवू लागते, आणि त्यांची भूक सारखी वाढतच जाते.

या गलेलठ्ठांच्या भोजन-मंडळात आपण अडकू, या भीतीने शेकडो अमेरिकन मंडळी नाना प्रकारच्या वजनवाढीविरोधी मंडळात ( वेट वॉचर्स

क्लब) सामील होतात; डायेटिंग औषधे, व्यायाम, उपास– जंग-जंग पछाडतात. त्यासाठी ८००० कोटी रुपये दरवर्षी खर्च करतात.

पण डॉ. जूडी रोडिन म्हणते की, टी. व्ही. आणि वृत्तपत्रातील गोड–गोड आणि मॅड–मॅड जाहिरातींवर जोपर्यंत निर्दय बंधन लादले जात नाही, तोपर्यंत वजनविरोधी लढाईत यश मिळणे सुतारम् शक्य नाही. लठ्ठपणाशी लठ्ठालठ्ठी करता येणार नाही !

**पहिला नंबर– गोमांस खाण्यात :**

म्हणूनच गोमांस खाण्यातही अमेरिकन माणसाचा आज जगात पहिला नंबर आहे. घरात २–३ मोटरगाड्या असणे, २–३ टी. व्ही.सेट किंवा रेडिओ दोन-तीन खोल्यांतून असणे हे जसं इथं मोठेपणाचं लक्षण, तसंच बीफ-स्टेक खाणं हेही खानदानी लक्षण समजलं जातं.

१९७१ साली, १४ कोटी टन मका आणि सोयाबीन खाऊन पुष्ट झालेल्या गुरांना अमेरिकेत कापण्यात आलं, आणि त्यापासून फक्त २ कोटी टन मांस मिळालं. म्हणजे १२ कोटी धान्य जवळजवळ फुकट गेलं; कारण धान्याऐवजी इतर भरडा गुरांना घालण्याची प्रथा अमेरिकेत फारशी नाही; आणि एवढं मोठं धान्य खर्चून मिळविलेलं ते दोन कोटी टन मांसही त्यांना पुरेसं वाटत नाही, म्हणून मोठ्या प्रमाणावर गोमांसाची आयातही केली जाते. या आयातीतही अमेरिकेचा पहिला नंबर आहे ! दरडोई सव्वादोन किलो मांसाची आयात अमेरिकेत होते, आणि ती वापरून दरडोई महिनाभर रोज एक हॅम्बर्गर सर्वांना इथं खाता येईल, इतकी ती आयात आहे ! कोस्टारिकासारख्या गरीब देशांतून त्यातली निम्मी आयात केली जाते; एका पाहणीत असं आढळून आलं आहे की, गेल्या काही वर्षांत कोस्टारिका या देशामधील गोमांस उत्पादनाचं प्रमाण ९२ टक्क्यांनी वाढलं, पण त्या देशातील मांस खाण्याचे प्रमाण २६ टक्क्यांनी कमी झाले ! म्हणजे आजकाल आपल्या कोकणातला हापूस आंबा, तिथल्या गरीब माणसाला खायला मिळत नाही; तो आंबा कुवैतला जातो. किंवा गोदीवाल्यांच्या (मुंबईतील) संपामुळे क्वचित गोदीतच पडून कुजतो, तसा थोडासा हा प्रकार आहे !

**मानवतेविरुद्ध पाप :**

धान्याची उधळपट्टी करून, अतिरेकी प्रमाणात गोमांस खाण्याच्या या प्रतिष्ठेला धक्का देणाऱ्या लहानमोठ्या चळवळी इथे चालू आहेत; पण अद्याप त्यांना मोठा प्रतिसाद मिळालेला नाही. श्रीमती लॅप या लेखिकेनं 'डायेट फॉर ए स्मॉल प्लॅनेट' नावाचे सुंदर लोकप्रिय पुस्तक लिहिलं आहे, त्यात ती म्हणते की, "अर्धा पौंडी बीफ-स्टेक तुम्ही रेस्टॉरंटमध्ये मागविलात, की तिथंच तुमच्यासमोर ४७ ते ५० अर्धपोटी गरीब माणसं झुणकाभाकरीसाठी रिकाम्या बश्या घेऊन वाट पाहात आहेत, अशी कल्पना करा; आणि त्यांना उपाशी ठेवलंत, तरच तुम्ही तो बीफस्टेक खाऊ शकाल हे लक्षात घ्या; कारण माणसांऐवजी गुरांना धान्य घालून, आणि सातात एक अशा अल्प प्रमाणात मिळालेलं हे गोमांस खालन मानवतेविरुद्ध तुम्ही पाप करीत आहात, यात कसलीही शंका नाही!"

१९५० साली दरडोई ३५ किलो गोमांस खाणारा अमेरिकन, १९७५ साली ७० किलो खाऊ लागला आहे. प्रोटीनचे प्रमाणसुद्धा जरुरीपेक्षा तो दुप्पट खात असतो. इतके गोमांस खाण्याची त्याला मुळीच जरुरी नाही; इतकेच नव्हे तर पूर्णपणे शाकाहारी राहूनही त्याला भरपूर प्रोटिन मिळून अगदी चैनीत राहता येईल, आणि जगावर उपकार केल्यासारखं होईल, असे ती लेखिका अनेक आधार देऊन आपल्या पुस्तकात बजावत आहे. मात्र हा 'मूर्ख खादाडपणा' आहे, किंवा हे "सर्वनाशाचं तत्त्वज्ञान" आहे, असं शास्त्रज्ञांना कितीही ओरडू दे; पण मॅकडोनाल्डच्या हॅम्बर्गरनं, आणि बीफ-स्टेकच्या प्रतिष्ठेनं मोहित झालेल्या इथल्या सामान्य माणसाला त्या शास्त्रज्ञांचं "भिकार तत्त्वज्ञान" ऐकायला फुरसत नाहीये!

हा विषय निघाला की बन्याबापू अस्वस्थ होतात. ते म्हणतात की, "इटालियन पिझ्झा आणि मेक्सिकन, चायनीज, जपानी प्रकार इथं जर लोकप्रिय होऊ शकतात, तर आपला बटाटावडा, दोशा, इडली, उपमा, पापड, नान, रसगुल्ला, मटरपनीर, मिठाई, इथं लोकप्रिय व्हायला काय हरकत आहे? कुठं गेले सगळे उडुपी, आणि चंदू हलवाई? शाकाहारातसुद्धा केवढी किक असू शकते, हे या बेट्यांना आपण नको का शिकवायला?"

बंडू म्हणाला, "अहो, बापू, आपली भारतीय रेस्टॉरंट्स, आपल्याच अनेक मंडळींनी इथे अनेक शहरांतून उघडलेली आहेत. पण भारतीयांची संख्याच मुळी या देशात इतकी कमी आहे, तर आपल्या पाककलेचा प्रभावही इथं जेमतेमच असणार !" पण बन्याबापूंना ते पटत नाही, आणि ते खट्टू होतात.

आणि मग एक दिवस अवचितपणे असं काही घडून आलं, की बन्याबापू अवाक् होऊन नुसते पाहातच राहिले ! सान्ता मोनिका बीचवर, ऑगस्टच्या एका थंडगार सायंकाळी आम्ही गेलो होतो. सुंदर, मुलायम सोनेरी उन्हात, उदंड पसरलेली ती रुपेरी वाळू; लांड्या चड्डयांतली गुलहौशी मंडळी— पोहणारी, एकदम पाच पतंग उडवणारी, स्केटर बोर्डावरून हसत घसरत हुंदडणारी, गिटारीवरचे सूर छेडीत डोलणारी— अशी ती सुरम्य सृष्टी मनाला अपरंपार खुलवीत होती. तेवढ्यात हरेकृष्ण मंडळींची वार्षिक रथयात्रा दिंडी, भजन व नाचाच्या जल्लोषात तेथे येऊन पोहोचली. न्यूयॉर्कहून खास आलेल्या मंडळींचे एक नाटक, प्रदर्शन, भक्तिगीते असा मोठा सुरेख संगीत कार्यक्रम त्या मंडळींनी केला, आणि सरतेशेवटी सुमारे ५० हजार मंडळींना मोफत हिंदी, शाकाहारी मेजवानी हरेकृष्ण मंडळींनी दिली. गरमागरम शिरा, सामोसा, पचडी, पापड, पेढे—बर्फी, मसाला दूध, असा भरपूर प्रसाद मुक्तहस्ताने हजारो अमेरिकन्स मिटक्या मारीत चाखीत होते. या मोफत प्रसादाव्यतिरिक्त हरेकृष्णीयांनी त्या बीचवर अनेक स्टॉल्स दिवसभर चालवून हजारो डॉलर्सची विक्री केली; उत्तम अस्सल मटर कचोरी, वांगीभाजी, लाडू, संदेश, गुलाबजांब असे हिंदी पदार्थ विकणारी जणू काही मथुरा-भवनची जंगी शाखा सान्ता मोनिका बीचवर त्या दिवशी अवतरली होती ! इतकेच नव्हे तर ह्या वस्तू घरी कशा कराव्यात ते सांगणारे सचित्र सुंदर हरे-कृष्ण कुक-बुक ( २ डॉलर्स किमतीचे ) त्या दिवशी मुद्दाम १ डॉलरला विकण्यात आले, शाकाहार का चांगला, गोसेवा का चांगली, गोहत्या किती वाईट असते, कृष्णकथा किती अप्रतिम आहे, दहीताक का खावं, श्रीमद् भागवत, चैतन्य महाप्रभू, गीता, अशी अनेक विषयांवरील सुंदर छापलेली सचित्र उत्तम पुस्तके त्या दिवशी अल्प किमतीत विकण्यात आली. लॉस एंजेलेसच्या फॅशनेबल लगूना बीचवर 'गोविंदा' नावाचे रेस्टॉरंट त्यांनी काढलेले आहे; हिंदी संगीताच्या पार्श्व-

भूमीवर तिथे हे सर्व काही देत आहेत. अमेरिका-कॅनडातील ३५ हरेकृष्ण-मंदिरांमध्ये दर रविवारी हा मोफत प्रसाद देण्यात येतो, असंही मुद्दाम सांगण्यात आलं.

हरेकृष्णपंथीयांबद्दल कुणाचे काही गैरसमज असलेच तर असोत, पण आमचं दोघांचं स्पष्ट मत झालं, की हिंदी मंडळींनी त्यांना पूर्ण सहकार्य व प्रोत्साहन दिलं पाहिजे. शास्त्रशुद्ध नैवेद्य कृष्णार्पण करून, गोकुळअष्टमीनिमित्त सान्ता मोनिका बीचवर त्यांनी केलेला अन्नदानाचा सोहोळा पाहून बन्याबापू सुखावले; त्यांना अगदी भरून आलं; तोंडाला पाणी सुटलंच होतं, पण डोळे-सुद्धा पाणावले. ते मला म्हणाले, "कृण्वन्तो विश्वमार्यम्" हे असं आहे! रथयात्रेचा प्रसाद त्यांनी भरपूर घेतलाच, पण बंडूसाठीही तो प्रसाद ते घरी घेऊन आले; हरेकृष्ण कुकबुकच्या पाचसहा प्रती विकत घेऊन त्यांनी आपल्या अमेरिकन मित्रांना दिल्या!

: ४ :

# चंदेरी, सोनेरी, कॅलिफोर्निया !

हायवे नंबर पाचवरून ताशी साठ मैलाने आमची मोटर भरघाव चालली होती; जाणारे तीन रस्ते, आणि येणाऱ्या तीन ओळी, अशा सहा रस्त्यांवरून असंख्य गाड्या व अजस्र मोठे ट्रक धावत सुटले होते ! जाणाऱ्या येणाऱ्या रस्त्यांच्या मधोमध, लाल आणि पांढऱ्या कण्हेरीच्या भरगच्च फुलांनी शोभा देणारी असंख्य झुडपे लावलेली होती. वाटेत आडव्या रस्त्यांचे लाल दिवे नाहीत, गुरे ढोरे, पाचदारी नाहीत, ट्रॅफिक–जाम नाही, नागमोडी वळणे व अरुंद रस्ते नाहीत, रस्त्यांच्या दुरुस्त्या नाहीत;—– ताशी ६०–६५ मैल वेग चालू ठेवून अजिबात न थांबता, अक्षरशः शेकडो मैल प्रवास करणे ही इथे नित्याचीच बाब झाली आहे, रस्त्याच्या बाजूने दूरवर पसरत जाणारे एखादे ‘ रँच ’ मध्येच दिसायचे; त्यात सहज पाच ते दहा हजार गुरे दिसायची; किंवा मैलोमैल पसरलेले कापसाचे मळे पाहताना दृष्टी क्षितिजाला भिडत होती; त्यात शेकडो स्प्रिंकलर बसविलेले आणि त्यातून गरगर फिरणारी कारंजी, बोंडे फुटलेल्या रोपट्यांना भिजवून चिंब करीत होती; टोमॅटो किंवा कांदे

उघडे भरलेले अगडबंब ट्रक्स, कॅनिंग कारखान्यांच्या दिशेने निघालेले मधून मधून दिसायचे; किंवा शेताच्या कडेने पाच-पंचवीस गाड्यांतून आलेले शेकडो मेक्सिकन कामगार, कॅलिफोर्नियाच्या सोनेरी उन्हात फळे तोडण्याच्या कामात गुंतलेले दिसायचे.

साराच कारभार मोठा अजस्र ! अमेरिकेतल्या एकूण जमिनीपैकी दोन-तीन टक्केच जमीन कॅलिफोर्निया या प्रांतात आहे, पण या देशातल्या एकूण उत्पादनापैकी ९ टक्के उत्पन्न या राज्यात होते. चारशे प्रकारच्या जमिनीत धान्ये, भाज्या, फळे अशा तीनशेहून अधिक वनस्पती, याच प्रांतातल्या ८० लक्ष एकर बागाईत जमिनीत वाढतात. उत्तरेतल्या थंड डोंगरात स्ट्रॉबेरी व बबुगोशा-( पेअर )चे मळे आहेत; दक्षिणेकडे सरकू लागले, की काळ्या मातीतले भात, कांदे, घेवडे; त्याच्या दक्षिणेला द्राक्षे, मग पिंगट मातीतले प्रून, पीच, ॲप्रिकॉट, नेक्टरीन, प्लम, ऑलिव्ह, भाज्या व कापूस; आणि मग खरबुजे, कालिंगडे, संत्री, मोसंबी ( खरं म्हणजे 'मोसंत्री' नावाचे, अत्यंत गोड, मोसंबी व संत्री असे दोहोंचे गुण असलेले इथले 'ऑरेंज') इडलिंबू, डाळिंब, पेरू, अंजीर, ॲव्होकॅडो, बदाम, आणि अक्रोड होतात; आणि वाळवंटी भागात खजूरसुद्धा उत्तम पिकतो.

अमेरिकेतील ९० टक्के खजूर व सुका मेवा, ७५ टक्के द्राक्षे, मद्य, बेदाणे, मनुका, व्हिनीगर, ५० टक्के फळे आणि ३५ टक्के भाजीपाला, कॅलिफोर्नियाच्या सुवर्णभूमीत पिकत असतो ! बदाम, अक्रोड, पीच, पेअर, लिंबू, बीट, टोमॅटो, लेट्युस इत्यादी अनेक पिकांत या राज्याचा पहिला नंबर आहे. फुलेसुद्धा रोजच्या रोज येथून विमानाने, शिकागो आणि न्यूयॉर्कसारख्या दोन तीन हजार मैलांपलीकडील शहरांकडे विक्रीसाठी जात असतात. इथले वार्षिक शेतीचे उत्पन्न चारशे कोटी डॉलर्स ( म्हणजे ३२०० कोटी रुपये ) आहे ! २७५ कोटी रुपयांचा कापूस, १०० कोटी रुपयांचा लेट्युस, ३० कोटी रुपयांचा अक्रोड, असे एकेक आकडे आहेत. नारळाएवढे मोठे कं‍े मोसंब्याएवढी लिंबे, आणि कवठाएवढे मोठे पीच, असले बुल्यंला सर्रास व मार्केटमध्ये पाहायला मिळतात !

गारे व यशस्वी

। आम्ही निघालो

**हिरवे, पिवळे व काळे सोने :**

कॅलिफोर्निया प्रांत मोठा भाग्यवान समजला पाहिजे. 'पिवळे सोने, हिरवे सोने, आणि काळे सोने जिथे अमर्याद गवसले,' अशा शब्दांत एका कवीने या प्रांताचे वर्णन केले आहे. १८४८ साली प्रथम सोन्याच्या खाणी सापडल्या, आणि अनेक प्रांतांतून अमेरिकन साहसी वीर मोठ्या संख्येने इथे येऊन थडकले; चार वर्षांत २०० कोटी रुपयांचे सोने त्यांनी हस्तगत केले, आणि मग 'गोल्ड रश'चा जमाना संपला; त्यानंतर चार कोटी एकर निबिड जंगलाच्या तोडीने, आणि शेती-फळबागांच्या उपक्रमाने इथे हिरव्या सोन्याची मुहूर्तमेढ रोवली गेली; आणि त्याच्यानंतर क्रूड ऑइलच्या खाणीतून पेट्रोल व डीझेलचे काळे सोने मुबलकपणे त्यांच्या हाती लागले !

पण ही अमूल्य भूमिगत संपत्ती, बेदरकारपणे आज उधळून टाकली जात आहे, असा गंभीर इशारा तिथले शास्त्रज्ञ निर्वाणीच्या भाषेत देऊ लागले आहेत. केवळ शेतीसाठी दरसाल सत्तर कोटी रुपयांचे पेट्रोल व क्रूड ऑइल कॅलिफोर्नियात लागते; एकट्या लॉसएंजेलेसच्या परिसरात ५० लक्ष मोटरगाड्या बेछूटपणे पळत असतात ! "ईनर्जी वाचवा, काटकसर करा" हे परवलीचे शब्द वापरून, प्रेसिडेन्ट कार्टर यांनी अनेकविध करांचा, व प्रतिबंधांचा कार्यक्रम आखला होता, पण त्यांना विरोध करण्यात अनेक पुढारी गुंतले होते.

फोर्ड कंपनीचा एखादा कारखाना चालावा, तशा शिस्तबद्ध यांत्रिक मिलिटरी खाक्यात इथला शेतीचा धंदा चालतो. बहुधा एक शेती-कंपनी पाच-सहा हजार एकरांची असते, त्यात १२५ ते १५० हॉ. पॉवरचे १८ टरबाइन पंप ठिकठिकाणी बसविलेले. कोट्यवधी डॉलर्स खर्च करून, दोन-अडीचशे मैलांवर अगडबंब नळ टाकून, कोलोरॅडोसारख्या नदीचे बारमाही पाणी सरकारने इथल्या वाळवंटात आणल्याने, पैशाचा पाऊस किंवा गंगा दिसायेचावतरल्यासारखे झाले आहे. १५ ट्रॅक्टर्स, ४० ट्रक, ५० मोटरगाड्या, भिडत होती; त्य‍ड़े असा ताफा, एकेक कंपनीच्या दिमतीला असतो. सुतार-कारंजी, बोंडे फुटर्ती ३ लक्ष पेट्या बनवून तयार ठेवतात; आणि शीतगृहामध्ये
नी भरलेल्या साठ हजार पेट्या साठवून ठेवण्याची सोय

असते. ७०० कायम मजूर व २५०० हंगामी असतात. मध्यभागी ऑफिसे, घरे, बंगले, शाळा, स्टोअर, टेनिस कोर्ट असा सारा सरंजाम असतो. म्हणजे आपल्याकडले चहा-कॉफीचे मळे किंवा साखर कारखान्याप्रमाणेच; पण भाजीपाला, फळबागा, तांदूळ, सर्वच पिकांसाठी तोच अवाढव्य यांत्रिक पसारा इथे दिसतो. विमाने वापरून, ३० ते ४० एकरांत, एका तासात भाताची पेरणी करतात; फक्त २५ फूट उंचावरून ते विमान चालवतात, आणि पाच मिनिटांत आठ पोती बियाणे पसरवितात. मग पाच महिनेपर्यंत पाण्याची पातळी शेतात सहा इंच ठेवण्यासाठी, फळ्यांचे बांध घालतात, आणि एकरी दर मिनिटाला ९ गॅलन पाणी सोडतात. ऑक्टोबरात मोठे थ्रेशर वापरून, भात झोडपून घेतात. कॅलिफोर्निया विद्यापीठातून शेतीच्या सर्वांगीण संशोधनाचा धडाका सुरू असतो, आणि उद्योगपती मोठमोठ्या कंपन्या चालवून, साऱ्यांचा समन्वय करीत असतात !

**बदामी किस्सा :**

एकेक पिकाच्या संघटनाही कशा जबरदस्त आणि गंमतीदार असतात ! कॅलिफोर्निया-बदाम-निर्मात्यांच्या संघटनेचे कार्यालय सॅक्रॅमेन्टो राजधानीत आहे. तिथे त्यांनी एक सुंदर बदाम-प्लाझा-गिफ्ट-शॉप व मिनी—थिएटर बांधले आहे. भेट देणाऱ्या प्रवाशांना प्रथम बदामाची लागवड, जोपासना व विक्री यासंबंधी एक सुंदर रंगीत चित्रपट दाखवितात. मग एका पाच मजली कारखान्यात नेतात, तिथे फळे तोडून, बदामगर निवडून, सुंदर वेष्टनांच्या डब्या-बाटल्यांतून भरताना, व कांदा, मीठ, पेपरमिंट असे स्वाद त्यांना देताना दाखवितात. नुसत्या विमान कंपन्यांसाठीच इथे अडीच लाख चंदेरी पाकिटे बदामांनी रोजच्या रोज भरली जातात ! टूरच्या शेवटी निरनिराळ्या स्वादाचे बदाम चाखायला देतात ! बदाम-संघटनेचे ४७०० सभासद आहेत; शेकडो झाडे एकेका सभासदाकडे असतात; परंतु “ केवळ ७० झाडे ” असणारा छोटा सभासदही आहे !

इथली गंमत अशी आहे की, मोठमोठी शेते ही जरी इथली सर्रास व फायदेशीर पद्धत असली, तरी जिद्दीने छोटी शेती चालविणारे व यशस्वी करणारे लोकही इथे आहेत ! त्या दिवशी हायवे नंबर पाचवरून आम्ही निघालो

होतो, ते असेच एका अमेरिकन दांपत्याची छोटी फळबाग पाहण्यासाठी. लॉस एंजेलेसपासून फक्त ४० मैल दूर असलेली ही जागा, वयाच्या ६८ व्या वर्षी केन नावाच्या या निवृत्त इंजिनिअरने घेतली. कारण निवृत्तीनंतर फळबाग करण्याचे स्वप्न त्याने उराशी बाळगले होते. केवळ दोन एकरांची ही जागा अकरा वर्षांपूर्वी त्याने घेतली, तेव्हा एकही झाड तिथे नव्हते. आज तिथे १३० इडलिंबू व ६४ अॅव्होकॅडोची झाडे भरपूर उत्पन्न देत असतात. चार झाडांमध्ये एक, असे स्प्रिंकलर बसवलेले आहेत, ते नुसते बटन दाबून चालू करायचे; पाण्याची कसलीही ददात नाही. जमिनीत उपकरण खुपसून पाणी किती आहे, ते केन पाहतो, आणि मग जरुरीप्रमाणे आठ-पंधरा दिवसांनी पाणी सोडतो. महिन्याचे पाण्याचे बिल पंचवीस डॉलर्सपेक्षा जास्त येत नाही.

केन आणि त्याची बायको मेरी, गेली दहा अकरा वर्षे या बागेत खपत आहेत; लॉस एंजेलेसमधला आमचा मित्र बॉब, ही बाग दाखवायला आम्हांला घेऊन आला होता. कारण बॉब व केन हे खूप जुने मित्र आहेत. बागेत फिरताना बॉब हळूच आम्हांला म्हणाला, की आज केन ही बाग विकायला गेला, तर त्याला दोन लक्ष डॉलर्स मिळतील ! "शेतकरी गरिबीत जगतात, आणि श्रीमंतीत मरतात," अशी इथे एक म्हण आहे; कारण जमिनीच्या किमती वाढत राहतात, आणि फळझाडांच्याही हळूहळू वाढत असतात.

फळे काढण्याचे एक छोटे उपकरण केनने बनविले आहे, आणि त्याचे त्याने पेटंटही घेतले आहे. आम्ही तिथे गेलो, तेव्हा दुपारी ३ वाजता हा ७८ वर्षांचा केन बागेतून फळे कशी काढावी, व छाटणी कशी करावी, ते आपल्या मेक्सिकन कामगाराला सांगत होता. फळे न दुखवता, व डहाळ्या फार न मोडता केन फळे काढतो. एका लांब सरकत्या काठीला रबरी चिमटा व स्प्रिंगा बसविल्या आहेत, त्यामुळे माणूस सुखाने फळे तोडू शकतो, असे तो म्हणतो.

बाग पाहिल्यावर त्याने आपले, सुखसोयींनी सज्ज असलेले, नवे बांधलेले घर दाखविले. अॅव्होकॅडोची चटणी, मंचो, आणि शांपेन त्याने आम्हांला देऊ केली, आणि तो आपले अनुभव सांगू लागला. बटाटा चिप्स असतात, तसेच मक्याचे छान चिप्स करतात; त्यांना इथे 'मंचो' म्हणतात.

ॲव्होकॅडोच्या मऊ गरांमध्ये मीठमसाला टाकून मिक्सरमध्ये एका मिनिटात मेरीने चटणी तयार केली. चटणीला लावून मंचो खा, व शांपेन प्या, अशी इथली पद्धत !

"हिरव्या इडलिंबाला १५ सेंट भाव मिळतो, तर पिवळ्या लिंबाला पौंडामागे फक्त २ सेंट भाव मिळतो." केन गंमती सांगत होता; (मी म्हटले की आमच्या देशात पिवळ्याजर्द लिंबांना चांगला भाव येतो, व ईडलिंबे बहुधा कमीच.) "कधीकधी हिरव्यांना ४० सेंटसुद्धा भाव येतो; मग मी एकाऐवजी दोनसुद्धा मेक्सिकन मजूर कामाला ठेवतो; भाव खाली गेला की मजूर ठेवणे परवडत नाही !" या मजुरांना इंग्लिश नीट येत नाही, म्हणून एक इंग्लिश स्पॅनिश डिक्शनरी केन सदैव आपल्या पॅंटच्या खिशात ठेवतो. त्यांच्या मजुरीचे दर वाढत चालले आहेत, अशी तक्रार केन करीत होता; पण अमेरिकन मजूर त्या कमी दराला मिळणे शक्य नाही, हे मात्र त्याने कबूल केले.

उत्तम हवा, पाणी, वीज, रस्ते, फोन, मार्केट अशा छान सोयींमुळे इथे लक्ष्मीचा वरदहस्तच आहे हे खरे; पण ६८ व्या वर्षी कामाला लागून, दहा वर्षांत समृद्ध फळबाग, स्वतः खपून उभारणारी, केन आणि मेरीसारखी धडपडणारी दांपत्ये आणि माणसे इथे आहेत, हेही इथल्या संपत्तीचे रहस्य आहे; आणि मेक्सिकन, चिनी, फिलिपिनो अशा स्वस्त मजुरांच्या निढळाच्या घामावर ही श्रीमंती उभारलेली आहे, हेही खरे.

मेक्सिकन गरीब कुटुंबांच्या झुंडी अद्यापही दरवर्षीच्या हंगामात मेक्सिकन सरहद्दीवरून कायदेशीर व बेकायदेशीर मार्गांनी, या मळ्यांकडे धाव घेत असतात; आणि कॉंट्रॅक्टर व मळेवाले त्यांच्या गरिबीचा फायदा उठवतात. "वेट-बॅक" असे त्यांना नाव आहे, असं केन सांगत होता; कारण सरहद्द ओलांडताना काहीजण गुपचूप नदी पोहून बेकायदेशीर प्रवेश करतात, तेव्हा त्यांच्या पाठी भिजतात ( Wet back ) !

**सेजरची पदयात्रा व सत्याग्रह :**

लेट्यूस, टोमॅटो, प्रून, पीच अशी मऊ फळे तोडणारी ( प्रचंड मळ्यासाठी ) यंत्रे अद्याप झालेली नाहीत, किंवा सर्रास उपयोगात नाहीत म्हणून, व इतरही

कामांसाठी मजुरांची जरुरी भासते. पण मध्यंतरी कॅलिफोर्निया विद्यापीठाने, पाच लक्ष रुपये किंमतीचे ऑटोमॅटिक लेट्युस कापणी यंत्र, व तसलेच टोमॅटो कापणी यंत्र शोधून काढले. ती वापरली गेली, तर दहा वर्षांत एक लक्ष गरीब कामगार बेकार होतील, अशी भीती कामगार-पुढाऱ्यांना वाटते; लोकप्रिय मेक्सिकन पुढारी ' सेजर शावेझ ' याने लेट्युस कामगारांतर्फे निर्वाणीचे खलिते मळेवाल्या कंपन्यांकडे धाडले होते.

१९६६ ते ७० पर्यंत, सेजर शावेझने गबर बागायतदारांशी व कंपन्यांशी जो ४ वर्षांचा निकराचा लढा दिला, तो अमेरिकन शेतीच्या व शेतमजुरांच्या इतिहासात अविस्मरणीय असा मानला जातो. महात्मा गांधी व मार्टिन ल्यूथर किंग, यांची चरित्रे वाचून त्याने स्फूर्ती मिळविली; त्यांचे फोटो तो आपल्या घरी लावतो, आणि अहिंसक शांततामय लढ्यावर त्याची नितान्त श्रद्धा आहे ! अत्यंत गरीब मेक्सिकन मजुर-कुटुंबात तो वाढला; ताशी ७० सेंट पगारावर त्याने काम केले, आणि शेकडो मजुरांबरोबरीने काम करून त्याने दारिद्र्याचे व पिळवणुकीचे अश्रू ढाळलेले आहेत. हे अश्रू पुसून, गुलामी जिणे संपावे, म्हणून त्याने संघटना उभारून संपाचे हत्यार उपसले; ३०० मैलांची कामगारांची पदयात्रा काढली होती आणि सेनेटर केनेडी व कॉलेज-विद्यार्थ्यांची संपूर्ण मदत व आपुलकी मिळविली होती.

बागायतदारांनी मारहाण सुरू केल्याने, त्याचे काही अनुयायी बिथरून हिंसक बनले, तेव्हा शावेझने महात्मा गांधींप्रमाणे पंचवीस दिवसांचा उपास करून त्यांचे मन वळविले ! इतर देशांतले संपफोडे कामगार द्राक्षमळ्यांसाठी बागायतदारांनी आणले, तेव्हा शावेझने साऱ्या अमेरिकन शहरांतून मोहीम आखून द्राक्षावर बहिष्कार घालण्याचे शस्त्र उपसले, आणि अनेकांनी त्याला साथ दिली ! अखेरीस बागायतदारांनी समझोता केला, आणि ताशी दर दोन डॉलर्सपर्यंत कामगारांना वाढवून मिळाला, व त्यांच्या संघटनेमार्फत त्यांना काम मिळण्याची व्यवस्था झाली. परंतु ही लढाई अशीच चालू राहणार आहे; कारण अनेक हिकमत्या लढविणारे कारखानदार सर्वांना पुरून उरतील, अशी लक्षणे दिसत आहेत.

मध्यंतरी वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर बातमी आली की, अमेरिकन सरकार छोट्या शेतकऱ्यांसाठी खूप जमीन मोठ्या कंपन्यांकडून काढून घेऊन,

त्यांना मिळवून देणार आहे. आपल्या भारतात छोट्या शेतकऱ्यांसाठी पुष्कळ योजना आहेत; त्यामुळे मी मोठ्या उत्सुकतेने वाचू लागलो, तेव्हा मोठी गंमत आढळून आली. इथला "छोटा शेतकरी" म्हणजे त्याच्याकडे "फक्त १६० एकर" जमीन असू शकते. आणि ती सर्व बागाईत जमीन ! त्याच्या बायकोच्या नावावर वेगळी १६० एकर असू शकते; आणि दोघांनाही खंडाने आणखी प्रत्येकी १६० एकर करता येते ! म्हणजे नवरा-बायकोतच ६४० एकर ( १ चौरस मैल ) "छोटा शेतकरी" या बिरुदाखाली घेता येते; शिवाय त्यांच्या मुलांनाही घेता येते ! म्हणजे सगळाच आनंद आहे की नाही ?

शेतमालाच्या व्यापारावर बड्या कंपन्यांची मोठी मिरासदारी आहे. १९७१ साली प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासात असे दिसून आले आहे की, गेल्या वीस वर्षांत शेतमालाच्या किमतीत जी वाढ झाली, त्यातला फक्त सहा टक्के फायदा शेतकऱ्यांच्या पदरात पडला, आणि ९४ टक्के फायदा कंपन्यांनी उचलला. गरीबी या प्रांतांतून समूळ नष्ट झाली आहे, असेही नाही. ( अर्थात इथला गरीब, आणि आपल्याकडील गरीब यांची तुलना होऊच शकत नाही ); शहरातून आठांपैकी एकजण गरीब आहे, व ग्रामीण भागात चारांतला एक गरीब असतो. त्यांच्यात अर्थात नीग्रो, मेक्सिकन, चिनी, यांचाच भरणा जास्त आहे.

### अति तेथे माती :

इथली दुसरी समस्या म्हणजे प्रचंड जादा उत्पन्नाची विल्हेवाट कशी लावायची, आणि ते ठेवायचे तरी कोठे ? १९७७ साली, कॅनिंग केलेल्या पीच फळांच्या ५० लक्ष पेट्या पडून राहिल्याने, आणि निर्यात घटल्याने, सर्व विचार करून पीचची झाडे कापून टाकायला बागायतदारांनी सुरुवात केली ! ७०००० एकरांत पिकणारा पीच थेट ५५००० एकरांपर्यंत खाली गेला. मका, गहू आणि सोयाबीन यांची अशी काही विक्रमी उत्पादने या देशात झालेली आहेत, की त्यांच्या साठवणीची मोठी डोकेदुखी असते. ६६-६७ साली भारताला खूप धान्य पाठविल्याने कोठारे मोकळी व्हायला मदत झाली होती; १९७३ साली रशिया व चीनकडे भली मोठी निर्यात केली गेली, व जगभर धान्य-तुटवडा झाल्याने धान्याचे इथले भाव चौपट

वाढले; शेतकऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी गडगंज पैसा मिळविला; कोठारे सारी मोकळी झाली. १९७७ साली पुन्हा एकदा ‘ ये रे माझ्या मागल्या ’प्रमाणे प्रेसिडेन्ट कार्टर यांनी निर्णय घेतला की, पुढील वर्षी सर्वांनी आपापली वीस टक्के जमीन मोकळी, पडित ठेवून द्यायची, काही पिकवायचे नाही ! आणि ती मोकळी ठेवणाऱ्या शेतकऱ्यांना मोबदला म्हणून दोनतीनशे कोटी डॉलर्स वाटायचे ! गंमत म्हणजे १९८१ मध्ये रशियाच्या शत्रूने, प्रेसिडेन्ट रेगनने– रशियाकडे जाणाऱ्या धान्याच्या निर्यातीवरची बंदी उठवली ! धान्य खप-विण्यासाठी अनेक युक्त्या चालू असतात. अमेरिकेत पिकणाऱ्या धान्यापैकी निम्मे धान्य इथे गुरांना खायला घालतात ! त्यामुळे निदान तेवढी मागणी कायम राहते हा शेतकऱ्याला दिलासा दिसत असतो; परंतु विचारवंतांना धान्याची ही प्रचंड नासाडी पटत नाही. “ डायेट फॉर ए स्मॉल प्लॅनेट ” या पुस्तकात श्रीमती लॅप या लेखिकेने अभ्यासपूर्वक कारणे पुढीलप्रमाणे दिली आहेत. ( १ ) संत्री-मोसंब्यांचा रस इथे प्रचंड प्रमाणात काढतात; त्यानंतर उरलेला चोथा गुरांना देणे श्रेयस्कर ठरेल, पण तसं होत नाही. कोको, कॉफी, केळी या पिकांतूनही असे सकस चोथे इतर राष्ट्रांतून स्वस्तात मिळतील, व त्या राष्ट्रांना मदत मिळून, इथल्या धान्याचीही बचत होईल. पण हे प्रयत्न केले जात नाहीत. ( २ ) गुर-चरणासाठी प्रचंड क्षेत्रफळ पडून आहे. सकस पौष्टिक गवत जास्त प्रमाणात द्यावे, व धान्य वाचवावे; मांसाचे उत्पादन मुळीच घटणार नाही. ते मांस जास्त रसदार ( टेंडर ) होणार नाही. पण इतक्या पुष्ट व रसदार मांसाची अमेरिकन माणसाला मुळीच जरूर नाही असे ती लेखिका म्हणते. जरुरीपेक्षा दुप्पट प्रोटीन व दुप्पट मांस अमेरिकन मनुष्य खात आहे, ते त्याच्या आरोग्यालासुद्धा चांगले नाही; गलेलठ्ठपणा वाटत आहे, तो हित-कारक नाही. ( ३ ) गुरे कापण्यापूर्वी, दोनचार महिने “ फीड-लॉट ”मध्ये बऱ्याच गुरांना एकत्र आणून, व धान्य देऊन त्यांना पुष्ट करतात; शेणखत–मूत, गोबर-गॅस असा कोणताच उपयोग इथे करून घेतला जात नाही; अमोल नैसर्गिक संपत्तीचा हा अपव्यय आहे.

**भारतातली पद्धत श्रेष्ठ !**

“ भारतामध्ये गाईची निगा नीट राखली जात नाही, तिचा नीट उपयोग

केला जात नाही; शेणाच्या गोवऱ्या आपण नुसत्या जाळतो; आणि गोहत्या-प्रतिबंधामुळे मोकाट जनावरांचा सुळसुळाट मात्र माजतो;" अशी ओरड आपण अनेक वेळा ऐकलेली आहे; "याउलट अमेरिकेत पशुधनाची उत्तम जोपासना झाल्याने, तो देश समृद्ध झाला आहे" असेही आपण नेहमी ऐकत असतो. परंतु हे काही पूर्ण सत्य नव्हे; इतकेच काय, पण अमेरिकेपेक्षा हिंदुस्थानातच गुरांचा उपयोग माणसासाठी अधिक चांगला होत असतो, असे एका अमेरिकन कृषिशास्त्रज्ञाने सिद्ध केले आहे ! ! "एनव्हॉयर्नमेन्ट" या शास्त्रीय मासिकाच्या डिसेंबर '७५ च्या अंकात ब्रूस लिआँ या शास्त्रज्ञाने "पवित्र गाय" (सेक्रेड काऊ) या नावाचा प्रबंध लिहिला आहे. गुरांना दिले जाणारे सर्व प्रकारचे चोथे, भरडा इत्यादी खाद्य आणि गुरांपासून मिळणारी नांगरट, शेणमूत-गॅस, दूध, मांस, चामडी इत्यादींचा प्रत्यक्ष उपयोग दोन्ही देशांत किती होतो, त्याची व्यवस्थित आकडेवारी व किंमत त्याने हिशेब करून काढली आहे, आणि त्याने असा वैज्ञानिक स्पष्ट निष्कर्ष काढला आहे की, भारतामध्येच, अमेरिकेपेक्षा "एकॉलॉजिकल एफीशिएन्सी" एकंदरीत जास्त आहे ! "अमेरिकेत सहापट धान्य खाऊन एकपट मांस इथली गुरे देतात; असली खुळी उधळपट्टी हिंदुस्थानात नाही; हिंदुस्थानातील गुरे खातात त्यापेक्षा अधिक, ती माणसाला देतात; तिथे गुरा-माणसांचे संबंधही अधिक प्रेमाचे व जवळचे आहेत," असे त्यांनी प्रबंधाच्या शेवटी म्हटले आहे ! अमेरिकेतील इतर गंमती पुढीलप्रमाणे आहेत :

(१) अश्वारोहणाची नुसती हौस भागविण्यासाठी ५० लक्ष घोडी अमेरिकेत पोसण्यात येतात; व त्यांच्या अन्नासाठी अडीच कोटी एकर शेती पिकवली जाते. ही हौस कमी झाली तर तेवढे अधिक धान्य माणसासाठी मिळू शकेल. (२) धूम्रपान, मद्यपान आणि मांसाशन यांचे देशातले प्रमाण फार असून, ते आरोग्याला विघातक आहेच, पण अपघात, गुन्हेगारी, घटस्फोट यांचेही मूळ काही वेळा अतिरिक्त मद्यपानात सापडते. म्हणून हे प्रमाण कमी झाले, तर तंबाखू इत्यादीखालची जमीन मोकळी होऊन, अधिक धान्य मिळू शकेल. (३) घरोघरी शोभेच्या बागा आणि लॉन इथे असते, त्यासाठी जितके खत या देशात एकूण वापरतात, तितके साऱ्या भारतात शेतीतसुद्धा वापरले जात नाही !

**पासष्ट रुपयांची घाणेरी :**

सॅन होजे या उपनगरात ( सॅनफ्रॅन्सिस्कोपासून ५० मैलांवर ) आम्ही ६ महिने राहिलो होतो. सकाळी आसपास फेरफटका मारायला गेलो की, घरोघरच्या बागांतून पीच, प्लम, अक्रोड अशी फळे झाडाखाली पुष्कळ वेळा पडून राहिलेली दिसत; गुलाब, कण्हेरी, शेवंती, जास्वंदी, लिली, जिरेनिअम, ऱ्होडोडेंड्रॉन, चमेली अशी असंख्य रोपटी भरगच्च फुललेली दिसत ! या सर्व बागा रस्त्याला लागून उघड्याच असतात, आणि त्यांना कसलेही कुंपण नसते ! परंतु सर्व घरी रेलचेलच असल्याने, कोणालाच ती फुलेफळे उचलण्याचा मोह होत नाही; घरची माणसेसुद्धा आळसाने किंवा बेपर्वाईने ती फळे पुष्कळ वेळा उचलतच नाहीत ! किंवा मित्रांना बोलावून घेऊन जा म्हणून सांगतात, व कशीबशी ती संपवितात !

घराजवळ बागा करण्याची हौस इथे किती प्रचंड असते ! " वेस्टर्न गार्डन बुक " नावाचे एक सुप्रसिद्ध पुस्तक बंगला-बगीचा-संबंधी आहे, त्याच्या इथे दहा लक्षांहून अधिक प्रती आतापर्यंत विकल्या गेल्या आहेत ! कारण घरेही पुष्कळ, बागेची जागाही भरपूर; पाण्याची टंचाई नाही, आणि पैशाची व हौसेची तर नाहीच नाही ! मग नाना तऱ्हेची हत्यारे, सेन्द्रिय खते, टांगत्या कुंड्या, सुंदर रोपे यांवर वारेमाप खर्च करतात, आणि घराच्या आत व बाहेर फळेफुले बहरू लागतात.

आमचे एक हिंदी मित्र आहेत, त्यांनी एकदा आठ डॉलर्स खर्चून ( म्हणजे ६५ रुपये ) घाणेरीची व झेंडूची रोपे आणली, आणि घरी लावली; हे वाचून कोणाला वाटेल की, घाणेरीसाठी ६५ रुपये, म्हणजे हा काय आचरटपणा आहे ? पण त्याला उत्तर हे आहे की, इथले डॉलर्समधील उत्पन्नही खूप असते. डॉलर्सऐवजी " आठ रुपये " समजावे, म्हणजे डोक्याला त्रास होत नाही.

**कोकणचा कॅलिफोर्निया**

कोकणचा कॅलिफोर्निया होऊ शकेल, आणि व्हायला पाहिजे, असे आपण म्हणत असतो. दिव्य भव्य असे ते एक स्वप्न आहे. नुसता आंब्याचा विचार केला तरी लागवडीला योग्य असे हजारो एकर क्षेत्र आज कोकणात ओसाड पडून आहे. जमिनीच्या मालकीचा प्रश्न, पैशाची सोय, रस्त्यांचा अभाव,

अशा समस्या असूनही गेली दहा पंधरा वर्षे कोकणात आंब्याची नवी लागवड प्रतिवर्षी सारखी वाढतच आहे. पण तो वेग लक्षात घेतला तरी आणखी पंचवीस वर्षेसुद्धा पुरणार नाहीत, इतकी पडित जमीन कोकणात आहे. काही फळांना भरपूर पाणी लागते (उदा.–अननस), तितके बारमाही पाणी कोकणात फारच थोड्या ठिकाणी आज आहे. रस्ते, पाणी, वीज, पैसे, संशोधन, सारे काही कमीच आहे. पण जरा प्रयत्न झाला, तर लोकांचा प्रतिसाद चांगला मिळू शकतो; लहानसे उदाहरण द्यायचे झाले तर, शुगर-बेबी, असाही यामोटो या कलिंगडाच्या नव्या जातीबाबत देता येईल. दापोली विद्यापीठातर्फे या नव्या फार मधुर जातींचा अभ्यास व प्रचार सुरू झाल्यापासून काही वर्षांतच मोठ्या प्रमाणावर या कलिंगडाचे उत्पादन कोकणातील अनेक गावी होऊ लागले, आणि जानेवारी महिन्यापासूनच अशी कलिंगडे मुंबई–पुण्याच्या बाजारात येऊ लागली; पूर्वी उन्हाळ्यातच ती मिळत असत.

याउलट असे म्हणता येईल की, आंब्याचे आलेले पीक वाहून नेण्यासाठीसुद्धा डिझेलचा तुटवडा होतो, यासारख्या विचित्र समस्यांना कोकणचा बागाईतदार आज तोंड देत आहे. कुठे कोकण, आणि कुठे कॅलिफोर्निया ! जमीन अस्माना-इतकी भयानक तफावत आहे !

साधे स्ट्रॉबेरीचे लहानसे उदाहरण घेऊ. पंचवीस कोटी रुपयांची नुसती स्ट्रॉबेरी फळेच कॅलिफोर्नियात दरवर्षी पिकतात ! अमेरिकेतील एकूण स्ट्रॉबेरी-पैकी ७० टक्के उत्पादन कॅलिफोर्नियात होते. पूर्वी एकरी वीस टन स्ट्रॉबेरी उत्पादन म्हणजे अमेरिकेत भरपूर समजले जाई. आता कॅलिफोर्निया विद्यापीठाने संशोधन करून 'ऐको' नावाची जात शोधून काढली आहे. कुनी शिंटा नावाचा कॅलिफोर्नियात स्थायिक झालेला एक जपानी प्रगतिशील शेतकरी आहे. त्याने ऐको जातीची स्ट्रॉबेरी लागवड करून एकरी ५२ टनांचे विक्रमी पीक काढले, आणि दुसऱ्या वर्षी (१९७८ साली) ५७ टन त्याने काढले ! केवळ स्ट्रॉबेरीच्या सुधारित जाती व उत्पादनाच्या, पॅकिंगच्या सुधारित पद्धती, यावरच कॅलिफोर्नियाच्या स्ट्रॉबेरी बोर्डाने ऐंशी लाख रुपये आजपर्यंत खर्च केलेले आहेत.

कॅलिफोर्नियातील शेतकरी, संशोधक किंवा उद्योजक अधिक हुशार आहे,

असे समजण्याचे काही कारण नाही. कोकणचा शेतकरी किंवा संयोजक तितकाच बुद्धिमान आहे. पण खाजगी व सरकारी पैशाच्या उदंड गुंतवणुकीचा अखंड प्रवाह कॅलिफोर्नियात जसा कित्येक वर्षे वाहात राहिला, तसाच तो एकदिलाने अप्रतिहत कोकणात वाहू लागला, तरच कोकणचा कॅलिफोर्निया होऊ शकेल—म्हणजे काही प्रमाणात होऊ शकेल ! ' काही प्रमाणात ' असे म्हणण्याचे एक कारण असे की, सर्वच बाबतींत कॅलिफोर्निया न होणे हेच बरे ! गेल्या तीस वर्षांत कीटकनाशक रसायनांचा खप दहापटीने वाढला आहे, त्यामुळे कॅलिफोर्नियात विचित्र समस्या निर्माण झाल्या आहेत ! कारण ७५ टक्के कीटकनाशके निष्प्रभ ठरली आहेत; उलट इतर उपयुक्त कीटकांचा मात्र सरसहा नाश होऊ लागला आहे, आणि निसर्गाचा समतोल त्यामुळे बिघडू लागला आहे.

कॅलिफोर्नियातली अति-श्रीमंती म्हणजे जगातले नववे आश्चर्य आहे ! न्यूयॉर्कमध्ये दर सहा माणसांत एक मोटर असते, तर कॅलिफोर्नियात दर दोन माणसांत एक गाडी असते ! सोळा कुटुंबांपैकी एका कुटुंबाचा स्वतःचा पोहण्याचा तलाव असतो. पंधरा हजार खाजगी विमाने व पाच लक्ष खाजगी बोटी ( होड्या ) या राज्यात आहेत. अमेरिकेतील निम्मे नोबेल पारितोषिक-विजेते, हे कॅलिफोर्नियातलेच शास्त्रज्ञ आहेत. जगभर गेलेल्या अमेरिकन शांतिसैनिकांपैकी निम्मे तरुण शांतिसैनिक याच प्रांतातून गेले. पण आश्चर्य असे की घटस्फोट, गुन्हेगारी व आत्महत्या यांचे प्रमाणही कॅलिफोर्नियातच सर्वांत जास्त आहे !

अति-श्रीमंतीच्या गुदगुल्या कॅलिफोर्नियात जितक्या हसवितात, तितक्याच प्रमाणात अति श्रीमंतीचे चटके तिथे मनाला पिळवटून काढतात, असे दिसते. म्हणूनच की काय, पण ' हिप्पी ' लोकांचा उदय इथेच झाला; आणि हरेकृष्ण पंथ, परमहंस योगानंद, महर्षी महेश योगी, यांची अमेरिकेतील प्रमुख कार्यालये याच कॅलिफोर्नियात आहेत. व्हिएतनाम युद्धाविरुद्ध कॉलेज-विद्यार्थ्यांनी बंडाचे झेंडे उभारून रौद्रावतार धारण केला, तो याच प्रांतामध्ये; आणि इलेक्ट्रॉनिक्सचे संशोधन व कारखानदारी यामधील विलक्षण दिग्विजय गाजले तेही याच ' सुपर-डुपर ' कॅलिफोर्नियात !

**मायक्रो-इलेक्ट्रॉनिक्सचे माहेरघर :**

कॅलिफोर्नियाची ओजस्वी प्रगती जितकी अद्‌भुतरम्य आहे,तितकीच तिथल्या इलेक्ट्रॉनिक्स कारखानदारीची कथा मोठी बहारदार आहे. इलेक्ट्रॉनिक्सच्या अस्सल विज्ञानाचे बी कॅलिफोर्नियात उत्तम रुजले; मग विद्यापीठातील संशोधनातून कारखानदारीचे विशाल वृक्ष उभे राहिले. आणि या डेरेदार वृक्षांची फळे म्हणजे कॅलिफोर्नियातील शेकडो लक्षाधीश, असा हा रोमांच-कारक मणिकांचन योग येथे मनाला भुरळ घालतो.

पालो आल्टो गावात, ली द फॉरेस्ट या शास्त्रज्ञाने जिथे १९१२ मध्ये 'व्हॅक्यूम ट्यूब' प्रथम पूर्णत्वाला नेली, त्या घरावर "इलेक्ट्रॉनिक युगाचे जन्मस्थळ" अशी सुंदर पाटी लावण्यात आली आहे. या व्हॅक्युम ट्यूबमुळे कागदावर लहानशी माशी चालत असताना, जणू काही सैन्य चालत असल्याचा आवाज ली द फॉरेस्टला अवचितपणे एकदा ऐकू आला; त्या आश्चर्यातूनच या शोधाचा जन्म झाला. या निर्वात नलिकेमुळेच (व्हॅक्यूम ट्यूब), रेडिओ, टी. व्ही., लांबचे दूरध्वनी, टेप-रेकॉर्डर, कॉम्प्यूटर, आपोआप उघडणारे दरवाजे, अशा साऱ्या इलेक्ट्रॉनिक सुखांचे रहस्य हाती आले.

अलीबाबाच्या गुहेचे दार उघडावे, तसा मग इलेक्ट्रॉनिक खजिन्यांचा मायाबाजारच जणू काही गेल्या साठ-सत्तर वर्षांत इथल्या कल्पक संशोधकांनी हस्तगत केला, आणि त्यातून उद्योजकांनी संपत्तीचे डोंगर उभारले.

स्टॅनफर्ड विद्यापीठाने या नव्या संशोधनाला अमाप सवलती व उत्तेजन दिले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमधून पीएच्. डी. पदवी मिळविणारे हरहुन्नर संशोधक, स्टॅनफर्ड विद्यापीठाच्या त्या सुरम्य पालो अल्टो उद्यानातून जितके बाहेर पडले, तितके क्वचितच दुसऱ्या कोणत्या अमेरिकन विद्यापीठात निपजले असतील. चार हजार पीएच्. डी. एवढ्याशा सान्ता क्लारा तालुक्यात आहेत; त्यांनी स्टॅनफर्डच्या नावालाही प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. पण स्टॅनफर्ड विद्यापीठाने याहिपुढे जाऊन, आठ हजार एकरांचा विद्यापीठाचा परिसर कारखानदारांना लीजवर देण्यास सुरुवात केली. शिक्षण, संशोधन, कारखानदारी यांचा असा हा त्रिवेणी संगम घडून आल्यावर इलेक्ट्रॉनिक्सच्या

भरतीला उधाण येणे हे अपरिहार्य होते. स्टॅनफर्डच्या प्रो. टर्मनने अशा पंचावन्न छोट्या-मोठ्या कंपन्यांना स्टॅनफर्डच्या परिसरात रुजविले, आणि लक्ष्मी व सरस्वती अशा दोन्ही देवी दिमाखाने तेथे नांदू लागल्या. लॉकहीड, आय्. बी. एम्., कैसर, सिल्व्हानिया, जनरल इलेक्ट्रिक अशा नामवन्त कंपन्याही मग सान्ता क्लाराच्या रमणीय शांत परिसरात आपले बस्तान पसरू लागल्या. सर्व मोठ्या कंपन्यांनी मुंबई, पुणे, कलकत्ता येथेच कारखाने काढून सारा परिसर बकाल गर्दीने दूषित करून टाकायचा, असे इथे झाले नाही. सान्ता क्लारामधील फळबागांच्या परिसरात आठशे कंपन्या आज रुजल्या आहेत; पण निसर्गाच्या रमणीयतेला कोठेही तडा गेलेला नाही. भाऊगर्दी, झोपडपट्ट्या, ट्रॅफिक–जाम, कर्कश गोंगाट, किंवा स्मॉग यांतले काहीही दिसत नाही.

**सिलिकॉन व्हॅली :**

या कारखानदारीचा वाढता वसा कसा पसरतो, त्याचे मनोरंजक उदाहरण म्हणून फेअरचाइल्ड कंपनीचा उल्लेख करता येईल. या कंपनीत खूप वर्षे अनुभव घेतलेले सदतीस लोक बाहेर पडले व त्यांनी आपापल्या स्वतंत्र कंपन्या स्थापन केल्या! "सेमाय-कंडक्टर" तंत्रज्ञानाला त्यामुळे व इतर कारणांमुळे इतकी चालना या भागात मिळाली, की 'सिलिकॉन व्हॅली' असे नाव या सान्ता क्लारा तालुक्याला मिळाले आहे. 'सेमाय-कंडक्टर' व लेसर उत्पादनामध्ये, ही सिलिकॉन व्हॅली म्हणजे जागतिक राजधानी आहे, अशी ख्याती या तालुक्याला मिळाली आहे.

ही इलेक्ट्रॉनिक क्रांती म्हणजे काय होऊन राहिले आहे, ते आपण थोडक्यात समजून घेऊया. व्हाल्व्ह असलेले जुने मोठे रेडिओ जाऊन, ट्रॅन्झिस्टॉर बसाविलेले पॉकेट रेडिओ बाजारात आले, तेव्हा इलेक्ट्रॉनिक्समधील पहिली क्रांती सुरू झाली, असे म्हणतात. आता ट्रॅन्झिस्टॉरच्या जागी 'सिलिकॉन चिप' (सिलिकॉन धातूचा एक अत्यंत बारीक तुकडा) आली आहे, त्यामुळे "मायक्रोइलेक्ट्रॉनिक्स"ची दुसरी क्रांती सुरू झाली आहे, असे शास्त्रज्ञ म्हणतात. गेल्या दहापंधरा वर्षांत संस्मरणीय अशी जी तांत्रिक घोडदौड अनेक क्षेत्रांत दिसून आली, त्यामागे मायक्रोइलेक्ट्रॉनिक्सचे प्रगत विज्ञान होते. पृथ्वीभोवती सोडलेले यांत्रिक उपग्रह, चंद्रावर पाठविलेला

मनुष्य, आणि अतिसंहारी आय. सी. बी. एम्. मिसाईल क्षेपणास्त्रे, इथपासून तो इलेक्ट्रॉनिक डिजिटल छोटी घड्याळे व पॉकेट कॅलक्युलेटरपर्यंत सर्व यशांचे रहस्य ' सिलिकॉन चिप 'मध्ये सापडते, असे म्हणता येईल.

रेडिओ किंवा टी. व्ही. सेटमध्ये जितके ट्रॅन्झिस्टॉर असतात, त्याच्या शंभरपट ट्रॅन्झिस्टॉर, इवल्याशा पॉकेट कॅलक्युलेटरमध्ये असू शकतात ! कारण केवळ पाव इंच रुंदीच्या सिलिकॉनच्या तुकड्यावर वीस हजार ट्रॅन्झिस्टॉर्सचे जाळे विणता येणे, आज शास्त्रज्ञांना शक्य झालेले आहे. गेल्या दहा वर्षांत ही प्रगती अशा भरधाव वेगाने होत आहे की, पॉकेट कॅलक्युलेटरची किंमत आज पूर्वीच्या मानाने फक्त एक शतांश आहे ! अमेरिकेत शाळेतली पोरेसोरेही आज पॉकेट कॅलक्युलेटर, गणिताच्या अभ्यासासाठी, व सर्वसाधारण हिशेबासाठी वापरतात. पाढे पाठ म्हणणे वगैरे सर्व तिथे बंद झालेले आहे. डिजिटल मनगटी घड्याळे व कॅलक्युलेटर यांच्या किंमती भरमसाट उतरत गेल्यामुळे कॅलिफोर्नियात काही कंपन्यांचे दिवाळेही वाजले ! रॉकवेल या एकाच कंपनीला सोळा कोटी रुपयांचा तोटा कॅलक्युलेटर्सच्या कारखानदारीत सोसावा लागला ! सुबक आणि स्वस्त अशा जपानी मालानेही अमेरिकेशी तीव्र चढाओढ केली ! आज अमेरिकेत पन्नास टक्के माल जपानी बनावटीचाच विकला जातो !

अशा या विस्मयकारी इलेक्ट्रॉनिक धंद्याचे, आणि त्या सिलिकॉन व्हॅलीचे येत्या १५–२० वर्षांतील भवितव्य याहीपेक्षा चित्तथरारक आहे, असा कॅलिफोर्नियातील पंडितांचा इशारा आहे. कारण ती सिलिकॉन चिप याहीपेक्षा लहान होऊन, तिचे सामर्थ्य मात्र सारखे वाढत जाणार आहे. वैज्ञानिक प्रक्रियांचा खर्च दरवर्षी २५ टक्क्यांनी कमी कमी होत जाण्याची शक्यता आहे. आज एखादे नोटबुक घेऊन आपण हिंडतो, तसे उद्या– दहाच वर्षांनंतर अमेरिकेत नोटबुकच्या आकाराचा स्वतःचा खाजगी पोर्टेबल कॉम्प्यूटर घेऊन लोक हिंडू लागतील; या खाजगी कॉम्प्यूटरचा किती विविध मंडळींना कसा चतुरस्रपणे उपयोग करता येईल, त्याची ही यादी पाहा :—

हॉस्पिटलमधील डॉक्टर्स : पेशंटचा अद्ययावत रेकॉर्ड व एक्स-रे, आणि पूर्वीच्या अशाच पेशंटांची औषधयोजना व अनुभव.

| | | |
|---|---|---|
| आर्किटेक्ट | : | मोजमापे बदलून होणारे फरकांचे संभाव्य चित्र पाहणे. |
| कंपोजर | : | गाण्याचे नोटेशन करता करता, ते ऐकू येणे. |
| व्यापारी | : | अनेक कंपन्यांची विविध माहिती मुखोद्गत ठेवणे. |
| गृहिणी | : | अनेक सामानांची माहिती, यादी, हिशेब, स्मरण ठेवणे. |
| मुले | : | शेकडो पुस्तकांतील आकृत्या, माहिती, गोष्टी, चित्रांसह फटकन पाहता येणे; इलेक्ट्रॉनिक खेळ खेळणे. |

पुस्तक छपाईचा शोध लागल्यामुळे शिक्षणात जी क्रांती घडून आली, तशीच अभिनव क्रांती या अभिनव छोट्या खाजगी कॉम्प्यूटरच्या निर्मितीने आता येत आहे, असे शास्त्रज्ञ म्हणतात.

### कॅलिफोर्नियाकडे सर्वांची रीघ :

सिलिकॉन व्हॅली, आणि पंचरंगी शेती यांसारखी छप्पन्न इतर रंगतदार आकर्षणे कॅलिफोर्नियात दिमाखाने मिरवीत असतात. हॉलिवुड आणि डिसनेलँड म्हणजे प्रवाशांची तीर्थस्थाने आहेत. एरोस्पेस उद्योगधंदे आणि संरक्षण साहित्य-कारखाने यांमध्ये हजारो तंत्रज्ञ व कामगार गुंतलेले आहेत. एकट्या लॉस एंजेल्स विमानतळावर ३० हजार माणसे काम करतात. कारण बोरिवलीची लोकल किंवा काशी-एक्स्प्रेसने हजारो माणसे जातात, तसा इथे विमानाचा प्रवास चालू असतो.

दक्षिण कॅलिफोर्नियात,— लॉस एंजेल्सच्या परिसरात— स्मॉग व पोल्यूशन (प्रदूषण) खूप जास्त; त्या मानाने सॅनफ्रान्सिस्कोपासून १०० किलोमीटरच्या वर्तुळातील परिसराला 'बे-एरिया' म्हणतात. त्या भागात ते बरेच कमी आहे; त्यामुळे आणखी मूठभर मांस चढून, इथली मंडळी स्वतःला धन्यधन्य समजत असतात!

सॅन्फ्रॅन्सिस्कोचे सुप्रसिद्ध सोनेरी प्रवेशद्वार (गोल्डन गेट ब्रिज), त्यावर रेंगाळणारे रम्य धुके, आणि सौम्य ऊन, आणि त्या पुलावरून अखंड

वाहणारी अलिशान मोटरगाड्यांची ती कांचनगंगा– अशा त्या मनमोहक दृश्याची 'सुनहरी याद' कोणत्याही प्रवाशाला अविस्मरणीय वाटते.

**गो वेस्ट, यंग मॅन :**

रमणीय कॅलिफोर्नियाची ओढ आणि हाक अमेरिकन साहसी तरुणांना, पिढ्यान् पिढ्या साद घालीत आली आहे. साऱ्या जगातून माणसे तिकडे गेलेली आहेत. काही लक्ष जपानी, चिनी, मेक्सिकन, इटालिअन, स्पॅनिश मंडळी येथे स्थानिक झालेली आहेत. अंदाजे दहा हजार भारतीय मंडळीही या भागात विखुरलेली आहेत. एकट्या 'बेकटेल' कंपनीतच २५० हिंदी तंत्रज्ञ आहेत. इथले 'युबा सिटी' गाव म्हणजे शीख मंडळींचे एक छोटे अमृतसरच आहे. शीख–अमेरिकनांची शेती, फळबागा, व्यापार, शाळा, गुरुद्वारे, सारे काही या अमेरिकन अमृतसरात आहे !

कॅलिफोर्नियात जायला निघालेले, जगभरातील तरुणांचे लोंढे अद्यापही थांबलेले नाहीत. दर दिवशी कॅलिफोर्नियात १५०० नवी माणसे स्थायिक होण्यासाठी येत असतात. १९३९ मध्ये अमेरिकेतील पाच टक्के लोकसंख्या कॅलिफोर्नियात होती, ती १९६९ मध्ये दहा टक्के झाली ! आज दोन कोटी आहेत, ती संख्या २००० सालापर्यंत तीन कोटीपर्यंत कॅलिफोर्नियात होईल, असा अंदाज आहे.

♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
622
23506
संदर्भ 23/...
शाखा (स्थळ प्रत)

: ५ :

# घटस्फोट पाहावा घेऊन

‘ यूजीन ऑस्टिन ’ हा एक धाडशी स्टंटबहाद्दूर आहे. ‘ मुलांना पळवून नेणे ’ हा त्याचा पोट भरण्याचा उद्योग आहे; म्हणजे अगदी कायदेशीर असा हा राजरोस धंदा तो उजळ माथ्याने अमेरिकेत करीत असतो !

यापूर्वी घोडेस्वार होऊन गुरे राखणे, किंवा मगरी–सुसरींशी झुंज देणे असा पोटाचा उद्योग हा दांडगेश्वर करीत असे; पण आता मुले पळविण्याचे काम सुलभतेने अधिक पैसा देणारे आहे, असे त्याला पटले आहे.

अमेरिकेत व कॅनडात आपल्या अशीलांसाठी आजवर सहाशेच्या वर मुले त्याने पळवून नेली आहेत. प्रत्येक मुलामागे शंभर ते एक हजार डॉलर्स ( ८०० ते ८००० रुपये ) तो मिळवतो. घटस्फोट घेतलेल्या आईबापांची ही मुले असतात. घटस्फोटानंतर मुलांचा कबजा आईला मिळावा की बापाला, यावरून कोर्टकचेऱ्यांतील दावे कित्येक ठिकाणी चालू असतात; अशा या कायदेकानूं-तील पळवाटांचा फायदा घेऊन मुले पळवून नेण्यात यूजीनचा हातखंडा आहे. त्याच्या या कीर्तीमुळे “ मीन जीन ” ( Mean Jean ) अशा लोकप्रिय

नावाने युजीन ओळखला जातो ! ( मराठीत आपण त्याला ' हीन जीन ' म्हणू या ! ) मूल पळवू इच्छिणारा बाप जीनबरोबर जातो, आणि आईकडचे मूल जीनच्या मदतीने पळवून नेतो; किंवा आईबरोबर जीन जातो, आणि बापाकडचे मूल तो आईसाठी पळवून आणतो !

अमेरिकेत घटस्फोटांचे प्रमाण सतत वाढत असल्याने, मुले पळविण्याचा जीनचा धंदाही तेजीत आहे. " घटस्फोटाच्या कायद्यात सुधारणा व्हायला पाहिजे; म्हणजे मग अशी पळवापळवी करण्याची पाळी येणार नाही," अशी मल्लिनाथी आपल्या धंद्यासंबंधी जीन वर आणखी करीत असतो !

## संसाराला लागलेली कीड :

१९७४ च्या या एकाच वर्षात दहा लक्ष मुलांच्या आईबापांनी अमेरिकेत घटस्फोट घेतला. आज अमेरिकेतील एकूण मुलांपैकी २० टक्के मुले, केवळ एकाच पालकाकडे (फक्त आईकडे, किंवा फक्त बापाकडे) राहून मोठी होत आहेत. आई-वडिलांच्या दोघांच्या प्रेमाचा लाभ न मिळू शकणारी, कोवळ्या वयातच कौटुंबिक संघर्ष आणि विघटन पाहिलेली, आणि मातृसुखाला किंवा पितृसुखाला पोरकी झालेली ही मुले, म्हणजे श्रीमंत अमेरिकेतील संसाराला लागलेली व्यक्तिस्वातंत्र्याची कीड आहे. आज अमेरिकेतील ४० टक्के लग्नांचा शेवट घटस्फोटात होतो. कॅलिफोर्निया प्रांतात तर घटस्फोटांचे प्रमाण अमेरिकन सरासरीच्या दीडपट आहे !

## सॅनफ्रॅन्सिस्कोचा उच्चांक :

पॅसिफिक महासागराचे दर्शन देणारे सॅनफ्रॅन्सिको हे एक अत्यंत रमणीय शहर आहे. हिवाळ्यात त्रासदायक बर्फ नाही, तसेच पोल्यूशन, उकाडा, गर्दी, धूळ, दारिद्र्य, गोंगाट नाही, असे दृष्ट लागण्यासारखे हे अनुपम सुंदर शहर आहे. पण अशा या भाग्यशाली शहराने सध्या कशात उच्चांक गाठला असेल, तर म्हणे " ॲलकॉहॉलिझम " आणि " होमोसेक्शुॲलिटी " अशा दोन विचित्र क्षेत्रांमध्ये ! म्हणजे खरोखरच या शहराला दृष्ट लागली, असे म्हटले पाहिजे. डिसेंबर ७७ च्या ' सॅन होजे मर्क्युरी 'मध्ये इथल्या ' होमोसेक्सिझम 'चे आलेले आकडे व वर्णने वाचल्यावर क्षणभर शिसारी आल्या-

वाचून राहात नाही. या शहरामध्ये सहा किंवा सात माणसांत एकजण ‘ होमो ’ असतो; एक-तृतीयांश शिक्षक व प्रशासक होमो आहेत, असा निष्कर्ष एका अभ्यासातून निघालेला आहे ! सहचर मिळवून लग्ने ठरविणे कठीण जाते, कारण तो मित्र ‘ होमो ’ निघतो, अशी तक्रार काही स्त्रिया करतात; किंवा लग्नानंतर त्यामुळे संसार उद्ध्वस्त होतो.

या ‘ होमो ’ मंडळींचे स्वतंत्र क्लब व बार आहेत. भक्कम संघटना आहे. त्यांच्या सभा भरतात, व मोर्चेसुद्धा निघत असतात. ते स्वतःला ‘ गे ’ म्हणवितात. होमो असूनही शिक्षकाची किंवा कोणतीही नोकरी मिळाली पाहिजे, आणि त्या कारणासाठी कोणालाही नोकरीवरून काढता कामा नये, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे; आणि त्यांची मते मिळावीत, म्हणून मिंधे झालेल्या राजकारणी धुरीणांनी त्यांच्या सर्व मागण्या मंजूर केलेल्या आहेत ! ‘ सॅनफ्रॅन्सिस्को क्रॉनिकल ’सारख्या प्रतिष्ठित दैनिकामध्ये ‘ होमो ’ संस्कृतीच्या आशा-आकांक्षा, त्यांच्या प्रेमकथा, असे होमो जीवनाचे चित्र रंगविणारे सदर नियमितपणे प्रसिद्ध होते. ‘ होमो ’जीवनाचा आनंद वर्णन करणारी पुस्तके लोकप्रिय होऊन त्यांच्या आवृत्त्या निघत असतात. १९७४ साली अमेरिकन सायकिॲट्रिक असोसिएशनने मुळी असा ठरावच पास केला आहे की, ‘ होमो ’ जीवनपद्धती विकृत नसून तो ‘ नॉर्मल ’ जीवनप्रवाहच आहे. पण इतर डॉक्टर्स व मानसशास्त्रज्ञांनी असा निष्कर्ष काढला आहे की, अशा मंडळींचे ग्रंथी-स्राव वेगळे नसतात, किंवा अशा प्रवृत्ती आनुवंशिकही नसतात. बालवयात योग्य संस्कार न झाल्याने, किंवा फार कडक शिस्त असल्याने काही तरुणांमध्ये अशा ‘ होमो ’ प्रवृत्ती निर्माण होतात; किंवा वाईट संगत आणि वातावरणामुळे ‘ होमो ’ प्रवृत्ती वाढतात. दारुबाज, धूम्रपानी, जुगारी व व्यभिचारी अशा मंडळीप्रमाणेच ‘ होमो ’ स्त्री-पुरुषांकडे एक तर दुर्लक्ष करावे, किंवा त्यांना व्यसनमुक्त होण्याला मदत करावी, असा सर्वसाधारण विचारप्रवाह व जनमत दिसून येते. अनिता ब्रायन्त, या प्रसिद्ध टी. व्ही.-तारकेने मध्यंतरी ‘ होमो ’विरुद्ध मोठी प्रचारमोहीम आखली होती. फ्लॉरिडामध्ये संत्र्याच्या रसाचे जे प्रचंड कारखाने आहेत, त्यांच्यातर्फे संत्र्यांची प्रचार करणारी अनिता ही एक प्रसिद्ध नटी आहे, आणि तिला या कामाबद्दल मोबदला म्हणून दरवर्षी १ लक्ष डॉलर्स मिळत असत. ती धार्मिक प्रवृत्तीची असून, ती व तिचा नवरा

यांनी 'होमो-संस्कृती 'विरुद्ध राज्यांनी कडक कायदे करावेत, असा प्रचार सुरू केला. स्त्री व पुरुष यांच्यामधील प्रेम हेच ईश्वराने पवित्र मानलेले आहे; बाकीच्या विकृत पद्धती म्हणजे पापाचरण आहे, असा प्रचार पुस्तके, व्याख्याने, दौरे आणि टी. व्ही.मधून तिने चालू ठेवला होता. होमो-संघटनेच्या सभासदांनी तिच्याविरुद्ध प्रचार करून गरळ ओकायला सुरुवात केली, तिला खुनाच्या धमक्या दिल्या, मोर्चे काढून तिच्याविरुद्ध हरताळ पाडू– अशी पाउले उचलली. एकंदरीत अनिताच्या चिकाटीच्या प्रयत्नांना फारसे यश मिळाले नाही, व होमोसेक्स वृत्तीचा विजय झाला, असेच म्हणता येईल.

अमेरिकन संसारातून दिसून येणारी ' नवी क्षितिजे ' ही एकंदरीने अशी अगम्य आणि अकल्पित आहेत. हर्बर्ट गोल्ड या कादंबरीकाराने असे उद्‌गार काढले आहेत की सोने, पेट्रोलियम, किंवा अफाट सुपीक जमिनी पादाक्रान्त करण्यासाठी, पश्चिमेकडे जाणाऱ्या साहसी तरुणांचे सीमोल्लंघन व पराक्रम आता संपले आहेत. घटस्फोट, व्यभिचार, स्वैराचार, अनाचार हीच आजची सीमोल्लंघने व नवी क्षितिजे आहेत !

## ' ओपन मॅरेज 'चे प्रस्थ :

या नव्या युगाचे संदेश देण्यासाठी, नव्या क्रांतीची तुतारी फुंकणारे अनेक नवे गुरू व लेखकू, तेजस्वी ताऱ्याप्रमाणे तेथे उदयोन्मुख होत असतात. लेखक ब्राउन म्हणतो की, " टेंपरवारी " नवराबायको म्हणून जगणारी दांपत्येच यापुढे वाढू लागतील. जॉर्ज ओनील हा प्रेमपंडित म्हणतो की, ' सीरियल मॅरेज ' म्हणजे लग्न, घटस्फोट, मग दुसरे लग्न, पुनः घटस्फोट असे चित्र मला दिसते आहे. या गुरूचे ' ओपन मॅरेज ' हे पुस्तक गाजलेले आहे. त्याचा सल्ला चक्क असा आहे की, लग्नापूर्वी निदान दोन वर्षे,जोडप्याने लग्न न करताच एकत्र रहावे, आणि मगच लग्न करण्यासंबंधी विचार करावा. लग्न न करताच एकत्र राहणारी वीस लाख जोडपी १९७७ साली अमेरिकेत होती. १९८० साली २७ लाख होती.

परंतु एवढ्यानेच सर्व संपलेले नाही. या नव्या क्षितिजावरचे प्रयोग व स्वातंत्र्य असे काही अनेक रूपांतून झळकत असते की, काही विचारू नका ! " सेक्स अँड ऑल यू कॅन इट " या नावाचे एक पुस्तक १९७५ साली

लाइन स्टुअर्ट या प्रकाशकाने प्रसिद्ध केले आहे. लॉइडायन कॅपानेली नावाच्या महिलेने ते पुस्तक स्वानुभवातून लिहिले आहे. तिचा नवरा म्हणे फार लट्ट असल्याने तिला तो आवडत नसे; म्हणून तिने एक दोन नव्हे, तर चक्क बासष्ट पुरुषांशी व्यभिचार केला, आणि त्याची वर्णने आपल्या पुस्तकात दिली आहेत. "व्यभिचार अमेरिकेत सर्वत्र चालूच आहे, त्यात एवढे बिचकण्यासारखे काय आहे ?" असे तिचे म्हणणे.

**घरून पळून जाणाऱ्या महिला :**

ॲना स्क्लार या विदुषीने 'घरून पळून जाणाऱ्या बायका' (रन अवे वाइव्हज), या नावाची एक भ्रमणगाथा १९७८ साली प्रसिद्ध केलेली आहे. घरातील (थोड्या मोजक्या) मुलाबाळांचा भार, आणि (अनेक सुखसोयींनी सज्ज असलेले) घर सांभाळण्याची कटकट आता "आपल्याला अगदी सहन होत नाही," असे म्हणून बायका घरातून चक्क पळून जाऊ लागल्या आहेत ! त्यांची संख्या व प्रमाण दिवसेदिवस वाढत आहे. त्यांच्या मुलाखती घेऊन व पळून जाण्याची मीमांसा करून, एकंदरीत त्यांच्याबद्दल लेखिकेने या पुस्तकात सहानुभूती व्यक्त केली आहे. घरातून निघून जाणाऱ्या पुरुषांचे प्रमाण दहा-बारा वर्षांपूर्वी स्त्रियांच्यापेक्षा पुष्कळच जास्त होते; पण आता पुरुषांइतक्याच प्रमाणांत स्त्रियाही घर सोडून पळून जाऊ लागल्या आहेत !

अनेक विचित्र क्षेत्रांतून स्त्रिया आता पुरुषांची बरोबरी अमेरिकेत करू लागल्या आहेत. कॅबेरे-नृत्यासारखा, 'स्ट्रिप-टीज' नावाचा एक नृत्य-प्रकार अमेरिकेत गेली ४०–५० वर्षे लोकप्रिय झालेला आहे; या स्ट्रिप-टीजमध्ये एकापाठोपाठ एक असे आपले सर्व कपडे, नाचणारी स्त्री अंगावरून काढून टाकून, शेवटी ती पूर्ण नग्न होते, असा प्रकार असतो; आणि पुरुष प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय झालेला हा प्रकार आहे. आता म्हणे अमेरिकेत काही ठिकाणी, पुरुष नृत्य करता करता कपडे काढून सरते शेवटी पूर्ण नग्न होतो; आणि हा नृत्य प्रकार स्त्री-प्रेक्षकांमध्ये फार लोकप्रिय झालेला आहे !

जुगार, धूम्रपान, दारू आणि आत्महत्या यांमध्ये पूर्वी स्त्रियांचे प्रमाण कमी होते; पण आता पुरुषांच्या बरोबरीने "हम भी कुछ कम नहीं" असे दाखवून, अमेरिकन महिलाही सिगारेटशोकीन, चिरूटप्रिय, आणि अट्टल

दारुबाज झाल्या आहेत. तितक्याच प्रमाणात त्यांच्या आत्महत्याही वाढल्या आहेत. १९६६ साली तिथल्या सर्जन जनरलने दिलेली, धूम्रपानविरोधी ताकीद, सिगारेट-पाकिटावर छापण्यास सुरुवात झाली. पण सिगारेटचा खप कमी होण्याऐवजी वाढतोच आहे; आणि याचे एक कारण म्हणजे स्त्रियांमधील वाढते धूम्रपान. संसाराला विटलेल्या, आणि एकलेपणाने, नैराश्याने, विफलतेने गांजलेल्या स्त्रिया जास्त प्रमाणात जुगार, सिगारेट व दारूकडे वळतात असे दिसून आले आहे.

विफलतेने ग्रासलेल्या अशा या संसारातील, कौटुंबिक कलहाचे व हिंसाचारांचे जे चित्र एका सरकारी पाहणीतून दिसून आले आहे, ते असेच मनाला विषण्ण करणारे आहे.

अमेरिकन कॉंग्रेसच्या सदस्या श्रीमती बारबारा मिकुल्स्की यांनी शिक्षण, लेखन, समाजकार्य अशा क्षेत्रांतून विपुल अनुभव मिळवून, व या समस्येचा विशेष अभ्यास करून मध्यंतरी ‘ कौटुंबिक हिंसाचार व उपचार कायदा ’ (फॅमिली व्हायोलेन्स अँड ट्रीटमेन्ट ॲक्ट) प्रतिनिधीसभेत मांडला; तो मांडताना त्यांनी पुढील प्रकारची आकडेवारी सादर केली : (१) अमेरिकेतील एकूण खुनापैकी एक-चतुर्थांश खून कुटुंबातून होतात; व त्यांतले निम्मे पति-पत्नींमध्ये होतात. (२) ही भांडणे सोडवायला पोलीस जातात, त्यांमध्ये काही पोलिसांचा मृत्यू ओढवतो; इतर दंगेधोपे, गुन्हे सोडविताना पोलिसांचे इतके मृत्यू होत नाहीत ! (३) नवरा बायकोला मारपीट करतो, त्यातील २ टक्के नवऱ्यांवरसुद्धा खटले भरता येत नाहीत. (४) पुरुषच हिंसक कृत्ये करतात असे नाही; स्त्रियासुद्धा जवळजवळ तितक्याच प्रमाणात हिंसाचार करतात. (५) गरीब कुटुंबांतूनच अशी मारपीट जास्त चालते, असे नाही; उच्च मध्यम वर्गीयांतूनसुद्धा– जात, धर्म, निरपेक्ष,– सर्वत्र सारख्याच प्रमाणात हिंसाचार आढळतो ! (६) भांडखोर पतिपत्नींची १० टक्के अपत्ये हिंसक निपजतात. अशा या समस्येवर तोडगा म्हणून स्थानिक कार्यकर्ते व स्वयंसेवक यांना सरकारी मदत देऊन, ही भांडणे कमी करता येतील, व हिंसाचाराला आळा घालता येईल, असा विश्वास श्रीमती मिकुल्स्की यांनी आपला कायदा मांडताना व्यक्त केला.

घटस्फोट घेण्यापूर्वी, किंवा घेण्याऐवजी, मारपीट किंवा इतर हिंसेतून

आपापले मार्ग मोकळे करू पाहणारी ही अशी कुटुंबे असतात, असे म्हणता येईल. कारण घटस्फोट घेतल्याने प्रश्न सुटतातच असे नाही.

'लग्न पाहावे करून,' आणि 'घर पाहावे बांधून,' अशी आपल्याकडे एक आपली साधीभोळी म्हण प्रचलित आहे. पण श्रीमंत अमेरिकेत आजकाल 'घटस्फोट पाहावा घेऊन, आणि घर पाहावे मोडून' अशी एखादी म्हणच जणू काही प्रचलित होऊ लागली आहे! घटस्फोट घेण्यात काही विशेष कौतुक किंवा फारशी कटकट नसावी, असे काहीजणांना वाटेल. पण घटस्फोटाचा मानसिक तणाव– विशेषतः मुले असलेल्या दांपत्यांना– आजही असह्य होतो, असे तेथील समाजपंडित म्हणतात. त्यामुळे लग्न न करताच वर्षानुवर्षे राहणे, मुले अजिबात न होऊ देणे, असले विचित्र पर्याय, किंवा होमोसेक्ससारखे हिडिस पर्याय तिथे आता राजरोसपणे रूढ होऊ लागले आहेत.

**घटस्फोटाचे संपूर्ण गाइड :**

घटस्फोटाचा त्रास पुरुषांना एकंदरीत जास्त होतो, असे एका पाहणीतून दिसून आले आहे. ब्लॅकवेल या पंडिताने 'फाइटर्स गाइड टु डायव्होर्स' या नावाचे एक घटस्फोटाचे संपूर्ण गाइड, १९७७ साली प्रसिद्ध केलेले आहे! त्यामध्ये पुरुषांना तो बजावतो की, तुम्ही सावध नसाल, तर घटस्फोटामुळे आपली मुले, आपले घर, विमा, व गुंतविलेले पैसे, सारे काही गमावण्याची पाळी पुरुषावर येते! वरती पत्नीला महिना शंभर डॉलर्स ॲलिमनी, व मुलासाठी महिना शंभर डॉलर्स देण्याची पाळी आलेल्या एका माणसाच्या पत्नीने चारच महिन्यांत दुसऱ्या पुरुषाशी लग्न केले; पण पहिल्या नवऱ्याला मात्र २ वर्षेपर्यंत महिना दोनशे डॉलर्स द्यावे लागले!

एकलेपणाचा पुरुषाच्या प्रकृतीवरही अधिक वाईट परिणाम होतो. विवाहित पुरुषांपेक्षा एकट्या पुरुषांमध्ये, मृत्यूचे प्रमाण अडीच पटीने अधिक असते, असे आढळून आले आहे; आत्महत्या व मानसिक आजाराचे प्रमाणही पुरुषांतच (घटस्फोटानंतर) जास्त दिसून येते. घटस्फोटाचा व ॲलिमनीचा कायदाच आमूलाग्र बदलला पाहिजे, अशी मागणी आता पुरुषमंडळी तिथे करू लागली आहेत.

परंतु कोमल मनाच्या, निष्पाप लहान मुलांच्या भावनांची जी ससे-

होलपट आणि ओढाताण या कलहनाट्यातून होऊ लागते, ती या घटस्फोट भारुडाची खरी दारुण शोकान्तिका आहे; आणि त्या कोवळ्या नातवंडांची परवड बघून, आजी-आजोबा, मावशी, आत्या, यांची अंतःकरणे हेलावत नसतील, असे तरी कसे म्हणता येईल? ज्या लॉस एंजेल्स शहरात अकरा लग्नांमागे नऊ घटस्फोट असा उच्चांकाचा पडघम बेगुमानपणे वाजत असतो, त्याच शहरातील मार्सी या एका बहिणीने, आपल्या भावाच्या घटस्फोटित संसाराचे अत्यंत हृदयंगम असे शब्दचित्र 'लॉस एंजेल्स टाइम्स'मध्ये ७७ साली टोपणनावाने प्रसिद्ध केलेले आहे; तिच्याच शब्दात मी ते थोडक्यात देऊ इच्छितो.

"दहा वर्षांपूर्वी माझ्या भावाचा– होवर्डचा– विवाह जेनशी झाला. त्यांना एक मुलगी आणि एक मुलगा अशी दोन अपत्ये; आठ वर्षे संसार करून, मग कडाक्याची भांडणे होऊन, दोन वर्षांपूर्वी त्यांचा अखेरीस घटस्फोट झाला. आणि आता आठ वर्षांची कॅरेन आणि ४ वर्षांचा मॅथ्यू यांचा कबजा आपल्याला मिळावा, म्हणून माझ्या भावाने कोर्टात फिर्याद दाखल केली आहे! कारण सध्या ती मुले जेनकडेच राहतात, आणि फक्त दर आठ दिवसांनी त्यांना तो भेटू शकतो.

"माझ्या आजूबाजूला सगळीकडे घटस्फोट, कोर्टकचेऱ्या, दुसरे लग्न, तिसरे लग्न, सारं काही असंच चालू आहे. म्हणजे त्या वातावरणाची सवयच झालेली आहे. परंतु आता अगदी जिव्हाळ्याच्या जवळच्या माणसांना या द्वेषाग्नीचा भडका सोसावा लागत आहे. माझी लाडकी भाची आणि भाचा– या लहान प्रेमळ पोरांना जे दिव्य सोसावे लागत आहे त्यातून माझ्या मनाला फार यातना होतात. माझ्या भावाचे व माझे फार जिव्हाळ्याचे संबंध पूर्वीपासून होते. माझे लग्न झाल्यावरही ते तसेच राहिले; इतकेच नव्हे तर जेनशीही माझी खूप मैत्री होती. आणि मुलेसुद्धा सारखी माझ्याकडे यायची. त्यांना माझा लळा होता.

"होवर्डला एकच व्यसन होते– खूप धंदे करून खूप पैसे मिळवायचे; त्यापायी त्याने मुलांकडे व जेनकडे कमी लक्ष दिले असे म्हणता येईल. त्या व इतर कारणांतून घटस्फोट झाला.

"दर रविवारी माझ्या आईवडिलांकडे आम्ही सर्व जमतो, व जेवतो

पण आता जेन नसते. लग्नातली फोटो–अलबमे, मुलांचे एकत्र फोटो, सारं काही माझ्या आईने लपवून ठेवून दिलं आहे. छोटा मॅथ्यू मला विचारतो, " मावशी, तू आमच्याकडे का येत नाहीस ? " त्याला काय उत्तर द्यावे ते मला कळत नाही. दोघा मुलांच्या लहानपणच्या रम्य आठवणी, आणि ते सुखाचे दिवस, सारं काही संपून गेल्यासारखे झाले आहे. जेवणे झाली की माझा भाऊ जेनविषयी मला तक्रारी सांगतो; मुलांचे ती नीट करीत नाही, त्यांची आबाळ होते; ती अप्पलपोटी आहे–– एक ना दोन ! मला ते पुराण ऐकण्याचा उबग येतो ! जेन आपल्यात आता नाही, या एकाच भावनेने मी अत्यंत व्यथित होते ! आणि मग असे वाटते की, आजूबाजूच्या या साऱ्या घरांतून दिसणारी शोभा किती दिखाऊ आणि फुसकी आहे ! अनेक दिखाऊ घराघरांतून आज प्रेमाचे दिव्य लागेबांधे होरपळून निघत आहेत. आणि निरागस हसऱ्या छोट्या जीवांना हा घटस्फोटाचा ब्रह्मराक्षस छळतो आहे, असं मला वाटते."

" केशवपनाच्या दुष्ट रूढीतून आपण आपली सुटका करून घ्यायला नको का ? " अशी आर्ततेची हाक पूर्वी आपल्याकडील सुधारकांनी दिली होती. तशाच आर्ततेने मार्सी शेवटी म्हणते की, " घटस्फोटाच्या या दुष्टचक्रातून सुटका कशी करावी, याचा मला संभ्रम होतो; यातून बाहेर पडायला नको का ? "

मुले झाल्यामुळे ह्या समस्या होतात, तेव्हा मुले मुळी होऊ द्यायची नाहीत; आणि घटस्फोटामुळे खूप मनःस्ताप किंवा कटकटी होतात, तेव्हा लग्न न करताच एकत्र रहायचे, असले आततायी संसार प्रच्छन्नपणे अनेक शहरांतून नांदू लागले आहेत; त्यामागे हीच भूमिका आहे, की नुसतेच 'सुख' असावे, मुलांची कटकट नको; एकत्र राहण्याची, मिळते घेण्याची, सांभाळून घेण्याची जबाबदारी नको ! अशा प्रकारच्या संसारांची संख्या प्रतिवर्षी वाढत असली तरी अद्यापही लग्न करून नांदणाऱ्यांचीच 'मेजॉरिटी' आहे, असे आकडेवारीवरून दिसून येते; म्हणजे अगदीच काही ताळ सुटलेला नाही !

**प्रेमळ हार्टमन दांपत्य :**

इतकेच नव्हे, तर अगदी उलट प्रकारचे संसार– म्हणजे चिक्कार मुलेबाळे असावीत, व त्यांच्या संगोपनाचा आनंद हेच संसारातले खरे सुख– असे

मानणारी मंडळी, कॅलिफोर्नियासारख्या बेछूट राज्यातच काही वेळा दिसून येतात ! रविवारच्या ' मर्क्युरी न्यूज 'च्या अंकात पान भरून फोटोसह " हार्टमन दांपत्य आणि त्याची अकरा मुले " नावाचा लेख वाचून खरोखरी आश्चर्याचा झटकाच बसावा, तसे मला होऊन गेले !

आल्फ्रेड आणि डार्लिन हार्टमन, कॅलिफोर्नियातील पेरिस या गावी राहतात. बावीस वर्षांपूर्वी त्यांचा विवाह झाला, त्या वेळी त्यांनी ठरविले की, जितकी मुले होतील, आणि सोसवतील, तितकी होऊ द्यायची. त्यांना स्वतःची सहा मुले आहेत. एकवीसपासून चौदापर्यंत त्यांची वये आहेत; ४ मुलगे व २ मुली. सर्व मुले त्या दोघांसारखीच खूप हुशार आहेत; आई-वडील दोघेही ' मेन्सा ' नावाच्या आन्तरराष्ट्रीय बुद्धिमन्तांच्या संस्थेचे सभासद आहेत. ९८ टक्के लोकसंख्येत दिसून येत नाही, इतका ' बुद्धिमत्ता-गणनांक ' ( आय. क्यू. ) असल्याशिवाय, या संस्थेचे सभासद होता येत नाही. म्हणजे गावंढळ शेतकरी आहेत, आणि होतील तेवढी मुले होऊ देत आहेत, अशातला हा प्रकार नाही. आल्फ्रेड हा उत्तम ॲक्च्युअरी असून त्याची फर्म छान चालते. त्यांची सध्या तीस एकरांची शेती आहे, व त्यातून भाजीपाला, दूध इत्यादी सोयही छान होते.

स्वतःची सहा मुले होऊन, त्यांचे समाधान झाले नाही; म्हणून त्यांनी आणखी पाच मुले दत्तक घेतली आहेत ! त्यांतली दोन भारतातली असून दोघेही अपंग आहेत. सव्वा वर्षाची मुलगी, आणि ६ वर्षांचा हा अपंग मुलगा, त्यांनी कलकत्त्याच्या अनाथाश्रमातून आणलेली आहेत. पोलिओमुळे अपंग झालेली ही मुले नीट चालू शकतील की नाही, याचीसुद्धा भ्रान्त आहे. पंधरा वर्षांचा एक कोरियन मुलगाही आहे, व अतिशय भाजल्यामुळे त्याचा एक पाय कापून टाकावा लागला होता; पण त्यालाही या दांपत्याने दत्तक घेतले ! आणखीही पाच सात मुलांना दत्तक घेऊन वाढविण्याची त्यांची इच्छा व हिम्मत आहे ! अमेरिकेत आपल्यासारखी नोकरमंडळी नसतात; त्यामुळे मोठ्या मुलांनाही लहान मुलांचे सर्व करावेच लागते. सर्व मुलांना असे चांगले वळण लावणे, व अकरा मुलांना सांभाळणे किती कठीण असेल, याची कल्पना करावी ! दोघेही आई-वडील वृत्तीने धार्मिक, आणि आन्तरिक श्रद्धा व जीवनमूल्यांना जोपासणारी असल्यामुळेच " अशी ही कार्यसिद्धी

होऊन आमचे संसार सुखाचे झाले व पुढेही होतील," असे त्यांना वाटते. इतर कुटुंबांनाही "मुले दत्तक घेण्याच्या कामात व आमच्याप्रमाणे मोठा संसार यशस्वी करण्यात आम्ही मदत करू," असे त्यांनी यापुढे ठरविले आहे !

आमच्या माहितीतले एक अमेरिकन गृहस्थ मुंबईच्या एका कॅथॉलिक संस्थेत काम करीत होते; ते भायखळ्याला राहायचे, आणि चार-पाच गरीब हिंदी विद्यार्थ्यांना आपल्याच घरी राहायला देऊन त्यांचे संवर्धन–शिक्षण प्रेमाने करीत असत. पुढे एका भारतीय डॉक्टर महिलेशी त्यांचा विवाह झाला, व आता न्यूयॉर्कला ते पूर्वीच्याच संस्थेत काम करून, हौस म्हणून मुलांना मदत करणे, वाढविणे, अशी कामेही आनंदाने करीत असतात. हे गृहस्थही मिशनरी नव्हेत, पण आनंदाच्या व सुखी जीवनाच्या– लाइफ-स्टाइलच्या– त्यांच्या श्रद्धा व कल्पनाच मुलखावेगळ्या असतात. अशी मंडळी संख्येने एकंदरीत कमीच असतात, पण अमेरिकेतही एकंदरीत अशा माणसांबद्दल प्रेमयुक्त आदराची भावनाच असते; त्यांची टवाळी–चेष्टा केली जात नाही. सर्वसामान्य अमेरिकन माणसाची 'लाइफ-स्टाइल' मात्र आज स्वच्छन्दतेकडे वळलेली आहे.

## आज्ञाधारक पतिव्रता पंथ :

परंतु अशा सर्वसामान्य माणसामध्येही अधूनमधून सनातनी, जुन्या संस्कारांची एखादी अशी काही जोरदार लाट येते की, ती या बेछूट नव-मतवादी अमेरिकन व्यक्तिस्वातंत्र्याला एक सणसणीत तडाखा हाणते. याचे मनोरंजक उदाहरण द्यायचे झाल्यास सौ. मॅराबेल मॉर्गन या गृहिणीने स्थापिलेला 'आज्ञाधारक पतिव्रता पंथ', आणि तिला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद ! 'टाइम' साप्ताहिकाने तिच्या चळवळीचे फार सुंदर वर्णन मार्च '७७च्या अंकात केले आहे. "स्त्रीने आपल्या नवऱ्याच्या आज्ञेत राहावे, नवऱ्याला अनेक मार्गांनी खूष ठेवावे, चूल आणि मूल यांकडेच जास्त लक्ष द्यावे, व प्रथम उत्तम गृहिणी व्हावे." असा उपदेश जर अमेरिकन स्त्रीला कोणी अलिकडे करू लागला, तर ती कधीच ऐकून घेणार नाही, असेच सामान्य वाचकाला वाटेल; पण गंमत अशी की, हाच उपदेश मॅराबेल या गृहिणीने मोठ्या अभिनव, आकर्षक पद्धतीने मांडला आहे, आणि अक्षरशः शेकडो अमेरिकन गृहिणींनी

या संदेशाचे स्वागत केले आहे ! ‘ टोटल वूमन ’ ( संपूर्ण गृहिणी ) आणि ‘ टोटल जॉय ’ या नावाची दोन पुस्तके तिने लिहिली आहेत. ‘ संपूर्ण गृहिणी ’ या तिच्या पुस्तकाच्याच ३० लक्षांहून अधिक प्रती खपल्या ! शिवाय साठ शहरांतून तिच्या ७५ गृहिणी शिष्या वर्ग चालवितात. प्रत्येकी २ तासांचे चार वर्ग, पंधरा डॉलर्स फी देऊन गृहिणींनी घेतले. सौ. मॅराबेलने या उद्योगातून लक्षावधी डॉलर्स मिळविले; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे सुखी संसाराची एक जुनी गुरुकिल्ली आधुनिक अमेरिकेत यशस्वी करून दाखविली !

नवऱ्याच्या आवडीचे खाद्यपदार्थ कसे करावेत, त्याची कामेच्छा व इतर लहरी कशा सांभाळाव्यात, त्याने केलेल्या कामाचे योग्य कौतुक केव्हा व कसे करावे, यासंबंधीच्या युक्त्या व प्रयुक्त्या या लेखिकेने मोठ्या खुबीने व कौशल्याने मांडल्या आहेत. गृहिणी ही मग घराची स्वामिनी कशी होते, संसारातील सुख मग कसे ओसंडू लागते, अशी सर्व रहस्ये तिने नटवून, सजवून आपली पुस्तके व वर्ग शोभिवंत केले आहेत, आणि अमेरिकन गृहिणींमध्ये भरपूर लोकप्रियताही आहे. रोज शंभर पत्रे तिला गृहिणींकडून एका वेळी येत असत ! अमेरिकेत एखादा नवा विचार व पंथ लोकप्रिय झाला, म्हणजे अमाप पैसा व प्रसिद्धी मिळवून देतो, तसेच टीकाकारही खूप मिळतात. मॅराबेलचे विचार बुरसटलेले, आणि स्त्रीच्या व्यक्तित्वाची गळचेपी करणारे आहेत; अशी झोड टीकाकारांनी ( विशेषतः अनेक महिलांनी ) उठविली; याउलट तिने सांगितलेल्या युक्त्या व मार्ग वापरून, संसार कसा अधिक सुखाचा झाला, अशी सांगणारी अनेक पत्रे पाहिली की, तिची शिकवण फार मोलाची वाटू लागते. एक हृदयंगम उदाहरण देऊ इच्छितो. पतिपत्नींमधील वितंडवादाने, प्रेमाला ओहोटी लागून काही घरांतून वैमनस्य निर्माण झालेले असते, अशा घरातील गृहिणींना सौ. मॅराबेल एक मार्ग सुचवितात. नवऱ्याचा एखादा चांगला गुण, किंवा त्याने पूर्वी केलेले एखादे उत्तम काम पत्नीने आठवावे व मुद्दाम केव्हा तरी त्याचा उल्लेख नवऱ्याकडे युक्तीने करावा, अशी ही शिकवण होती. एका गृहिणीने या शिकवणीचा उपयोग करून आपला अनुभव मॅराबेलला कळविला; त्या गृहिणीने खूप विचार केला, तेव्हा तिला असे आठवले की, १९३० सालच्या मंदीच्या वेळी अत्यंत परिश्रम व हिकमती

लढवून नवऱ्याने मोठ्या हिमतीने संसार सावरला होता; ती आठवण कृतज्ञतेने पत्नीने करून दिली, तेव्हा नवऱ्याला अगदी रड्डू कोसळले; आणि तेव्हापासून त्यांच्या संसारातील प्रेमाची ओहोटी संपू लागली !

केवळ ' चूल आणि मूल ' सांभाळणे या कामाला पूर्ण प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी, अनेक इतर महिला कार्यकर्त्या अमेरिकेत आता पुढे सरसावल्या आहेत, आणि त्यांनी जोरदार राष्ट्रीय संघटनाही उभारल्या आहेत. जिंक्स मेलिया, आणि आर्लीन कार्डोझो या दोन महिला कित्येक वर्षे या क्षेत्रात आघाडीवर राहून कार्य करीत आहेत. मुलांना पाळणाघरात ठेवून स्त्रियांनी कामाला जाणे हे आर्लीनला पसंत नाही; कारण तिला असे वाटते की, जिव्हाळ्याचे प्रेम आई देऊ शकते, ते पाळणाघरात मिळत नाही; आणि अशा नितान्त प्रेमाची बाळाला फार जरुरी असते. काही महिलांना, नोकरी सोडून देऊन घर आणि मुले प्रेमाने व आनंदाने सांभाळण्यातच खरे म्हणजे अधिक आनंद वाटत असतो. पण तिने नोकरी सोडली की, ' अग, तू एवढी शिकून आता नुसती घरातच बसून राहणार का ? ' असं तिला आजूबाजूला महिला व पुरुष विचारू लागतात. स्त्रियांनी घराबाहेर पडून काय काय उद्योग केले, त्याचीच रसभरित वर्णने मासिकांतून देतात, आणि नुसते घर सांभाळण्याला कमी लेखले जाते; अशा प्रचाराने स्त्रियांनीच स्त्रियांचे व मुलांचे जिणे दुःखमय केलेले आहे, असे आर्लीन व जिंक्स या कार्यकर्त्यांना वाटते. कौटुंबिक सुखाला तडा देऊन, स्त्रीने बाहेरचे उद्योग शक्य तो करू नयेत; बाहेरचे काम केल्या-खेरीज स्त्रीची जीवनपूर्तता होऊ शकत नाही, हे तत्त्वज्ञान म्हणजे शुद्ध खुळचट-पणा आहे, असे त्यांनी शेवटी बजावले आहे. पुरुष नोकऱ्या करतात, तेसुद्धा जीवनपूर्ततेसाठी नव्हे, तर पुष्कळ वेळा नाइलाज किंवा गुलामी म्हणून करतात. त्या नोकऱ्या करण्यात मोठे सुख असते, असे स्त्रियांनी समजू नये. नुसते अधिक पैसे मिळविण्यासाठी स्त्रीने घराबाहेर पडणे, आणि मुलांकडे व घराकडे दुर्लक्ष करणे यामुळे तिलासुद्धा सुख मिळतेच असे नाही. आपल्या गरजा काय असाव्यात, व कौटुंबिक सुख कशात आहे याबाबत चिंतन व आत्मपरीक्षण स्त्रियांनी व पुरुषांनी दोघांनीही करावे, असे त्या आता ठामपणे सांगू लागल्या आहेत. पुढची पिढी उत्तम रीतीने संगोपन करून वाढविणे यापेक्षा अधिक पवित्र व आनंददायक दुसरे काय असू शकेल, असाही प्रश्न त्या विचारतात.

पण ‘ व्यक्तिस्वातंत्र्या ’चा उदोउदो अद्याप चालूच असल्याने अनेक महिलांना हे विचार पटत नाहीत.

**व्यक्तिस्वातंत्र्याचे विडंबन :**

अमेरिकेत प्रवेश करताना बोट किंवा विमान न्यूयॉर्क शहराच्या अगदी जवळ येऊ लागले, की तिथल्या इवल्याशा स्टेटन बेटावरचा जगप्रसिद्ध प्रचंड स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा सर्वांना दिसू लागतो. व्यक्तिस्वातंत्र्याची ज्योत व शिकवण अमेरिकेत पिढ्यान पिढ्या तेजस्वितेने झळकत राहिली, म्हणूनच नीग्रोंची गुलामी संपली, स्त्रीस्वातंत्र्य, वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य अबाधित राहिले, व्हिएतनाम युद्धातून माघार घ्यावी लागली, आणि प्रेसिडेन्ट निक्सनची उचलबांगडी होऊ शकली.

परंतु याच व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेक झाल्यामुळे ज्या विचित्र समस्या व कौटुंबिक दुःखे आज अमेरिकेत वाढत आहेत, त्या पाहिल्यावर, स्वातंत्र्य-देवतेच्या डोळ्यांतूनही दुःखाचे चारदोन अश्रू ओघळत असतील, असा मला भास होतो.

गंमत अशी आहे की, अमेरिकन संस्कृतीतले दोष व अतिरेक यांची स्पष्ट आकडेवारी, अभ्यास व निष्कर्ष स्वच्छपणे मांडून, त्या समस्यांवरील तोडगे सुचवून ते अंमलात आणण्यातही अनेक अमेरिकन व्यक्ती व संस्था हिरीरीने व तळमळीने कार्य करीत असतात. निःशस्त्रीकरण, जागतिक बंधुभाव व शांती, ग्रामोदय, अहिंसा, दारुबंदी, शाकाहार, निसर्गाकडे चला, व्यसनमुक्ती, परदेशांतील मिशनरी कार्य, इथपासून ते हरेकृष्ण, टी. एम., शांतिसैनिक, मॉर्मन पंथ, अशा अनेक चळवळी जिद्दीने, निष्ठेने व उत्साहाने चालविण्यात अमेरिकन मंडळी गुंतलेली असतात. त्यातही कधीकधी ते अतिरेक करतात ती गोष्ट वेगळी !

४० टक्के विवाहांचा शेवट घटस्फोटात होतो, असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा बाकीची ६० टक्के मंडळी विवाहित राहून चांगला संसार करीत असतात, हे आपण विसरतो; आणि घटस्फोट झाल्यावरही अनेकांना पटापट दुसरा नवरा किंवा पत्नी मिळून ते पुन्हा सुखाने संसार करतात, हेही लक्षात ठेवले पाहिजे. सर्व-सामान्य अमेरिकन दांपत्य सुस्वभावी आणि हसतमुख

असते, आणि आपले घर व परिसर सुंदर व रमणीय करण्यासाठी ते खूप कष्ट करीत असते; म्हणूनच सर्वसामान्यांनाही भरपूर संधी व श्रीमंती मिळवणे तेथे शक्य झाले आहे.

परंतु ' अति तेथे माती ' किंवा ' अति झाले आणि हसू आले ' असे थोडेसे तिकडे झाले आहे. तेराव्या वर्षापासूनच मुलगा किंवा मुलगी तिथे काही ठिकाणी आईबापापासून वेगळी राहायला लागतात. कारण राहायला तशी वेगळी जागा, आणि कामाची व शिक्षणाची भरपूर संधी त्या वयात त्यांना मिळू शकते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास, धडाडी, आणि व्यक्तिस्वातंत्र्य दुणावते; त्याचप्रमाणे काही दुष्परिणामही होऊ शकतात.

अशी ही श्रीमंती दुखणी आहेत. पत्नीला पटापट दुसरीकडे नोकरी, जागा किंवा दुसरा नवरासुद्धा अनायासे मिळू लागला की, तीही केव्हा तरी काडीमोड मागायला किंवा घरून पळून जायला प्रवृत्त होते ! भारतीय स्त्रीला अशी संधी फारशी मिळत नाही, म्हणून ती आयुष्यभर गुलामी पत्करते, आणि यालाच नीतिमत्ता म्हणण्यात येते, असा युक्तिवाद काही समाजपंडित तेथे करीत असतात. " अमेरिकन संस्कृती रसातळाला चालली आहे," असे म्हणण्यापूर्वी, भारतीय विचारवंतांनी स्वतःच्या पायाखाली काय जळते आहे ते पाहावे, असेही ते सुचवितात.

भारतातील अठरा विश्वे दारिद्र्य, वेठबिगारी, हरिजनांवरील अत्याचार, गरिबांची पिळवणूक व ससेहोलपट आपण पाहिली, तर त्यांतून आपल्या संस्कृतीचे उदात्त चित्र किंवा ' आध्यात्मिक वारसा ' दिसून येतो, असे म्हणता येईल का ? तेव्हा आपली लांच्छने, आपली दुःखे व अपराध वेगळे आहेत, श्रीमंत अमेरिकेतील समस्या वेगळ्या आहेत; अमेरिकेतील सामाजिक दुखण्यांवर बोट ठेवताना, आपल्या नीतिमत्तेचा टेंभा मिरवण्याचे कारण नाही, असे आपण लक्षात घेतले पाहिजे.

: ६ :

# पदयात्रेतून समाजसेवा

नीता आणि तिची कॅनेडियन मैत्रीण आर्लिन, यांनी ७ मे १९७७ रोजी सकाळी ८ वाजता, टोरोंटोतील लेकशायर बुलेवार्डपासून जोडीने चालायला सुरुवात केली. रात्री ८ वाजता युनिव्हर्सिटी अॅव्हेन्यूपर्यंत त्या दोघी पोचल्या, आणि त्यांनी चालणे थांबविले, तेव्हा २८ मैलांचा (४५ किलोमीटर्स) फेर-फटका त्यांनी पुरा केला होता. लेकीचे कौतुक करून तिला मोटरीतून घरी घेऊन जायला, नीताचे आई-वडील ५ वर्षांच्या छोट्या नीलेशला घेऊन तिथे आलेले होते.

पंढरीच्या वारीची क्षणभर आठवण व्हावी, तशी शेकडो-हजारो मंडळी त्या दिवशी टोरोंटो आणि ओटावा शहरातून दिवसभर पदयात्रा करीत होती! म्हातारे-तरुण, गरीब-श्रीमंत, स्त्रिया-पुरुष, लठ्ठ-बारीक—अशी सर्व प्रकारची मंडळी, सुटसुटीत रंगीबेरंगी पोषाखात त्या अजब पदयात्रेला निघालेली होती. शहरातले हमरस्तेच नव्हे, तर उपवने, तलाव आणि टुमदार वस्त्या यांच्यातून नागमोडी वळणे घेत, स्वच्छंदीपणे ही सुखयात्रा दिवसभराच्या सुंदर-गुलाबी

उन्हात पुलकित होऊन नाचत अशी जणू चालली होती. काहींनी पळत जाऊन थोड्या तासांतच २८ मैल कापले. तर काही वयोवृद्ध धिमेपणाने गप्पाष्टकांत रंगून चालले होते.

"खूप गंमत आली, अंकल !" नीता मला म्हणाली, "सर्व सोयी वाटेवर कशा छान होत्या ! बूट लागले किंवा पाय दुखले, तर वाटेत पावडरी-मलम मिळण्याची सोय होती. २३ व्या मैलावर एका कंपनीने सर्वांना गरम टोमॅटो-सूप मोफत दिले; आणि सरतेशेवटी तर आम्हांला चॉकलेट मिळाले ! शिवाय वरती हे चालण्याचे सर्टिफिकेट मला मिळाले ते पाहा !" असे म्हणून तिने रंगीत नकाशावरील वाटचालीचे चित्रमय सर्टिफिकेट मला दाखविले.

गोव्यातील शाळेत शिकलेली नीता दोन वर्षांपूर्वी इथे आई-वडिलांबरोबर आली, आणि टोरोंटोच्या शाळेत जाऊ लागली. भाषेच्या उच्चारापासून अभ्यासक्रमापर्यंत सारे काही नवीन असे होते; पण थोड्याच अवधीत नीताने सर्व पद्धती आत्मसात केली; इतकेच नव्हे, तर सर्वांगीण अशी उत्कृष्ट प्रगती केल्याबद्दल, तिचा शाळेतर्फे खास समारंभामध्ये गौरव करण्यात आला. अशी ही नीता पदयात्रेच्या सुवर्णसंधीपासून दूर राहिली असती तरच नवल झाले असते ! त्यातून तिच्या आजी ( इंदिराबाई जोशी ) त्याच दिवशी ओटावा-मध्ये उतार-वयातही, पदयात्रेत सामील झाल्या होत्या; मग १४ वर्षांची नीता मागे कशी राहील ?

'माइल्स फॉर मिलिअन्स' या नावाच्या संस्थेतर्फे हा अभिनव पदयात्रेचा कार्यक्रम दरवर्षी आखण्यात येतो. गरीब देशातील निवडक संस्थांना मदत मिळवून देणे, हा त्यातला प्रमुख उद्देश आहे. नायजेरियापासून फिजीपर्यंत, आणि नेपाळपासून चिलीपर्यंत, त्रिखंडांत पसरलेल्या जगातील सर्व विकसन देशांतील चांगल्या कामाला आपला हातभार लागावा ('पायभार' लागावा, असे पाहिजे तर म्हणू या ) या श्रद्धेने शेकडो कॅनेडिअन वारकरी या वार्षिक दिंडीमध्ये हौसेने सामील होतात. प्रत्येक मैलामागे इतके पैसे, अशा हिशेबाने तुमच्या पायपिटीसाठी पैसे उभे करणारे मित्र तुम्ही निवडायचे, आणि फॉर्म्स भरून या संस्थेकडे द्यायचे असतात; म्हणजे सिनेमा-नाटकांचे खेळ करून फंड उभे करण्याऐवजी, मित्रांच्या यात्रेसाठी, खुषीने स्वतःच्या खिशाला कात्री लावणाऱ्या व्यक्ती व वह्री निवडून, पावला-पावलागणिक पावली-पावली गोळा

करायची, असा हा आगळा सोहळा असतो!

उन्हाळ्याचा मे महिना असल्याने रात्री ८ वाजेपर्यंत झकास सूर्यप्रकाश असतो. त्यामुळे 'काळोखात कशी फिरू?' असाही सवाल उमटत नाही. सूर्यास्त होऊन, सर्व फॉर्म्स हाती आले, की कॉम्प्यूटर यंत्राचे काम सुरू होते, आणि झटपट सर्व बिले ज्याची त्याला पाठविण्यात येतात. किती पैसे एकूण गोळा झाले, त्याची लगेच प्रसिद्धी वृत्तपत्रात देण्यात येते; आणि ते आकडे वाचून सर्वांना मग मूठभर मांस चढते!

गेल्या नऊ वर्षांत अडीच लाख लोकांच्या अंगात वारे शिरून, त्यांनी ही वारी केली; वीस लक्ष लोकांनी त्या वारीच्या मार्गावर डॉलर्सच्या नोटा पसरून पुण्य मिळविले. एक लाख स्वयंसेवकांनी कंबरा कसून सारी यात्रा सुकर केली. तीन कोटी रुपये आजपर्यंत या पदयज्ञाच्या होमकुंडातून मिळाले, आणि जगातील ११० देशांतून ते वाटण्यात आले.

नामांकित अशा छोट्यामोठ्या संस्थांतर्फे हे संपत्तीदान करण्यात येते, व दरवर्षी त्यात थोडा बदलही करतात. आन्तरराष्ट्रीय पातळीवर काम करणारी ती संस्था असावी; आणि त्या संस्थेतर्फे निदान १०० स्वयंसेवक यात्रेच्या व्यवस्थेसाठी मिळाले पाहिजेत, अशा अटी घालून मग त्या संस्थेची निवड, 'माइल्स फॉर मिलियन्स'तर्फे केली जाते. १९७७ साली खालील तेरा संस्थांची निवड करण्यात आली होती—

आफ्रिकन मेडिकल अँड रिसर्च फौंडेशन, कॅनेडिअन क्रॉस-रोड्स इंटर-नॅशनल, कॅनेडिअन आर्ट फेडरेशन, कॅनेडिअन सेव्ह द चिल्ड्रेन फंड, कॅने-डिअन युनिव्हर्सिटी सर्व्हिस ओव्हरसीज, केअर कॅनडा, फ्रॉंटिअर फाउंडेशन, ओव्हरसीज बुक सेंटर, ऑक्सफॅम ऑफ कॅनडा, युनिटेरिअन सर्व्हिस कमिटी, वर्ल्ड लिटरसी ऑफ कॅनडा, वर्ल्ड युनिव्हर्सिटी सर्व्हिस ऑफ कॅनडा, आणि वाय. एम्. सी. ए. ऑफ मेट्रोपॉलिटन टोरोंटो...ज्या गरीब संस्थांना मदत द्यायची, त्यांना मदतीमुळे स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सुकर व्हावे, असा निकष वापरून गरीब देशातील संस्थांची व कार्यक्षेत्रांची निवड केली जाते.

ऑस्ट्रेलिया आणि इतर काही देशांतूनही अशा पदयात्रा चालू झाल्या आहेत, व सुरू आहेत. पण टोरोंटोची १९७७ ची पदयात्रा ही असल्या उद्देशासाठी घडलेली जगातली सर्वांत मोठी पदयात्रा होती, असा या

संचालकांचा दावा होता.

वर्णविद्वेषातून टोरोंटोमध्ये पूर्वी दोन वर्षे काही भारतीयांना मारपीट झाल्याच्या बातम्या, आपल्याकडे मागे प्रसिद्ध झाल्या होत्या; त्या वाचून व्यथित झालेल्या वाचकांनी हे लक्षात ठेवायला पाहिजे की, त्या बातम्या खऱ्या असल्या, तरी शितावरून भाताची परीक्षा करण्यालायक त्या नाहीत. बहुसंख्य स्थायिक भारतीयांचे, कॅनेडिअन नागरिकांशी सलोख्याचेच संबंध आहेत, आणि ते तसेच चांगले राहतील, असे अनेकांना वाटते. म्हणूनच 'माइल्स फॉर मिलिअन्स,' आणि त्या संस्थेच्या १३ भावंडांचे आपण स्वागत करायला 'पाहिजेल आहे'. जातपात, धर्म, देश यांची बंधने तोडून, झुगारून, 'चिंता करितो विश्वाची' ही रामदासांची ओवी सार्थ करणारी ही भ्रमणगाथा, म्हणजे नव्या जगातील आशेचा अंकुर आहे.

कॅनडातील हिमरुद्री हिवाळा मोठा जबर कडाक्याचा असतो; त्यामुळे वसंतऋतूच्या खुणा तिथल्या माणसाला गुदगुल्या करू लागतात, मनाला आल्हाद देतात; आणि वसंताच्या आगमनाने निसर्गाबरोबर त्याच्या मनाला सुकुमार पालवी फुटते.

दरवर्षी वसंतऋतूत तिथे येणारी ही प्रेमपदयात्रा, अशीच मनाला डोलविते आणि फुलविते; वर्णद्वेषाच्या आसुडाने पेटलेल्या मनावर, प्रेमाच्या प्राजक्ताची ती फुंकर घालते !

♣ ♣

: ७ :

# या, सुखांनो या !

" सुखाचा शोध " घेण्यासाठी अमेरिकन माणूस इतक्या उत्कटतेने जंगजंग पछाडतो, की त्याची कोणीच बरोबरी करू शकणार नाही. अटीतटीने, बेहोषीने, उन्मादाने, कल्पकतेने, भल्याबुऱ्या किंवा वेळप्रसंगी हास्यास्पद मार्गांनी पण अट्टाहासाने, तो सुखाच्या गिरिशिखराकडे जोमदार, पल्लेदार घोडदौड करीत असतो. तसे पाहिले तर जगभर माणसे सुखाच्या मागे धावत असतात; पण अमेरिकन पिंड काही वेगळाच आहे. अमेरिकन घटनेतच मुळी " लाइफ, लिबर्टी, अँड परसूट ऑफ हॅपिनेस ", असे हे सुखाचा बेधडक पाठलाग करण्याचे निःशंक तत्त्वज्ञान अंतर्भूत करण्यात आलेले आहे !

" ठेविले अनंते तैसेचि रहावे, चित्ती असो द्यावे समाधान " असली शिकवण त्याला नेभळटपणाची वाटेल; " ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या " असले तत्त्वज्ञान म्हणजे खुळचट थोतांड आहे, असे मानणारा त्याचा पिंड आहे.

**मोठे व सुंदर हत्ती कसे करावेत ?**

अशी एक गोष्ट सांगतात की, विश्वकर्म्याने एकदा आन्तरराष्ट्रीय संमेलन

भरविले होते; त्यामध्ये " हत्ती " या विषयावर प्रत्येक राष्ट्राच्या प्रतिनिधीला निबंध लिहिण्यास सांगण्यात आले होते. एकेकाच्या निबंधातून, त्या त्या राष्ट्राची अस्मिताच मोठ्या गंमतीदार रीतीने उमलून आली होती !

फ्रेंच माणसाने ' तरुण हत्तिणीची रोमहर्षक प्रणयकथा ' या नावाची भावरम्य कोमल कविता तयार केली होती. जर्मन माणसाने ' साडेतीन वर्षांच्या हत्तीच्या शरीरान्तर्गत ग्रंथस्रावांचे रासायनिक पृथक्करण ' यावरील संशोधनाचे पाच खंड प्रसिद्ध केले होते. भारतीय प्रतिनिधीने ' हत्तीचे अस्तित्व– खरे की खोटे ? ' यासंबंधी अंगिरस ऋषींची संभाव्य शिकवण एका भारदस्त प्रबंधात सादर केली होती; तर अमेरिकन माणसाने " मोठे व सुंदर हत्ती कसे तयार करावेत ? " यासंबंधी एका लिमिटेड कंपनीची विस्तृत योजना आखली आणि कारखाना व विक्रीची संघटना कशी उभारावी, त्या-संबंधी आपल्या सविस्तर सूचना सादर केल्या होत्या !

अमेरिकन माणसाची ही दिग्विजयाची हौस आणि खुमखुम दुसऱ्या एका पंडिताने, पुढीलप्रमाणे समीकरणे मांडून सजविली आहे :

एक जर्मन हा शास्त्रज्ञ असतो.
दोन जर्मन एकत्र आले की एक कारस्थान करतात.
तीन जर्मन एकत्र आले की, एक महायुद्ध होते !

एक भारतीय हा सापांना पुंगी वाजविणारा गारुडी असतो.
दोन भारतीय एकत्र आले की, तत्त्वज्ञानाचा काथ्याकूट होतो.
तीन भारतीय एकत्र आले की चक्क गोंधळ माजतो !

एक अमेरिकन म्हणजे सर्वसामर्थ्यवान डॉलर.
दोन अमेरिकन एकत्र आले, म्हणजे एक कॉर्पोरेशन स्थापन होते !
तीन अमेरिकन एकत्र आले की, पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करतात !

काही वर्षांपूर्वी ही समीकरणे प्रसिद्ध झालेली आहेत. आणि आज ती तंतोतंत लागू पडतील असे नाही; पण अमेरिकन उत्साहाच्या दुर्दम्य हौशीचे

चित्र त्यांतून छान दिसू शकते, यात शंका नाही. काही नामवंत समाजपंडित गेल्या दहा वर्षांत वेगळे इशारे द्यायला लागले आहेत; " हे सुख दुखते आहे; या सुखासाठी जबर किंमत द्यावी लागणार आहे; इतक्या अवास्तव वेगाने सुखे फस्त करण्यामुळे पुढे अनेक संकटे येऊ घातली आहेत; इतकेच नव्हे, तर या सुखांच्या हव्यासातून अनेक दुःखे आणि समस्याच निर्माण होत आहेत." असे हे अनेक प्रकारचे इशारे आहेत. परंतु या इशाऱ्यांचा फारसा परिणाम होत असल्याचे दिसून येत नाही; आणि भरधाव सुटलेल्या अमेरिकन रथचक्राचा वेग या इशाऱ्यांनी कमी होईल, असेही वाटत नाही.

अमेरिकन जीवन ज्यांतून उचंबळून येते, अशा अनेक हौशींच्या व हव्यासांच्या या विस्मयकथा, म्हणजे परिकथांच्या सृष्टीतून केलेला सिंदबादचा फेरफटका आहे, असे वाटू लागते. त्यातील काही इरसाल मासल्यांचे आपण आता धावते दर्शन घेणार आहोत.

## रॉक अँड रोलचे तुफानी संगीत :

रॉक अँड रोलचा उदय होऊन खूप वर्षे झाली; पण अजूनही तरुण-तरुणीं-मध्ये या संगीताने तुफान लोकप्रियता मिळवलेली आहे. साठ टक्के ध्वनिमुद्रिका व टेप्स अद्यापि याच रॉक अँड रोल संगीताच्या असतात. बाराशे कंपन्या हे संगीत निर्माण करण्यात गुंतलेल्या आहेत. दरवर्षी ६२०० ध्वनिमुद्रिका आणि २६०० आल्बम निर्माण करण्याच्या त्यांच्या या अजस्र धंद्यातून दोन हजार कोटी रुपयांची वार्षिक विक्री होते! १८ ते २६ वयातील तरुण-तरुणींना ही वादळी गीते मनस्वी भुरळ घालतात. यौवनातली रोमांचकारक स्वप्ने, जुन्या पिढीविरुद्ध व बुरसट नीतिनियमांविरुद्ध बंडखोरी, आणि स्वच्छंद व बेछूट जीवनाचा एक तडाखेबंद जयजयकार, हा या गीतवादळाचा आत्मा असतो. गीतांना साथ देणाऱ्या किंचाळ्या, आणि अकटोविकट नृत्याचा झणत्कार याच्यातून तरुणांना आपल्या बेभान जीवनाचा जणू साक्षात्कार मिळत असतो !

अशी एखादी ध्वनिमुद्रिका नव्याने तयार करावयाची, म्हणजे तीन महिने-सुद्धा कधी कधी पुरत नाहीत ! तीस टनी वजनाची यांत्रिक उपकरणे, साउंड व इलेक्ट्रिकल इंजिनिअर, अनंत प्रकारची वाद्ये, कृत्रिम आवाज काढणारी यंत्रे,

व कुशल संघटक, असा हा मोठा ताफा एकत्र येऊन कित्येक दिवस राबत व खपत असतो, तेव्हा ती कच्ची रेकॉर्ड तयार होते. मग पंचवीस तीस प्रकारचे इलेक्ट्रॉनिक आवाज अत्यंत कुशलतेने ठायी ठायी तिच्यात मिसळले जातात; हे मिश्रण असे अचाट बेमालूम असते, की कोणत्याही कॉन्सर्ट किंवा गीत-मंडळाला ते तसे सादर करणे शक्य होत नाही.

परंतु रॉक अँड रोलच्या तुफानी कार्यक्रमात प्रत्यक्ष हजर राहून सहभागी होणे, म्हणजे सुखाचा परमोच्च कल्लोळ आहे, अशी अमेरिकन तरुण-तरुणींची अपार श्रद्धा आहे. रौद्र-करुण-शृंगार-वीर अशा नवरसांनी ओथंबलेला हा गीतचमत्कार निदान टी. व्ही.वर तरी प्रत्यक्ष पाहिला पाहिजे; आर्त किंचाळ्या फोडून आणि देहभान विसरून या गीत-आर्तायनात मश्गुल होणे म्हणजेच जीवनाची परिपूर्तता, असे जणू काही त्यांना वाटत असते. एखाद्या सैन्याच्या प्रचंड स्वारीला तोंड देणे, अशा तऱ्हेचे जबरदस्त वातावरण त्या वेळी मुद्दाम निर्माण करण्यात येते. काही ठिकाणी दारुकामाची आतषबाजी, कोलांट्या उड्यांच्या मर्कटलीला, आणि तांडवाची रणधुमाळी अशी काही शिगेला पोचवितात की, त्या तुफानी संगीतात सहभागी न होण्याची कोणाची प्राज्ञा नसते ! संगीताचा भाग निम्मासुद्धा त्यात नसतो, पण मुद्दाम निर्माण केलेला हा विचित्र हलकल्लोळ अत्यंत आवश्यक समजला जातो ! एका कंपनीचा संचालक म्हणतो की, " अमेरिकन मंडळींना शांत, सुस्वर, अभिजात, कलात्मक सिंफनी, रागदारी नको असते; घणाघाती, वज्राघाती, अशा संगीताच्या चाबकाचे फटकेच त्यांना हवे असतात !" म्हणजे आपल्याकडे जसे चित्रपटनिर्मात्यांनीच ठरवून टाकले आहे की, " लोकांना हाणामारी, स्मगलिंग, व्यभिचार, स्वैराचार, भडक नृत्ये हीच चित्रपटांतून बघायला आवडतात ! " तसाच हा निर्णय तिकडच्या रॉक अँड रोल कंपन्यांनी घेऊन टाकला आहे. परिणाम असा झाला की, बीथोव्हन प्रणीत अस्सल जुन्या रागदारीच्या ध्वनिमुद्रिकांचा खपाचा आकडा ३ टक्क्यांच्यावरसुद्धा अमेरिकेत आज जाऊ शकत नाही.

हार्ड रॉक, कंट्री रॉक, फोक रॉक, जाझ रॉक, अशी मूळ रॉकची मोठी पिलावळ आता तयार झालेली आहे; आणि धूर्त उद्योगपतीपासून आचरट विदूषकापर्यंत, सर्वजण या रॉक-साम्राज्याला बळकट करण्यात गुंग झालेले

आहेत. महाराष्ट्रात जसे साखर-महर्षी आणि सहकार-सम्राट असतात, तसे अमेरिकेत रॉक-महर्षी आहेत. खूप लोकप्रिय झालेला कलाकार तिसाव्या वर्षी गडगंज पैसा मिळवून सेवानिवृत्त होऊ शकतो. कारण लोकप्रिय ध्वनिमुद्रिकेच्या निदान एक लक्ष प्रती खपतात, व एक रेकॉर्डची आठ डॉलर्स ( ६५ रुपये ) किंमत असते.

लोकप्रिय होण्यासाठी कोणते चाळे करावेत, त्यावर कसलाच अंकुश नाही. इगी पॉप नावाचा गायक, आपला कार्यक्रम चालू असताना, उड्डाण केल्यासारखा श्रोतृवृंदामध्ये उतरतो, आणि म्हणे एकेकाच्या गालाला पीनट बटर ( लोणी ) चोळीत सुटतो ! आणि तरुण-तरुणीही त्याच्या या चाळ्यांवर बेहद्द खूष असतात !

परंतु एलव्हिस प्रेसले काही वर्षांपूर्वीच मेला, तो या साऱ्या तुफानी रॉकचा अनाभिषिक्त बादशहा समजला जात असे. वर्षानुवर्षे त्याने इतकी अथांग लोकप्रियता मिळविली, इतक्या स्त्रियांशी संबंध ठेवले, इतकी अगणित संपत्ती मिळविली, आणि मादक औषधी गोळ्यांचा असा काही वारेमाप उपयोग स्वतःवर केला की, कशालाच काही सुमार नाही. बेलगाम आयुष्य आणि मादक गोळ्यांचे अतिसेवन यांच्यातूनच त्याचा अकाली मृत्यू ओढविला, असे सांगतात. परंतु आजही त्याच्या गावी व घरी, तीर्थस्थानाप्रमाणे लोकांची झुंबड गर्दी भक्तिभावाने घिरट्या घालीत असते !

## अफाट संपत्तीच्या कथा :

बिंग क्रॉसबी हा सिनेनट व गायक असाच लोकप्रिय होता. तो मेला तेव्हा बत्तीस कोटी रुपयांची ( ४० मिलिअन डॉलर्स ) इस्टेट तो ठेवून गेला, असे प्रसिद्ध झाले आहे. अर्थात त्याखेरीज त्याने काही वेगळे ट्रस्ट स्थापन केले, त्यातही त्याने खूप पैसे घातले होते.

बॉक्सिंग, बेसबॉल, बास्केटबॉल, सिनेमा, टी. व्ही., अशा अनेक क्षेत्रांतून अशाच अफाट संपत्तीच्या कथा अमेरिकेत ऐकू येतात; कोणत्याही क्षेत्रात लोकप्रियता मिळाली, की त्या माणसावर अमेरिकेत पैशाचा पाऊसच पडत असतो. मध्यंतरी भारतात येऊन गेलेला जगज्जेता मुष्टियोद्धा महंमदअली याने आतापर्यंत ४० कोटी रुपये मिळविलेले आहेत ! तो म्हणतो की, यातले माझे

बरेचसे पैसे सरकारी इनकम्-टॅक्स, व धर्मादायमध्ये गेले, आणि काही पैसे “ असे-तसे ”च निघून गेले. त्यामुळे पैसे मिळविण्यासाठी तो आपली विद्या व मुष्टियुद्धे चालूच ठेवणार आहे; कारण पैशाची त्याला जरूर आहे ! आम्ही ७७ साली अमेरिकेत टी. व्ही.वर त्याचे १९ वे जगज्जेता-मुष्टियुद्ध पाहिले. अर्नी शेवर्सबरोबर तो हे मुष्टियुद्ध खेळला. त्या एकाच खेळातून त्याला २५ लाख रुपये मिळाले; आणि अर्नी शेवर्स ते युद्ध हरला, त्याला अडीच लाख रुपये मिळाले !

अनेक खेळांतले हे चुरशीचे सामने पाहण्यासाठी कित्येक शहरांतून नवे राजशाही अफाट स्टेडिअम, भरमसाट खर्च करून राज्य सरकारांनी किंवा नगरपालिकांनी बांधले आहेत; त्यावर अलीकडे जागरूक नागरिकांनी टीकेची झोड उठविली आहे. कारण पैशाची उधळपट्टी झाल्याने पुष्कळसे स्टेडिअम तोट्यात आहेत, आणि नागरिकांना मात्र जबर कर भरावा लागतो. लुइझि-आनातला सुपर डोम बांधायला एकशेचाळीस कोटी रुपये खर्च आला, आणि त्याचा रोजचा चालू खर्च ४५ हजार रुपये होतो. असे ५३ नवे किंवा वाढीव स्टेडिअम आज तोट्यात चालू आहेत. “ कन्सल्टंटना ” अवास्तव मुशाहिरा देणे, आणि इतर असेच अनेक भ्रष्टाचार, त्यांतून आता उघडकीला आले आहेत.

तेव्हा, आपल्याकडील नगरपालिका आणि आमदारच अशा कामात हुशार आहेत, अशी खंत कोणी बाळगण्याचे कारण नाही; अमेरिकेतील सार्वजनिक संस्थांतूनही हे प्रकार चालूच असतात.

याउलट ‘ डिस्नेलॅंड ’सारख्या अनेक लहानमोठ्या अभिनव उपक्रमांतून, खाजगी कंपन्यांनी करमणुकीचे एक विशाल नवे विश्वच अमेरिकेत उभारले आहे; त्यांतून त्या कंपन्यांनी स्वतः फायदाच मिळविला आहे; पण अमेरिकन माणसाचे मन रिझविण्यासाठी कल्पनाशक्तीची अशी काही गगनभरारी मारली आहे, की ती आजची खरी तीर्थक्षेत्रे झालेली आहेत; ती कोणाला चुकविता येत नाहीत !

आपल्याकडे सिनेमा, नाटक, सर्कस, संगीत व नृत्य, व्याख्याने, प्रदर्शने, क्रिकेट-मॅचेस, झू, फार तर जुन्या पद्धतीची रामलीला, असे हाताच्या बोटावर मोजण्याइतपत करमणुकीचे प्रकार लोकप्रिय झालेले आहेत. अमेरिकेत या मौज-

मजेची दसपट विविधता दिसून येते.

**किंचाळ्यांतला आनंद :**

रॉक अँड रोलच्या तुफानातून ज्याप्रमाणे हर्षोन्मादाच्या किंचाळ्या निघतात, त्याचप्रमाणे रोलर-कोस्टरच्या गाडीत बसलेली मंडळी भयभीत होऊन किंचाळ्या फोडीत असतात, व त्यातच त्यांना खूप मजा वाटते ! रोलर-कोस्टर म्हणजे वेडीवाकडी व उंचसखल प्रवास वेगाने करणारी एक छोटी यांत्रिक, भीतिदायक घसरगुंडी ! २५–३० मंडळींना घेऊन ही इलेक्ट्रिक रोलर-कोस्टर एकदा सुरू झाली की, आपण पडून जाऊ की काय या भीतीने या गाडीच्या कोलांटीत माणसे गांगरतात; मध्येच पाण्यातून ती सरकते, तेव्हा अंगावर पाणीही खूप उडते; आणि असा हा चित्तथरारक अनुभव घेऊन दहा-पंधरा मिनिटांत ही गाडी पुन्हा पहिल्या ठिकाणी येते; खरे म्हणजे या वर्णनातून काही नीटशी कल्पना येणार नाही, तो प्रत्यक्ष अनुभवच घेतला पाहिजे, म्हणजे त्या किंचाळ्या कशा फुटतात, आणि तरीही आपण सुखरूप कसे काय परत येतो, त्याचे गुलजार अजब रहस्य आपल्या ध्यानी येते.

रोलर-कोस्टरप्रमाणे, आणखीही काही चमत्कृतिजन्य आकर्षणे सुपीक अमेरिकन मेंदूतून निघून, यशस्वी झालेली आहेत. अशी पाच-पंचवीस आकर्षणे एकत्र आणून मोठ्या आकाराचा एक ' ॲम्युझमेन्ट पार्क ' स्थापन होतो. तथापि बहुतेक पार्कमध्ये रोलर-कोस्टर हा एक अविभाज्य भाग असतोच; कारण वर्षातून एकदा तरी पोराबाळांना, किंवा मित्र-मैत्रिणींना घेऊन, रोलर-कोस्टरमधील किंचाळ्या मारल्याशिवाय अमेरिकन जीवनातली रंगत–लज्जत प्रफुल्लित होऊच शकत नाही !

अशी चाळीस मोठी क्रीडा-केन्द्रे व किंचाळी-केन्द्रे अमेरिकेत आज आहेत; आणि दर वर्षी सरासरीने सात-आठ कोटी अमेरिकन मंडळी– म्हणजे चाळीस टक्के अमेरिकन लोकसंख्या– तिथल्या गंमतीजमतीत रममाण होत असते; तिथल्या तिकिट-विक्री व वस्तु-विक्रीतूनच दरवर्षी म्हणे सातशे कोटी रुपये जमा होतात ! हजारो लोकांना काम देणारा, त्यांचे अजब कसब व किमया दाखविण्यास संधी देणारा, आणि लाखो लोकांना मनसोक्त रमविणारा व हसविणारा हा अगडबंब उद्योग, म्हणजे पृथ्वीवरील एक स्वर्गच आहे,

असा अमेरिकन दावा आहे.

चाळीस वर्षांपूर्वी स्थापन झालेला एक जुन्यापैकी स्वर्ग, म्हणजे न्यूयॉर्क-मधील ' कोनी आयलंड 'चा ॲम्यूझमेन्ट पार्क; आणि अलीकडे स्थापन झालेला पृथ्वीवरील स्वर्ग म्हणजे सॅनफ्रॅन्सिस्कोच्या परिसरातील ' ग्रेट अमेरिका ' क्रीडाकेन्द्र. थेट १९ व्या शतकातील अमेरिकेतील खेडे आणि जुन्या जत्रा यांचा सुंदर आभास करणारी सुरम्य दालने या ' ग्रेट अमेरिका ' मध्ये जशी आहेत, त्याचप्रमाणे आधुनिक विज्ञानाने मुखरित झालेल्या इलेक्ट्रॉनिक लीलांचे लाघवही येथे तुडुंब भरलेले आहे.

जुन्या व नव्या गंमतींचा सुरेख संगम असा कसा साधावा, त्याचे धडे या सर्व स्वर्ग-वाल्यांना, प्रथम वॉल्ट डिसने याने आपल्या डिसनेलँडमधून दिले असे म्हणता येईल. या सर्व स्वर्गवाल्यांचा तो एक दादाच आहे, असे म्हणता येईल. डिसनेलँड, चित्रपट, आणि टी. व्ही. कार्यक्रम अशा आपल्या अथांग पसाऱ्यातून डिसने-समूहाने १९७७ या एकाच वर्षात ६५ कोटी रुपयांचा नुसता फायदाच मिळविला! कॅलिफोर्नियातील डिसनेलँडपेक्षाही मोठा असा आनंद–तमाशा आता या समूहाने फ्लॉरिडामध्ये ' डिसने-वर्ल्ड ' या नावाने सुरू केला आहे.

ॲब्राहॅम लिंकन हा अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष दिवंगत होऊन आता खूप वर्षे झाली. पण तो उभा राहून प्रत्यक्ष व्याख्यान देतो आहे, ते पाहण्याची व ऐकण्याची पर्वणी जेव्हा डिसनेलँडमध्ये मिळाली, तेव्हा खरोखरच अतिशय कौतुक वाटले. सिनेमात किंवा नकलाकाराने लिंकनची नक्कल करणे हे वेगळे; पण इथे एक यांत्रिक प्रतिकृती, उभे राहून, तोंड हालवून, जिवन्त लिंकन बोलल्याप्रमाणे बोलते, म्हणजे एक अजब किमया वाटते. मुंबईच्या नेहरू सेंटरमध्ये जर उद्या पंडित नेहरू प्रत्यक्ष बोलत आहेत, अशी प्रतिकृती रोज दाखविता आली, तर ते किती जबरदस्त आकर्षण प्रेक्षकांना वाटेल, असा विचार मनात येऊन गेला.

### भुताटकीचे लोकप्रिय वाडे :

आणि अगदी नवीन वैज्ञानिक आकर्षण म्हणजे डिसनेलँडमधील ' स्पेस माउंटन ' आणि ' स्पेस प्रोब '. अंतरिक्षात उड्डाण प्रत्यक्ष केल्याचा,

आणि वरून पृथ्वीचा गोळा पाहिल्याचा अनुभव आणि संभ्रम प्रत्यक्ष व्हावा, अशी ही नवी हिकमत आहे. आम्ही गेलो होतो, तेव्हा ही नवी जादू पाहण्यासाठी एवढा मोठा 'क्यू' होता की, तो कार्यक्रम सोडून इतर साहसामध्ये सामील होण्याचे आम्ही ठरविले. म्हणजे चाच्यांच्या जहाजातून प्रवास करणे, निबिड जंगलातील श्वापदांना तोंड देणे, आणि भुताटकीने पछाडलेल्या पडक्या वाड्यांतून अमावास्येच्या मध्यरात्री फिरणे, अशा जुन्या पद्धतीच्या साहसयात्रा आम्ही प्रत्येकी अर्ध्या तासात त्या डिसनेलँडमध्ये करून आलो ! या साहसी प्रवासांतून अर्थातच अधून-मधून अवचित भुताटकीची व श्वापदांची गाठ पडल्याने गाळण उडणे, अंगावर शहारे येणे, क्वचित अस्फुट किंकाळी फुटणे, हे सर्व यथासांग होत असतेच; म्हणजे तिकिटांची वसुली नीटपणे होत असते.

आणि केवळ भयभीत होऊन थरकाप होणे, याचीच आपणाला जास्त आवड असली, तर फ्रँकेनस्टाइनच्या वाड्यांना तुम्ही अवश्य भेट दिली पाहिजे. असा एक भयाण वाडा न्यूयॉर्कमधील लेक जॉर्ज येथे आहे, व दुसरा कॅनडातील नायगारा धबधब्याजवळ आहे.

जिवंत सर्पांनी भरलेली भुयारे, मेलेल्या माणसांच्या भेसूर हसणाऱ्या कवट्या, पिशाच्चांचे दर्शन आणि ब्रह्मसमंधांच्या हाका, यांत्रिक छळ करणारी अवजारे, अवचित भयानक आवाज, आणि अर्थात मानगुटी पकडण्यासाठी येणारा सुप्रसिद्ध फ्रँकेनस्टाइन, अशी सारी खाशी जबरदस्त आकर्षणे या वाड्यातून खच्चून भरलेली आहेत; आणि खूप मंडळी हा 'आनंद' लुटायला रोज येत असतात !

परंतु असे हे चक्रम प्रकार सोडल्यास, इतर अनेक 'शो'मधून मनाला प्रसन्न आणि स्तिमित करणारे, नाविन्याने नटलेले सुंदर खेळ पाहायला मिळतात. संगीताच्या तालासुरात, आणि दिव्यांच्या रोषणाईत, पाण्यावरून पळण्याचे ( स्कीइंग ), व कारंजांच्या थुयथुय नाचण्याला साथ देणारे जे अद्भुतरम्य खेळ पाहायला मिळतात, त्यांचे झकास वर्णन श्री. पु. ल. देशपांडे यांनी 'उदंड जाहले पाणी' या आपल्या लेखात केलेले आहे.

आपल्याकडे मुंबईत व कलकत्त्यातच मोठी प्लॅनेटॅरिअम आहेत. अमेरिकेत ती पुष्कळ ठिकाणी आहेत, व त्यांतून आता आणखी नव्या प्रकारची दृश्ये

दाखवीत असतात; आकाशगंगा, सूर्यग्रहण व सूर्यमालिका, अनंत ब्रह्मांडाचा अथांग पसारा, हे सारे आपण मुंबई व कलकत्त्याच्या प्लॅनेटॅरिअममध्ये पाहू शकतो. पण कॅलिफोर्नियातील खेळामध्ये लेसरच्या साहाय्याने, संगीताच्या तालसुरात लयबद्धपणे बदलणाऱ्या अनंत तेजस्वी आकृत्यांचे एक अखंड तांडव-नृत्य अलीकडे दाखवितात ते पाहिले; हा कृत्रिम आकृत्यांचा खेळ मला तरी तितकासा आकर्षक वाटला नाही; मात्र त्यानंतर, आकाशात विजा चमकून प्रचंड गडगडाट होऊन पाऊस पडायला लागतो, अशा नैसर्गिक हृदयंगम दृश्याची इतकी हुबेहुब नक्कल दाखविण्यात आली, की ते पाहून मन अगदी उचंबळून आले.

**जुगार आणि ज्योतिष :**

निसर्गरमणीय अशी जुन्या प्रचंड सेकोया वृक्षांची गर्द राई, सरोवरे, पर्वत, समुद्रकाठ, नद्या यांची शोभा व आनंद अमेरिकेत हजारो मंडळींना सुखाने लुटता येतो. रस्ते, हॉटेल्स, मोटेल्स, सुखसोयी, यांची कसलीच कोठे कमतरता नाही; आणि त्या सोयींना जोडून आणखी काही खास आकर्षणे मुद्दाम तेथे ठेवण्यात येतात. हिवाळ्यात बर्फावरचे खेळ, उन्हाळ्यात पायी प्रवास किंवा पर्वतारोहण, कुत्र्यांच्या शर्यती, प्रदर्शने, एक ना दोन-- किंवा जुगारांचे चक्क मोठे कायम अड्डे ! आम्ही लेक टाहोला गेलो. तेव्हा जुगारी अड्ड्यांचे प्रचंड हॉल पाहिले; शेकडो जुगारी स्लॉट-यंत्रे तिथे ओळीने शिस्तीत मांडलेली असतात. आणि ती अनंत प्रकारची रंगीबेरंगी, असंख्य ढंगाने व पद्धतींने झुलविणारी असतात. एका हातात जळती सिगारेट, व दुसऱ्या हातात डॉलर्सच्या नोटा व नाणी घेऊन चारपाच ताससुद्धा एकेका यंत्रापाशी खेळत राहणारी बाई किंवा बुवा दिसणे, हे एक कायमचेच दृश्य असते. सारा मोठा हॉल गच्च भरलेला !— माणसांनी, सिगारेटच्या प्रचंड धुराने, जुगारीच्या बेहोशीने, व स्लॉट यंत्राच्या खणखणाटाने. तो सारा परिसर वखवखलेला असतो.

कित्येक मंडळी तर लांबून, हा जुगार खेळण्यासाठीच येतात. कारण प्रांताची सरहद्द ओलांडली की जुगारी कायदे शिथिल होतात. टाहो सरोवराची शांत सुरम्य सृष्टिशोभा, त्या प्रवाशांना विरंगुळा किंवा सुखशांती देऊ

शकत नाही. असले काही साधेसुधे मिळमिळीत त्यांना नको असते; काही तरी सणसणीत त्यांना हवे असते !

सुट्टीचा दिवस कसा घालवावा, आणि एकलेपणाची आग कशी विझवावी अशा दोन्ही प्रश्नांचे उत्तरही त्यांना जुगारात सापडते; आणि " या रविवारचे आपले ग्रहमान व नशिबाचा खेळ आहे तरी कसा ? " या उत्सुकतेचे उत्तरही त्यांना तिथे गवसते.

मासिक व साप्ताहिक फलज्योतिषाचा सुळसुळाट जुनाट भारतातच आहे, असा गैरसमज कोणी करून घेऊ नये. फलज्योतिषाचे वेड अमेरिकेतही अगदी छान फोफावलेले आहे. निदान पाच कोटी अमेरिकन मंडळी फलज्योतिषात चांगल्या रीतीने लक्ष घालतात, अशी एक मोजदाद करण्यात आलेली आहे. अमेरिकेतल्या पंधराशे दैनिकांपैकी १२३० दैनिकांमध्ये राशीवार, जन्मतारखेनुसार, आणि इतर पद्धतीने भविष्यकथनाचा गुलमोहोर बारा महिने बहरत असतो, आणि हजारोंच्या मनांना हिंदोळ्याचे हेलकावे देत असतो; इतकेच नव्हे तर सहा विद्यापीठांतून फलज्योतिषाचे पद्धतशीर शिक्षणक्रम व्यवस्थित चालू आहेत.

गेल्या काही वर्षांत कॉम्प्यूटर्सचा उपयोग फलज्योतिषासाठी होऊ लागला आहे. अनेक प्रकारचे संशोधन, शेकडो कुंडल्यांचे फरक, साम्ये, प्रत्यक्ष पडताळे, झटपट संपूर्ण जन्मकुंडली अंशात्मक माहितीसह करणे, असा हा अभ्यास कॉम्प्युटर्सच्या साहाय्याने होऊ लागला आहे. त्यामुळे चुका कमी होतील, आणि आडाखे सुधारतील असे तज्ज्ञांना वाटते.

आमच्या माहितीचे एक महाराष्ट्रीय इंजिनिअर अमेरिकेत स्थायिक झाले आहेत; त्यांनी या विषयावर पुस्तके लिहून तिकडे प्रसिद्ध केली आहेत, आणि इंजिनिअरिंग व्यवसाय सोडून याच व्यवसायाला, त्यांनी आता वाहून घेतले आहे. अमेरिकेत या व्यवसायात त्यांनी उत्तम यश मिळविले आहे.

## चेटकीण होऊ इच्छिता का ?

सर्वसामान्यांना आपले ज्योतिष पाहण्याची उत्सुकता वाटणे, आणि काही मंडळींनी त्यात पारंगत होणे, हे मनुष्यस्वभावाला धरूनच आहे; आणि त्यात काही वावगे नाही, असे आपल्याला वाटते. परंतु अमेरिकेत चेटकीण होऊन,

चेटकिणीचा धंदा करण्याची आपली इच्छा असली तर त्याही बाबतीत आपल्याला व्यवस्थित मार्गदर्शन मिळू शकते !

अमेरिकेत प्रत्येक विद्येचा अभ्यास, आकडेवारी, संशोधन, संघटना, असा धडाका सर्व क्षेत्रांत नीटपणे चालू असतो; आणि त्यातून चेटकिणीसुद्धा सुटलेल्या नाहीत ! सध्या अमेरिकेत ऐंशी हजार (८०,०००) गोऱ्या चेटकिणी आहेत, असा आकडा प्रसिद्ध झालेला आहे; परंतु या चेटकिणी चांगल्या कार्यासाठीच आपली शक्ती वापरीत असतात; उदाहरणार्थ, त्या असें सांगतात की, शारीरिक आणि मानसिक व्याधींतून मुक्तता करण्यासाठी आम्ही आमच्या गुप्त शक्ती वापरतो. काही चेटकिणींच्या शक्ती वंशपरंपरेने चालू राहतात. याउलट नव्या चेटकिणींना मार्गदर्शन देण्यासाठी प्रशिक्षणवर्ग, गुप्त-विधी, साप्ताहिक बैठकी, मासिके, सभा असे सारे काही व्यवस्थितपणे चालू असते ! आता बोला !

असाच एक मुलुखावेगळा पंथ, म्हणजे नग्न लोकांची संघटना. कपड्यांनी सदा अंग झाकीत राहणे, हे निसर्गाविरुद्ध आहे आणि ते या पंथाला पसंत नाही ! घरात किंवा ऑफिसात काम करताना, हिंडता फिरताना, किंवा खेळताना, ऊटसूट कपड्यांचा जुलूम करवून घेणे बरोबर नाही. उलट नग्नता पाळल्याने मने अधिक शुद्ध व साधी होतात, असे त्यांचे तत्त्वज्ञान आहे. अर्थात थंडीसाठी कपडे वापरणे, अशा तऱ्हेच्या वापराला बंदी नाही. अमेरिकेत अशा मंडळींनी आपापली नग्नग्रामे स्थापिली असून, त्यांनी आपापले काही नियम तयार केलेले आहेत. बाहेरच्या मंडळींना, या नग्नग्रामात प्रवेश मिळत नाही. कॅलिफोर्नियातील अशा एक नग्नग्रामामध्ये वर्षातून एकदा बाहेरच्या मंडळींना बोलावून नग्नोत्सव करण्यात येतो; त्या वेळी हजार-पंधराशे फोटोग्राफर हजर राहिले होते, अशी बातमी छापून आली होती ! कारण त्या एका दिवशी सर्वांना भेट देता येते.

अमेरिकेतील अशा अनेक विक्षिप्त पंथांची नुसती ओझरती तोंडओळख करून द्यायची म्हटली, तरी पुस्तकाची पंचवीस तीस पाने पुरणार नाहीत. विचित्र पांढरे बुरखे घालून गुप्त सभा भरविणारा, व काळ्या लोकांना दहशत बसवू इच्छिणारा ‘ कू क्लुक्स क्लॅन ’ नावाचा भयाण पंथ अजूनही भरपूर हालचाली करीत असतो; तर यांत्रिक युगाला, शहरी संस्कृतीला व पोल्यूशन,

गोंगाट, धावपळ यांना विटलेली मंडळी खेड्यापाड्यांत जाऊन अत्यंत साधे जीवन जगण्यासाठी नाना पंथ आणि चळवळी उभारीत असतात. आणि या सर्व पंथांना भरपूर चेले आणि हवी तितकी प्रसिद्धी मिळत असते, ही त्यातली गंमत आहे. मनःपूत वागण्याची मुभा असली, आणि सर्व उचापती करण्याची आर्थिक ऐपत असली की सुखेनैव वाटेल ते करता येते, ही त्यातली गोम आहे.

आणि तरीही आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, अशी वाट चुकलेली, आडवळणे घेणारी, किंवा ध्येयवादी मंडळी एकंदरीत खूप कमीच असतात. सर्वसामान्य अमेरिकन माणूस, आपले काम, आपले घर, कुटुंब, व आपले छंद यांमध्ये खूप रंगलेला असतो; आणि त्याला विचित्र उचापतींत लक्ष घालायला फुरसत नसते. घरातील बारिक व मोठ्या दुरुस्त्या, रंगकाम, सुतार-काम, बागकाम, मोटरदुरुस्ती, फर्निचर करणे, फिटिंग बसविणे, घरी आवडीने वर्कशॉप ठेवणे, या कामासाठी त्याला भरपूर साहित्य, उपकरणे व माहिती सतत मिळत असते; आणि त्यात त्याला एक प्रकारचा ‘ क्रिएटिव्ह ’ आनंद मिळत असतो. काही मंडळी जुनी घरे घेतात, स्वतः कित्येक महिने खपून आतून बाहेरून घर अगदी अद्ययावत, व रमणीय करतात, व मग ते विकून टाकतात; तर काही मंडळी घराचा वाढीव निम्मा भाग, किंवा संपूर्ण घरच स्वतः बांधून तयार करतात ! कष्टांची ही हौस पुरविण्यासाठी, इतक्या छान सुखसोयी अमेरिकेत आहेत की, माणसाला त्या कष्टांतून कृतकृत्यता वाटते, मौज लुटता येते, आणि पैसेही मिळून जातात. शिवाय एखादी चांगली कला हस्तगत करता येते.

**पतंगापासून विमानापर्यंत :**

कोणताही छंद तुमच्या मनात येवो, त्यासाठी अमेरिकेतील प्रचंड व लहान-मोठी खास दुकाने तुमच्या सेवेसाठी तत्परतेने मदत करतील. यांत्रिक युगातला अमेरिकन मनुष्य, पतंग उडविण्यातही रमतो, आणि पतंगांच्या चढाओढीत भरपूर रस घेतो हे पाहून मला खूप गंमत वाटली. सॅनफ्रॅन्सिस्कोमध्ये गुजरातेतून आयात केलेल्या पतंगांचे एक दुकान गुजराती मंडळीच चालवीत असतात, ते आम्ही पाहिले. गुजराती पतंगांना येथे खूप मागणी आहे,

तसेच चिनी पतंग, किंवा अमेरिकेतच बनविलेले पतंग, व त्यांत नित्य नवे होणारे प्रयोग व प्रकार यांनाही खूप मागणी असते.

आपल्याकडील लपंडाव किंवा शिवाशिवीप्रमाणे, येथील पोरासोरांचा एक अस्सल अमेरिकन छंद म्हणजे रोलर-स्केटिंग; हे आज अमेरिकेत खूप लोकप्रिय झालेले आहे. ३ कोटी तरुण-तरुणी रोलर-स्केटिंग करीत असते ! बाहेरच्या फूटपाथवर, रस्त्यावर, जिथे परवानगी व जागा मिळेल तेथे,— व न मिळेल तेथेही— रोलर-स्केटिंग करण्यात ही मंडळी रमलेली असतात. साध्या लाकडी पट्टीखाली बसविलेली दोन गुळगुळीत चाके, असा साधा रोलर-स्केटर सध्या नसतो. मिश्र धातूची पट्टी, आणि पॉलियुरेथेन प्लास्टिकची सुळसुळणारी चाके, आज या स्केटरला बसविलेली असतात. त्यावरून मनसोक्त हुंदडावे, व अनेक प्रकारचे स्वस्त खेळही शोधून काढून खेळावेत, यापेक्षा आणखी सुख ते काय असणार, असे त्यांना वाटत असते. काही मंडळी तर म्हणे रोलर-स्केटरवरून ऑफिसला जातात !

पण ज्यांना असला स्वस्त साधा आनंद पुरत नाही, ती मंडळी यांत्रिक डोकी चालवून, रेडिओ, टी. व्ही. सेट, इलेक्ट्रॉनिक साहित्य आणि अशा अनेक वस्तू घरी बनविण्याचा खटाटोप करीत असतात व प्रकल्पांची हौस भागवून घेत असतात. संपूर्ण छोटे विमान घरी बांधायचे असले, तरी त्यासाठीही संपूर्ण मार्गदर्शन मिळते !

**पळा, पळा, आणि सुखी व्हा :**

अमेरिकेत कोणकोणते नवे छंद आणि व्यायाम कसे, केव्हा उदयाला येतील किंवा लोकप्रिय होतील, त्याचा कधी थांगपत्ता लागायचा नाही. गेली काही वर्षे पळण्याचा व्यायाम हजारो स्त्री-पुरुषांमध्ये लोकप्रिय झाला आहे. केवळ ३०—४० वर्षे वयाची मंडळी नव्हे, तर ६०—७० वयाचीसुद्धा काही मंडळी नियमित पळतात; आणि थोडेसे पळणे नव्हे, तर रोज चार ते सहा मैल पळणारे, व महिन्यातून एकदा मॅरॅथॉन—म्हणजे २५—२६ मैल—पळणारे कित्येक लोक आहेत. " पळा, पळा, म्हणजे तुमचे वजन कमी होईल; मग डायेटिंग करायला नको; हार्ट-पेशंटना पळण्याचा फायदा होतो, डिप्रेशन वाटणाऱ्यांची प्रकृती सुधारते, हार्ट अॅटॅक येत नाही, मेंदूतून अल्फा लहरी

निघू लागतात, त्यामुळे सर्जनशीलता वाढते, मनःशान्ती वाढते." असे एक ना दोन, पळण्याचे अनेक अनुभव व अभ्यास डॉक्टरमंडळींनी व पळणाऱ्यांनी प्रसिद्ध केलेले आहेत ! इतकेच नव्हे तर 'रनर्स वर्ल्ड' नावाचे पळणाऱ्या लोकांसाठी, पळणारांनी चालविलेले एक मासिकही व्यवस्थितपणे चालत असते; व पळणाऱ्यांसाठी खास महाग बूट-मोजे, शिकवण्या, क्लब, मार्गदर्शन असे सारे काही मिळू शकते. याउलट काही टीकाकार म्हणतात की, अति पळण्याने प्रकृतीची नासाडी होते; व दुसरे टीकाकार म्हणतात की, ज्यांना समतोल आहाराची सवय असते व जे फार मद्यपान, धूम्रपान करत नाहीत, तेच लोक नियमित पळू शकतात. तेव्हा मुख्य कारण पळणे हे नसून, नियमित संयमी सवयीमुळेच प्रकृती छान राहते, असे या टीकाकारांचे म्हणणे आहे.

असे हे एकेक नव्या छंदाचे विचारमंथन व चर्वितचर्वण प्रत्यक्ष अनुभवांच्या कसोटीवर घासूनपुसून, मोठ्या दिलचस्पीने अमेरिकन स्त्री-पुरुष हिरीरीने चालू ठेवतात. अशा या मंथनातून, मग कधी कधी एखादा नवा उच्चांक प्रस्थापित होतो. विज्ञानाची व संशोधनाची नवी शाखा जन्माला येते, किंवा एखादा नवा धंदा जोमाने तजेलीत येतो. काही मंडळींना त्यात सुखाचे शिखर गाठल्याचा भास होतो, तर काहींना सुखाची एक एक नवीन टेकडी हस्तगत केल्याचा आनंद होतो. मग काही वर्षांनंतर पुन्हा त्यांचे गिरिभ्रमण सुरू होते आणि सुखाचे दुरून दिसणारे नवे डोंगर पादाक्रान्त करण्यासाठी ते पळू लागतात.

### सर्व सुखांची रेलचेल :

रस्ते, आगगाड्या, विमाने, बंदरे, टेलिफोन, अशा सर्व वेगवान आधुनिक सुखसोयींमध्ये अमेरिकेने जागतिक उच्चांक प्रस्थापित केलेले आहेत. अडतीस लक्ष मैल लांबीचे अद्ययावत मोठे रस्ते, आणि दोन लक्ष मैलांचे रेल्वेमार्ग, असे जाळे दुसऱ्या कोणत्याही देशाला लाभलेले नाही. अमेरिकेत दरवर्षी दरडोई ७७० मैलांचा विमान-प्रवास होत असतो. दर हजार लोकसंख्येत ७१८ टेलिफोन्स आहेत; असे वैभव इतरत्र कोठे दिसत नाही. न्यूयॉर्क हे जगातले सर्वांत मोठे बंदर आहे, आणि एकाच वेळी ३९१ बोटी तेथे धक्क्यांना लागू शकतात.

जगातले सर्वांत मोठे विद्यापीठ व मोठी शाळा अमेरिकेतच आहे, असे सांगण्यात येते; न्यूयॉर्क–विद्यापीठामध्ये १९७६ साली २,७०,००० विद्यार्थी शिक्षणासाठी दाखल झाले होते, आणि १५११६ अध्यापक नेमण्यात आले होते. याच न्यूयॉर्कमधील ब्रॉन्क्सचे डी विट क्लिंटन हे जगातील सर्वांत मोठे हायस्कूल आहे, असे समजतात. एका वर्षी बारा हजार विद्यार्थी तेथे शिक्षण घेत होते. जगातील सर्वांत श्रीमंत किंवा खर्चिक शाळा म्हणून वेस्टब्रुक ( कनेटिकट, अमेरिका ) येथील ऑक्सफर्ड ॲकेडमीचा उल्लेख करण्यात येतो. तेथे वार्षिक खर्च प्रत्येक विद्यार्थ्याला ७८००० रुपये ( ९८०० डॉलर्स ) इतका प्रचंड सोसावा लागतो !

**उच्चांकाचे वेड :**

परंतु वैभवशाली अशा या उच्चांकांनी त्यांची हौस भागलेली नाही. नवेनवे उच्चांक गाठण्यासाठी असे काही अजब, विचित्र, आणि अगडबंब खटाटोप ही मंडळी करीत असतात, की काही विचारू नका ! १९७६ च्या चार जुलैला साऱ्या अमेरिकेत द्विशतसांवत्सरिक समारंभ साजरे झाले; त्या दिवशी बाल्टिमोर शहरात ३१८०० किलो वजनाचा अतिप्रचंड केक तयार करण्यात आला होता. त्यामध्ये म्हणे दहा हजार डझन अंडी, साडेनऊ हजार किलो साखर, आणि १८० किलो मिठाची चिमटी सोडण्यात आली होती ! जगातला हा सर्वांत मोठा केक समजला जातो !

त्याच वर्षी न्यूयॉर्कच्या सेंट्रल पार्कमधील ' टॅव्हर्न-ऑन-ग्रीन ' या उपाहारगृहाने बारा फूट उंच आइसक्रीम-संडी उभारून एक असाच जागतिक उच्चांक स्थापन केला. ३३०० किलो वजनाच्या या संडीमध्ये १५०० गॅलन आइसक्रीम प्रथम बारा फुटाच्या भिंतीसारखे रचण्यात आले, आणि मग त्यावर ७० किलो चॉकलेट-फज, ४५ किलो स्ट्रॉबेरी, २३ किलो अक्रोड, २३ किलो चॉकलेट तुकडे, ११ किलो चेरी-फळे आणि ८ गॅलन क्रीम, झकास शोभेने रचण्यात आले होते.

१३३८३ लोकांना एकाच पंक्तीत, ५३ मिनिटांत, प्रत्येकी २५ रुपयांचे जेवण घालून इंडियानापॉलिस शहराने उच्चांक मोडला; तर पंधराशे फूट लांबीची टेबले, शहरातील रस्त्याच्या मधोमध पसरून, अकरा हजार मंडळींना

उत्कृष्ट न्याहारी देण्याचा विक्रम फ्रेंडली आइसक्रीम कंपनीने स्प्रिंगफिल्ड गावात साजरा केला !

अमेरिकेत अशा उच्चांकांची योग्य शहानिशा करून नोंद करण्याची, व अधिकृत मान्यता देण्याची तत्पर यंत्रणा आहे. 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' या पुस्तकात जगातील सर्व उच्चांकांची दखल घेण्यात आली आहे, आणि सचित्र सुरेख सारी माहिती मिळते. नायगारा फॉल्सजवळ गिनेस कंपनीने आता एक जागतिक विक्रमांचे कायम प्रदर्शनच भरविले आहे. आपल्याकडे कुंभमेळ्यात सर्वात जास्त माणसे एकत्र जमतात, त्याही जागतिक उच्चांकाचा उल्लेख गिनेसच्या पुस्तकात आहे.

अमेरिकेने जे अनेक आणखी चित्रविचित्र जागतिक विक्रम मिरविलेले आहेत, त्यांतले काही मासले पुढीलप्रमाणे आहेत :

( १ ) जगात जो सर्वांत वजनदार इसम;—डॉक्टरांनी वजनाची नोंद केलेला— असा दिसून आला, तो म्हणजे मिसुरीतील मॉंटिसेलो गावचा रॉबर्ट अर्ल ह्यूजेस. ६ फूट उंचीच्या या रॉबर्टचे वजन, १९५८ साली तो मेला, तत्पूर्वी १०६९ पौंड ( ४८६ किलो ) होते !

( २ ) जगातला सर्वात उंच इसम, म्हणजे इलिनॉइसमधला रॉबर्ट वॅडलो. तो १९४० साली वारला, तत्पूर्वी त्याची मोजून नक्की केलेली उंची ८ फूट ११ इंच होती !

( ३ ) निश्चित वय माहीत असलेली, जगात सर्वात जास्त जगलेली स्त्री, न्यूयॉर्क राज्यात वाढली होती. मृत्युसमयी तिचे वय ११३ वर्षे आणि २१४ दिवस, इतके होते !

( ४ ) थोड्या अवधीत जास्तीत जास्त वजन वाढवून दाखविण्याचा विक्रम कॅलिफोर्नियातील आर्थर नॉर या गृहस्थाने केलेला आहे. जुलै १९६० मध्ये तो मेला, त्या वेळी त्याचे वय ४६, आणि वजन ९०० पौंड होते. मृत्यूपूर्वी केवळ सहा महिन्यांमध्ये त्याने आपले वजन सहाशे पौंडांवरून नऊशे पौंडांवर नेले होते !

( ५ ) याउलट कमी वेळात जास्तीत जास्त वजन कमी करून दाखविण्याचा जागतिक उच्चांक जॉर्जिया प्रांतातील कॉब नावाच्या मल्लाने केलेला आहे. १९६५ मध्ये, त्याने आपले वजन ८०२ पौंडांवरून तीन वर्षांत २३२ पौंड

इतके खाली नेले होते ! १९७३ मध्ये पुन्हा त्याचे वजन ६५० पौंड झाले होते !

( ६ ) इलिनॉइस प्रांतातील रॉसडेल याने जगातील २२१ पैकी २१९ देशांत प्रवास करून, सर्वांत जास्त देशांत प्रवास करण्याचा जागतिक उच्चांक प्रस्थापित केला.

( ७ ) गॅरी गॅबेलिक या कॅलिफोर्नियातील धाडशी इसमाने ताशी ६५० मैल असा आपल्या मोटरीचा वेग काही क्षण प्रस्थापित करून जागतिक रेकॉर्ड मोडले.

( ८ ) लॉस एंजेल्सच्या श्रीमती ॲव्हेरी या बार-मेडने चवदा नवऱ्यांशी सोळा घटस्फोट घेतले; आणि ग्लिन दि मॉस वुल्फ या अमेरिकन गृहस्थाने १८ पत्नींबरोबर वीस घटस्फोट घेतले. असे दोघांचेही जागतिक विक्रम रीतसर नमूद झाले आहेत !

( ९ ) वर्नर हिरझेल हा एकटा मनुष्य स्वतःच्या अंगावर एका वेळी ४९ निरनिराळी वाद्ये धारण करून, व सर्वांचा उपयोग करून बँड वाजवितो. १९७४ साली टी. व्ही.वर त्याचे प्रयोग झाले होते.

अशी ही चक्रम विक्रमांची कहाणी आहे !

धाडस आणि मस्तीने रंगलेले, आचरट आणि खुळचट, पराक्रमी किंवा हास्यास्पद, चित्तथरारक आणि अकल्पनीय, असे हे उच्चांकांचे वेड अमेरिकेत आहे. उच्चांकांचेही उच्चांक गाठलेले आहेत, असे म्हणता येईल ! एका झाडावरच जास्तीत जास्त किती तास आपण बसू शकतो, सर्पांच्या सान्निध्यात किती तास सतत राहण्याचा विक्रम होऊ शकतो, आणि मध्ये न थांबता एखादा खासदार जास्तीत जास्त किती तास विक्रमी भाषण अमेरिकन काँग्रेसमध्ये करू शकतो, इथपासून तो ऑलिंपिक स्पर्धांमध्ये विक्रम गाजविणाऱ्या स्त्री-पुरुषांपर्यंत, सारे काही चक्रम विक्रम आणि खरोखरी कौतुकास्पद पराक्रम, अमेरिकन मंडळींच्या सुपीक मेंदूतून जन्म घेत असतात.

**अब्जाधीश हंट बंधूंचे दिवाळे !**

लक्षाधीश व कोट्यधीशांच्या विस्मयकथा अमेरिकेत नेहमीच ऐकायला मिळतात. पण या सर्वांवर ताण करणारी अब्जाधीश हंट बंधूंची चंदेरी

दिवाळखोरी मोठी स्मरणीय म्हटली पाहिजे. चांदी व चांदीच्या वस्तू खरेदी करीत राहणे हा त्यांचा आवडता छंद. चांदीचे भाव वाढत राहिले तरी ती न विकता नुसती खरेदी करणे व ती गहाण ठेवून, कर्जे काढून, इतर धंदे करणे अशी त्यांची सवय. १९८० मध्ये चांदीचे भाव भरमसाट ( तिप्पट झाले ) वाढले, आणि मग पुन्हा खाली कोसळले. पण हंटर बंधूंनी चांदी विकलीच नाही. आणि इतर उद्योग व उपद्व्याप मात्र अफाट कर्जे काढून चालूच ठेवले. चांदीचे भाव कोसळल्यावर ते पूर्णपणे गोत्यात पडले. ७२० कोटी रुपयांची कर्जे त्यांनी काढली होती, हे कोणाला वाचून खरे वाटणार नाही. त्यांनी काढलेल्या कर्जावरील व्याजच रोजचे चाळीस लाख रुपये त्यांना द्यावे लागते आहे ! त्यांचे कापसाचे मळे व कोळशाच्या खाणी इथपासून तो स्वतःच्या गाड्या व सोन्याच्या घड्याळापर्यंत सारे काही गहाण ठेवून किंवा विकून ही कर्जफेड व व्याज भागविण्याची पाळी त्यांच्यावर आली आहे. इतकी ही अकल्पित अशी हंट बंधूंची चांदीची हौस व अजस्र कर्जे, म्हणजे अमेरिकेतील एक अतिश्रीमंती उच्चांकच आहे !

तासन्-तास टी. व्ही.वरची नाटके ( सोप ऑपेरा ) पाहात बसणाऱ्यांना अमेरिकेत ‘ सोपॅहॉलिक ’ म्हणतात. अतिरिक दारू पिऊन स्वतःच्या प्रकृतीची व संसाराची वाताहात करणाऱ्या विक्रमी वीरांना अमेरिकेत ‘ अॅलकॉहॉलिक ’ म्हणतात; अतिशय जुगार खेळणाऱ्यांना ‘ गॅम्बॉहॉलिक ’ आणि धूम्रपान करणाऱ्यांना ‘ स्मोकॅहॉलिक ’ म्हणतात. गंमत अशी की, खूप कष्ट किंवा कामाची आवड असणाऱ्यांना ‘ वर्क्यहॉलिक ’ म्हणतात ! भूतपूर्व प्रेसिडेन्ट कार्टरलासुद्धा एका पत्रपंडिताने ‘ वर्क्यहॉलिक ’ अशी पदवी बहाल करून एक शाब्दिक विक्रम केला आहे !

अमेरिकन कॉंग्रेसमध्ये एखादे नवीन बिल आले, तर ते हाणून पाडण्यासाठी, काही वेळा सभासद न थांबता सतत बोलण्याचा जो विक्रम करून दाखवितात, त्याला ‘ ब्लॉक बस्टर ’ असे म्हणतात, किंवा ‘ मॅरॅथॉन ’ शर्यतीच्या धर्तीवर ‘ टॉकॅथॉन ’– प्रचंड वेळ चालणारी बडबड– असे नाव दिले जाते. जपानी ‘ डॅटसन ’ मोटरगाड्या विकण्यासाठी अमेरिकेत अनेक गमतीचे प्रयोग जपानी मंडळी करीत असतात. ती गाडी नुसती चालवून पाहिल्यावर एक मनगटी घड्याळ फुकट बक्षीस दिले जाते, असाही एक प्रयोग

होता. " सेलॅथॉन " नावाचा बासष्ट तासांचा रात्रंदिवस चालणारा डॅटसन गाडी विक्रीचा विक्रमी प्रयोग या कंपनीने कॅलिफोर्नियात केला होता. रात्रंदिवस केव्हाही, तेथे ६२ तासांत येणाऱ्याने गाडी फक्त चालवून पाहायची आणि डोनट, कॉफी, ड्रिंक्स असा पाहुणचार व मोफत घड्याळ घेऊन जावे, असे हे आमंत्रण होते ! बऱ्याच मंडळींनी अशा भेटी देऊन घड्याळे मिळविली.

खूप मंडळींनी सायकलीवरून दिवसभर गावातून चकरा मारून चांगल्या कामासाठी पैसे गोळा करायचे, या उपक्रमाला सायक्लॅथॉन किंवा बायकॅथॉन म्हणतात; हेच काम रोलरस्केटर वापरून केले तर स्केटॅथॉन म्हणतात, आणि दिवसभर पदयात्रा करून पैसे गोळा करण्याचा खटाटोप व विक्रम खूप मंडळींनी केला, की त्याला वॉकॅथॉन म्हणता येते. कॅनडात वॉकॅथॉनमध्ये भाग घेणाऱ्या भारतीय मंडळींची कहाणी मागील एका प्रकरणात आपण पाहिली आहे.

सुखाचा शोध घेण्यासाठी आणि विक्रम प्रस्थापित करण्यासाठी सरसावलेल्या या मंडळींचे हे विक्रम-पुराण किंवा हे " लिखॅथॉन "— तूर्त आपण येथेच आटोपते घेऊ या !

♣ ♣

६२२
२३५०८...


: ८ :

# अमेरिकेतील हिंदू मंदिरे

मुंबईहून निघून २१ मे १९७७ ला आम्ही दोघे न्यूयॉर्कला पोचलो; आणि चार जूनच्या संकष्टी चतुर्थीला, न्यूयॉर्कच्या फ्लशिंग विभागात उभारलेल्या नव्या हिंदू मंदिरातील महागणपति-मूर्तीच्या प्रतिष्ठापनेला हजर राहण्याचा अलभ्य लाभ आम्हाला मिळाला. सौ. चंपूताई पुण्यातील सारसबाग गणपती (देवदेवेश्वर संस्थान)च्या एक ट्रस्टी आहेत; तेव्हा श्रीगजाननानेच हा योग घडवून आणून, आमच्या प्रवासाची सुरुवात निर्विघ्नपणे करून दिली, असे आम्हाला त्या वेळी वाटले होते.

**न्यूयॉर्कचा विघ्नेश्वर :**

मोदकप्रिय विघ्नेश्वराच्या पूजेसाठी भाविक न्यूयॉर्कवासीयांनी शेकडो नारळ आणि केळी आणली होती, आणि तीन ते पाच जूनपर्यंत तीन दिवस, सुप्रसिद्ध पद्मिनींच्या पूजा-नृत्याच्या पार्श्वभूमीवर, आणि वीणामृदंगाच्या झंकारात, भजनपूजनाचा हा सोहळा, लंबोदर गौरीसुत वक्रतुंडासाठी चालू होता. एकूण

पाच हजार मंडळींनी, तीन दिवसांत हे देवदर्शन घेतले असावे.

कोणत्याही शुभकार्याची सुरुवात आपल्याकडे महागणपतीच्या पूजेने होते. तशीच येथेही मुख्य देवता, व पहिली पूजा विनायकाचीच होती. पण त्याचबरोबर शिव, षण्मुख, महालक्ष्मी आणि व्यंकटेश्वर ( विष्णु ) यांच्याही मूर्तींची येथे ४ जूनला प्रतिष्ठापना झाली. आणि त्यानंतर राम व कृष्ण यांच्या मूर्ती बसविल्या.

हिंदी, कन्नड, मल्याळी, तामीळ, व तेलगू अशी पाच भाषांतून भजने व पूजा चालू होती. चार जुलैला राज-गोपुरासाठी महाकुंभाभिषेक झाला; नवग्रहांचा व पंचदेवतांचा यंत्रविग्रह—प्रतिष्ठाविधीही त्याच दिवशी श्री. पंद्रिमलै स्वामीगल यांच्या हस्ते झाला. अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन दरवर्षी ४ जुलैला साजरा होतो; तेव्हा भारत अमेरिका मैत्रीचे प्रतीक म्हणून, आजपर्यंत कधीही एवढ्या मोठ्या प्रमाणावर अमेरिकेत न झालेला हा महाकुंभाभिषेकही ४ जुलैलाच मुद्दाम साजरा करण्यात आला. त्यानंतरच्या कायम पूजा व अर्चनाच्या व्यवस्थेसाठी स्वामी आत्मानंद यांची नेमणूक करण्यात आली.

न्यूयॉर्कच्या या हिंदू मंदिरामध्ये भजन व धून या निमित्ताने जो आवाज होऊ लागला, त्यावरून शेजारच्या व आजूबाजूच्या अमेरिकन मंडळींनी नापसंती आणि विरोध व्यक्त करून, काही दिवस हिंदी भाविकांना सतावणे, धमक्या देणे, अधिकाऱ्यांकडे तक्रारी करणे, असे उद्योग सुरू केले होते. पण पुढे समझौता होऊन हे प्रकरण मिटले. बर्कली (कॅलिफोर्निया) येथे बांधलेल्या हरेकृष्णपंथीयांच्या मंदिरासंबंधीही अशा तक्रारी काही उपद्व्यापी ( आणि हिंदुद्वेष्टी ? ) शेजाऱ्यांनी केल्या होत्या, पण त्याही बाबतीत नंतर समजोता झाला.

शिखांची गुरुद्वारे यापूर्वीच कॅलिफोर्निया व कॅनडामध्ये, शीख वस्ती भरपूर असलेल्या गावांमध्ये, उभारण्यात आलेली होती. पेनसिल्व्हानिया भागात एका अमेरिकन महिलेने, पंढरपूरसारखी विठ्ठलाची मूर्ती उभारून एक लहानसे विठ्ठल-मंदिरही बांधलेले आहे ! परंतु अनेक देवतांची मोठी हिंदु-मंदिरे बांधण्याची एक प्रकारची लाट नव्याने अमेरिकेमध्ये गेल्या दहा बारा वर्षांतच आलेली आहे.

न्यूयॉर्कच्या नव्या पंचदेवता मंदिराची संस्थापना ' हिंदू टेम्पल सोसायटी

ऑफ नॉर्थ अमेरिका ' या संस्थेतर्फे झाली व त्यासाठी एकूण सात लक्ष डॉलर्स ( ५६ लक्ष रुपये ) खर्च आला. त्यापैकी १६ लक्ष रुपये खर्च तिरुपतितिरुमलै देवस्थानातर्फे करण्यात आला; आंध्रातील १२० कुशल कारागिरांनी दोन वर्षे खपून, आंध्रमधील सुंदर काळ्या दगडांतून खोदून या मंदिराची शिल्पकला उभी केली. ३०० टन वजनाचा या मंदिराचा गाभा व मूर्ती, नंतर बोटीने न्यूयॉर्कला पाठविण्यात आल्या; आणि निवडक तामीळ व आंध्र कारागिरांना विमानाने न्यूयॉर्कला आणून, त्यांच्याकरवी ही अस्सल हिंदू शिल्पाची प्रभा, न्यूयॉर्कच्या क्षितिजावर साकार झाली. या सोसायटीने न्यूयॉर्कच्या स्टेट बँक ऑफ इंडियाकडून २५ लक्ष रुपयांचे कर्ज त्यासाठी मिळविले; आणि प्रत्येकी ५०० ते १००० डॉलर्स देणारे ४०० भारतीय आश्रयदाते मिळविले. आंध्र राज्य अनुदान मंडळानेही मदत केली आहे. गोपुरांसह, थेट दक्षिणी मंदिराची प्रतिकृतीच इथे उभारली गेली आहे. बारन बसू, प्रवीण पटेल, अरविंद गोखले, अशा स्थानिक तंत्रज्ञांच्या कमिटीने बांधकामाची देखरेख केली. देवालयाच्या ट्रस्टी-बोर्डामध्ये अमेरिकन समाजशास्त्रज्ञांचा व पूर्व-संस्कृति-अभ्यासकांचा समावेश आहे.

स्थानिक अमेरिकन समाजापासून विन्मुख होऊन फुटीर वृत्तीने आपले जुने कर्मकांड चालू ठेवण्यासाठी हे मंदिर उभारलेले नाही; येथे वाढणाऱ्या हिंदी मुलांबाळांवरही आपल्या संस्कृतीचे संस्कार घडावेत, आणि पूर्वपश्चिमेचा सुरेख संगम घडवून आणून इथल्या समाजाशी एकरूप व्हावे, अशी ही भूमिका आहे. देवालयाच्या प्रशस्त तळघरामध्ये, तीनशे लोक बसू शकतील असा वातानुकूलित सभामंडप बांधण्यात आला आहे, व तेथे हिंदु-संगीत, नृत्य, नाट्य, व इतर सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात.

या मंदिराचे काम संपवून कारागीर पिट्सबर्गला गेले, व तेथील व्यंकटेश्वर मंदिर त्यांनी उभारून पुरे केले. न्यूयॉर्कचे मंदिर भरवस्तीत लहानशा रस्त्यावर आहे, तर पिट्सबर्गला डोंगरामध्ये आठ एकरांचे सविस्तर आवार व्यंकटेश्वर मंदिराला लाभलेले आहे. गुरुपौर्णिमेला शंकराचार्य तेथे गेले होते, आणि ' शंकराचार्य-पीठम् ' या नावाची धार्मिक-सांस्कृतिक संस्था स्ट्राउडस्बर्गला स्थापण्यात आली आहे. लंडन, न्यूयॉर्क व पिट्सबर्ग अशी तिन्ही देवालये, तिरुपतितिरुमलै देवस्थानच्या मदतीने, हिंदू टेम्पल सोसायटीने उभारली आहेत.

'हिंदू-अमेरिकन-रिलिजस-इन्स्टिटयूशन' (H. A. R. I. किंवा हरी या छोट्या नावाने ती ओळखण्यात येते) या दुसऱ्या एका संस्थेतर्फे पेनसिल्व्हानियातील हॅरिसबर्ग येथे गणपती, राधा-कृष्ण, व सीता-राम यांचे संयुक्त मंदिर उभारण्यात आले आहे. टोरोंटो येथे काही भारतीयांनी एकत्र येऊन एक जुने चर्च विकत घेतले, आणि त्याचे रूपांतर हिंदू देवालयांत केले आहे. सॅन्फ्रॅन्सिस्कोच्या परिसरात ४५ लक्ष रुपये खर्च करून, हिंदू देवालय व सांस्कृतिक केन्द्र उभारण्याचा, तेथील भारतीयांचा संकल्प अद्याप यशस्वी झालेला नाही, पण बर्कली-विभागात जे प्रशस्त हरेकृष्ण मंदिर अमेरिकन हरेकृष्ण पंथीयांनी उभारलेले आहे, ते पुष्कळ लोकप्रिय आहे.

**अमेरिकेतील गोकुळ-वृंदावन :**

गोकुळ-वृंदावनातील गोपालकृष्णाच्या लीला हा कृष्णचरित्रातील एक अद्भुतरम्य कथाभाग आहे. नितान्त रमणीय अशा त्या परम काव्याचा विसर कोणाही कृष्णभक्ताला पडणार नाही; म्हणूनच हरेकृष्ण मंडळी केवळ मंदिरे बांधून थांबलेली नाहीत. बंगालमधील मायापूरप्रमाणे, इतरत्र १२ ठिकाणी त्यांनी नवी वृंदावने बसविली आहेत. वेस्ट व्हर्जिनियातील मॉडसव्हिल गावामध्ये २००० एकरांमध्ये वृंदावन आहे, तेथे गाई पाळून गोसेवा केली जाते. एक प्रकारचे 'धार्मिक कम्यून' असे या उपक्रमाचे वर्णन करता येईल. धोतरे नेसून गाईंच्या धारा काढणारे अमेरिकन गोप, आणि साड्या नेसून, दधिमंथन करणाऱ्या ब्रजगोपिका, या नव्या वृंदावनात हरेकृष्णभजनामध्ये तल्लीन होतात. मिसुरी या अमेरिकन राज्यातही 'गोद्रुम' या नावाचे नवे वृंदावन आहे. या सर्व वृंदावनांमध्ये श्रीकृष्णमंदिरेही अर्थात असतातच.

अमेरिका-कॅनडामधील ३५ हरेकृष्ण-मंदिरे, ५ वृंदावने, व लॉस एंजेल्स येथील मुख्य कार्यालय आणि छापखान्यातून बाहेर पडणारा अनेक भाषांतील प्रचंड श्रीकृष्ण साहित्याचा हा ओघ पाहिला, की त्या मानाने भारतीयांच्या प्रयत्नातून उभारलेल्या मूठभर हिंदू देवालयांचा प्रयत्न तोकडा वाटतो; परंतु मुलाबाळांसह इथल्या पूर्ण भारतीय समाजाला आपल्या संस्कृतीपासून वंचित ठेवू नये, अशा तळमळीतून इथल्या हिंदी मंडळींनीच केलेले प्रयत्न, या दृष्टीने गणपती व इतर पंचदेवतामंदिरांचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे.

ओटावा (कॅनडा) येथील हरेकृष्ण मंदिरात सायंकाळच्या आरतीला आम्ही हजर राहिलो होतो. घंटानाद, धूपारती, कर्पूरारती, चवरी व मोरपिसांनी वारा घालणे, दिवसांतून ६ वेळा भोग देणे व षोडषोपचारी पूजा, टेप केलेली पण अस्सल भारतीय संस्कृतातली आरती व स्तोत्रे, असा सर्व थाट पाहायला मिळाला. भारतीय पुजाऱ्याऱ्याच धूतवस्त्राप्रमाणे पवित्र वस्त्र नेसून कॅनेडिअन भक्त ते सर्व करीत होते; आपण कोणत्या देशात आहोत, त्याचा आम्हाला संभ्रम पडला !

आरतीच्या शेवटी पाहिलेले, ओटावा येथील हरेकृष्णमंदिरातले एक हृदयंगम दृश्य तर मी कधीच विसरणार नाही ! हरेकृष्ण-दांपत्ये स्वतःच्या मुलांबाळांवर लहानपणापासून कसे संस्कार करतात, त्याची एक निशाणी आम्हांला पाहायला मिळाली. कृष्णभक्त झालेल्या त्या कॅनेडियन गृहिणीचे नवे नाव होते विशाखादेवी दासी; साधी साडीचोळी, कपाळावर चंदनाचे गंध लावलेले, अशी जणू ती एक साधीभोळी व्रजगोपिका दिसत होती; तिच्याबरोबर तीन वर्षांची तिची मुलगी होती तिचे नाव होते "मित्रवृंदा" ! आरतीच्या शेवटी अनेक नावांतून श्रीकृष्णाचा, गुरूंचा व त्या परंपरेचा जयजयकार चालू होता, तेव्हा या दोघींनी मूर्तीपुढे जमिनीवर गुडघे व डोके टेकलेले होते. प्रत्येक नाव कॅनेडियन पुजाऱ्याने ( रामप्रसाद दास ) उच्चारले, की दोघीजणी लगेच म्हणत होत्या, "की जय !" "की जय !" नतमस्तक होऊन आईबरोबर, श्रीकृष्णाचा जयजयकार करणारी, तीन वर्षांची ती कोमल बालिका 'मित्रवृंदा' मी कधीच विसरू शकणार नाही, आणि नतमस्तक होऊन मग मलाही म्हणावेसे वाटते की, 'मधुसूदना श्रीकृष्णा ! तुझी लीला अगाध आहे !'

असा मी त्या वेळी भारावून गेलो खरा; पण ओटावा येथे स्थायिक झालेल्या माझ्या मावसभावाने मला तेथे नेले होते, तो काही भारावलेला नव्हता. अमेरिका-कॅनडात स्थायिक झालेल्या निदान पन्नास टक्के भारतीयांना, या हरेकृष्णपंथाबद्दल फारशी आत्मीयता वाटत नाही. काही जणांना तर असे वाटते की, हा एक चक्रमपणा आहे; फॅड आहे. वाट चुकलेले फॅनॅटिक अमेरिकन लोक, अनेक विचित्र मार्गाकडे वळतात, त्यातलाच हा एक प्रकार आहे, असे त्यांना वाटते. याउलट उरलेले भारतीय, थोड्याफार आत्मीयतेने हरे-कृष्णीयांच्या उत्सवात व समारंभांत भाग घेतात, आणि निदान आनंदाने

भारतातून आलेल्या वयस्कर मंडळींना तेथे घेऊन जातात. पण लहान मुलाबाळांचा या पंथाकडे फारसा संपर्कच येत नाही.

**आध्यात्मिक डिसनेलँड ? :**

वेस्ट व्हर्जिनिया प्रांतात दोन हजार एकरांमध्ये जे नवे वृंदावन व टोलेजंग मंदिर उभारण्यात आलेले आहे, ते प्रवाशांसाठीसुद्धा एक उच्च प्रकारचे आकर्षण होऊ शकेल.

१९८० साली तेथे साठ हरेकृष्णीय शिष्यांनी स्वतः खपून एक अद्भुत सुवर्णमंदिर बांधून पुरे केलेले आहे. मोरपिसाप्रमाणे हिरवा रंग असलेल्या या कृष्णमंदिरासाठी त्रेसष्ट टन संगमरवरी दगड आयात करण्यात आला; तीन टन कोरलेले सागवानाचे लाकूड भारतातून मागविण्यात आले; सोने, व तांबे हजारो चौरस फुटांच्या नक्षीकामात बसविले आहे, बेचाळीस प्रचंड झुंबरे, रंगीत काच इत्यादी सर्व सामान जे वापरले, त्याचीच किंमत चाळीस लाख रुपये झाली आहे. १९७३ साली या राजशाही कृष्णमंदिराचे काम सुरू झाले. मुख्य मंदिराचे काम १९८० मध्ये पूर्ण झाल्यावर जन्माष्टमीला जेव्हा उद्घाटन झाले, तेव्हा साठ शिष्यांनी उभारलेले हे विलक्षण भव्य सुंदर असे कृष्णायतन पाहून, तेथे जमलेल्या पंधरा हजार मंडळींच्या डोळयांचे पारणे फिटले. प्रभुपादस्वामी भक्तिवेदान्त यांची समाधीही तेथे बांधण्यात आली आहे. रेझीनपासून बनविलेली, व लेखनकार्यात मग्न असलेली अशी जी त्यांची प्रतिकृती तेथे एका खोलीत बसविलेली आहे ती इतकी हुबेहुब व इतकी आकर्षक आहे की, जिवन्त स्वामीजींकडेच आपण पाहात आहोत, असे कोणालाही वाटते.

१९८१ मध्ये तेथे एक शाकाहारी प्रशस्त उपाहारगृह बांधण्यात आले. १९८२ मध्ये दहा एकरांचा एक मनोहर बगीचा पुरा होईल. एकूण तेथे सात मंदिरे बाधण्यात येतील; व एक प्रकारची ‘ आध्यात्मिक डिसनेलँड ’च तेथे पुढेमागे प्रस्थापित होईल. हजारो प्रवाशांना आकर्षणारे, परंतु तरीही शुद्ध रसाळ कृष्णभक्तीने गुंग करणारे ते एक पवित्र तीर्थक्षेत्र होईल, असे हरेकृष्णीयांना वाटते. भारतातही अशी कृष्णमंदिरे, वृंदावने व इतर उपक्रम पसरत आहेत. कर्जत ( जिल्हा रायगड ) पासून सहा मैलांवर नसरापूर

गावात शंभर एकर जमीन त्यांनी घेतली असून, सर्वांगीण ग्रामविकासाचे काम हरेकृष्णीयांनी सुरू केलेले आहे; तो उत्साह व कृष्णप्रेम खरोखरी कौतुकास्पद आहे, व एकदा पाहण्यासारखे आहे.

♣ ♣

: ९ :

# अनेक गुरू व नाना पंथ

भारतातील हरेकृष्ण पंथ अमेरिकेत १९६७ नंतर लोकप्रिय झाला, व अनेक श्रीकृष्णमंदिरे अमेरिकन मंडळींनी उभारली आहेत हे आपण पाहिले; पण एका जपानी पंथाचा प्रचार व प्रभाव अमेरिकेत गेली ३४ वर्षे कशा सहजतेने यशस्वी झाला आहे ते पाहण्यासारखे आहे.

निचिरेन शोशू या जपानी पंथाच्या अमेरिकेत आज १३५ शाखा आहेत, आणि दोन लक्ष सभासद आहेत. तेराव्या शतकातील कर्मठ जपानी निचिरेन याने या पंथाची स्थापना जपानमध्ये केली. दुसऱ्या महायुद्धात जपानचा लष्करी पराभव झाला खरा, पण या महायुद्धानंतर अमेरिकेत निचिरेन शोशूच्या पंथाचा प्रसार सुरू झाला, तो दिग्विजय अजूनही टिकून आहे. कॅलिफोर्निया-तील सान्ता मोनिका येथे त्या पंथाचे मुख्य कार्यालय आहे, आणि मुख्य मंदिरही आहे.

पद्मसूत्र हा एकच पवित्र ग्रंथ ते मानतात, व त्यातील अध्यायांचे जपानी पठण रोज करतात. बुद्धांची नावे असलेली पेटी ( गोहोनझोन ) पवित्र मानणे,

तिची पूजा करणे, आणि “ नाम म्योहो, रेंगे क्यो ” हा दाईमोकू ( म्हणजे मंत्र ) दिवसभरात जितका वेळ जरूर पडेल त्याप्रमाणे पुटपुटणे, असे हे कडक कर्मकाण्ड असते. ती पूजा आणि तो मंत्र चालू ठेवला, की विश्वशक्तीशी तुम्ही एकरूप होऊ शकता, आणि भौतिक व आध्यात्मिक अशा तुमच्या सर्व गरजा भागविल्या जातात, अशी या पंथाची शिकवण आहे. हजारो अमेरिकन शिष्य तो मंत्र पुटपुटताना आढळून येतात, असे नाथानिअल लांदे या लेखकाने म्हटले आहे.

पण हा जपानी पंथ आणि दाईमोकू मंत्र, म्हणजे अमेरिकेतील नाना पंथांच्या इंद्रधनुष्यांतील केवळ एक लहानशी छटा आहे. कोरियन, सुफी, बौद्ध, तिबेटी, इजिप्शियन, चिनी, भारतीय, अशा नानाविध देशांतील व धर्मांतील शेकडो गुरू आणि पंथ, यांच्या शिकवणीची लज्जतदार खिचडी मनसोक्त चाखावी तर ती अमेरिकेतच! केवळ भारतीय गुरूच अमेरिकेत जाऊन तिथल्या मेंढरांना अध्यात्म शिकवू लागले आहेत, व शिकवतील, अशा भ्रमात आपण राहू नये; इतकेच नव्हे तर अमेरिकन गुरू भारतात येऊन आता अध्यात्माचे धडे आपल्याला देऊ लागले आहेत !

कोरियात जाऊन तेथे अमेरिकन मंडळी लढाई खेळून आली; आणि आता तिथल्या एका गुरूने अमेरिकेत खूप शिष्य व शिष्यिणी मिळविल्या आहेत. रेव्हरंड सन मुंग मून हे या गुरूचे नाव. मून याने १९५४ साली कोरियामध्ये ‘ युनिफिकेशन चर्च ’ची स्थापना केली. ते येशू ख्रिस्ताला मानतात, व त्याचेच कार्य पुढे चालू ठेवण्याला मी आलो आहे असे सांगतात. विश्वबंधुत्वाचा ते दावा करतात, परंतु कम्युनिस्टांचा ते कट्टर विरोध करतात. आणि अमेरिका हा ईश्वराचा खास आवडता असा देश आहे, असे त्यांचे म्हणणे आहे ! जगभर २० लक्ष मंडळी त्यांच्या पंथात सामील झालेली आहेत; त्यांतले २० हजार शिष्य अमेरिकेतले आहेत. त्यांच्या संस्थेचे अमेरिकेतले बजेटच दहा कोटी रुपयांचे आहे. न्यूयॉर्कमधील हडसन नदीच्या तीरावर एका बादशाही टोलेजंग एस्टेटमध्ये रेव्ह. मून थाटात राहतो; तथापि तो दारू व सिगारेटला स्पर्शही करत नाही; त्याचप्रमाणे त्याचे बहुतेक शिष्य व शिष्यिणी दारू-सिगारेट न घेता, ब्रह्मचर्य पाळून, कर्मठपणाने व हिरिरीने मूनच्या पंथाचा प्रचार करतात. मूनच्या शिष्यांना मूनी म्हणतात. काही

पालकांना मुलगा किंवा मुलगी हरेकृष्ण पंथात किंवा मून पंथात गेलेले आवडत नाही; आणि कायदेशीर किंवा बेकायदेशीर मार्गाने या मुलांमुलींना पळवून घरी आणून परावृत्त करण्याचा खटाटोप ते करतात. परंतु सुप्रीम कोर्टाने १९७७ साली निर्णय देऊन सांगितले आहे की, हरेकृष्ण, मुनी किंवा कोणत्याही धार्मिक व आध्यात्मिक पंथात सामील होण्याचा, वयात आलेल्या अमेरिकन व्यक्तीला कायदेशीर हक्क आहे, आणि तो हक्क कोणालाही हिरावून घेता येणार नाही.

**सायकोबॅबल आणि सायकोसेरॅमिक्स :**

'गुरू' आणि 'पंडित' हे शब्द आता अमेरिका–इंग्लंडमध्ये इतके रुळले आहेत की, त्या शब्दांचे इंग्रजीकरण झाले असून अमेरिकन डिक्शनरी-मध्येही ते शब्द सापडतात. असे हे गुरू आपल्या शिष्यांचे 'ब्रेनवॉशिंग' करून स्वतःचे महत्त्व आणि प्रतिष्ठा वाढवितात, असा आरोप किंवा अशी टिंगल, अमेरिकन विचारवंत काही वेळा करीत असतात. या गुरूंची एकेक मासलेवाईक शिकवण व तंत्र म्हणजे नुसती 'सायकोबॅबल' आहे, किंवा प्रतिष्ठित पण अर्थशून्य बडबड आहे, असे हे टीकाकार म्हणतात. काही विनोदी टीकाकारांनी 'सायकोसेरॅमिक्स' हा शब्द शोधून काढलेला आहे. ही शिष्यमंडळी 'क्रॅकपॉट' असतात, किंवा कच्ची मडकी असतात; आणि त्यांच्यासाठी 'सायकोसेरॅमिक्स'चे मानसशास्त्र वापरून त्यांचे ब्रेनवॉशिंग केले जाते, असे टीकाकार म्हणतात !

तथापि या अनेक पंथांचा व गुरूंचा पसारा इतका जबरदस्त व चिरकाल टिकणारा असा आज दिसतो आहे की, या वावटळीसमोर टीकाकार वाळलेल्या पानाप्रमाणे भुरुभुरू नुसते उडून जात आहेत, असे वाटते. पंथांच्या लोकप्रियतेत भरती–ओहोटी आहे, पण एकंदरीत खऱ्या व खोट्या योगाची, अध्यात्माची व परिवर्तनाची आज तेथे खूप चलती आहे, यात शंका नाही. एक गंमतीदार उदाहरण म्हणजे 'योग टेनिस'. 'योग टेनिस' किंवा 'इनर टेनिस' यांची लोकप्रियता आणि नियमित वर्ग टी. व्ही.-वरूनही दिसून येतात. त्यासंबंधी भारतात फारसे प्रयत्न झालेले नाहीत. परंतु भारतीय टी. व्ही.प्रमाणे अमेरिकन टी. व्ही.वर 'लिलियन' या योग-

शिक्षिकेचे व रिचर्ड हिटलमन या शिक्षकाचे योगासने व प्राणायामाचे धडे नेहमी आम्ही तेथे असताना पाहात होतो; सुप्रसिद्ध सत्पुरुष श्री. जे. कृष्णमूर्ती यांचे व्याख्यान व मुलाखत, आणि महर्षी महेश योगी यांच्या टी. एम. (भावातीत ध्यान) संबंधी कार्यक्रमही टी. व्ही.वर पाहिले. मुक्तानंद, मेहेर-बाबा, परमहंस योगानंद, रमणमहर्षी, महेश योगी, अरविंद, शिवानंद, विवेकानन्द–रामकृष्ण, सत्य साईबाबा, बालयोगी, रजनीश, अशा सुप्रसिद्ध भारतीयांचा शिष्यवर्ग व केन्द्रे अनेक ठिकाणी अमेरिकेत आहेत, पण आपणाला पुरेशी माहिती नसलेल्या व अमेरिकेत–कॅनडातच खूप वर्षे राहिलेल्या मंडळींची ही पुढील यादी जरा पाहण्यासारखी आहे :

(१) केरळ प्रांतातले विष्णुदेवानंद; हे स्वतःचे विमान चालवून शांततापत्रके विमानातून टाकणारे म्हणून प्रसिद्ध झालेले आहेत. पाकिस्तान, सुएझ कालवा, व बेलफास्ट (आयर्लंड) येथे त्यांनी शांततापत्रके विमानातून टाकून, संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मॉंट्रीअलजवळ ६० एकरांचा त्यांचा मुख्य आश्रम आहे. पण बहामामधील पॅराडाईज आयलंड, व कॅलिफोर्नियातील ग्रास व्हॅली येथे त्यांचे नवे आश्रम निघाले आहेत. मुंबईच्या टी. व्ही.ने त्यांची मुलाखत घेतली होती.

(२) कुंडलिनी योग शिकविणारे व शीख धर्माचा प्रचार करणारे योगी भजन, यांची 'हेल्दी, हॅपी, होली' संघटना, 'थ्री-एच' या नावाने ओळखली जाते. त्यांचे दोन लक्ष शिष्य असून, हजारो लोकांना त्यांनी व्यसनांतून मुक्त केले आहे, असे सांगण्यात येते.

(३) बंगालचे चिन्मय घोष हे १९६४ साली अमेरिकेत आले. तत्पूर्वी २० वर्षे त्यांनी भारतीय आश्रमात साधना केली होती. प्रामुख्याने भक्ति-योगावर त्यांचा भर आहे. निवडक असे फक्त पाचशे शिष्य चाळीस परदेशीय केन्द्रांतून त्यांनी निवडलेले आहेत. ते न्यूयॉर्कला राहतात, आणि युनायटेड नेशन्स संघटनेमध्येही ते वर्ग घेतात. एके काळचा जगजेता मुष्टियोद्धा महंमदअली हा त्यांना मानतो.

(४) शक्तिपात दीक्षा देणारे योगी अमृत देसाई यांचा कृपाळू योगाश्रम, सनी टाउन, पेन्सिल्व्हानिया येथे आहे.

(५) स्वामी राम यांचे हिमालयन इन्स्टिटयूट ऑफ योग, सायन्स, अँड

फिलॉसॉफी ( इलिनॉइस ).

( ६ ) योगी रामय्या यांचा बाबाजी क्रिया योग संगम आश्रम ( कॅलिफोर्निया ).

( ७ ) सच्चिदानंद यांचे इंटिग्रल योग इन्स्टिटयूट ( कनेटिकट ).

( ८ ) आनंदमार्गाचे प्रमुख आनंदमूर्तीजी हे पूर्वी हिंसाचाराच्या आरोपावरून तुरुंगात होते, ते आता मुक्त झालेले आहेत; परंतु अमेरिकेत त्यांची व त्यांच्या मार्गाची जी प्रतिमा दिसून येते, ती फार वेगळी आहे. ते व त्यांचे दहा सहकारी आचार्य मिळून, अमेरिकेत १०० व कॅनडात १० केन्द्रे चालवितात. योगासने, प्राणायाम, ध्यान असे सर्व शिक्षण विनामूल्य दिले जाते; आणि गरिबांसाठी काही ना काही सेवाकार्य चालू ठेवणे अनिवार्य असते, असा या मार्गाचा दंडक आहे.

( ९ ) बालयोगी महाराजजी ( हृषीकेशचे ) यांच्याबद्दल आपल्या देशात तितकेसे चांगले मत नाही. डेनव्हर, कोलोरॅडो येथे त्यांचा ' डिव्हाइन लाइट मिशन ' आश्रम आहे; व २०० इतर केन्द्रे आहेत. त्यांचा कॉलेज-विद्यार्थ्यांत जास्त प्रचार असतो. विमाने, मोठे आश्रम असा त्यांचा मोठा पसारा आहे, आणि त्यांचे कार्य तिकडे व्यवस्थित चालू असते. केवळ संख्येमध्ये मोजायचे झाल्यास महेश योगी यांचे अनुयायी बरेच, म्हणजे १५ लाखांपेक्षा अधिक आहेत; याचे मुख्य कारण म्हणजे डॉक्टर्स व शास्त्रज्ञ यांचे भरपूर सहकार्य, व संशोधनाची जोड मिळाल्याने, विज्ञानावर अधिष्ठित अशी त्यांची ' भावातीत ध्यानपद्धती ' ( टी. एम्., किंवा ट्रॅन्सेंडेंटल मेडिटेशन ) लोकप्रिय झालेली आहे; आणि सहा हजारांहून अधिक असे प्रशिक्षित अमेरिकन व कॅनेडिअन ध्यानशिक्षक त्यांचे कार्य चालवीत असतात; तणावातून मुक्ती झाल्याने शरीरप्रकृती सुधारणे व मनःशांती मिळणे असे शेकडो मंडळींचे अनुभव वैज्ञानिक प्रबंधांतून प्रसिद्ध झालेले आहेत. ' महर्षी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ ' आयोवा येथे स्थापन झालेले आहे. त्यातून दरवर्षी शेकडो ग्रॅज्युएट आपापल्या विषयाबरोबर, ध्यानाभ्यासातही पारंगत होऊन, बाहेर पडत असतात. या विद्यापीठातील विद्यार्थी व्यसनमुक्त असतात, व शिस्त चांगली पाळून उत्तम विद्या संपादन करतात.

गणेशपुरीचे स्वामी मुक्तानंद यांचे दोन लाख शिष्य व शिष्यिणी अमेरिकेत

आहेत, असे सांगण्यात येते. मुक्तानंदांनी एक अभिनव असा हर्षवर्धक उपक्रम १९८० साली अमेरिकेत हाती घेतला. फेब्रुआरीत वॉशिंग्टनला, आणि जुलै ८० मध्ये, न्यूयॉर्कच्या उत्तरेकडील त्यांच्या फॉल्सबर्ग येथील आश्रमामध्ये, त्यांनी सामुदायिक विवाहसमारंभ पार पाडले. मुक्तानंदांच्या प्रमुख शिष्यिणींमध्ये मार्शा मेझन ही नटी आहे. नील सायमन या नाटककाराशी तिचा विवाह झालेला आहे. मार्शा म्हणते की, स्वामी मुक्तानंदजी लग्ने लावून देतात ते विवाह खूप टिकतात. त्या विवाहांत खूप आनंद असतो; असा हा अनुभव आल्याने, जुलैतील सामुदायिक विवाहसमारंभात पंचेचाळीस दांपत्ये सामील झालेली होती !

**मेलेल्याला जिवंत केले :**

सत्यसाईबाबांच्या एका शिष्याला तर मृत्यूनंतर पुन्हा जिवंत करण्याचा अत्यंत विलक्षण अनुभव बाबांनी दिला. कॅलिफोर्नियातील वॉल्टर व एल्सी कोवन या दांपत्याच्या स्वप्नामध्ये, अनेक रात्रींमध्ये त्यांना प्रथम बाबा दिसले. मग अवचितपणे एक दिवस त्यांचा भारतातील पत्ता व नाव त्यांना मिळाले, व कर्नाटकातील पुट्टापुर्ती या आश्रमाला त्यांनी भेट दिली; नंतर खूप आजारी पडून मद्रासच्या हॉस्पिटलात वॉल्टरचे निधन झाले; पण त्यातून त्यांना सत्यसाईबाबांनी जिवंत केले, अशी प्रत्यक्ष घटना वॉल्टरने लिहून ठेवली आहे !

असे हे चमत्कार एकंदरीने थोडेच असतात. पण एवढे मात्र खरे की, व्यसने, तणाव, कलह, दुःखे, अस्वस्थता, आणि व्यथा कमी होण्यासाठी हरेकृष्णांपासून विपश्यनेपर्यंत, आणि टी. एम्.पासून नित्यानंदांपर्यंत अनेक ध्यानपंथांचा व पद्धतींचा निश्चित उपयोगच अमेरिकेत झालेला आहे. आणि म्हणूनच या ध्यानपंथांचा प्रभाव तेथे कमी होणे शक्य नाही; आर्डिस व्हिटमन या लेखिकेने अमेरिकेतील अनेक प्रचलित ध्यानपंथांचा व अनुभवांचा अभ्यास करून "मेडिटेशन, जर्नी टु दि सेल्फ" (सायमन अँड शूस्टर, १९७६, न्यूयॉर्क) हे एक सुरेख पुस्तक लिहिले आहे. ती म्हणते की, रोगमुक्ती आणि रोगप्रतिबंधनासाठी, आणि निद्रानाश, ब्लड-प्रेशर, डोकेदुखी, अशा सायकोसोमॅटिक तक्रारींवर हमखास उपाय म्हणून, अधिकाधिक मंडळी आता अंतर्मुख होऊन अनेक प्रकारचे ध्यानाभ्यास उत्साहाने व सातत्याने

करू लागली आहे; व यापुढेही हा वेग वाढणारच आहे. परंतु एवढ्याने हे संपत नाही; ही नुसती सुरुवात असते. स्वतःचा स्वतःच डॉक्टर होणे यातून पुढे स्वतःची नीट ओळख पटणे; आणि माणसाचे हळूहळू पण संपूर्ण परिवर्तन होणे, अशी ही नव्या क्रांतीची लाट पश्चिमेत आता आलेली आहे. व्यक्तीव्यक्तींमध्ये प्रथम असे हे अंतरंगाचे परिवर्तन होणे, आणि त्यातून मग संस्थांचे, समाजाचे परिवर्तन होऊ लागणे अशी ही नवनिर्मितीची प्रसादचिन्हे आहेत. प्रथम माणूस बदलला पाहिजे, अशी ही श्रद्धा आहे.

श्री. हार्वे कॉक्स हे हारवर्ड येथील नामांकित विद्यापीठामध्ये डिव्हिनिटी विषयाचे प्राध्यापक आहेत. 'टर्निंग ईस्ट' (पूर्वेकडचे वळण) या नावाचे सुंदर पुस्तक १९७७ साली त्यांनी प्रसिद्ध केले आहे. (सायमन अँड शूस्टर, न्यूयॉर्क). पूर्वेबद्दल त्यांचे पूर्वग्रह काही चांगले नव्हते. या पूर्वेच्या तथाकथित अध्यात्माची कसून तपासणी करावी, हे गौडबंगाल उघडकीला आणावे, अशा इन्स्पेक्टरच्या भूमिकेतून त्यांनी या अभ्यासाची सुरुवात केली; पण ते म्हणतात की, "या तीर्थयात्रेच्या शेवटी मला पूर्वेने जिंकले; मी पूर्वी नव्हतो इतका श्रद्धाळू ख्रिश्चन झालो; माझ्यातली एक पोकळीच जणू भरून निघाली, आणि त्यामुळे माझे आंतरिक जीवन समृद्ध झाले असे मला वाटते."

पश्चिमेतली माणसे पूर्वेकडे का वळतात, त्याचे व्यासंगपूर्ण पण हृदयाला भिडणारे असे विवेचन त्यांनी केले असून, पुढील सहा कारणांस्तव माणसे पूर्वेकडे वळतात, असे त्यांनी निक्षून सांगितले आहे. (१) साधीभोळी माणुसकीची मैत्री काही जणांना या पंथातून मिळत असते; हरेकृष्णपंथात सामील झालेल्या काही मंडळींनी असे उद्गार काढलेले आहेत. अमेरिकन लोकसंख्येत ज्यू मंडळीचे प्रमाण ३ टक्केच आहे, पण हरेकृष्णपंथामध्ये, व रमणमहर्षींच्या अमेरिकेतील आश्रमामध्ये ज्यू मंडळींचे प्रमाण बरेच अधिक आहे. काही ज्यू मंडळींनी वरील कारण दिलेले आहे. (२) "चर्चमधून पाद्रीलोक ईश्वरासंबंधी जी सर्मन्स (प्रवचने) देतात ती आम्हाला नुसती शाब्दिक व कंटाळवाणी वाटतात; याउलट अंतरंगाची प्रत्यक्ष अनुभूती, मनःशांतीचा स्वतःचा शोध, असे काही तरी वेगळेच अद्‌भुत सत्य आम्हाला पूर्वेच्या पंथातून व शिकवणीतून मिळू लागते." असे मत काही जणांनी व्यक्त केले आहे. (३) काही वेळा गुरू अधिकारवाणीने स्पष्ट उत्तरे देतो; त्यामुळे मनाचा

गोंधळ कमी होतो, असे काहींना वाटते. ( ४ ) सत्ता, पैसा, आणि संघर्ष या पश्चिमेतल्या देवता आहेत. पण निसर्गाशी समरस होऊन, पवित्र, शुद्ध अंतः-करणाने, मनाची खरी सुखशांती मिळविण्याची किमया, पूर्वेच्या ध्यानपंथातून सापडते. ( ५ ) काही महिलांना असे वाटते की, पश्चिमेतल्या पंथातून पुरुष गुरूंचे व देवांचेच प्राबल्य आहे; पण हिंदू परंपरेत स्त्री-देवतांनाही खूप महत्त्व आहे. ( ६ ) पश्चिमेत पशुपक्षी, वनसंपत्ती, नद्या यांबद्दल आदराची भावना नाही; अति यांत्रिकतेने निसर्गाचा समतोल बिघडू लागला आहे; पण पूर्वेत अद्याप साधीभोळी राहणी व निसर्गप्रेम, जीवनाशी निगडित झाल्यासारखे वाटते. शाकाहारी बरेच आहेत, प्राणिहिंसा कमी आहे, जीवनात कृत्रिमता फार वाढलेली नाही, असे काहींना पूर्वेचे आकर्षण वाटते.

कोलॅरॅडोमधील डेन्व्हर येथील आश्रमामधील आपले अनुभव हार्वे कॉक्स यांना अत्यंत संस्मरणीय वाटले. तिबेटी गुरू चोग्यम ट्रुंगपा रिंपोचे यांनी नरोपा इन्स्टिटयूट डेन्व्हरला स्थापन केली आहे; सहजसुंदर अशा तिबेटी ध्यान-विद्येचे जे धडे तिथे दिले जातात, ते अमेरिकन मंडळीत फार लोकप्रिय झालेले आहेत. हार्वे कॉक्स म्हणतात, " आपल्या श्वासोच्छ्वासाकडे—खरं म्हणजे उच्छ्वासाकडे—लक्ष देत स्वस्थ बसणे, विचार-प्रवाहांकडे जणू काही नुसते दुरून पाहणे, असा हा ध्यानाभ्यास होता. पहिल्याच तासामध्ये काही तरी अंतरंगात वेगळे घडून येत आहे, असे मला वाटू लागले. ध्यानात विचारचक्र थोडे मंदावले, आणि ध्यानानंतर कसे स्वच्छ, प्रशान्त, वाटू लागले. थोड्याच दिवसांत या ध्यानाची मला गोडी लागली; ध्यानामुळे माझ्या मनांतील तत्परता व कार्यशक्ती वाढली, आणि गोंधळ कमी झाला; ख्रिश्चन धर्माशीही हा ध्याना-भ्यास सुसंगतच आहे; ' सब्बाटिकल ' घेण्यासारखे, हे रोजचे शांत बसणे, अत्यंत उपयुक्त आहे. ट्रुंगपा गुरू हा अमेरिकन जीवनातील धावपळ आणि अकारण घाई, भरगच्च कार्यक्रम आणि तुडुंब ओढाताण, यावर टीका करून, मनःशांतीचे व स्वस्थतेचे हे सुंदर ध्यान-शिक्षण लोकप्रिय करीत आहे, याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत."

तथापि काक्स हा एक धोक्याची सूचना देतो. ' करून करून भागले, आणि आता अध्यात्माकडे वळले ' असे आपल्याकडे म्हणतात; त्याप्रमाणे प्रचंड पैसा, खूप चैनी, अफाट लष्कर असे सारे काही अमेरिकन मंडळींनी

मिळविले; आणि आता त्यांना अध्यात्मातील सुखे व उच्चांकही काबीज करून मोठेपणा मिळवायचा आहे, अशी वृत्ती असल्यावर काही उपयोग नाही, असे तो म्हणतो; अहंकार आणि मीपणा नाहींसा होऊन खरेखुरे निरपेक्ष प्रेम, परित्याग, करुणा, क्षमा, शांती जेथे निर्माण होऊ शकते, तेथेच खरे अध्यात्म सापडते, व त्यानेच समाजाचे परिवर्तन होऊ लागेल, असे त्याने बजावले आहे.

**अध्यात्मातले अमेरिकन प्रयोग :**

सुखाच्या शोधासाठी ज्या ईर्षेने अमेरिकन मनुष्य अविरत झपाटून जातो, तशाच जिद्दीने आध्यात्मिक क्षेत्रातले त्याचे प्रयोग आणि प्रकल्प असे काही विस्तार पावू लागतात, की बघतच राहावे !

आर्थर ॲश या टेनिसपटूने १९७५ साली विंबलडन स्पर्धेत अत्युच्च यश मिळविले, याचे एक कारण म्हणजे तो ध्यानाभ्यासी होता; मन शांत करायला शिकला होता, असे मत ' इनर टेनिस ' या पुस्तकाचे लेखक व टेनिसपटू टिमथी गॅलवे यांनी व्यक्त केले आहे. " खेळापूर्वी किंवा दोन सेटच्यामध्ये, ॲश डोळे बंद करून शांतपणे थोडा वेळ ध्यान करताना टी. व्ही.वर स्पष्टपणे दिसत होता. ध्यानातून येणारा धिमेपणा, शांती, आत्मविश्वास, आणि मुक्त शरीराचा सहजसुंदर टेनिसचा खेळ, त्यामुळे ॲश ते यश मिळवू शकला," असे टिमथीने म्हटले आहे.

भूतपूर्व प्रेसिडेन्ट कार्टरची बहीण सौ. रुथ स्टेपलटन, ही ध्यानस्पर्शातून रोग बरे करण्यामध्ये प्रवीण आहे. " दि गिफ्ट ऑफ इनर हीलिंग " हे तिचे पुस्तक फार गाजलेले आहे. नितान्त, निरपेक्ष अशा अमर्याद प्रेमाने तुमचे अंतःकरण जेव्हा भरते, आणि दुसऱ्याचे दुखणे हे आपलेच आहे, असे जेव्हा वाटू लागते, तेव्हाच दुसऱ्याची व्यथा तुम्ही बऱ्या करू शकता, असा तिचा मध्यवर्ती सिद्धान्त आहे. अशा अथांग प्रेमाने पुलकित होण्याचा स्वतःचा अभ्यास जसजसा वाढू लागला, तसतसे अनेकांना मानसिक व शारीरिक व्यथेतून मुक्त करण्याचे प्राविण्य तिला मिळू लागले; अशा रीतीने बऱ्या केलेल्या अनेक रुग्णांचे अनुभव तिने आपल्या पुस्तकांत दिले आहेत; आणि प्रत्येकाच्या अंतरंगात ही दिव्य शक्ती आहे; ध्यानाभ्यासातून ही शक्ती जाग्रत होऊ शकते, व त्यामुळे स्वतःची प्रकृती सुधारून इतरांच्याही जीवनात आपण आनंद

निर्माण करू शकता, असे रूथ म्हणते. चार मुलांची आई असलेल्या या महिलेने संसारात उशिरा या अभ्यासाला सुरुवात केली, आणि अपूर्व यश मिळविले. ही विद्या हस्तगत केलेली अनेक मंडळी अमेरिकेत आहेत. न्यूयॉर्कचे मानसशास्त्रज्ञ लॉरेन्स ल शॅन, हे तर या विद्येमध्ये पारंगत होण्याचे वर्गही चालवितात; आणि १५० विद्यार्थ्यांना त्यांनी थोड्याबहुत प्रमाणांत ही शक्ती मिळवून देण्यात मदत केली आहे.

**भारतात आलेले अमेरिकन गुरू !**

अमेरिकन गुरूंनी भारतात येऊन अध्यात्माचे धडे आपल्याला देण्याला सुरुवात करावी, असा एक नवा जमाना आता सुरू झालेला आहे ! यात " नामुष्की, लाजिरवाणे " असे अर्थात काहीही नाही. ही अशी देवाण-घेवाण अहरिहार्य आहे. ' एस्ट ' हा असा एक पंथ आहे.

तसं पाहिलं तर ' एस्ट ' पंथाचा गुरू वेर्नर एरहार्ड याने जे. कृष्णमूर्ती, मुक्तानंद, स्वामी रामदास अशा गुरूंचा, योगनिद्रा, झेन बुद्धिझम, व हिंदू तत्त्वज्ञान यांतील शिकवणीचा आणि सायंटॉलॉजी, माइंड डायनामिक्स, सुबुद, गेस्टाल्टथेरपी अशा पश्चिमेतील पंथांचा जवळून अभ्यास दहा वर्षे केला आणि मग ' एस्ट ' या पंथाची स्थापना केली असे म्हणता येईल. पूर्वी त्याचे बेबंद आयुष्य होते, आणि स्वतःच्या पत्नीपासून दूर राहून, वेगळेच नाव घेऊन तो राहात असे. नंतर उपरती होऊन तो व पत्नी आता पुन्हा एकत्र राहतात. एके दिवशी कॅलिफोर्नियात स्वतःची गाडी चालवीत असताना, एकाएकी त्याला आत्मबोधाचा अनुभव प्राप्त झाला, आणि तेव्हापासून त्याच्या आयुष्याला विलक्षण कलाटणी मिळाली; एक अपूर्व परिवर्तन घडून आले, असे एरहार्ड म्हणतो.

प्रत्येकी अडीचशे डॉलर्स ( अलीकडे तीनशे डॉलर्स ) भरून अंदाजे दीड लक्ष अमेरिकन स्त्री-पुरुषांनी हा शिक्षणक्रम पुरा केलेला आहे, यावरून त्याची लोकप्रियता लक्षात यावी. भारतामध्ये तीनशे रुपये भरून अनेक मुंबईकरांनी हा कोर्स पुरा केला आहे. भारतातील कोर्सचे उत्पन्न भारतातच ते खर्च करतात. येत्या वीस वर्षांत जागतिक उपासमार बंद करायची, असे एक उद्दिष्ट या संस्थेने मानलेले आहे, व त्यासाठी सर्व शिष्यगण तत्परतेने काम करतात.

त्याचे एक प्रतीक म्हणून १४ नोव्हेंबरला सर्वजण दिवसभर उपास करतात, व पैसे जमवून गरीब देशांना पाठवितात. ' एस्ट 'चे जसे चाहते आहेत, तसेच अर्थात टीकाकारही आहेत. एस्टची पद्धत म्हणजे ' कॅटल-थेरॅपी ' म्हणजे गुरांना हाकण्यासारखी पद्धत आहे; आणि त्यातून एक प्रकारे ' अहंकार ' वाढायलाच मदत होते, असे हे अमेरिकन टीकाकार म्हणतात !

## बुलंद पंथांचा फेरफटका :

अमेरिकेतील असे हे एकेक बुलंद गुरू आणि भरभक्कम पंथ, यांचा मजेदार फेरफटका करू म्हटले, तर तो न संपणारा आहे. तेव्हा गंमत म्हणून, आणखी काही नावे व किस्से थोडक्यात सांगून, ही साठा उत्तरांची आध्यात्मिक अमेरिकेची कहाणी आपण पुरी करूया.

( १ ) इलेक्ट्रॉनिक योग : मेंदूतून निघणाऱ्या अल्फा लहरींचा संबंध मनःशांतीशी आहे, असे मेंदूशास्त्रज्ञांनी प्रसिद्ध केल्यापासून, अल्फा लहरी मोजणाऱ्या व मतःशांती देणाऱ्या लहानमोठ्या यंत्रांचा अमेरिकेत गेली काही वर्षे सुळसुळाट झाला आहे. ' बायोफीडबॅक ' या विद्वन्मान्य तंत्राचे अनेकांगी संशोधन चालू आहे; पण बाजारातली बहुतेक यंत्रे विश्वासार्ह नाहीत, व तूर्त ती वापरू नयेत, असे आवाहन मेनिंजर फाउंडेशनचे डॉ. एलमर ग्रीन व इतर शास्त्रज्ञांनी केले आहे.

( २ ) झटपट अध्यात्म : ' डायल-ए-मेडिटेशन ' या नावाने, अमेरिकेत काही शहरांतून, टेलिफोन डिरेक्टरीत नंबर दिलेले असतात. त्या नंबरावर फोन केला की ध्यानाचे धडे फोनवरून चार ते सहा मिनिटे मिळण्याची व्यवस्था केलेली असते; तो धडा ऐकून तुम्ही अभ्यास करायचा, आणि दर आठवड्याला नवीन धडा घ्यायचा. कॉरेस्पॉडेन्स कोर्स असतात, तसेच हे ' फोन-अध्यात्म ' म्हणता येईल.

( ३ ) ट्रॅन्झॅक्शनल ॲनॅलिसिस : माणूस प्रगल्भ झाला की तो आहे त्या परिस्थितीचा व माणसांचा स्वीकार करू लागतो, असे हे तत्त्वज्ञान थोडक्यात आहे. ' आय् ॲम् ओ. के.', ' यूआर् ओ. के.', किंवा ' मी ठीक आहे, तूही ठीक आहेस ' असे प्रगल्भ माणूस म्हणू लागतो.

( ४ ) ' ओम् ' चळवळ : लॉस एंजेलसची योगशिक्षिका लिन टेलर ही

हवाई बेटातील एका निद्रिस्त ज्वालामुखीच्या टोकात उतरली होती, व तेथे आतल्या बाजूला ध्यानस्थ बसल्यावर तिला पृथ्वीचा शब्द असा ओंकारनाद ऐकू आला, असे ती म्हणते. ती ओंकाराचा प्रचार करते.

(५) बहाई पंथ : इराणमध्ये स्थापन झालेल्या या पंथाचे पन्नास हजार सभासद अमेरिकेत असून, शिकागो येथे मुख्य कार्यालय आहे.

(६) पिरॅमिड पॉवर : सहा फूट उंचीचे लोखंडी पिरॅमिड आकाराचे मनोरे कॅलिफोर्नियात, प्रत्येकी ९० डॉलर्सना मिळतात. ध्यानक्रिया, रोगमुक्ती, आणि उत्साहवर्धनासाठी पिरॅमिडच्या शक्तीचा उपयोग करणारा हा पंथ आहे, व काही शास्त्रज्ञही त्यात सामील झाले आहेत ! बंगलोर व पुणे येथेही आता पिरॅमिड उभारून लोकांना मनःशान्ती देण्यात येते !

(७) अजपा–ब्रेथ–फाउंडेशन : कॅनडात मॉन्ट्रियल येथे आहे. श्वासावर लक्ष ठेवून अजपाजप कसा करावा, ते प्रामुख्याने शिकविले जाते.

(८) आय ॲम आश्रम : कॅनडात ओटावा येथे आहे; तो माता आत्मानंदांनी सुरू केला असून, प्रेम, नम्रता, सहकार्य, योगासने, साधेपणा, शाकाहार, यांवर त्यांचा भर आहे.

(९) न्यू जर्सी येथे अमेरिकन वेगन सोसायटी तर्फे 'अहिंसा' हे मासिक चालविले जाते. सर्व हिंसाचाराचा, मांसाहाराचा, व प्राण्यांवरील निर्दयतेचा निषेध केला जातो, व शाकाहाराचा प्रसार केला जातो.

(१०) हनुमान फाउंडेशन : हार्वर्ड येथील प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. रिचर्ड आल्पर्ट यांनी एल्. एस. डी. या मादक द्रव्याचे प्रयोग व प्रचार केल्यावर त्यांना हार्वर्ड विद्यापीठातून काढून टाकण्यात आले. पुढे भारतात येऊन, मादक द्रव्यांऐवजी योग व ध्यानमार्गातून आंतरिक नव्या अनुभूतींचा पाठपुरवा त्यांनी केला, व अनेक आश्रमांतून अनेक प्रयोग स्वतःवर केले. मुक्तानंदांचे विष्णुसहस्रनाम त्यांनी तंबोऱ्यावर न्यूयॉर्कमध्ये प्रथम जेव्हा ऐकले तेव्हा त्यांच्या अश्रुधारा सुरू झाल्या, व मुक्तानंदांकडून त्यांनी पहिली दीक्षा घेतली. १९६७ व १९७० अशी दोनदा त्यांनी भारताला भेट दिली. हिमालयातील एका छोट्या हनुमानाच्या देवळातील 'नीम करोली बाबा' हे त्यांचे प्रमुख गुरू; कारण या गुरूंचे अनेक चमत्कार व अनोखे मार्गदर्शन यांचे त्यांनी आपल्या रसाळ लेखणीने पण अमेरिकन फटकळपणाने वर्णन

केलेले आहे. १९७४ मध्ये आमावॉक (न्यूयॉर्क) येथे त्यांनी आध्यात्मिक साधनेची सर्वांगीण शिकवण देऊन प्रचार व प्रसार करण्यासाठी हनुमान फाउंडेशन स्थापिली; आणि मेक्सिकन सरहद्दीवर एक लामा फाउंडेशनही स्थापिले. 'बी हिअर नाऊ', 'दि ओनली डान्स देअर ईज', 'ग्रिस्ट फॉर दि मिल' आणि 'दि गेम ऑफ अवेकनिंग' अशी फार वेगळ्या धर्तीची, आकर्षक भाषेतली पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.

(११) 'लिव्हिंग लव्ह' आश्रम, व कॉर्नुकोपिया इन्स्टिट्यूट : सेंट मेरी, (केंटकी) येथे आहे. अन्न, वस्त्र, निवारा, अशा प्राथमिक गरजा सोडल्यास इतर सर्व इच्छा, वासना, आणि गरजा व महत्त्वाकांक्षा, म्हणजे केवळ खुळी व्यसनेच आहेत; त्यांचा आनंदाने त्याग करून, सर्वांशी निरपेक्ष प्रेमाने, निर्व्याज, निष्पाप आपुलकीने व सहानुभूतीने कसे वागावे याचे पद्धतशीर शिक्षण केन कीज हा संचालक देत असतो; हजारो स्त्री-पुरुषांनी हे शिक्षणक्रम घेतले असून, त्यामुळे त्यांचे जीवन निश्चितपणे अधिक सुखी, प्रेमळ, व आनंदमय झालेले आहे, असे तो म्हणतो. 'हँडबुक टु हायर कॉन्शसनेस' (दि सायन्स ऑफ हॅपिनेस) या त्याच्या पुस्तकाच्या चार लक्ष प्रती खपल्या आहेत! बुद्ध, पतञ्जली, खिस्त यांच्या थोर शिकवणीचा जसा त्याला उपयोग झाला, त्याचप्रमाणे कृष्णमूर्ती, पीर विलायत खान, चोग्यम ट्रुंगपा, चार्लस बर्नर, जॉन लिली, व ॲब्रॅहॅम मॅस्लो अशा आधुनिक पंडित व सत्पुरुषांपासूनही त्याने स्फूर्ती मिळविली, व हा पंथ सुरू केला, असे तो म्हणतो.

केन कीज याची ही शिकवण पुष्कळशी उघड, साधी, स्वच्छ, सोपी अशी वाटते; व अशा पंथातून 'गुरुबाजी'ला फारसा वाव मिळण्याची शक्यता वाटत नाही. पण अमेरिकेतील अस्सल गुरुबाजीचे एक बेंड कसे फुटले, आणि ते थोतांड कसे जबरदस्त होते, ते 'सायंटॉलॉजी'च्या गाजलेल्या प्रकरणांतून छान दिसून येते.

नाना पंथांची लोकप्रियता, व अनेक जबरदस्त गुरूंचे तडाखेबंद प्राबल्य पाहून, असे जर कोणाला वाटू लागले असेल की, अमेरिका देशच आता भोगवाद सोडून अध्यात्मवादी होऊ लागला आहे, तर तो निष्कर्ष खचितच चुकीचा ठरेल, यात शंका नाही.

"ज्या वस्तूंची आपल्याला खरोखरच गरज नाही, अशा वस्तूंची

आपल्याला आयुष्यात सारखी कमतरताच वाटत असते ! ” असे एक सुंदर वचन, ‘ एस्ट ’ पंथाचा प्रणेता एरहार्ड याने एकदा व्यक्त केले होते.

अशा या गरजेच्या व निरर्थक वस्तू व इच्छा, सतत अधिकाधिक मिळविण्याचा व भोगण्याचा हव्यास आणि पकड, अमेरिकन जनमानसावर अद्यापही कायम आहे. कधीही यापूर्वी नव्हती अशी सुबत्ता, आणि चांगल्या–वाईट, सर्वच गोष्टींची यथेच्छ रेलचेल असूनही तो हव्यास कमी झालेला नाही. अध्यात्मपंथांच्या झाडून साऱ्या एकूण अनुयायांची मोजदाद केली तरी लोकसंख्येच्या १ टक्कासुद्धा ती भरणार नाही, असे वाटते. जाहिरातदार, कारखानदार, बागायतदार व लष्करशहा यांची सोनेरी मगरमिठी, हीच अमेरिकेची खरी अस्मिता आजही आहे.

आणि आपल्याकडे तरी काय अवस्था आहे ? सौदेबाजी, गुंडगिरी, निरक्षरता, हलाखी, वेठबिगारी, हरिजनांवरील व स्त्रियांवरील अत्याचार, दारिद्र्य, गावठी-दारुबाजी, पक्षकलह, भ्रष्टाचार, जातीयता, चित्रपटशाही, विषमता, अस्वस्थता, सारे काही आहे; आणि इकडे अरविंदाश्रमात दोन तट पडले आहेत; शंकराचार्य कोण असावेत यावर कोर्ट-कचेरी चालू आहे; गलेलठ्ठ पगारदार संपावर जाऊन, साऱ्या समाजाला जेरीस आणतात ! खरे अध्यात्म भारतातही फार दुर्मिळ झाले आहे !

♣ ♣

: १० :

# गम्मतशाही आणि हिंसाकांड

अमेरिकन अध्यात्मातील खऱ्या व खोट्या गुरुबाजीचा फेरफटका आपण पुरा केला. पण अमेरिकेतल्या अस्सल गुरुबाजीचे खरेखुरे दर्शन आपल्याला घ्यायचे असेल तर अध्यात्माचे सुंदरकांड सोडून,- आपल्याला माफियाचे हिंसाकांड, रंगीत टी. व्ही.चे कोट्यवधी रुपयांचे चित्रकांड, मर्तिक कंपन्यांचे दफनकांड, आणि कुत्र्या-मांजरांचे प्रस्थकांड, अशा अद्‌भुत सिंदबाद सृष्टीचा बेछूट फेरफटका पुरा केला पाहिजे; आणि तिकडे आपण आता वळणार आहोत. या कांडदर्शनातून असे काही एकेक प्रकांड 'गुरू' आपल्याला भेटतील की, साऱ्या जगातील गुरू त्यांच्यावरून ओवाळून टाकावेत !

**टिपी बोक्याची राजशाही कहाणी :**

ॲम्सबरी गावामध्ये ७६ साली 'टिपी' नावाचा बोका मेला, तेव्हा मोठी खळबळ उडाली; कारण आपल्यामागे, वर्षाला सात हजार डॉलर्स

( म्हणजे छप्पन्न हजार रुपये ) उत्पन्न देणारी गडगंज एस्टेट ठेवून तो बोका परलोकवासी झाला होता ! होय, मांजराचीच ती संपत्ती होती, माणसाची नव्हे ! अमेरिकेतच असे काही घडणे शक्य आहे.

त्याचं असं झालं की, कुमारी वेबस्टर नावाच्या श्रीमंत म्हाताऱ्या बाईकडे चार कुत्री व चार मांजरे होती. घरात दुसरे कोणीही नाही. तेव्हा कुत्री–मांजरी म्हणजे जीव की प्राण, अशी तिची त्यांच्यावर माया होती. आणि त्यातूनही ' टिपी ' बोका सर्वांत लाडका होता. तेव्हा आपल्या मागे आपली सर्व संपत्ती टिपी बोक्याला मिळावी, टिपी बोक्यानंतर इतरांना मिळावी, असे मृत्युपत्र करून कुमारी वेबस्टर स्वर्गवासी झाली !

अमेरिकेतील कुत्र्या-मांजरांची मिजास व श्रीमंती किती वर्णावी ? अनेक अद्ययावत कारखान्यांतून, त्यांच्यासाठी भरगच्च सकस आहार निर्माण करण्याची चढाओढ चालू असते. मांस, मासे, सोयाबीन, चिकन अशा सर्व पौष्टिक वस्तूंचा अंतर्भाव केल्यावर, या व्हिटॅमिनयुक्त खाद्याचा तडाखेबंद प्रचार टी. व्ही. वर अहमहमिकेने चालू असतो.

परंतु शिकागोतील आमचे मित्र श्री. डलेस म्हणाले, ' शी शी ! असले निकृष्ट बाजारी अन्न मी माझ्या लाडक्या कुत्र्याला देत नाही. मी रोज त्याला अंडी व बेकन देतो; रात्री आइसक्रीम खाऊन तो झोपतो. अधूनमधून मी त्याला कॉडलिव्हर ऑइल व व्हिटॅमिनच्या गोळ्याही देतो. कारण व्हिटॅमिन कमी न पडलेले बरे !!

' कॅट फॅन्सी ' नावाचे मांजरांसाठीच चालविलेले मासिक आहे, त्यामध्ये आहाराचे व इतर मार्गदर्शन येतेच, पण ' कॅटस्ट्रॉलॉजी ' हा एक मांजराचे भविष्य सांगणारा विभागही या मासिकात कोणी तरी होराभूषण नियमितपणे चालवीत असतात. समजा, तुमच्या मनी मांजरीची मीन रास आहे, आणि तिला साडेसाती लवकरच सुरू होणार असेल; तर वेळीच सावध होऊन तिला मासे ( मीन ) देणे बंद करणे, किंवा इतर खबरदारी घेणे योग्य ठरणार नाही का ?

धन्य ती कॅटस्ट्रॉलॉजी, आणि धन्य ते पौष्टिक खाद्य !

आणि तरीही उलटी गंमत अशी आहे की, अमेरिकन कुत्र्या-मांजरांना त्यांचे मालक व मालकिणी नेहमी जरुरीपेक्षा जास्त अन्न खायला घालतात;

त्यामुळे ते प्राणी वाजवीपेक्षा अवास्तव अधिक लठ्ठ होतात, व त्यामुळे लवकर मरतात. असा शास्त्रशुद्ध निष्कर्ष, अमेरिकन पशुवैद्यकांच्या पाहणीतून व संशोधनातून वेळोवेळी निष्पन्न झालेला आहे !

आणि मग मृत्यूनंतर या लाडक्या प्राण्यांना, त्यांच्यासाठी खास राखून ठेवलेल्या स्मशानभूमीत पुरण्यात येते. त्याचा खर्च ८५ डॉलर्स ( ७०० रुपये ) येतो. पण अर्थात कुमारी वेबस्टरच्या टिपी बोक्याचा दफनखर्च यापेक्षा किती तरी जास्त झाला पाहिजे. कारण तो असातसा साधा बोका थोडाच होता ? त्याच्या इतमामाप्रमाणेच त्याचा दफनविधी रुबाबात झाला असला पाहिजे ! अतिविशाल मनाच्या त्या कुमारी वेबस्टरला, आणि श्वानांची व बोक्यांची मासिक भविष्ये वाचणाऱ्या शेकडो अमेरिकन येडबंबूंना आपण हात जोडून कोपरापासून नमस्कार करू या !

**बोकेशाही झिंदाबाद :**

गेल्या दहा वर्षांत ( १९७१ ते १९८१ ) तर मांजरांची लोकप्रियता अमेरिकेत वाढून अशी काही शिगेला पोचली आहे की, आता चार घरांपैकी एका घरात मांजर असतेच; काही घरांतून २–४ मांजरेही असतात. गेल्या दहा वर्षांत ५५ टक्के वाढ झाल्याने आता ( १९८१ मध्ये ) अमेरिकेत साडेतीन कोटी मांजरे आहेत ! मांजरावरील पुस्तके, उपकरणे व मांजरांचे खाद्य, या सर्व धंद्यांना उत्तम बरकत आलेली आहे. १९८० मध्ये मांजरांची चारशे प्रदर्शने भरली होती ! " मेलेल्या मांजरांचे १०१ उपयोग " या नावाच्या पुस्तकाच्या लक्षावधी प्रती खपल्या आहेत; कॅलिफोर्नियात मांजरांची खास दुकाने आहेत, तेथे मांजरे भाड्याने मिळतात, बोक्यांना योग्य मांजरिणी–वधू शोधून दिल्या जातात, आणि दुःखी मांजरावर मानसोपचारसुद्धा करण्यात येतात ! मांजरांची विष्ठा नीट ठिकाणी व्हावी, म्हणून २॥ ते ३५ डॉलर्सची भांडी मिळतात; पण त्याऐवजी मांजरांनी बाथरूममध्ये जाऊनच शौचविधी उरकावा, असे त्यांना शिकविणारे ' किटी व्हिज ' नावाचे उपकरण आता पंधरा डॉलर्सना ( सव्वाशे रुपये ) बाजारात मिळू लागले आहे; तर मांजराला शांत झोप मिळावी म्हणून ३६ डॉलर्सना त्याच्यासाठी वॉटरबेड ( मऊ पलंग ) मिळते.

८० टक्के मांजरे स्वस्त आणि मिश्रकुळीची असतात. पण पर्शियन, अबिसिनिअन, सयामीज, अशी अस्सल पेडिग्री मांजरे घ्यायची झाली, तर एका मांजराला ३०० ते ५०० डॉलर्स पडतात ( २॥ हजार ते ४ हजार रुपये ). मांजरांची नावेही गंमतीदार असतात. नानकी–पो, ट्विगी, डिक डेड-आय, पिगपेन, अनास्तेशिया, व्हॉयोलेता, डॉन अलहाम्ब्रा, मॅड लडविग अशी अनेक लाडकी नावे असतात ! उत्तम कुळीची मांजरे वाढविणे आणि विकणे हाच अनेकांचा मोठा फायदेशीर धंदा झाला आहे. ‘ पुढल्या जन्मी मला अमेरिकेत मांजराच्या जन्माला घाल,’ असे एखाद्या वाचकाला वाटते आहे का ?

**मृत्यूचा व्यापार :**

मांजरा–बोक्यांना सद्गती मिळावी, म्हणून इतका खटाटोप अमेरिकेत होतो; मग तिथल्या माणसांच्या दफनविधीचे काय सांगावे, महाराज ?

‘ अंत्यविधी ’ म्हणजे अमेरिकेतील एक मोठा बिझिनेस आहे. काहीजण म्हणतात की मर्तिक कंपन्यांचे ते एक ‘ रॅकेट ’ आहे, व त्यावर अनेक कंपन्या गबर झाल्या आहेत. कंपन्या म्हणतात की, आम्ही समाजाची सेवा करीत आहोत, दुःखितांना शान्ती-समाधान मिळवून देत आहोत, त्यासाठी सारे काही व्यवस्थितपणे, सोईने काम करीत आहोत.

अंत्यविधीचे शिक्षण देणारी महाविद्यालये अमेरिकेत आहेत. त्या विषयाची नियतकालिकेही आहेत. त्यांचे परिसंवाद, अंत्यविधी बोर्डाच्या परीक्षा, सल्लागार-मंडळाच्या निवडणुका, भांडणे, आरोप व प्रत्यारोप असे सारे काही व्यवस्थितपणे चालू असते !

प्रेत पुरण्यासाठी आठ फूट × तीन फूट अशी जागा राखून ठेवायची, म्हणजे १५०० ते ३५०० डॉलर्स ( बारा हजार ते अठ्ठावीस हजार रुपये ) खर्च येतो.

सेमेटरीजसाठी वीस लक्ष एकर जागा आतापर्यंत अमेरिकेत व्यापलेली आहे; जागांच्या किंमती नेहमी वाढतच असतात, म्हणून कित्येक वर्षे अगोदरच, कबरस्तानातील जागा राखून ठेवण्याचा प्रघात त्या देशात आहे.

केवळ पाचशे लोकवस्ती असलेल्या ‘ अॅबॉय ’ खेड्यात मी दोन दिवस राहायला गेलो होतो; तिथला आमचा स्नेही, बड लॅन्स हा प्रगत शेतकरी

म्हणाला की, एवढ्याशा त्याच्या खेडेगावातसुद्धा कबरस्तानातली जागा, आणि अंत्यविधी मिळून दीड हजार डॉलर्स खर्च करावा लागतो ! अंत्यविधीचे प्रस्थ कंपन्यांनी सर्वत्र माजवलेले आहे.

काही श्रीमंत मंडळी आपल्या नातेवाइकांकडे जिवंतपणी फारसे लक्ष देत नाहीत; आणि नातेवाईक मेल्यावर मात्र त्यांच्या अंत्यविधीवर भरमसाट खर्च करून जणू काही भरपाई करीत असतात. संपूर्ण तांब्याची शवपेटी, तिला आतून रेशमाची अस्तरे, उत्कृष्ट कबर, अशा श्रीमंती थाटात तो नातेवाईक मृत्यूनंतर आरामात विश्रांती घेत असतो ! अंत्यविधी कंपन्यांनाही महागडे गिऱ्हाईक मिळाल्याचा आनंद होतो. कित्येक वेळा, जरूर नसताना, आणि न विचारता, प्रेताला सुगंधी मेणाचा व औषधींचा खास शृंगार करून त्याचे बिल वारसदारांना पाठवतात. प्रेत पुरण्यासाठी खड्डा खणायचा, तो यंत्राने पाच-दहा मिनिटांत खणतात, पण खणण्याचे बिल ५० ते १०० डॉलर्स लावले जाते. शिवाय दरवर्षीच्या देखभालीचे बिलही वारसदार देतात.

‘ अंत्यविधी-नफेखोरी-विरोधक मंडळे ’ अमेरिकेत काही वर्षे, ग्राहकांनी स्थापिलेली असून त्यांची ओरड अधूनमधून चालत असते. जेसिका मिटफोर्ड या विदुषीने लिहिलेले ‘ अमेरिकन वे ऑफ डेथ ’ हे पुस्तकही चांगले गाजलेले आहे, आणि कंपन्यांच्या नफेशाहीविरुद्ध तिने खूप कोरडे ओढलेले आहेत. तिचा नवराही ‘ फ्यूनरल बोर्ड ’विरुद्ध ‘ ग्राहक-शक्ती ’ जागरूक करण्यात खूप वर्षे गुंतलेला आहे. परंतु मृत्यू-कंपन्यांची मगरमिठी समाजावर अशी पक्की आहे की अंत्यविधीची प्रतिष्ठा व टोलेजंग खर्च कमी होण्याची फारशी लक्षणे तिकडे दिसत नाहीत. नाही म्हणायला, प्रेते पुरण्याऐवजी ती जाळण्याची प्रथा थोडीशी रूढ व्हायला सुरुवात झाली आहे. अमेरिकन शास्त्रज्ञांच्या मते, जाळणे हे अधिक स्वच्छ व हितकारक आहे, आणि त्यामुळे जमीन व खर्चही वाचतो. पण अमेरिकेत पाच टक्के प्रेते जाळतात, तर जपानमध्ये ७५ टक्के प्रेते जाळतात. अमेरिकेतील ‘ आधुनिक, सुशिक्षित, बंडखोर ’ नागरिकही अद्यापि या बाबतीत स्वस्थ आहे, किंवा मूग गिळून आहे, असे दिसते.

कॅलिफोर्नियात काही भागांतून अलीकडे स्वस्त दहनविधीचा प्रसार झपाट्याने वाढू लागला आहे. जॉन गॉर्डन नावाच्या गृहस्थाला आपल्या

पत्नीच्या दफनासाठी कर्ज काढावे लागले; त्याचे हप्ते तो पाच वर्षे फेडत होता. त्याला कंटाळून, व इतरांचा त्रास वाचावा म्हणून त्याने १९७३ साली 'नेपच्यून सोसायटी' नावाची संस्था सॅनफ्रॅन्सिस्कोमध्ये स्थापन केली. दफन करण्याऐवजी दहन करावे, तेसुद्धा अगदी स्वस्तात व्हावे, असा प्रचार व अशा सोयी करण्यात या संस्थेने पुढाकार घेतला. आज या संस्थेचे एक लाख सभासद आहेत. फक्त वीस डॉलर्समध्ये दहनविधी होतो, व इच्छेनुसार रक्षाविसर्जन केले जाते.

तथापि अशा संस्था अपवादात्मकच आहेत, आणि सर्वत्र त्यांचा फैलाव झालेला नाही. मृत्यूपूर्वी खूप वर्षे अगोदरपासून चांगला प्लॉट राखून ठेवणे यात व्यवहार व प्रतिष्ठा दोन्ही साधतात, असे एकंदरीत जनमत आहे. विद्यार्थी शाळेत जात असतो, तेव्हापासूनच एखादा प्लॉट त्याच्या नावावर (दफनासाठी) घेऊन ठेवावा, अशी 'ओंगळ' पण 'व्यावहारिक' सूचना पालकांना करण्यापर्यंतही दफन-कंपन्यांची मजल जाते, ती या प्रतिष्ठेमुळेच !

मुलाच्या आयुष्याचा विमा घ्यावा, असे आपल्याकडे विमा-एजंट सांगतात; पण त्याच्या दफनासाठी प्लॉट घ्यावा असे सांगण्याची पाळी आपल्या देशातील एजंटांवर येणार नाही, याची खात्री वाटते ! मृत्यूनंतर रडण्यासाठी खोटी भाडोत्री माणसे आणणे, आणि बाराव्या दिवशी मोठे गावजेवण घालणे, अशा विचित्र किंवा खर्चिक रूढी आपल्याही देशात काही जमातींतून अद्याप नाहीशा झालेल्या नाहीत; व त्या रूढी नष्ट करणे हे सोपे काम नाही; आपला देश अडाणी म्हणून रूढींचे प्राबल्य राहणारच, अशी आपली समजूत असते. पण सुधारलेल्या अमेरिकेतही दफनप्रतिष्ठेची रूढी जनमनाच्या मानगुटीवर कशी भुताप्रमाणे बसली आहे, ती पाहून खरोखर अचंबा वाटतो !

म्हणूनच वीस डॉलर्समध्ये दहनक्रिया करणाऱ्या 'नेपच्यून सोसायटी'चे उपक्रम कौतुकास्पद समजले पाहिजेत. अमेरिकेत इतर गावांतून जिथे दहन-क्रियेची सोय आहे, तिथेसुद्धा वीस डॉलर्स, इतक्या कमी खर्चात दफनक्रिया होत असतील, असे वाटत नाही.

दुसरे असे की, अमेरिकेतील हॉस्पिटल्स आणि डॉक्टरी उपचार यांचे खर्चही बेसुमार वाढलेले आहेत. इंग्लंडप्रमाणे राष्ट्रीय आरोग्य योजना तिथे नाही; त्याऐवजी खाजगी कंपन्यांच्या आरोग्य-विमा योजना तिथे आहेत;

गरीब किंवा वृद्ध यांच्यासाठी सरकारी योजनाही आहेत. सर्वसामान्य आजार, प्रसूती, मुलांचे आरोग्य व संगोपन, इत्यादी खर्च सुलभतेने या योजनांतून होऊ शकतो. परंतु मोठा आजार व अपघात, दीर्घकाळ टिकणारी दुखणी आणि दंत-वैद्यांची बिले, इतकी प्रचंड होतात की, मध्यमवर्गीयांना त्यांचा जबर फटका बसतो. अनेक वेळा सारी बचत संपून फस्त होते, व कर्जे काढावी लागतात. भारतातून काही महिन्यांसाठी जी मंडळी प्रवासी म्हणून तेथे जातात, त्यांनाही दुखणी व अपघात झाल्यास, हॉस्पिटल व डॉक्टर्सची बिले भरताना डोळे पांढरे होतात ! कार्टर, केनेडी, लाँग असे पुढारी नवी बिले काँग्रेसमध्ये मांडू इच्छित होते; पूर्वीचे कायदे व पद्धती अशाच चालू राहिल्या, तर आजाऱ्यांची पैशाची समस्या तीव्र होणार आहे; त्याचप्रमाणे सरकारी खर्चेही वाढतील, व अधिक करही सर्वांवर बसवावे लागतील, अशी भीती सर्वांना वाटते. पण १९८० सालापर्यंत तरी सर्वमान्य असा तोडगा किंवा असा नवा कायदा दृष्टिपथात आलेला नव्हता; प्रयत्न चालू आहेत.

अमेरिकेत चाळीस वर्षे संसार केलेल्या एका भारतीय सद्‌गृहस्थांची अशी इच्छा होती की, आयुष्याच्या अखेरीला आपण हिंदुस्थानात जावे, आणि आपल्या मातृभूमीतच आपल्याला मरण यावे. म्हणजे केवळ अंतकाळची महागडी दुखणी व महागडा अंत्यविधी टाळावा, एवढाच व्यावहारिक दृष्टिकोण त्यात नव्हता; तर मातृभूमीची ओढ आणि प्रेम, हे त्यातले प्रमुख कारण होते.

परंतु डॉक्टरी सल्ल्यानुसार अखेरीस हिंदुस्थानात त्यांना येता आले नाही; आणि आयुष्यातील अखेरचे दिवस त्यांना अमेरिकेतच काढावे लागले. दुर्दैवाने त्यांचे दुखणे लांबून अतोनात खर्च झाला; आणि मृत्यूनंतर दहनक्रिया केली, तरीसुद्धा एक हजार डॉलर्स खर्च आला. जिवाभावाचे नातेवाईक व भारतातली मित्रमंडळी यांची भेट अर्थात होऊ शकलीच नाही; पण अमेरिकेतल्या अंत्य-विधीसाठीसुद्धा फार लोक हजर राहू शकले नाहीत; कारण "मर्तिकासाठी ऑफिसमधून सुट्टी घेणे" हे तेथे आपल्याइतके सोपे नाही ! अमेरिकन लंकेतल्या सोन्याच्या विटांनी शृंगारलेला असा हा चमत्कारिक अंतकाल त्या हिंदी गृहस्थाला मनापासून नको होता; पण दैवाचे खेळ हे असेच असतात !

दरम्यान 'मर्तिक कंपन्यां'चा धंदा अगदी तेजीत आहे. ५४० कोटी डॉलर्सची (किंवा ४३२० कोटी रुपयांची) वार्षिक उलाढाल या धंद्यात

चालू आहे. ‘ नेपच्यून सोसायटी ’सारख्या कमी खर्चाच्या संस्था दोनचार गावांत निघतीलही, पण त्यामुळे इतरांची या धंद्यातली बरकत कमी होईल, असे दिसत नाही. कारण शेकडो कंपन्यांनी गुंतविलेले भांडवल, हजारो-लाखो लोकांनी घेऊन ठेवलेले प्लॉट असे हे बस्तान गुंडाळायला खूप काळ लोटेल. अमेरिकेतील मृत्यूचा व्यापार व मृत्यूची श्रीमंती कित्येक वर्षे अशीच झळकत राहील, अशी या कंपन्यांची श्रद्धा आहे, व असाच त्यांचा आडाखा आहे.

**बंदुकांची श्रीमंती :**

मरणाची श्रीमंती, किंवा कुत्र्यामांजरांची श्रीमंती, याहून अधिक अद्भुत, चित्तथरारक आणि भयानक अशी बंदुकांची व पिस्तुलांची श्रीमंती आज अमेरिकेत बहराला आलेली आहे !

अमेरिकेत मोकाट सुटलेल्या या बंदुकधाऱ्यांनी प्रेसिडेन्ट केनेडी, त्याचा भाऊ रॉबर्ट केनेडी, व मान्यवर नीग्रो पुढारी मार्टिन ल्यूथर किंग यांचे खून केले ! अगदी अलीकडे, मार्च १९८१ मध्ये, एका २५ वर्षांच्या तरुणाने, प्रेसिडेन्ट रेगन व त्यांचे सहकारी यांच्यावर गोळीबार करून, जगभर वृत्तपत्रांमध्ये धमाल उडवून दिली !

अमेरिकेत दर २४ मिनिटाला एक खून होत असतो. दर दहा सेकंदाला कोठे तरी घरफोडी होते, आणि दर सात मिनिटांमध्ये एक बलात्कार होत असतो, असे भयानक आकडे प्रसिद्ध झालेले आहेत !

तेवीस कोटी लोकसंख्येच्या अमेरिकेत आज पंधरा कोटी बंदुका (हँडगन) व पिस्तुले घराघरांतून पसरलेली आहेत; म्हणजे प्रत्येक घरी रेफ्रिजरेटर, टी. व्ही., मोटर व वॉशिंग मशिन असते, तशीच एक बंदुक व एखादे पिस्तुलही सरासरीने असते, असे म्हणता येईल !

या पुस्तकातले हे प्रकरण आपण वाचून पुरे कराल, तेवढ्या अवधीत पंच्याहत्तर नव्या बंदुका व पिस्तुले अमेरिकन कारखान्यांतून तयार होतील व विकली जातील !

दरवर्षी अमेरिकेत २३५०० माणसे या बंदुकांमुळे मरतात ( ११००० खून, ११००० आत्महत्या व १५०० अपघात ); खेरीज एक लाख लोक

जखमी किंवा जायबंदी होतात. तीन लक्ष गुन्ह्यांमध्ये ही हत्यारे दरवर्षी अमेरिकेत वापरली जातात. दर तीन खुनांतले दोन खून कौटुंबिक कलहातून किंवा शेजाऱ्यांच्या भांडणांतून होतात, आणि कित्येक वेळा क्षुल्लक कारणांतून ते घडून येतात; या बंदुका व पिस्तुले हाताशी नसती, तर असले खून झाले नसते— अशी आकडेवारी व माहिती देऊन अमेरिकेतील 'राष्ट्रीय-हत्यारबंदी आंदोलन-मंडळ' गेली कित्येक वर्षे वृत्तपत्रांतून, रेडिओ, टी. व्ही., सभा-संमेलनांतून व इतर मार्गाने भरपूर प्रचार करीत आहेत; 'या बंदुकांच्या व पिस्तुलांच्या खरेदीविक्रीवर व निर्मितीवर अंकुश आणा' असे पदोपदीने सरकारला विनवीत आहे. केवळ दहा डॉलर्स खिशात असले की, अमेरिकेत हँडगन विकत मिळविणे कठीण नाही. पतिपत्नींतले निम्मे खून या हँडगनमुळेच होतात. दर आठवड्याला अमेरिकेत ४०० खून होतात, त्यांतले एक-तृतीयांश खून काही कारण नसताना होत असतात! दर लक्ष लोकवस्तीत, दरवर्षी होणाऱ्या खुनांचे सरासरी आकडे पुढीलप्रमाणे आहेत: अमेरिका ९.७, जपान १.६, ब्रिटन १.३, पश्चिम जर्मनी १.३. हत्यारबंदीचे कडक कायदे इतर देशांत असल्याने तेथे खून कमी होतात. अमेरिकेत अशीच शिथिलता कायद्यात राहिली तर येत्या पाच-सहा वर्षांत, अमेरिकेतील प्रत्येक घरामध्ये गुन्हा घडून येणे शक्य आहे, असे भयानक भाकित 'ब्यूरो ऑफ जस्टिस स्टॅटिस्टिक्स' या संस्थेचे पूर्वीचे संचालक हॅरी स्कार या पंडिताने वर्तविले आहे!

या हिंसाचाराने केवढी घबराट व दहशत अमेरिकेतील सर्व शहरांत निर्माण झाली आहे, त्याचे वर्णन करताना अमेरिकेतील मुख्य न्यायाधीश श्री. वॉरेन बर्गर यांनी तर अलीकडे असे उद्गार काढले की 'इराणमध्ये अमेरिकनांना ओलिस ठेवण्यात आले, त्याची सर्वत्र मोठी ओरड झाली. पण आपल्या या सुधारलेल्या, श्रीमंत, स्वतंत्र, समंजस आणि पुढारलेल्या देशांत आपण सर्वजण ओलिस आहोत; आणि कड्याकुलपांच्या बंदोबस्तात दिवस कंठीत आहोत, अशी गुन्हेगारांची दहशत या अमेरिकेत शिगेला पोचली आहे!'

एवढे सर्व होऊनही, अमेरिकेत कडक हत्यारबंदी कायदे होतील, असा सुतराम् संभव आज तरी दिसत नाही. कारण पिस्तुल-कारखानदारांची

संघटना, पैसा, शक्ती, लॉबी अत्यंत प्रभावी असून, सरकारात त्यांचे फार वजन आहे. खुद्द प्रेसिडेन्ट रेगन हाही त्यांच्या बाजूचा आहे ! आता त्यांच्या-वरच हल्ला झाल्याने त्याचे मत बदलेल किंवा नाही, ते सांगता येत नाही. पण एकंदरीत आज तरी असे दिसते की, बंदुकांचे जबरदस्त उत्पादन व प्रसार, आणि निरर्थक खून व अपघात यांची ही बंदूकशाही अमेरिकेत 'साला-बादप्रमाणे' वर्षानुवर्षे मिरवीत राहणार आहे !

**टी. व्ही.ची गम्मतशाही :**

हिंसाचाराला खतपाणी घालून बंदुकांचा धंदा भरभराटीत ठेवायला, टी. व्ही. कारखानदारांचीही छान मदत होत असते !

आई, बाप, आणि टी. व्ही. असे तीन पालक अमेरिकन मुलांना असतात, असे म्हटले जाते. टी. व्ही.मुळे, अमेरिकन मुलांमुलींना विद्यार्थीदशेपासून हिंसाचाराचे बाळकडूच जणू मिळत असते ! टी. व्ही. कार्यक्रम पाहून, तेथील मुलांवर जे संस्कार होतात, त्यांचा अनेक वर्षे अभ्यास व संशोधन करून, डॉ. जॉइस सलिव्हन या पंडिता बाईने अलीकडे जे निष्कर्ष काढून प्रसिद्ध केलेले आहेत, ते वाचून मन विषण्ण होऊन जाते. वयाच्या पाचव्या वर्षा-पासून १५ व्या वर्षापर्यंतची मुले, त्या दहा वर्षांत सरासरीने तेरा हजार खून व मृत्यू टी. व्ही.वर पाहतात. मोठ्या माणसांचे कार्यक्रम ही मुले निदान निम्मा वेळ पाहात असतात. सतरा वय होईपर्यंत त्या मुलाने साडेतीन लक्ष जाहिराती टी. व्ही.वर पाहिलेल्या असतात. आणि शाळेच्या वर्गात जितके तास घालविले असतील, त्यापेक्षा अधिक तास टी. व्ही. कार्यक्रम पाहण्यात घालविलेले असतात.

अशा या टी. व्ही. दर्शनातून मुलावर जे संस्कार होतात, ते प्रामुख्याने पुढीलप्रमाणे असतात, असे जॉइसबाईचे म्हणणे आहे. (१) स्त्री आणि पुरुष यांचे संबंध निव्वळ लैंगिकच असतात; दुसरे काही नसते. (२) यशस्वी होणे म्हणजे खूप पैसे मिळविणे; त्यासाठी युक्त्याप्रयुक्त्या व लांड्यालबाड्या करा-व्यात. (३) आपले प्रश्न आपण सोडविण्याऐवजी, संस्थेला किंवा सरकारला दोष द्यावा; आणि जो आपला शत्रू असेल, त्याला जमल्यास ठार मारून टाकावे ! (४) दारिद्र्याची दृश्ये टी. व्ही. वर कधी दिसलीच, तर ती फार्स

किंवा विनोदी प्रसंगांच्या निमित्तानेच टी. व्ही.वर दिसतात; तेव्हा अनुकंपा किंवा सहानुभूती दूरच राहिली, पण साधी दारिद्र्याची जाणीवही त्यांना नीटपणे होत नाही.

अशा टी. व्ही. संस्कारांचे खोलवर विपरीत परिणाम दिसून आले नाहीत, तरच आश्चर्य ! अमेरिकेत जे गंभीर गुन्हे दरवर्षी घडून येतात, त्यांतले निम्म्यापेक्षा अधिक गुन्हे, १० ते १७ वयाच्या कोवळ्या मुलांनी केलेले असतात. १९७६ या एकाच वर्षात सत्तर हजार शिक्षकांवर घातकी हल्ले करण्यात या कोवळ्या गुंडांनी पुढाकार घेतला होता !

ए. बी. सी., एन्. बी. सी. आणि सी. बी. एस. या आद्याक्षरांच्या तीन प्रभावशाली टी. व्ही. कंपन्यांतर्फे चढाओढीने, झगझगीत टी. व्ही. कार्यक्रम व बातम्या देण्यात येतात. १९७३ साली या तीन कंपन्यांचा वार्षिक नफाच १२५ कोटी डॉलर्स इतका अफाट होता. कमर्शिअल्स ( जाहिराती ) हे त्यांचे प्रमुख उत्पन्न असते. हिंसा, व्यभिचार, आणि गुन्हेगारी यांचे पिसाटलेले थैमान, आकर्षक नंगेपणाने रोजच्या रोज टी. व्ही.वर मांडून अधिकाधिक गबर नफा कसा मिळवावा, इकडेच त्यांचे लक्ष आहे की काय, असे वाटू लागते. गुन्हेगारी व लैंगिक स्वैराचार शिकविणारी, व तो दाखवून मनाला रिझवू पाहणारी ती एक मोठी गम्मतशाही, एक मोठी शाळाच आहे, असे म्हणावेसे वाटते.

### ' माफिया 'चे राज्य ?

न्यायखात्याने केलेल्या अंदाजाप्रमाणे ' गुन्हेगारी ' हा एक मोठा धंदाच अमेरिकेत झालेला आहे. या ' माफिया ' संघटनेच्या हाती, निदान दहा हजार कायदेशीर कंपन्या व संस्था आहेत. चोरट्या मालाचा व मादक पदार्थांचा व्यापार त्या करतात, तसाच राजरोस व्यापारही करतात; आणि या सर्व संस्था मिळून २५ बिलियन डॉलर्सचा फायदा दरवर्षी मिळवतात ! आपल्याकडे जसा समांतर काळा पैसा सर्व मोठ्या शहरांतून काम करीत असतो, तसे हे माफियाचे समांतर राज्यशासन अमेरिकेत प्रतिष्ठितपणे काम करीतअसते; आणि प्रेसिडेन्ट कार्टर किंवा रेगन, डेमोक्रॅटिक किंवा रिपब्लिकन पक्ष, कोणाचाच या माफियाशी झुंज देण्याची ताकद नाही; किंवा शासनाचा काही भाग, त्या

माफियाशी हातमिळवणी करून असावा.

असे हे नागडे सत्य, गेली तीस–चाळीस वर्षे, वेळोवेळी अमेरिकन वृत्तपत्रांतूनही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मांडण्यात येत असते. अगदी अलीकडे ( टाइम्स ऑफ इंडिया, ५ एप्रिल ८१ ) श्री. गिरिलाल जैन या पत्रकाराने त्याचा आढावा घेतला आहे. पिढ्यान् पिढ्या, वर्षानुवर्षे, हे असेच चालत राहणार, गुन्हेगारी वाढतच राहणार, असे हे हृदयविदारक भविष्य आहे !

**गुन्हेगारीची श्रीमंती :**

गुंडगिरीला सादर लोटांगण घालून, हिंसाचाराची प्रतिष्ठा उज्ज्वलतेने उंचावण्यासाठी, अशी काही अजब जाहिरातीची नशा व जादू तिथले उद्योगपती ओसंडत असतात की, जगातल्या कोणत्याही प्रतिष्ठित जाहिरातदाराला त्यापुढे नतमस्तक व्हावेसेच वाटावे !

फेब्रु. १९७९ मध्ये ‘ द वॉरिअर्स ’ नावाचा, जणू काही गुंडांसाठी गुंडांनी बनविलेला, गुंडगिरीप्रवर्तक असा चित्रपट, हॉलिवुडमधील पॅरामाउंट कंपनीने प्रसिद्ध केला. हजारो बलिष्ठ गुंड सुरे व इतर हत्यारे परजून, क्रोधाने व आवेशाने तळपत तेजस्वितेने उभे आहेत, असे एक पोस्टर चित्र सर्व शहरांतून या चित्रपटाबरोबर प्रसिद्ध करण्यात आले, व या पोस्टरवर खालील अर्थाचा भडक मथळा मोठ्या अक्षरात छापण्यात (अर्थात इंग्रजीत) आला होता. “ हे रात्रीचे सुभेदार आहेत ! संख्येने एक लक्ष आहेत. पोलिसांना पाचांस एक असे पुरून उरतील. संपूर्ण न्यूयॉर्क शहराचा ताबा ते घेऊ शकतात ! आज रात्री ते ‘ वॉरिअर्स ’ कंपूचा नायनाट करणार आहेत ! ”

हे भडक मथळे वाचून व गुंडांची ती बेदरकार तेजस्वी पोस्टर्स पाहून, अनेक शहरांतून खरोखरचे गुंड, आणि हिंसेला चटावलेला तरुणवर्ग मोठ्या संख्येने चित्रपटगृहांतून तोबा गर्दी करू लागला. चित्रपट संपल्यावर बाहेर ज्या मारामाऱ्या झाल्या, त्यांत तीन तरुण मृत्यू पावले, आणि अनेक लोक चित्रपटगृहाबाहेर जखमी झाले !

तथापि या प्रकारांमुळे या चित्रपटाला बंदी झाली, किंवा शासनाने खंबीर पावले टाकली, असे काहीच झाले नाही ! या चित्रपटाला ४॥ कोटी रुपये खर्च आला, पण त्यातून ११॥ कोटींची प्राप्ती निर्मात्यांना झाली; तेव्हा

आता आणखी असे चित्रपट (गुंडविजय-लीला दाखविणारे) निघणार हे अपरिहार्य आहे, असे वर्णन मिटक्या मारीत एका साप्ताहिकाने केलेले आहे. म्हणजे एक एक नित्य नवे भडक प्रकार रुजू लागले की चित्रपटनिर्माते व टी. व्ही.ची मंडळी जणू काही निर्ढावतात, व लोकांनाही त्यात काही विशेष बिघडले, असे वाटत नाही.

**जोन्स-पंथाचे आत्महत्या-कांड :**

आपल्याकडे होणारे हरिजनांवरील अत्याचार व त्यांची ससेहोलपट, यांच्या उद्वेगजनक बातम्या आपण नेहमी वृत्तपत्रांतून वाचत असतो; व अशा बातम्या वाचून आपली मनेही जणू काही निर्ढावल्यासारखी झाली आहेत.

ही दलितांची पिळवणूक आहे, व ती थांबवली पाहिजे; असे म्हणून आपण स्वस्थ बसतो; पिढ्यान् पिढ्या असेच चालू आहे. त्यात बारीकसे समाधान एवढेच की, 'पिळवणूक' या शब्दातून या घटनांचा कार्यकारणभाव व स्पष्ट चित्र मनापुढे उभे राहते. परंतु अमेरिकेत जे निरर्थक हत्याकांड कित्येक वेळा दिसून येते, ते पाहून मनाचा गोंधळ होतो, व ही सर्व हिंसा कशासाठी चालली आहे तेच कळेनासे होते.

१९७८ च्या अखेरीस नऊशे (९००) अमेरिकन स्त्री-पुरुषांचा मृत्यू एका अत्यंत विचित्र परिस्थितीत घडून आला; ती घटना म्हणजे तर या निरर्थक हिंसाचाराचा व दहशतीचा एक कळसच आहे, असे म्हटले पाहिजे. 'येडबंबूंचे मृत्यू' एवढेच दोन शब्द, या चमत्कारिक मृत्यूंचे रहस्य समजण्यासाठी उपयोगी पडतील, असे वाटते.

कॅलिफोर्नियातील रेव्हरंड जिम जोन्स याने 'जन-मंदिर' (पीपल्स टेंपल) या नावाचा एक पंथ स्थापन केला होता. दक्षिण अमेरिकेतील गायना या देशातील जंगलामध्ये त्याने काही वर्षांपूर्वी एक आश्रम किंवा वसाहत स्थापन केली. शहरी, भांडवलशाही, आधुनिक नागरी जीवनापासून दूर राहून सामूहिक, आध्यात्मिक (?) जीवन जगण्यासाठी हा आश्रम स्थापण्यात आलेला आहे, असा गवगवा करण्यात आलेला होता. तथापि या आश्रमात राहिलेल्या अंदाजे हजार कुटुंबियांना कसलेही स्वातंत्र्य नाही, आणि रेव्ह. जोन्सची

हिंसात्मक हुकुमशाही तेथे चालते, असे गुप्त वृत्तान्त कॅलिफोर्नियातील आमदार रायन ( कॉंग्रेसमन ) यांच्या कानावर येत होते. आश्रमातून पळून अमेरिकेत परत आलेल्या एका साधकाचा खून करण्यात आला, असेही त्याला कळले. तेव्हा प्रत्यक्ष तेथे जाऊन शहानिशा करण्याचे रायन याने ठरविले. रायन आणि त्यांच्याबरोबर आलेल्या इतर मंडळींचे मोठे स्वागत आश्रमात करण्यात आले. मुलांचे क्रीडामंदिर, सुतारकामाचा हॉल, शेती, अशा सर्व विभागांना भेटी दिल्यावर बँडच्या निनादात राष्ट्रभक्तिपर गीते म्हणून मेजवानीही देण्यात आली. ' आश्रमवासीय येथे सुखी व आनंदात आहेत ', असे उद्‌गार रायनने आपल्या भाषणात काढले.

तथापि दहा-पंधरा मंडळी रायनच्या विमानातून आश्रम सोडून अमेरिकेत परत जायला निघाली, तेव्हा पाद्री जोन्स खवळला. त्याचा एक शिष्य सुरा घेऊन खासदार रायनला मारायला धावला, तेव्हा इतरांनी त्याला आवरले. परंतु या प्रसंगानंतरही दुसरे दिवशी जेव्हा दहा-पंधरा मंडळी जायला निघाली, तेव्हा रायन, त्याचे मित्र आणि जाऊ पाहणाऱ्या मंडळींचा सरसकट भीषण खून जोन्सच्या शिष्यांनी केला! जे निसटू शकले त्यांनी दिलेली वर्णने अंगावर काटा उभा करणारी होती. या खुनांच्या पाठोपाठ, सर्वच्या सर्व ९०० आश्रमवासीयांना, आपापल्या हाताने साइनाइडमिश्रित सरबत घेऊन आत्महत्या करण्यास पाद्री जोन्स याने भाग पाडले. जे थोडे कबूल झाले नाहीत, त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. लहानग्या मुलांना विष पाजून त्यांच्या मातांनी पाठोपाठ स्वतः विषमिश्रित सरबत घेतले ! मुलांच्या किंकाळ्यांनी हलकल्लोळ माजला; पण काही तासांतच आश्रमात सर्वत्र प्रेतांचे ढिगारे पडले ! जोन्स याने स्वतःला गोळी घालून शेवटी आत्महत्या केली. त्याची शिष्यांवर भयानक दहशत होती. त्याचे व्याख्यान नीट ऐकले नाही, तर त्या शिष्याला क्रूरतेने वागविण्यात येई. या दहशतीमुळेच नऊशे स्त्रीपुरुषांनी बालकांसह विषप्राशन केले, असे नंतर उघडकीला आले. ' पंधरा लोक आश्रम सोडून जातात, म्हणजेसुद्धा आपल्या कार्याचा पराजयच आहे.' अशा आसुरी अहंमन्यतेतून या मॅड पाद्र्याने जी महाभयानक सांघिक आत्महत्या घडवून आणली, तिला अमेरिकेच्याच काय, जगाच्या इतिहासातही दुसरी तोड नाही !

## विनाकारण खून करण्यातली गंमत

काहीही कारण नसताना, गोळ्या झाडीत, खून करीत सुटणे, हा अमेरिकन हिंसाकांडाला खास खुमारी आणणारा, आणि तेथल्या वृत्तपत्रीय सनसनाटीला विशेष आवडणारा एक पराक्रम समजला जातो; फोटो व नकाशासह, अशा पराक्रमांची साद्यंत वर्णने वृत्तपत्रांतून अधूनमधून सविस्तर छापून येतात.

ब्रेन्डा स्पेन्सर ही सोळा वर्षांची मुलगी सॅन डिएगो या शहरात जिथे राहात होती, तिच्या समोरच लहान मुलांची एक शाळा होती. एका सोमवारी, काहीही कारण नसताना, तिने हातात बंदूक घेऊन शाळेवर गोळ्या झाडायला सुरुवात केली. मुख्याध्यापक बर्टन रॅग, आणि एका कारकुनाला ठार केले. आठ मुले व एका पोलिसाला जखमी केले. कित्येक तास ती बंदूक घेऊन घरात बसून राहिली होती. शाळेतील सर्व मुले व मास्तर, भय-भीतीने गाळण उडून, जमिनीवर उताणी पडून राहिली. पोलिसांबरोबर ब्रेंडा फोनवर मधूनच बोलायची, व कित्येक तास पोलिस तिला पकडू शकले नाहीत. "मला सोमवार आवडत नाही; मी केवळ मजा म्हणून मुलांवर-मास्तरांवर गोळ्या झाडीत होते." असे तिने पोलिसांना सांगितले ! १२-७-७९ च्या टाइम साप्ताहिकात फोटोसह या प्रसंगाची रसभरित वर्णने आली आहेत. अशी अकारण हत्या नेहमीच या मॅड मॅड अमेरिकेत चालू असते, असे वृत्तपत्रांतील बातम्या वाचल्यावर दिसून येते.

ब्रेन्डाला सोमवार आवडत नाही, तेव्हा काय करायचे ? मग आपली बिचारी बंदूक चालवून स्वतःची करमणूक करून घेऊ लागली, तर काय हरकत आहे ? शिवाय घरात कित्येक महिने बंदूक नुसती पडून राहण्यापेक्षा तिचा काही तरी उपयोग होऊ लागला, हे चांगले नाही का ?

## गुन्हेगारीपुढे हात टेकले :

गुन्हेगारीच्या समस्येने अमेरिकेत आज अत्यंत भीषण स्वरूप धारण केलेले आहे. पोलीस, तुरुंग, प्रोबेशन, कोर्टे, व अनेक सार्वजनिक संस्था, अविश्रांत काम करीत आहेत; पैशालाही तोटा नाही. सोळा हजार कोटी रुपये दरवर्षी गुन्हेगारी थांबविण्यासाठी खर्च होत असतात ! नवी वैज्ञानिक उपकरणे व

नव्या गुप्त पद्धती, असे सर्व प्रकारचे बळ दिमतीला लावूनही, आज अशी दुःखद परिस्थिती आहे की केवळ बारा टक्के गुन्हेगार पकडले जाऊ शकतात ! बाकीचे तसेच मोकाट सुटलेले असतात; त्यांना पकडता येणे शक्य झालेले नाही ! आणि जे पकडले जातात त्यांतल्या निम्म्या लोकांनाच शिक्षा होते; बाकीचे कोर्टातून निरपराधी म्हणून सुटतात. जे गुन्हे घडतात, त्यांतल्या निम्म्या गुन्ह्यांची पोलिसांना आधी खबरच मिळत नाही; कारण खबर देणे म्हणजे नुसतीच कटकट; त्यांतून काहीच निष्पन्न होत नाही, असे लोकांना वाटते. सर्वांत दुःखद गोष्ट अशी की, तुरुंगातल्या शिक्षेनंतर ९० टक्के कैदी पुन्हा गुन्हे करतात. त्यांच्या हृदयपरिवर्तनाचे किंवा पुनर्वसनाचे प्रयत्न निष्फळ ठरले आहेत.

ह्या सर्व अपयशांचा परिणाम असा झाला आहे की, अनेक शहरांतून गुन्हेगारीचे प्रमाण सतत वाढते आहे. १९७० ते १९७५ या पाच वर्षांमध्ये घरफोडी, जबरी चोरी, बलात्कार, हिंसाचार यांचे प्रमाण ३० ते ४० टक्के इतक्या भयानक वेगाने वाढले आहे.

१९६५ साली प्रेसिडेन्ट जॉन्सनने काँग्रेसला उद्देशून खास आवाहन केले होते की, "गुन्हेगारी हा जनतेचा एक नंबरचा शत्रू आहे. त्याचे समूळ निर्मूलन करण्यासाठी आपण अधिकाधिक लोकांना पकडले पाहिजे; तुरुंगात जाणे, बाहेर पडल्यावर पुन्हा गुन्हा करून पुन्हा तुरुंगात जाणे, या दुष्ट वर्तुळाला आळा घातला पाहिजे. हा गुन्हेगार पुन्हा गुन्हा करण्याकडे वळू नये, यासाठी नवे मार्ग शोधून प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे." परंतु १९८१ साल आता उजाडले, तरी या परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी दिवसेंदिवस गुंडांची भयंकर सत्ता अप्रतिहतपणे वाढतच जाणार, असे स्पष्ट दिसते. रॉजर लॅनफिअर या कॅलिफोर्नियातील निष्णात वकिलाने १९७९ मध्ये "फ्रीडम फ्रॉम क्राइम" नावाचे पुस्तक, तुरुंगातील काही प्रत्यक्ष प्रयोग व अनुभवांनंतर प्रसिद्ध केलेले आहे ( नेलेन पब्लिशिंग कंपनी, न्यूयॉर्क ), त्या पुस्तकात ही अद्ययावत माहिती देऊन त्याने बरेच मनन–चिंतन केले आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की, महर्षी महेश योगी यांच्या ध्यानपद्धतीचे शिक्षण व नियमित ध्यानाभ्यास तुरुंगांतील कैद्यांकडून करून घेतल्यानंतर त्यांचा शारीरिक व मानसिक तणाव कमी होऊन त्यांना चांगले वळण लागू लागते, असे आता अमेरिकेत

अनेक तुरुंगातील प्रयोगांनंतर दिसून आले आहे, व त्यांची सविस्तर माहिती या पुस्तकात या वकीलमहाशयांनी दिली आहे.

समाजशास्त्रज्ञ, डॉक्टर्स, तुरुंगातील अधिकारी, अशांच्या संयुक्त चर्चा व अभ्यासातून, अमेरिकेतील फॉलसम, स्टिलवॉटर, लॉमपॉक, मिलन ( मिशिगन ) अशा अनेक ठिकाणच्या तुरुंगांतील कैद्यांवर झालेल्या ध्यानाभ्यासाच्या प्रत्यक्ष अनुभवातून, कैद्यांना स्वत: जे वाटले व इतरांना दिसू लागले, ते निष्कर्ष पुढीलप्रमाणे होते—

( १ ) तुरुंगातील नियम पाळण्याबाबत कैद्यांनी कमी कुचराई केली.

( २ ) कैदी कमी धूम्रपान करू लागले, व त्यांची झोप सुधारली.

( ३ ) त्यांचा तणाव, कलह, आणि आक्रस्ताळेपणा कमी झाला.

( ४ ) शिक्षण, उद्योग, दैनंदिन कामे, यांत विधायक वृत्तीने अधिक वेळ देऊ लागले.

( ५ ) त्यांची मानसिक शांती व स्थिरता वाढल्याने, तुरुंगातील एकंदर वातावरण सुधारल्याचे दिसून आले.

मुक्तानंद यांच्या सिद्धयोगाचे, नामस्मरणाचे व मंत्रपठणाचे काही प्रयोगही, अमेरिकेतील तुरुंगांतून कैद्यांवर करण्यात आलेले आहेत.

## येडबंबूंची अमेरिका

असे हे काही तुरळक चांगले प्रयोग यशस्वी होत आहेत, हे खरे आहे; पण एकंदरीत त्याचे प्रमाण अद्याप कमीच आहे. गुन्हेगारांचे राज्य, लष्करशहांचे व कारखानदारांचे राज्य हीच अमेरिकेतली खरी वस्तुस्थिती आहे. शासनाचा त्यांच्यावर फारसा अंकुश नाही; आणि सामान्य माणूस प्रवाहपतित होऊन, ताटाखालचे मांजर होऊन, येडबंबूप्रमाणे त्यांतील सुखदु:खांचा निमूटपणे स्वीकार करीत आहे, असे हे दुर्दैवी चित्र आहे. लोकांसाठी, लोकांनी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही, अशी सरळ–सोपी व्याख्या आहे. अमेरिकेत अशी लोकशाही आहे असे दिसून येत नाही.

परंतु भारतासारख्या गरीब देशातही श्रीमंतांची श्रीमंती व गरिबांची गरिबी वाढते आहे. जगातील भूमी, संपत्ती, साधने यांची विषम वाटणी जोपर्यंत सुधारत नाही, तोपर्यंत जगातले दारिद्य व उपासमार नाहीशी होणे

शक्य नाही, असे सुसन जॉर्ज या विदुषीने बजावले आहे.

'हाउ दि अदर हाफ डाईज– दि रिअल रीझन्स फॉर वर्ल्ड हंगर' या आपल्या पुस्तकात सुसन जॉर्ज म्हणते की, दर दिवशी दहा हजार माणसे आपल्या जगात उपासमारीने मरत असतात. इसवी सन दोन हजार जरी उजाडले, तरी ही उपासमार अशीच चालू राहणार आहे, व विषमता वाढणार आहे, असे ती म्हणते.

## अलव्हिन टॉफलरची 'तिसरी लाट':

'फ्यूचर शॉक' या गाजलेल्या पुस्तकाचा विचारवन्त अमेरिकन लेखक अलव्हिन टॉफलर याने १९८० साली 'दि थर्ड वेव्ह' (तिसरी लाट) हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. इ. स. २००० सालच्या अमेरिकेच्या व जगाच्या भवितव्याकडे तो एका वेगळ्या अभ्यासपूर्ण अशा दृष्टिकोणातून पाहतो आहे.

आज भारतामध्ये जी अनेक आंदोलने, अस्थिरता, दिरंगाई, समस्या, संप, व राजकारणाचा खेळ दिसून येतो, त्यामुळे विचारवन्तांना उबग येतो, विफलता वाटते, देशाच्या भवितव्याबद्दल चिंता वाटते, असे आपण रोज पाहतो व वाचतो. पण टॉफलर आपल्या या 'तिसरी लाट' पुस्तकात म्हणतो की, अमेरिका, जपान, रशिया, युरोप सर्वत्र हीच अस्थिरतेची, असमाधानाची परिस्थिती आहे. या सर्व देशांतून अशीच भावना वाढते आहे की, राजकारणी मंडळी व पुढारी लोक जनतेच्या समस्या सोडविण्यास असमर्थ आहेत. महागाई, तेढ, प्रांताप्रांतांतील कलह, शस्त्रस्पर्धा, गुन्हेगारी, बेकारी, कोणतेच प्रश्न सुलभतेने सुटत नाहीत, किंवा सुटल्यास नवे प्रश्न उभे राहतात.

टॉफलर म्हणतो की, लोकशाही व हुकुमशाही– अशी सर्वच सरकारे निष्प्रभ ठरतात; कोणत्याही पक्षाचा प्रेसिडेन्ट निवडून आला तरी बहुतेक समस्या तशाच राहतात; कारण सरकारी संस्था व सरकारची घडण– सर्व काही कालबाह्य, जुनाट, गंजलेले असे झाले आहे. आगखी २०–२५ वर्षां-मध्ये हळूहळू बदल होऊन एक नवे जग उदयाला येईल. अगदी नव्या प्रकारची, लवचिक, विकेन्द्रित, बहुरूपी, अशी ती प्रभावशाली पण सर्व स्वातंत्र्य मानणारी, संशोधन व प्रयोग सतत करणारी जागरूक व अभिनव अशी लोकशाही एकविसाव्या शतकात उदयाला येणार आहे; व ती अपरि-

हार्य आहे, असे तो म्हणतो. अनेक लहानमोठे संघर्ष, चळवळी, पंथ, संघटना, नवनव्या विचारप्रणाली जगभर कार्य करतील, पेटत राहतील, विज्ञानाच्या स्तिमित करणाऱ्या प्रगतीतून उदयाला येतील. त्यांतून तिसरी लाट प्रस्थापित होईल व आजची निष्प्रभ, बुरसटलेली सरकारे, संस्था, कंपन्या, व चळवळी पूर्णपणे पालटून जातील, असे त्याचे भाकित आहे.

महाराष्ट्रातील एक अलीकडेच सुरू झालेले आंदोलन म्हणजे श्री. शरद जोशी यांची शेतकरी-संघटना. तंबाखू, कांदा, ऊस, तांदूळ व दूध यांचा उत्पादनखर्च लक्षात घेऊन योग्य भाव त्या शेतकऱ्यांना मिळावा यासाठी जबरदस्त ‘ रस्ता रोको ’ व ‘ जेलभरो ’ आंदोलन त्यांनी सुरू केले. स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेल्या ३३ वर्षांत असे हे आंदोलन शेतकऱ्यांनी कधीही यापूर्वी केलेले नाही; आणि कोणत्याही सरकारच्या वा पक्षाच्या पुढाऱ्यांना ते सुचले नाही. ‘ तिसरी लाट ’ काय असू शकते, त्याचे हे एक लहानसे उदाहरण आहे.

अशी ही नवी लाट अमेरिकेत येत्या २० वर्षांत जर बहराला आली आणि अमेरिकेतील अंतर्गत समस्या व आन्तरराष्ट्रीय शस्त्रस्पर्धा जर त्यामुळे आटोक्यात येऊ लागली तर जगभर त्या लाटेचे कल्याणकारी पडसाद उमटू लागतील यात शंका नाही. अमेरिका–रशियाचे सख्य व सलोखा वाढू दे, शस्त्रास्त्रखर्च निम्म्याने तरी कमी होऊ दे, अमेरिकेतील अंतर्गत हिंसाचाराला आळा बसू दे, भारत–पाकिस्तान व अमेरिका यांचे संबंधही सलोख्याचे राहून ‘ थंडे युद्ध ’ नाहीसे होऊ दे, अशी प्रार्थना करू या. असे जर २० वर्षांत घडून आले, तर अमेरिकेत ‘ पृथ्वीवरचा स्वर्ग ’ खऱ्या अर्थाने प्रस्थापित होऊ शकेल व भारतासारख्या देशांनाही अप्रतिहत प्रगती करणे सोपे जाईल असे वाटते.

पण १९८२ साली तरी चित्र उफराटे दिसते आहे !

**भारतावरील संकट :**

पेट्रोल व ऑइलच्या किमतीत प्रचंड वाढ परदेशांनी केल्याने भारताच्या आयातीला व अर्थकारणाला जबरदस्त तडाखा गेल्या दहा वर्षांत सोसावा लागला आहे. पण हे संकट काहीच नव्हे, असे महासंकट प्रेसिडेन्ट रेगन यांनी

पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरविण्याचा जो दुर्दैवी निर्णय घेतला, त्यातून आता भारतावर कोसळू पाहात आहे! आपल्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी अत्यंत प्रखरतेने या महासंकटाची जाणीव रेगनसकट अनेक जागतिक पुढाऱ्यांना व भारतीय जनतेला करून दिली आहे.

१९८२ ते ८७ अशा पाच वर्षांत २८८० कोटी रुपयांची अद्ययावत युद्ध-सामुग्री अमेरिकेतून पाकिस्तानला मिळणार आहे. ती थोपविण्याचे सारे समजुतीचे प्रयत्न असफल झाल्याने, आता अदमासे १२,६०० कोटी रुपयांचा असा एक तडाखेबंद शस्त्रास्त्रनिर्मितीचा व कोठारांचा कार्यक्रम हाती घेऊन आठ-दहा वर्षांत तो पुरा करण्याची नामुष्कीची पाळी व नाइलाजाचे संकट भारतावर गुदरले आहे.

भारताने ४,५०० कोटी रुपयांचे कर्ज १९८१ साली जागतिक बँकेकडून (मोनेटरी फंडाकडून) मंजूर करून घेतले, व त्यातून पेट्रोल दरवाढीने होणारी आयातीची कुचंबणा थांबविण्यात यश येईल, असे वाटत होते; पण आता शस्त्रास्त्रशाहीचे जे संकट कोसळत आहे, त्यामुळे भारताच्या सर्वांगीण प्रगतीला मोठी खीळ बसणार आहे यात शंकाच नाही.

परंतु अमेरिका व रशिया अशी दोन्ही राष्ट्रे या आपत्तीबाबत जबाबदार धरली पाहिजेत. अफगाणिस्तानात घुसलेले रशियन सैन्य व इथिओपिआ, व्हिएतनाम, अशा अनेक राष्ट्रांना अलिकडे रशियाने केलेला शस्त्रास्त्रपुरवठा पाहिला, तर रशिया म्हणजे काही अहिंसक गरीब गाय नव्हे, हे स्पष्ट होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

: ११ :

# अमेरिकेत जाऊ इच्छिता का ?

अमेरिकेत जाऊन आपले नशीब काढावे, जमल्यास तेथेच स्थायिक होऊन आपला संसार तेथे थाटावा, अशी अभिलाषा व ऊर्मी अनेक परदेशी तरुणांना जगभर कित्येक देशांतून वाटत असते.

अमेरिकेतली सुबत्ता, साऱ्या वस्तूंची रेलचेल, भरपूर पगाराच्या नोकरीची किंवा फायदेशीर धंद्याची संधी, अशी आकर्षणे तरुणांना व व्यापाऱ्यांना मोहवीत असतात. समृद्ध अमेरिकेला भेट देऊन 'जिवाची अमेरिका' करण्यासाठी व मित्रमंडळीला भेटण्यासाठीही साऱ्या देशांतून प्रवाशांची रीघ लागलेली असते. तथापि अमेरिकेत प्रवेश मिळविण्यासाठी अधिकृत 'व्हिसा' मिळविणे, दिवसेंदिवस जिकीरीचे होत चालले आहे, व प्रवासखर्चही खूप वाढत चालले आहेत, यात शंका नाही.

वास्तविक परदेशीयांचे लोंढे पिढ्यान्‌पिढ्या या देशात येत राहिले, व त्यांतूनच अमेरिकन राष्ट्राची उभारणी झालेली आहे. अंदाजे आठ पिढ्यांतून, ५ कोटी मंडळी आपापल्या देशांतून निघाली व अमेरिकेत येऊन स्थायिक

झाली. जर्मनीतून ७० लाख, इंग्लंड ५० लाख, इटाली ५०, आयर्लंड ४७, कॅनडा ४०, रशिया ३०, मेक्सिको २०, स्वीडन १३ लाख, फ्रान्स ७॥ लाख, असे प्रमुख आकडे आहेत. जपान, चीन, भारत, ऑस्ट्रेलिया, डेनमार्क, तुर्कस्थान, आफ्रिका, नेदरलंड, पोर्तुगाल, अशा प्रत्येक देशांतून पाच लक्षांपेक्षा कमी मंडळी अमेरिकेत गेली. एकवीस बावीस कोटी लोकसंख्या असूनही इतके उंच जीवनमान व श्रीमंती असलेला आज दुसरा कोणताही देश नाही. परदेशीयांना अमर्याद प्रमाणात येऊ दिले, तर हे उच्च जीवनमान आणि व्यक्तिस्वातंत्र्य टिकणार नाही, असे अमेरिकन शासनाला वाटणे साहजिक आहे. त्यामुळेच अनेक निर्बंध घालणे क्रमप्राप्त झाले आहे; आणि असे हे निर्बंध परदेशी विद्यार्थी, इंजिनिअर, व्यापारी यांना थोडेबहुत जाचक वाटणे हेही साहजिकच आहे. तथापि हे निर्बंध असले, तरी आशियाई राष्ट्रांना व भारतीयांना गेली दहा-बारा वर्षे, अमेरिकेची प्रवेशद्वारे अधिक प्रमाणावर खुली झाली आहेत, हे मान्य केले पाहिजे. प्रतिवर्षी शे-दोनशे भारतीय पूर्वी जाऊ शकत असत, ते १९८० साली अंदाजे तेवीस हजार भारतीय अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी गेले, असा हा मोठा फरक घडून येत आहे !

**वाढत्या प्रमाणात जाणारे भारतीय :**

१९६५ सालापूर्वी अमेरिकेत कोटा पद्धती होती. आशियाई देशांतून रीतसरपणे फार थोडे लोक दरवर्षी अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी जाऊ शकत असत. भारतातून फक्त शंभर माणसे दरवर्षी स्थायिक होण्यासाठी जाऊ देण्यात येत. पण १९६५ साली जो नवा इमिग्रेशन कायदा अमेरिकन कॉंग्रेसने पास केला, त्यामुळे सर्व देशांना समान संधी देण्याचे उदारमतवादी धोरण अंमलात आले. जुलै १९६८ पासून या कायद्याची कार्यवाही सुरू झाली. या कायद्यानुसार पश्चिम गोलार्धातून दरवर्षी जास्तीत जास्त– एक लक्ष वीस हजार माणसे येऊ द्यायची, अशी मर्यादा घालण्यात आली; पूर्वी कसलीच मर्यादा त्यांच्यावर नव्हती. याउलट पूर्व गोलार्धावर एक लक्ष सत्तर हजार इतकी जास्त वार्षिक मर्यादा मंजूर करण्यात आली; मात्र यांतील कोणत्याही एका देशातून एका वर्षात वीस हजारापेक्षा अधिक लोक अमेरिकेला स्थायिक होण्यासाठी जाऊ शकणार नाहीत. जे परदेशीय, अमेरिकन नागरिक झाले आहेत, त्यांचे

आईवडील, पत्नी, किंवा पती, यांचा समावेश या १७०,००० च्या मर्यादेत झालेला नाही. म्हणजे या १,७०,००० च्या पलीकडेसुद्धा अशी नातेवाईक मंडळी अग्रहक्काने अमेरिकेत जाऊन स्थायिक राहू शकतात.

१९६५ च्या या कायद्यामुळे, १९६८ ते १९८० या काळामध्ये युरोपिअनपेक्षा आशियाई नागरिक आता अधिक संख्येने अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी गेल्याचे दिसून येते; खालील टक्केवारी पाहा :

( संदर्भ : स्टॅटिस्टिअल ॲबस्ट्रॅक्ट ऑफ यू. एस्. ए. – सप्टेंबर १९७९ ची आवृत्ती )

| | १९६१ ते १९७० | १९७१ ते १९७७ |
|---|---|---|
| आशियातून गेलेले लोक ... | १३·४ टक्के | ३३ टक्के |
| युरोपमधून गेलेले लोक ... | ३७·३ ,, | २०·५ ,, |
| भारतातून गेलेले लोक ... | ०.९ ,, | ३·९ ,, |
| कोरिया व फिलिपाइन्समधून गेलेले लोक | ४·२ ,, | १४·५ ,, |

भारतातून अमेरिकेमध्ये १८२० ते १९७७ अशा एकूण १५८ वर्षांत अंदाजे १,५०,००० लोक कायम राहण्यासाठी गेले; परंतु त्यांतील बहुसंख्य मंडळी गेल्या दशकातच गेली आहेत, हे खालील आकड्यांवरून दिसून येईल :

| | | |
|---|---|---|
| १९५१ ते १९६० | मध्ये गेलेल्या भारतीयांची संख्या | ३१०० |
| १९६१ ते १९७० | ,, | ३१२०० |
| १९७१ ते १९७७ | ,, | ११३६०० |
| १९७० | ,, | १०१०० |
| १९७३ | ,, | १३१०० |
| १९७४ | ,, | १२८०० |
| १९७५ | ,, | १५८०० |
| १९७६ | ,, | १७५०० |
| १९७७ | ,, | १८६०० |

१९८० मध्ये तर वीस हजारांचा आकडा ओलांडून एक नवा उच्चांक भारतीय मंडळींनी प्रस्थापित केला आहे. म्हणजे २० हजारांची कायद्याची मर्यादा व त्याखेरीज अमेरिकन नागरिकांचे नातेवाईक असल्याने जाऊ शकणारे भारतीय असे एकूण अंदाजे तेवीस हजार भारतीय ग्रीन कार्ड घेऊन, म्हणजे

कायम स्थायिक होण्याची परवानगी घेऊन अमेरिकेत रवाना झाले.

असे असूनही अमेरिकेत जाण्यासाठी ‘ व्हिसा ’ मिळविणे फार कठाणी व त्रासदायक आहे, अशी सर्वसाधारण भावना आहे; त्यासंबंधी ‘ स्पॅन ’ मासिकाच्या जुलै १९७८ च्या अंकामध्ये स्पष्ट व सुरेख चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले आहे.

भारतीय विद्यार्थ्यांनाच व्हिसा मिळविण्यात सर्वात जास्त अडचणी येतात. स्पॅन मासिकातील लेखात अमेरिकन अधिकारी म्हणतो की, अमेरिकेत जाऊ इच्छिणारा भारतीय विद्यार्थी हा हुशार व डिग्री संपादन केलेला असतो. तो बरीच वर्षे अमेरिकेत राहून उच्च पदव्युत्तर शिक्षण घेतो, प्रत्यक्ष अनुभव नोकरीत मिळवतो आणि नंतर अमेरिकेत स्थायिक होण्याचा अर्ज करून त्यात यशस्वी होतो. १९७१ ते १९७५ या पाच वर्षात जे भारतीय विद्यार्थी अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी गेले, त्यांतले निदान २० टक्के तेथेच कायम स्थायिक झाले. त्यामुळे इंजिनिअर, डॉक्टर झालेल्या विद्यार्थ्यांना अलीकडे अमेरिकेत प्रवेश मिळण्यापूर्वी अनेक निर्बंधांना तोंड द्यावे लागते.

आपल्या डॉक्टर्सना एम्. बी. बी. एस्. ही डिग्री मिळते. या M.B.B.S.चा खरा अर्थ “ मेंब्रर्स ऑफ दि बेस्ट ब्रेन-ड्रेन सर्व्हिस ” असा आहे. असे गंमतीदार वर्णन एका टीकाकाराने केले आहे. कारण परदेशांत जाण्यासाठी त्यांची लागलेली रीघ !

## भारतीय डॉक्टर परदेशी का जातात ?

आपले ॲलोपॅथिक डॉक्टर्स व डेन्टिस्ट यांना परदेशांत खूप अधिक पैसे मिळतात, म्हणून ते जातात, किंवा आजपर्यंत जात होते, असा सर्वसाधारण समज आहे, व तो बहुतांशी खराच आहे. तथापि जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) या विषयाचा सखोल अभ्यास करून, जे निष्कर्ष १९८० साली प्रसिद्ध केलेले आहेत, ते खरोखरी चिंतनीय आहेत. या संघटनेचे म्हणणे असे की, भारतातील मेडिकल महाविद्यालयांतून ब्रिटिश पद्धतीने जे वैद्यकीय शिक्षण दिले जाते, त्यामुळे तो डॉक्टर हॉस्पिटलमध्ये, व शहरी विभागात काम करण्याला योग्य होतो, व त्याचा जास्त भर रुग्णांना बरे करण्यावर असतो. परंतु रोग होऊ नयेत, यासाठी तो फारसे काही करत नाही; आणि

ग्रामीण भारताकडे एकंदरीत त्याचे व सरकारचे लक्ष योग्य प्रमाणात गेलेले नाही. गेल्या तीस वर्षांत शहरांतून एक लक्ष तीस हजार डॉक्टरांच्या जागा हिंदुस्थानात निर्माण झाल्या, पण जिथे ७८ टक्के लोकसंख्या राहते, त्या ग्रामीण भागात फक्त तेहत्तीस हजार डॉक्टरांच्या जागा निर्माण करण्यात आल्या. वास्तविक ग्रामीण भागात दर लाख वस्तीला १ डॉक्टर देण्याची जरुरी आहे, पण तितक्या प्रमाणात सुविधा निर्माण करणे सरकारला शक्य झालेले नाही; त्यामुळे आज बारा हजार डॉक्टर्स बेकार असल्यासारखे आहेत, आणि कित्येक हजार डॉक्टर्स, अनेक परदेशांत जाऊन तेथेच व्यवसाय करीत आहेत. प्रतिवर्षी पास होणाऱ्या सुमारे बारा हजार डॉक्टर्सना भारतातच योग्य संधी देणे किंवा मिळणे आज तरी दुरापास्त वाटते; त्यामुळे या प्रकारच्या डॉक्टरांचे उत्पादन जरुरीपेक्षा जास्त प्रमाणात वर्षानुवर्षे होत आहे, ते कमी करावे; किंवा ग्रामीण गरजांना योग्य ठरतील असे नवे डॉक्टर निर्माण करावेत, व त्यासाठी शिक्षणातच परिवर्तन करावे, अशी सूचना जागतिक आरोग्य संघटनेने केली आहे. पण आपल्या डॉक्टरांची लॉबी अशा परिवर्तनाला विरोध करील, असे काही विचारवंतांना वाटते.

गेल्या काही वर्षांमध्ये अमेरिकेनेही परदेशी डॉक्टरांना प्रवेश देणे फार कठीण केले आहे. 'इ. सी. एफ. एम्. जी.' ही परीक्षा पूर्वी आशियाई देशातच देण्याची सोय होती; व ती पास झाली की अमेरिकेत जाणे भारतीय डॉक्टरांना सहजसाध्य होते; पण आता ही परीक्षा द्यायलासुद्धा अमेरिकेत जावे लागते, आणि त्याखेरीज 'व्हिसा क्वालिफाइंग परीक्षा' नव्याने वेगळी आता द्यावी लागते. त्यामुळे आपल्या डॉक्टर्सना अमेरिकेत जाऊन काम करणे दुरापास्त झाले आहे. इंग्लंडमध्येही आता आपल्या डॉक्टर्सना जाणे सुलभ राहिलेले नाही.

### इंजिनिअरांचा अधिक भरणा :

अमेरिकेत विद्यार्थी म्हणून प्रवेश मिळवून, नंतर तेथे कायम नोकरी मिळ विणाऱ्या भारतीयांचा आढावा १९७८ साली घेण्यात आला. तेव्हा अमेरिकन इमिग्रेशन अधिकाऱ्यांना असे दिसून आले की, इंजिनिअर विद्यार्थ्यांचा त्या पहिला क्रमांक लागतो; म्हणजे इंजिनिअरिंगची पोस्टग्रॅज्युएट डिग्री अमेरिके घेऊन, मग तेथेच नोकरी मिळवून स्थायिक झालेले इंजिनिअर अधिक प्रमाणा

आहेत. त्याखालोखाल, विज्ञानाच्या विविध शाखांतील पदवीधर, मग कॉम्प्यूटर प्रोग्रॅमिंग व बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन या विषयांतील पदवीधर असा अमेरिकेतील भारतीयांचा भरणा आहे. हे बहुतेक भारतीय उच्च शिक्षित असल्याने चांगला पगार मिळवितात; सर्वाधिक पगार मिळविणारी, अमेरिकेतील दहा टक्के लोकसंख्येची जी वरची श्रेणी आहे, त्यामध्ये आपल्या या भारतीयांचा अंतर्भाव होतो, हे लक्षात ठेवले पाहिजे. अशा वरच्या श्रेणीतील सुखवस्तू भारतीयांचा थोडासा हेवाही काही अमेरिकन मंडळींना वाटत असतो.

इंग्लंड व कॅनडामध्ये बस-कंडक्टर, फेरीवाले, झाडूवाले, ड्रायव्हर, हलकी कामे करणारे, कमी शिकलेले, अशा भारतीयांचा पुष्कळ भरणा आहे; विशेषतः पंजाबी व शीख मंडळी त्यात बरीच आहेत असे म्हणतात. परंतु अमेरिकेत उच्चशिक्षित, व प्रतिष्ठित पदावर असलेल्या भारतीयांचा भरणा अधिक आहे; आणि अमेरिकन कंपन्याही आपल्या हुशार भारतीय विद्यार्थ्यांना नेमून घेण्यात आणि त्यांना स्थायिक होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात उत्सुक असतात, असे दिसून येते.

इंग्लंड व कॅनडामधून वर्णविद्वेषाच्या व हाणामारीच्या बातम्या अधूनमधून येतात; त्यात भारतीय व पाकिस्तानी लोकांवर गोऱ्या तरुणांचे हल्ले झाल्याची क्वचित्प्रसंगी गोऱ्या मंडळीवरही हल्ले झाल्याची बातमी येते; अशा या तुरळक दंगलीमध्ये बहुधा आपल्या किंवा पाकिस्तानातील कमी शिकलेल्या व हलकी कामे करणाऱ्या मंडळींचा भाग असतो. उच्चशिक्षित डॉक्टर, इंजिनिअर, तंत्रज्ञ, यांच्या बाबतीत असले हाणामारीचे वर्णद्वेषी प्रकार सहसा घडून येत नाहीत, व एकंदरीत त्यांना चांगलीच वागणूक मिळते, असे अमेरिकेतील व कॅनडातील बहुतेक भारतीय मंडळींचे मत आहे; दंगलीसुद्धा फारच थोड्या होतात.

कॅनडातील सध्या प्रचलित असलेला इमिग्रेशन कायदा हाही काळ्यागोऱ्या वर्णद्वेषावर उभारलेला नाही. कॅनडात येऊन स्थायिक होऊ इच्छिणाऱ्या इसमाचे शिक्षण, तंत्रज्ञान, पारंगतता, वय, अनुभव, त्याची कौटुंबिक व इतर परिस्थिती अशा माहितीला प्राधान्य देऊन त्याला कॅनडात प्रवेश देण्यासंबंधी निर्णय घेण्यात येतो.

दरवर्षी पंचाहत्तर हजार परदेशीयांना कॅनडात प्रवेश देण्याची आवश्यकता

आहे; तसे झाले तरच कॅनडातील लोकसंख्या स्थिर व प्रगतिशील राहू शकेल, असा अंदाज कॅनडातील एका समाजशास्त्रज्ञाने व्यक्त केला आहे.

कॅनेडिअन व आशियाई इमिग्रंट यांचे संबंध चांगले कसे राहतील, या दृष्टीने एक सर्वांगीण अभ्यास श्री. भाऊसाहेब उबाळे या महाराष्ट्रीय गृहस्थाने केलेला आहे. कॅनडात स्थायिक झालेल्या या पंडिताचा अभ्यास व दृष्टिकोण कॅनेडिअन सरकारला फार उद्बोधक व उपयुक्त वाटल्याने, ' रेस रिलेशन्स कमिशनर ' अशी त्यांची नेमणूक कॅनेडिअन सरकारने केली. कॅनडातील ' ह्यूमन राइट्स कमिशन 'तर्फे त्यांची ही नेमणूक टोरोंटो येथे झालेली आहे. भारत–कॅनडा संबंध सुधारण्यासही त्यामुळे मदतच होणार आहे.

कॅनडात किंवा अमेरिकेत परदेशी व्यक्तींना एकदा प्रवेश मिळाला, की एकंदरीत भरपूर व्यक्तिस्वातंत्र्य असते, व मिळत राहते, हे मात्र मान्य केले पाहिजे. परदेशी विद्यार्थी किंवा इमिग्रंट यांना अमेरिकेत कसलेही आयडेंटिटी कार्ड बाळगावे लागत नाही, किंवा ऊठसूठ त्यांच्या चौकशा केल्या जात नाहीत. भारतातील कॉन्सलेट ऑफिसर, आणि अमेरिकेत प्रवेश करताना भेटणारा इमिग्रेशन ऑफिसर, असे दोनच अधिकारी कसून तपासणी करतात; त्यानंतर मग कसलीच चौकशी नसते. अनधिकृतपणे, किंवा परवानगीपेक्षा अधिक काळ राहणाऱ्या माणसाला, अमेरिकेतून परत मायदेशी सक्तीने व पकडून पाठवून देणे, असले प्रकारही सहसा होत नाहीत; त्यामुळे वरील दोन तपासण्या कडक व हडसून-खडसून केल्या जातात, किंवा कराव्या लागतात, असे अमेरिकन अधिकारी म्हणतात.

अमेरिकन इमिग्रेशन कायदा असेच धरून चालतो की, अमेरिकेत ' विद्यार्थी ' किंवा ' प्रवासी ' म्हणून तात्पुरता प्रवेश मिळवू इच्छिणारा इसम हा अमेरिकेत कायम वास्तव्यच करू इच्छितो; आणि तो कायम वास्तव्य करू इच्छित नाही, हे सिद्ध करण्याची जबाबदारी त्या परदेशी प्रवाशावरच कायद्याने टाकलेली आहे. अमेरिकेतील तात्पुरत्या वास्तव्यासाठी जो खर्च येईल, किंवा विद्यार्थ्याला शिक्षणासाठी जो खर्च येईल, त्यासाठी त्याने पुरेशी आर्थिक तरतूद केली आहे, हे सिद्ध करण्यासाठी पुरेसे कागदपत्र अधिकाऱ्यांपुढे सादर करावे लागतात. याखेरीज विद्यार्थ्यांचे शिक्षण, इंग्लिश भाषेवरील प्रभुत्व, घरची आर्थिक परिस्थिती व कौटुंबिक पाश, परत आल्यावर त्याला

भारतात नोकरी मिळेल की नाही, आणि केवळ शिक्षणासाठीच तो परदेशी जात आहे की नाही, अशी पूर्ण खात्री करून घेऊन मगच विद्यार्थ्याला अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी प्रवेश ( व्हिसा ) मिळू शकतो. व्यापाऱ्यांच्या बाबतीतही अशीच काळजीपूर्वक सर्व तपासणी करण्या येते. हा इसम अमेरिकेत कायम राहू इच्छितो, तात्पुरता नव्हे, अशी थोडीशीही शंका मनात आल्यास, त्याला व्हिसा नाकारण्यात येतो; म्हणजे केवळ कागदपत्रांवर सर्व अवलंबून आहे, असेही नाही. इतकेच नव्हे, तर समजा, एका विद्यार्थ्याला अशी तपासणी मुंबईत होऊन, व्हिसा मिळाला; आणि न्यूयॉर्कला उतरल्यावर त्याच्या सामानात अमेरिकन अधिकाऱ्याला जर कदाचित असे पत्र आढळून आले की, ‘ तू एकदा अमेरिकेत प्रवेश मिळव, मग आम्ही तुझी नोकरीची सर्व व्यवस्था करू ’– तर अशा या पत्राच्या आधारावर, न्यूयॉर्कचा तो अधिकारी त्या विद्यार्थ्याला अमेरिकेत प्रवेश नाकारू शकतो, आणि भारतात परत पाठवू शकतो ! भारतीय विद्यार्थी किंवा प्रवासी ज्या वेळी तात्पुरत्या वास्तव्याचा अर्ज अमेरिकन कॉन्सलेटसमोर करतो, त्या वेळी त्याचा हेतू काय असतो, हे कायद्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. तात्पुरत्या वास्तव्याचाच त्याचा हेतू आहे, हे त्या वेळी सर्व दृष्टीने सिद्ध झाले पाहिजे.

परंतु अमेरिकेतील तात्पुरते वास्तव्य चालू असताना त्या इसमाचा विचार बदलला, व त्याने कायम वास्तव्यासाठी अर्ज नंतर करण्याचे ठरविले, तर अशा अर्जाला कायद्याने पूर्ण मुभा दिली आहे; व असा अर्ज तेथे गेल्यावर विद्यार्थ्याने केला, तर योग्यतेनुसार त्याला ‘ ग्रीन कार्ड ’ मिळू शकते, म्हणजे कायम वास्तव्य करून, नोकरीधंदा करण्याची परवानगी मिळू शकते.

## ग्रीन कार्ड कसे मिळवावे ?

अमेरिकेत ‘ ग्रीन कार्ड ’ मिळवून राहिलेले, असे आजमितीला चाळीस लक्षाहून अधिक परदेशीय आहेत असा अंदाज आहे. ‘ नॉट फॉर इल्लीगल एलिअन्स ओनली– हाउ टु गेट ए ग्रीन कार्ड ’ या नावाचे पुस्तक १९७८ साली कॅपनेर व फील्ड या लेखकांनी प्रसिद्ध केलेले आहे, ( गोल्डन डोअर पब्लिकेशन, न्यूयॉर्क ). त्यामध्ये हा अंदाज दिला असून, ग्रीन कार्ड मिळविण्यासाठी वकिलांची व इतर मदत कशी मिळू शकते त्याचे पूर्ण मार्गदर्शन

आहे; तसे झाले तरच कॅनडातील लोकसंख्या स्थिर व प्रगतिशील राहू शकेल, असा अंदाज कॅनडातील एका समाजशास्त्रज्ञाने व्यक्त केला आहे.

कॅनेडिअन व आशियाई इमिग्रंट यांचे संबंध चांगले कसे राहतील, या दृष्टीने एक सर्वांगीण अभ्यास श्री. भाऊसाहेब उबाळे या महाराष्ट्रीय गृहस्थाने केलेला आहे. कॅनडात स्थायिक झालेल्या या पंडिताचा अभ्यास व दृष्टिकोण कॅनेडिअन सरकारला फार उद्बोधक व उपयुक्त वाटल्याने, 'रेस रिलेशन्स कमिशनर' अशी त्यांची नेमणूक कॅनेडिअन सरकारने केली. कॅनडातील 'ह्यूमन राइट्स कमिशन' तर्फे त्यांची ही नेमणूक टोरोंटो येथे झालेली आहे. भारत–कॅनडा संबंध सुधारण्यासही त्यामुळे मदतच होणार आहे.

कॅनडात किंवा अमेरिकेत परदेशी व्यक्तींना एकदा प्रवेश मिळाला, की एकंदरीत भरपूर व्यक्तिस्वातंत्र्य असते, व मिळत राहते, हे मात्र मान्य केले पाहिजे. परदेशी विद्यार्थी किंवा इमिग्रंट यांना अमेरिकेत कसलेही आयडेंटिटी कार्ड बाळगावे लागत नाही, किंवा ऊठसूठ त्यांच्या चौकशा केल्या जात नाहीत. भारतातील कॉन्सलेट ऑफिसर, आणि अमेरिकेत प्रवेश करताना भेटणारा इमिग्रेशन ऑफिसर, असे दोनच अधिकारी कसून तपासणी करतात; त्यानंतर मग कसलीच चौकशी नसते. अनधिकृतपणे, किंवा परवानगीपेक्षा अधिक काळ राहणाऱ्या माणसाला, अमेरिकेतून परत मायदेशी सक्तीने व पकडून पाठवून देणे, असले प्रकारही सहसा होत नाहीत; त्यामुळे वरील दोन तपासण्या कडक व हडसून-खडसून केल्या जातात, किंवा कराव्या लागतात, असे अमेरिकन अधिकारी म्हणतात.

अमेरिकन इमिग्रेशन कायदा असेच धरून चालतो की, अमेरिकेत 'विद्यार्थी' किंवा 'प्रवासी' म्हणून तात्पुरता प्रवेश मिळवू इच्छिणारा इसम हा अमेरिकेत कायम वास्तव्यच करू इच्छितो; आणि तो कायम वास्तव्य करू इच्छित नाही, हे सिद्ध करण्याची जबाबदारी त्या परदेशी प्रवाशावरच कायद्याने टाकलेली आहे. अमेरिकेतील तात्पुरत्या वास्तव्यासाठी जो खर्च येईल, किंवा विद्यार्थ्याला शिक्षणासाठी जो खर्च येईल, त्यासाठी त्याने पुरेशी आर्थिक तरतूद केली आहे, हे सिद्ध करण्यासाठी पुरेसे कागदपत्र अधिकाऱ्यांपुढे सादर करावे लागतात. याखेरीज विद्यार्थ्यांचे शिक्षण, इंग्लिश भाषेवरील प्रभुत्व, घरची आर्थिक परिस्थिती व कौटुंबिक पाश, परत आल्यावर त्याला

भारतात नोकरी मिळेल की नाही, आणि केवळ शिक्षणासाठीच तो परदेशी जात आहे की नाही, अशी पूर्ण खात्री करून घेऊन मगच विद्यार्थ्याला अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी प्रवेश ( व्हिसा ) मिळू शकतो. व्यापाऱ्यांच्या बाबतीतही अशीच काळजीपूर्वक सर्व तपासणी करण्यात येते. हा इसम अमेरिकेत कायम राहू इच्छितो, तात्पुरता नव्हे, अशी थोडीशीही शंका मनात आल्यास, त्याला व्हिसा नाकारण्यात येतो; म्हणजे केवळ कागदपत्रांवर सर्व अवलंबून आहे, असेही नाही. इतकेच नव्हे, तर समजा, एका विद्यार्थ्याला अशी तपासणी मुंबईत होऊन, व्हिसा मिळाला; आणि न्यूयॉर्कला उतरल्यावर त्याच्या सामानात अमेरिकन अधिकाऱ्याला जर कदाचित असे पत्र आढळून आले की, ' तू एकदा अमेरिकेत प्रवेश मिळव, मग आम्ही तुझी नोकरीची सर्व व्यवस्था करू '– तर अशा या पत्राच्या आधारावर, न्यूयॉर्कचा तो अधिकारी त्या विद्यार्थ्याला अमेरिकेत प्रवेश नाकारू शकतो, आणि भारतात परत पाठवू शकतो ! भारतीय विद्यार्थी किंवा प्रवासी ज्या वेळी तात्पुरत्या वास्तव्याचा अर्ज अमेरिकन कॉन्सलेटसमोर करतो, त्या वेळी त्याचा हेतू काय असतो, हे कायद्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. तात्पुरत्या वास्तव्याचाच त्याचा हेतू आहे, हे त्या वेळी सर्व दृष्टीने सिद्ध झाले पाहिजे.

परंतु अमेरिकेतील तात्पुरते वास्तव्य चालू असताना त्या इसमाचा विचार बदलला, व त्याने कायम वास्तव्यासाठी अर्ज नंतर करण्याचे ठरविले, तर अशा अर्जाला कायद्याने पूर्ण मुभा दिली आहे; व असा अर्ज तेथे गेल्यावर विद्यार्थ्याने केला, तर योग्यतेनुसार त्याला ' ग्रीन कार्ड ' मिळू शकते, म्हणजे कायम वास्तव्य करून, नोकरीधंदा करण्याची परवानगी मिळू शकते.

## ग्रीन कार्ड कसे मिळवावे ?

अमेरिकेत ' ग्रीन कार्ड ' मिळवून राहिलेले, असे आजमितीला चाळीस लक्षाहून अधिक परदेशीय आहेत असा अंदाज आहे. ' नॉट फॉर इल्लीगल एलिअन्स ओनली– हाउ टु गेट ए ग्रीन कार्ड ' या नावाचे पुस्तक १९७८ साली कॅपनेर व फील्ड या लेखकांनी प्रसिद्ध केलेले आहे, ( गोल्डन डोअर पब्लिकेशन, न्यूयॉर्क ). त्यामध्ये हा अंदाज दिला असून, ग्रीन कार्ड मिळविण्यासाठी वकिलांची व इतर मदत कशी मिळू शकते त्याचे पूर्ण मार्गदर्शन

करण्यात आले आहे.

'ग्रीन कार्ड' हे वास्तविक 'ब्ल्यू कार्ड' (निळे कार्ड) असते, पण ग्रीन कार्ड हीच संज्ञा लोकप्रिय व कायम झालेली आहे.

असे हे ग्रीन कार्ड मिळविण्यासाठी, आठ प्रकारच्या अग्रहक्कांची (प्रेफरन्स) तरतूद अमेरिकन कायद्यात केलेली आहे. सर्वप्रथम अग्रहक्क अमेरिकन नागरिकांच्या अविवाहित अपत्यांना दिलेला आहे. म्हणजे नागरिकांची मुले व मुली अधिक अग्रहक्काने ग्रीन कार्ड मिळवून अमेरिकेत कायम वास्तव्यासाठी प्रवेश करू शकतात. अमेरिकन नागरिक जन्मापासून असणे किंवा नंतर होणे, आणि ग्रीन कार्डर असणे यातील फरक लक्षात घेतला पाहिजे. ग्रीन कार्ड असल्यावर कायम वास्तव्य करून अमेरिकेत नोकरीधंदा करणे, घर व जमीन घेणे हे सर्व हक्काने करता येते; पण असा ग्रीन कार्डर अमेरिकेचा नागरिक नसतो. भारतीय नागरिक असूनही तो अमेरिकेचा ग्रीन कार्डर असू शकतो; मात्र काही विशिष्ट कालावधीनंतर ग्रीन कार्ड असणारा इसम इच्छेनुसार अर्ज करून अमेरिकन नागरिक होऊ शकतो.

ग्रीनकार्ड मिळविण्याचा सर्वप्रथम अग्रहक्क अमेरिकन नागरिकांच्या अविवाहित मुलांमुलींना आहे, हे वर सांगितले. त्याखालोखाल असलेले अग्रहक्क पुढीलप्रमाणे आहेत :

**दुसरा अग्रहक्क** (प्रेफरन्स) : अमेरिकेत ग्रीनकार्ड घेऊन राहणाऱ्या इसमाची पत्नी किंवा पती. कित्येक ग्रीनकार्डर भारतीय मुलगे भारतात येऊन लग्न करतात; तेव्हा पत्नीला ग्रीनकार्ड मिळवून अमेरिकेत जाता येते. परंतु लालफितीच्या प्रोसिजरमुळे, व कागदपत्रांना वॉशिंग्टनची मान्यता मिळावयाची असल्याने वेळ लागतो. बरीच लग्ने झाल्यास, लग्नानंतर ६–७ महिनेसुद्धा पत्नीला ग्रीनकार्ड मिळण्यासाठी, यादीतील नावानुसार थांबावे लागते, व त्यानंतर अमेरिकेत तिला प्रवेश मिळून मग पति-पत्नींचा संसार सुरू होतो. १९८० साली खूप भारतीयांचे अर्ज असल्याने असा विलंब झाला होता.

**तिसरा अग्रहक्क** : कला व विज्ञान शाखेतील विशेष प्राविण्य मिळवणारे परदेशीय. आपले डॉक्टर व इंजिनिअर विद्यार्थी अमेरिकेत शिक्षणानंतर स्थायिक होऊ इच्छितात, त्या वेळी बहुधा या अग्रहक्काचा त्यांना उपयोग

होतो. अमेरिकन सरकारच्या मजूरखात्याचे लेबर सर्टिफिकेटही त्यासाठी त्यांना मिळवावे लागते; म्हणजे अशा नोकरीसाठी पुरेसे अमेरिकन उपलब्ध नाहीत, असे ते सर्टिफिकेट असते.

**चौथा अग्रहक्क** : अमेरिकन नागरिकांची विवाहित अपत्ये.

**पाचवा अग्रहक्क** : अमेरिकन नागरिकांचे भाऊ व बहिणी (बरेच शीख नागरिक झाले असून, शेती, धंदे, नोकऱ्या असे सर्व व्यवसाय तेथे करीत असतात. हे शीख नागरिक भारतातील आपल्या भावा-बहिणींना अमेरिकेत या पाचव्या अग्रहक्काने, अधिक संख्येने नेत असतात, असे अमेरिकन अधिकाऱ्यांनी प्रसिद्ध केले आहे.)

**सहावा अग्रहक्क** : कसबी, बिनकसबी कामगार (यासाठी अमेरिकन लेबर सर्टिफिकेटची आवश्यकता असते.)

**सातवा अग्रहक्क** : निर्वासित (क्युबा, कोरिया इत्यादी कम्युनिस्ट राष्ट्रांतून मोठ्या प्रमाणावर निर्वासित या अग्रहक्काने अमेरिकेत जाऊन स्थायिक झालेले आहेत.)

**आठवा अग्रहक्क** : इतर राहिलेले, संकीर्ण अर्जदार. अग्रहक्क नसणाऱ्यामध्ये, स्वतःचे पैसे नेऊन अमेरिकेत धंद्यामध्ये ते गुंतविणाऱ्यांचा अंतर्भाव होतो. निदान ४०००० डॉलर्स (सव्वातीन लक्ष रुपये) तेथे गुंतविण्याची तयारी असली, तर अमेरिकेत प्रवेश मिळू शकतो. आफ्रिकेतून आलेल्या गुजराती मंडळींनी, त्याचप्रमाणे सिंधी, पंजाबी अशा व्यापारी मंडळींनी, अनेक धंद्यांतून या पद्धतीने चांगला जम अमेरिकेत बसविलेला आहे.

भारतीय विद्यार्थ्यांना मुक्तहस्ताने मदत करणारे वाटुमल फौंडेशन सुप्रसिद्ध आहे. हवाई बेटामध्ये त्यांचे मुख्य कार्यालय आहे. वाटुमल, पहुमल, सोगानी, मुरजानी अशी अनेक सिंधी नावे प्रसिद्धी पावलेली असून, आन्तरराष्ट्रीय व्यापारात त्यांनी पिढ्यान्‌पिढ्या मोठ्या उलाढाली करून भरपूर यश मिळविलेले आहे.

हाँगकाँगमध्ये मुख्य कार्यालय असलेल्या मुरजानी या पेढीने अमेरिकेतील 'व्हँडरबिल्ट' या धनाढ्य कुटुंबाशी सहकार्य करून मोठ्या प्रमाणावर अत्यंत अद्ययावत व उत्कृष्ट दर्जाच्या 'जीन्स' हाँगकाँगहून अमेरिकेला निर्यात करण्याचा साहसी उपक्रम हाती घेतला; आणि त्यात अमाप यश मिळ-

विल्याची सुरस कथा ‘ इंडिया टुडे ’ या हिंदी पाक्षिकाने प्रसिद्ध केली होती.

श्रीमती ग्लोरिया व्हँडरबिल्ट या बाई टी. व्ही.वर दिवसातून २० वेळा येऊन अमेरिकेत त्या जीन्सची जाहिरात करतात; न्यूयॉर्कच्या अनेक नामवन्त जीन कंपन्यांना लोकप्रियतेत त्यांनी मागे टाकले आहे. ‘ व्हॅन्डरबिल्ट फॉर-मुरजानी ’ या नावाने या जीन्स विकल्या जातात. ३६ डॉलर्सना जीन्सची ही जोडी विकतात (रु. २८८), १९८० साली ४०० कोटी रुपयांची विक्रमशाली विक्री अमेरिकेत झाली, आणि ती अजून वाढतेच आहे ! ३८ वर्षांचे श्री. मोहन मुरजानी यांचे हाँगकाँग व मकाव येथे सध्या बारा कारखाने आहेत.

**पराक्रमाचे नवे क्षितिज :**

हाँगकाँगचे मुरजानी, हवाईचे वाटुमल, आणि आफ्रिकेतील पटेल, यांच्यापासून स्फूर्ती घेऊन अनेक अस्सल भारतीय मंडळींनी व्यापारधंद्यांमध्ये अमेरिकेत जी नवी पावले टाकायला सुरुवात केली आहे, ती भारताची शान वाढविणारी आहेत, यात शंका नाही.

न्यूयॉर्कच्या ब्रॉडवे ते लेक्झिंग्टन ॲव्हेन्यूपर्यंत, २६ व्या रस्त्यापासून ३० व्या रस्त्यापर्यंत अंदाजे चारशे भारतीय दुकाने, पेढ्या व उपाहारगृहे आहेत, त्यांची एक भारतीय ‘ काळबादेवी ’च पसरलेली आहे ! ती आता इतकी स्थिर आणि सुप्रसिद्ध झालेली आहे की ‘ छोटा भारत ’ ( लिटल इंडिया ) असे अधिकृत नाव या विभागाला मिळेल असे दिसते. अमेरिकेतून भारतात येणारी मंडळी, हौस म्हणून किंवा स्वस्त मिळतात म्हणून, तेथून साड्या, सूटिंग, बुशकोट, शर्ट, टेप-रेकॉर्डर, कॅमेरा, रेडिओ, ब्लेड्स, रेकॉर्ड-प्लेअर, शेव्हिंग मशिन, कॅलक्युलेटर, अशी इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक उपकरणे भेटीसाठी बहुधा आणतात. लवंगा, केशर, बदाम अशा तिथे स्वस्त मिळणाऱ्या वस्तूही काहीजण आणतात. पूर्वी ज्यू मंडळींच्या दुकानांतून अशा वस्तू घेतल्या जात असत. पण आता भारतीय मंडळी हा व्यापार हळूहळू हाती घेत आहेत; येत्या पाच वर्षांत तर उपकरणांचा घाऊक व किरकोळ धंदा भारतीय मंडळींच्याच हातात प्रामुख्याने जाईल, असे दिसते ( इंडिया टुडे पाक्षिक, १६-७-८० ). गुजराती समाजानेच अर्थात यात आघाडी मारली आहे;

पटेल–देसाई–शहा–मेहता–कापडिया, अशी नावेच त्या व्यापारात झळकतात यात आश्चर्य नाही. बारा–चौदा तास काम रोज केल्याने, आणि ओव्हरहेड कमी राखल्यामुळे, टी. व्ही.सेट व रेफ्रिजरेटरसारख्या वस्तू ३० टक्के अधिक स्वस्त विकणेसुद्धा त्यांना कठीण जात नाही; म्हणजे केवळ भारतात परतणाऱ्या गिऱ्हाइकांनाच वस्तू विकणारे हे स्टोअर्स नसून सर्वसामान्य अमेरिकन जनतेमध्येही या दुकानांनी चांगले बस्तान बसविले आहे. न्यूयॉर्कच्या सबवे-वरील (भुयारी आगगाडी) वृत्तपत्र दुकानेही हळूहळू भारतीयांच्या हाती जात आहेत.

बिना रमानीसारख्या भारतीय महिलेने मोठ्या प्रमाणावर व्यापार करून अमेरिकेत नाव मिळवावे, हे आणखी एक आश्चर्य ! एअर इंडियाचे अधिकारी ॲंडी यांच्याशी तिचा विवाह झाला आहे. ब्लूमिंग-डे-सारख्या सुप्रसिद्ध अमेरिकन चेन-स्टोअर्सना ब्लाउज विकण्याची मोठी ऑर्डर मिळवून तिने आपल्या व्यापाराचा श्रीगणेशा केला. त्यानंतर तिने दहा हजार मायक्रोवेव्ह ओव्हन (दीड कोटी रुपयांच्या) अमेरिकेतून परदेशांत निर्यात केल्या. लंडनमध्ये तिचा भाऊ आहे, त्याच्या मदतीने ती छोटे टी. व्ही. सेट अमेरिकेत आयात करणार आहे. भारताला कमी किंमतीत ५ लक्ष टन डिझेल तेल विकून तिने आपल्या व्यापार धंद्यातील एक नवा उच्चांक प्रस्थापित केला. युरोप आणि दक्षिण अमेरिकेत मोठमोठ्या व्यापाऱ्यांशी तिच्या जशा ओळखी आहेत, तशाच त्या दिल्लीतील प्रथितयश व्यापारी पेढ्यांबरोबरही आहेत, असे ही बिना अधिकारवाणीने सांगते !

श्री. श्रीकुमार पोद्दार यांनी प्रकाशकासाठी "डायरेक्ट मेल"चे एक अभिनव तंत्र इतक्या यशस्वितेने वापरले आहे की, शिक्षण क्षेत्रामध्ये दरवर्षी तीन कोटी रुपयांचा (४ मिलियन डॉलर्स) धंदा ते करीत आहेत. प्रेसिडेन्ट निक्सनच्या कारकीर्दीत बंगला-देश-रिलीफ-फंड त्यांनी सुरू केला, व निक्सन-सकट अनेक राजकारणी पुढाऱ्यांचे सहकार्य मिळवून कित्येक कोटी रुपयांची मदत बांगला देशला मिळवून दिली.

श्री. अर्जुन मथराणी हे वयाच्या ३२ व्या वर्षी, सुप्रसिद्ध चेस मॅनहॅटन बॅंकेचे व्हाइस प्रेसिडेन्ट झाले; परदेशांतील बॅंकिंग व्यवहारामध्ये त्यांचे मत मोलाचे समजले जाते, आणि हेनरी किसिंजर व डेव्हिड रॉकफेलर यांच्याबरोबर

उच्च स्तरावरील बँक कमिश्यांवर ते काम करतात.

बिना रमानी, पोद्दार व मथराणी हे व्यापाराच्या क्षेत्रातील उदयोन्मुख असे नवे तारे व तारका आहेत; परंतु अमेरिकन क्षितिजावरील अनेक क्षेत्रांमध्ये तेजस्वितेने चमकणाऱ्या ताऱ्यांची यादी करायला आपण जर बसलो, तर मूठभर मांस अंगावर चढायला काही अडचण पडणार नाही; नोबेल पारितोषिक विजेते डॉक्टर हरगोविंद खोराना, ऑर्केस्ट्रा कंडक्टर झुबिन मेहता, खगोलशास्त्रज्ञ डॉक्टर चंद्रशेखर, भारतीय संगीत व सतार लोकप्रिय करणारे रविशंकर, अंधलेखक वेद मेहता, व लेखिका शान्ता रामराव, तत्त्ववेत्ते राजाराव, अशी सहज सुचणारी कित्येक नावे डोळ्यांपुढे येतात.

**ग्रेन-एड व ब्रेन-एड**

वॉशिंग्टनच्या अमेरिकन एम्बसीतले प्रमुख अधिकारी श्री. अशोक गोखले यांनी एका वाक्यात सुरेख वर्णन करून सांगितले की, अमेरिकेने भारताला ग्रेन-एड ( धान्य ) देऊन जितकी मदत दिली, त्यापेक्षा अधिक मदत भारताने अमेरिकेला ब्रेन-एड ( पंडित व तंत्रज्ञ ) देऊन केलेली आहे ! अमेरिकेनेही या हुशार मंडळींच्या कर्तृत्वाचे चीज केलेले आहे. म्हणूनच असे म्हणतात की, भारतीय मंडळींची अमेरिकेतील सर्व संपत्ती मोजली (घरे, बँक सेव्हिंग्ज, व्यापारातील गुंतवणूक इत्यादी) तर ती १० बिलियन डॉलर्स किंवा आठ हजार कोटी रुपये इतकी भरेल; या बाबतीत अमेरिकेतील ज्यू मंडळींच्या खालोखाल, परदेशीयांमध्ये आपलाच दुसरा नंबर लागेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**मोटेल आणि पटेल :**

त्रिनिदादमधून काही वर्षांपूर्वी बऱ्याच भारतीयांना गाशा गुंडाळून बाहेर पडावे लागले; त्यातली अनेक गुजराती मंडळी कॅलिफोर्नियात स्थायिक झाली; ‘ मोटेल ’ धंद्यात शिरून ती यशस्वी झाली आहेत. मोटरीतून प्रवास करतांना चटकन गाडी उभी करून, हॉटेलमध्ये काही तास, किंवा दिवस, विश्रांती घेता येईल, अशा छोट्या हॉटेलला अमेरिकेत मोटेल म्हणतात. दहा बारा खोल्यांचे, ऐन रस्त्यावरचे विश्रामगृह, प्रत्येक खोलीत फोन, टी. व्ही., स्वच्छ बिछाने अशी सोय, आणि बाहेर काही ठिकाणी पोहण्याचा तलाव, असा हा

सरंजाम असतो.

कॅलिफोर्नियातील हॉटेल्स व मोटेल्सपैकी दहा टक्क्यापेक्षा अधिक, म्हणजे पाचशेहून जास्त मॉटेल्स गुजराती मंडळींनी खरेदी करून चालवायला घेतली आहेत. गंमत अशी की, पटेल आडनाव असलेल्या मंडळीचाच त्यात जास्त भरणा आहे; तेव्हा मोटेलचा मालक पटेलच असणार, असे गंमतीने म्हटले जाते. इंग्लिश शिक्षण बेताचे असलेल्या गुजराती महिलासुद्धा मोठ्या हुशारीने व व्यावहारिक सावधतेने हे मोटेलचे काम सांभाळायला मदत करीत असतात. कॅलिफोर्नियाखेरीज इतरत्रही मोटेलचा धंदा, जरा कमी प्रमाणात, या मंडळींनी यशस्वितेने चालविला आहे.

आफ्रिकेतून अमेरिकेत गेलेली ही सधन व्यापारी मंडळी, व भारतातून गेलेले हुशार तंत्रज्ञ, डॉक्टर, इंजिनिअर साऱ्या अमेरिकेत व कॅनडात विखुरलेले आहेत, व एकंदरीत त्यांच्याबद्दल अमेरिकन मतही चांगले आहे. भारतीयांचे सौजन्य, उच्च शिक्षणातील प्राविण्य, कौटुंबिक जीवनातील स्थैर्य, व कष्टाळू स्वभाव यांमुळे अमेरिकन मंडळींना एकंदरीत आपल्याबद्दल आदर असतो, असेही म्हणता येईल. अशा या सधन, हुशार भारतीयांशी चांगले संबंध ठेवावेत, अशी इच्छा तेथील प्रमुख राजकीय व्यक्तींनी किंवा पक्षांनी आता प्रदर्शित केलेली दिसून येते. चांगल्या भविष्यकाळाची ही प्रसादचिन्हे आहेत.

## घरांचा व्यवसाय करणाऱ्या कर्तबगार गृहिणी :

अमेरिकेत घरगडी किंवा मोलकरणी नसतात; त्यामुळे तेथल्या गृहिणींना खरोखरच घरकाम स्वतःच दिवसभर करावे लागते; मात्र गॅस, वीज, पाणी, रेशन, दूध असली कसलीच टंचाई किंवा कटकट नसल्याने घरातली टापटीप मजेत ठेवता येते. इतकेच नव्हे, तर ते संभाळून कित्येक पति-पत्नी दोघेही दोन मोटरी ठेवून नोकऱ्या करीत असतात. त्याही पुढे जाऊन जर असे सांगितले की, आपापले घरदार सांभाळून इतरांची घरदारे भाड्याने देण्यात, किंवा विकत देण्याघेण्यात अमेरिकेत अनेक भारतीय गृहिणी चांगले पैसे मिळवीत असतात, तर अनेकांना आश्चर्य वाटेल, व त्यांचा हेवाही वाटेल; पण वस्तुस्थिती तशी आहे खरी. एकट्या कॅलिफोर्निया प्रांतात वीसपंचवीस गृहिणी एस्टेट एजंट म्हणून ( अमेरिकेत रिअल-एस्टेट एजंट म्हणतात ) चांगला व्यवसाय करीत

आहेत. भारतीय पुरुष या धंद्यात आहेतच, पण गृहिणीही आहेत, हे नक्कीच कौतुकास्पद आहे. 'इंडिया वेस्ट' या कॅलिफोर्नियातील साप्ताहिकाच्या ४ एप्रिल ८० च्या अंकात अशा कर्तबगार गृहिणींचा छान परिचय आला आहे; ॲना कृष्णमूर्ती, जोसी रूपावाला, पवन दत्त, देवी वेद, उषा सुखिजा, अलका पुरी अशी या महिलांची नावे आहेत.

रिअल एस्टेटचे लायसन्स मिळायला १० डॉलर्स इतकीच छोटीशी फी भरावी लागते. एक लक्ष डॉलर्स किंमतीच्या लहानशा घराचा एखादा जरी सौदा झाला, आणि दीड टक्का कमिशन जरी हाती लागले, तरी पंधराशे डॉलर्स उत्पन्न मिळते; म्हणजे काही थोडेथोडके नाही. रिअल एस्टेट कंपनीत नोकरीचा अनुभव घेऊन, किंवा या धंद्याचा शिक्षणक्रम पुरा करूनही काहीजण या धंद्यात पदार्पण करतात. आपल्या इच्छेनुसार फावल्या वेळात रोज फक्त दोन-चार तास हुशारीने काम करूनही या धंद्याचा श्रीगणेशा करता येतो. आणि कॅलिफोर्नियासारख्या सुवर्णभूमीत हा धंदा किफायतशीर होणार नसला, तर मग आणखी कोठे होणार? श्रीमती देवी वेद यांच्या दोघी मुली पूर्वी म्हणायच्या की, आम्हांला डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हायचे आहे. आता आईचे यश पाहून त्या म्हणतात की आम्हांला एस्टेट एजंट व्हायचे आहे!

रिअल एस्टेटमधील एक मोठा गडगंज उपक्रम म्हणून 'ओबेरॉय हॉटेल्स'चा येथे उल्लेख केला पाहिजे.

ओबेरॉय कंपनीने १९८० साली न्यूयॉर्कमधील बार्बिझॉन हॉटेल आठ कोटी रुपयांना विकत घेतले (१ कोटी डॉलर्स); आणि एका सौदी अरेबियन कंपनीच्या भागीदारीत न्यूयॉर्कमध्ये पाचशे खोल्यांचे एक नवे पंचतारांकित हॉटेल बांधण्याचा उपक्रमही १९८० साली ओबेरॉय कंपनीने सुरू केला, त्याला साडेनऊ कोटी रुपये खर्च येणार आहे. म्हणजे ओबेरॉय कंपनीची हिंदुस्थानात जेवढी हॉटेल्स आहेत, त्यापेक्षा बाहेरच्या देशांतच जास्त आहेत. ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, इजिप्त, श्रीलंका, इंडोनेशिया, टांझानिया, नेपाळ, स्पेन, ताहिती अशा अनेक ठिकाणी त्यांची हॉटेल्स आहेत. मुंबईच्या नरिमन पॉइंटवरील त्यांचे टोलेजंग पंचतारांकित ओबेरॉय–शेरॅटन हॉटेल्स अनेकांना माहीत असेलच. अमेरिकेतील शेरॅटन हॉटेल्सच्या सहकार्याने सुमारे पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी हे हॉटेल बांधले.

अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीयांमध्ये गुजराती मंडळींची संख्या सर्वांत जास्त आहे. त्याखालोखाल केरळीय, मग पंजाबी आणि मग इतर प्रांतीयांचा नंबर लागतो.

अमेरिकेतील महाराष्ट्रीय मंडळी बहुधा प्रतिष्ठित कंपन्यांतून तंत्रज्ञ, इंजिनिअर, प्राध्यापक, डॉक्टर, शास्त्रज्ञ, संशोधक इत्यादी कामे करीत असतात. काही तुरळक मंडळींनीच ट्रॅव्हल एजन्सी, रिअल एस्टेट, हिंदी कारागिरीची दुकाने, रेस्टॉरंट अशा धंद्यांत लक्ष घातलेले आहे.

केरळमधून अमेरिकेत जाऊन, एकट्या न्यूयॉर्कमध्येच सात हजार कुटुंबे स्थायिक झालेली आहेत. न्यूयॉर्कच्या हॉस्पिटलमध्ये दुपारच्या दुसऱ्या पाळी-मध्ये बहुधा केरळमधील नर्सेस काम करीत असतात, व मल्याळी भाषेतून त्यांच्या मजेत गुजगोष्टी चालू असतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर मल्याळी नर्सेस अमेरिकेत जाऊन स्थायिक झाल्या आहेत.

ग्रीन कार्ड मिळविलेली आणि अद्याप न मिळविलेली अशी सर्व भारतीयांची मोजदाद केली, तर अमेरिकेत साडेतीन लाख ते पाच लाख भारतीय असावेत, असा अंदाज न्यूयॉर्कमध्ये अलीकडे व्यक्त करण्यात आला. एकट्या न्यूयॉर्कमध्येच एक लाख भारतीय असावेत असा अंदाज आहे.

अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीयांमध्ये अंदाजे तीस हजार इंजिनिअर्स, वीस हजार डॉक्टर्स, व पंधरा हजार नर्सेस आहेत, असे एका पाहणीत आढळून आलेले आहे.

भारतातील सर्व प्रांतांतून, अमेरिकेच्या व कॅनडाच्या सर्व प्रांतांमध्ये, आपली ही मंडळी विखुरलेली असल्याने त्यांची वेगवेगळी मंडळे असणे हे अपरिहार्यच आहे. महाराष्ट्र-मंडळ, बंगाली मंडळ, अशी प्रांतवार, भाषावार मंडळे आहेत, त्याचप्रमाणे सर्व भारतीयांची विशिष्ट कार्य करणारी अशीही मंडळे व संस्था आहेत. गरीब विद्यार्थ्यांना मदत करणे, संगीतप्रेमी मंडळे, विवाह मंडळे, असे अनेक उद्योग चालू असतात. अमेरिकेत व कॅनडात, अशी पाचशेहून अधिक मंडळे व संस्था काम करीत आहेत. न्यूयॉर्कचे इंडिया ॲब्रॉड व न्यूज इंडिया, सॅनफ्रॅन्सिस्कोचे इंडिया वेस्ट, ही पाक्षिकेही छान चालतात. 'सालाबादप्रमाणे', पारशी मंडळींची पटेटी, बंगाल्यांची दुर्गापूजा, शीखांची वैशाखी, आपली गणेश-चतुर्थी व दिवाळी, असे वेगळाले कार्यक्रम उत्साहाने अमेरिकेत–कॅनडात साजरे

होत असतात. ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनाला सर्व प्रांतीय एकत्र जमून कार्यक्रम करतात. आम्ही १९७७ साली गेलो. तेव्हा सॅनफ्रॅन्सिस्कोच्या 'बे-एरिया'-मधील महाराष्ट्र-मंडळातर्फे 'स्नेहलतेची शिदोरी' ही एकांकिका, आणि विविध कार्यक्रम झाले होते. भारतातील नट-नट्या, संगीतकोकिळा व कलाकारही नेहमी येत-जात असतात. न्यूयॉर्क व टोरोंटो येथे सर्वच कार्यक्रम जोरदार होत असतात. शनि-रविवारी हिंदी सिनेमा, रेडिओवर हिंदी दुकानदारांच्या जाहिरातींसह हिंदी संगीताचा विविधरंगी कार्यक्रम, असे सर्व प्रकार चालू असतात.

**भारतीयांच्या समस्या :**

तथापि या सर्व विखुरलेल्या भारतीयांची आवळ्यांची मोट बांधणे, एक मध्यवर्ती दुवा निर्माण करणे, भाषा-प्रांत-व्यवसाय यांच्या मर्यादेपलीकडले एक सांघिक, सामूहिक व्यासपीठ निर्माण करणे, साऱ्या मंडळांचा व कार्यांचा आढावा घेऊन सिंहावलोकन करणे, हेही काम महत्त्वाचे समजले पाहिजे. न्यूयॉर्कमधील केरळीय इंजिनिअर ॲब्रॅहम याने या कामात पुढाकार घेतला आहे. तिथल्या ४५ शहरांतील सर्व मंडळांची डायरेक्टरी, त्याने दोन वर्षे खपून तयारी केली आहे. मे १९८० मध्ये भारतीयांचा मेळावा न्यूयॉर्कच्या शेरॅटन हॉटेलमध्ये भरविण्यातही त्याने पुढाकार घेतला. तीस प्रांतांतले १५०० भारतीय या मेळाव्याला हजर होते. रोहिणी रामनाथन् म्हणाली की, भारतीयांनी एकत्र येऊन जर आपली संघटना बांधली नाही, तर ब्रह्मदेश, केन्या, व युगांडांप्रमाणे 'भारतीय असंघटितांची उचलबांगडी' होणे कठीण नाही.

याउलट न्यूयॉर्कचे हार्ट-सर्जन डॉ. त्रेहान यांना असे वाटते की, भारतीय माणसे या देशात विखुरलेली आहेत, म्हणूनच त्यांनी अमाप यश मिळविलेले आहे. त्यांच्या लढाऊ संघटना उभ्या राहू लागल्या तर काही अमेरिकन संघटनांच्या डोळ्यांत हे यश खुपू लागेल, व पोटात दुखू लागेल; त्यामुळे भारतीयांना त्रास होण्याची शक्यता वाढेल.

अमेरिकेतील भारतीय कुटुंबांचे सरासरी वार्षिक उत्पन्न पंचवीस हजार डॉलर्स (दोन लाख रुपये) असते, आणि अमेरिकन कुटुंबातील सरासरी उत्पन्नापेक्षा हे उत्पन्न दुप्पट आहे, असे अभिमानाने सांगण्यात येते. तेथे

गेलेल्या भारतीयांना घरची ओढ वाटते; भारतीय सण, रीतिरिवाज, कौटुंबिक स्थैर्य, भारतीय आहारप्रकार, असे सर्व टिकवावे असेही वाटत असते; व काही जण अमेरिकेतून गडगंज पेन्शन घेऊन, भारतात शेवटी परतण्याची वाट पाहात असतात, हेही खरे. पण सुख-संपत्ति-यश यांनी बहरलेल्या त्यांच्या संसारामध्ये ज्या नव्या कौटुंबिक समस्या निर्माण होत आहेत, त्यांची समाधानकारक उकल अद्याप झालेली नाही, असेच म्हटले पाहिजे.

भारतातील त्यांचे आईवडील व इतर नातेवाईक यांच्यापासून या अमेरिकन-भारतीयांची एक प्रकारची फारकतच होते, असे म्हटले पाहिजे. कित्येक वर्षांतून केव्हा तरी एखादी गाठ पडणे, असा पायंडा पडल्याने संबंध दुरावतात. ‘ संध्या-छाया ’ या मराठी नाटकामध्ये भारताला पूर्णपणे दुरावलेल्या व अमेरिकेत स्थायिक झालेल्या तरुणाचे, आणि एकाकी पडल्याने अत्यंत व्यथित होऊन आत्महत्येस उद्युक्त झालेल्या वृद्ध आईवडिलांचे सुरेख चित्र नाटककाराने उभे केले आहे.

हे अतिरंजित चित्र आहे, आणि अशा आत्महत्या सहसा होत नाहीत, असा आक्षेप या नाटकावर काहीजण घेतात. वास्तविक पुष्कळ आईबाप अमेरिकेत मुलांकडे जातात, व काहीजण तेथे स्थायिकही होतात, हेही खरे आहे; आणि नोकरीधंद्याला अमेरिकेत मुले गेली नाही, तरीसुद्धा भारतीय आईवडिलांना मुलांच्या विभक्त कुटुंबामुळे एकाकी वाटणे, दोन पिढ्यांतला संघर्ष होणे, हे काही प्रमाणात सगळीकडे अपरिहार्यच असते, असेही म्हणता येईल. परंतु अमेरिकेतील जीवन व संस्कृती इतकी वेगळी आहे, आणि तिकडे जाणेयेणे आज इतके खर्चाचे व काही दृष्टींनी जिकिरीचे झालेले आहे की, आईवडील, मुले, नातवंडे यांचे संबंध आपल्याच देशात राहिल्याने जितके जवळचे राहतात, तितके अमेरिकेतल्या भारतीय कुटुंबाशी राहू शकत नाहीत यात काही शंका नाही.

मात्र अमेरिकेतील भारतीयांच्या मुलाबाळांची जी नवी पिढी आज अमेरिकेत वाढत आहे, त्या पिढीला भारतीय संस्कृतीची किंवा भारताची ओढ फारशी वाटत नाही, ही खरी नवी समस्या तिथल्या भारतीयांपुढे उभी राहिलेली आहे. अमेरिकन टी. व्ही., अमेरिकन शाळा, व ‘ डेटिंग ’ करणाऱ्या मुली अशा संस्कारांतून वाढलेल्या मुलांमुलींना भारताची ओढ वाटणे

कसे शक्य आहे ? आणि ही पिढी जर सर्वस्वी अमेरिकन जीवन जगू लागली, तर मग कसं होणार, व काय करायचे ? अशा चिंतेने, अमेरिकेत खूप वर्षे राहिलेल्या पंचाहत्तर हजार भारतीय मातांना,– अशा या चिंतेने व काळजीने ग्रासलेले आहे, असे काहीजणांना वाटते. कॅलिफोर्नियातील शीख मंडळींनी अनेक गुरुद्वारे बांधली आहेत, इतकेच नव्हे, तर पंजाबी भाषेतून शिकविणाऱ्या शाळासुद्धा चालविलेल्या आहेत. परंतु भारतीय भाषांतून शाळा चालविणे, इतर ठिकाणी शक्य नाही आणि सोपेही नाही. नव्या पिढीचे अधिकाधिक अमेरिकीकरण होणार, आणि भारताला ती बहुतांशी दुरावणार, हे भविष्य अटळ आहे, असे दिसते. तथापि, असे हे संबंध दुरावणार असल्याने अमेरिकेत आपल्या मुलांनी जाऊ नये, त्यांची आपल्या देशातच जास्त जरुरी आहे; हुशार मुलांनी परदेशांत जाऊन स्थायिक होणे म्हणजे देशद्रोह आहे, अशा तऱ्हेचे दुसऱ्या टोकाचे अतिरेकी विचारही योग्य नाहीत, असे मला वाटते.

१९८१ साली अडुसष्ट कोटींहून अधिक माणसे, म्हणजे जगातील १५॥ टक्के लोकसंख्या भारतामध्ये रहात होती. पण भारताचे क्षेत्रफळ पाहिले तर ते जगाच्या २·४ टक्के इतकेच आहे.

एवढ्या अफाट लोकसंख्येने एवढ्याशा लहान देशातच रहावे, असे म्हणणे हे अन्यायाचे आहे. पुणेकरांनी पुण्यातच रहावे, उत्तम संधी मिळाली तरी मद्रास किंवा कलकत्त्याला जाऊ नये, असा आग्रह धरणे म्हणजे जसें कूपमंडूकवृत्तीचे समजले जाते, तसेच अमेरिकेबद्दल म्हणता येईल. दरवर्षी वीस हजार मंडळी भारतातून अमेरिकेत ( इमिग्रेशन कायद्यानुसार ) कायम राहण्यासाठी जाऊ शकतात; श्रीमंत अमेरिकेने हुशार तरुण परदेशीयांसाठी हे जे दरवाजे उघडलेले आहेत, त्या संधीचा पुरेसा उपयोग गेली एकदोन वर्षेच ( १९७९–८१ ) भारताने करून घेतलेला आहे; महाराष्ट्रीय तरुणही या कामात मागे पडू नयेत, असे म्हणता येईल. ही वीस हजार मंडळी दरवर्षी अमेरिकेत गेल्यामुळे, आपल्या देशातील उद्योगधंदे, हॉस्पिटल्स, किंवा ग्रामविकासाच्या अनेक योजना यांना तंत्रज्ञांची चणचण भासेल, अशी परिस्थिती आज तरी दिसत नाही. उलट आपल्याकडची बेकारी, टंचाई, व विफलता थोडीशी कमी होण्यालाच, या परदेशगमनाने मदत होणार आहे. परंतु अशी संधी मिळालेल्या

मंडळींनी आपल्या मायभूमीची, व इथल्या असंख्य गरीब जनतेची आठवण ठेवावी, जरूर पडल्यास भारतात परत येऊन आपल्या ज्ञानाचा व कार्यशक्तीचा मिशनरी वृत्तीने देशासाठी उपयोग करण्यास तयार व्हावे, अशी अपेक्षा बाळगणे रास्त ठरेल. आपल्या देशातून फार पूर्वीच्या काळातही जगभर भारतीयांनी संचार केलेला आहे; आणि गेली कित्येक वर्षे सिंधी, गुजराती, पंजाबी, व दक्षिणी मंडळी मोठ्या प्रमाणावर जगभर जात आहेत. तेव्हा अमेरिकेत व कॅनडातही 'बृहन्महाराष्ट्र-मंडळे' वाढत राहोत, अशीच इच्छा आपण व्यक्त करू या !

REFBK-0023507
REFBK-0023507

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
822
23406
23/8/
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## आणखी काही संग्राह्य पुस्तके

कॉन्टिनेन्टल

हे देश ही माणसे : शांता धांदरफळे

संचार : चिं. वि. जोशी

अफगाण-डायरी : प्रतिभा रानडे

बिकट वाट वहिवाट (नाटक) : व्यंकटेश माडगूळकर

तीर्थरूप महाराष्ट्र : महादेवशास्त्री जोशी

वाटेवरच्या सावल्या : वि. वा. शिरवाडकर

छायाबन : केशव मेश्राम

माझे पण विश्व : दीपा गोवारीकर

शरद-हास्य : शरद तळवदकर

नग्न-देवता (कम्युनिस्ट रशिया) : माधव लिमये

भारताचा शोध : पं. जवाहरलाल नेहरू

अनर्थाची फुले : शशिकला जाधव

चेरीचा मळा : (चेकॉव्ह) अनु. सुमती कानिटकर

पानदान : वसंत सबनीस



**विनायक विश्वनाथ गोखले**

# मॅड मॅड अमेरिका !

अमेरिका म्हणजे खरोखरी एक गहजब आहे ! इथल्या चतुरंग श्रीमंतांच कथा जितक्या हसवितात, तितक्याच गुन्हेगारीच्या व व्यसनांच्या व्यथा म पिळवटून टाकतात. शब्द थिटे पडावेत, अशी ही चक्रमी विक्रमी सुवर्णभूमी आहे

पण ही मॅड मावशी मोठी बहुरूपिणी आहे ! खट्याळ, खोडकर, खा मावशी. रसीली, प्रतिभावान, निष्ठावन्त मावशी. प्रेमळ, क्रूर, हावरट, आचरट, व्यसनी, निःस्वार्थी मावशी ! एकेक किस्से ऐकाल, तर पुनवेची सारी रात संपून जाईल, पण या चंदेरी-अंधेरी कथांची अमृतधारा संपणार नाही !

आणि इथले सारे मजेदार किस्से व विस्मयकथा रंगवून सांगत आहेत, श्री. विनायकराव गोखले, निवृत्त आय्. ए. एस्. अधिकारी. गोवा, महाराष्ट्र, बिहारमध्ये अनेकविध जबाबदाऱ्या संभाळून त्यांनी पाच पुस्तके लिहिली. कुटुंबनियोजनच्या ग्रामीण कार्याबद्दल सुवर्णपदक मिळविले.

गोखले पतिपत्नी, त्यांचे दोघे मुलगे व मुलगी असे सर्वांचेच पोस्ट ग्रॅज्युएट शिक्षण व पदवी अमेरिकेत पुरी झालेली. तीनदा पतिपत्नी अमेरिकेत जाऊन आले. गेली ४० वर्षे अमेरिकेसंबंधी लिखाण, भेटीगाठी व पाहुणचार. भारत ही जन्मभूमी, तर अमेरिकेला मावशी मानण्याइतपत दोन पिढ्यांचे संबंध आलेले.